क्रमांक : ७

# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग दोन

### सोमवार, दिनांक ३० जानेवारी, २०२३ / माघ १०, १९४४ (शके)

### लक्षवेधी सूचनांवरील प्रलंबित निवेदनांच्या प्रतींचे वितरण

७. सर्व सन्माननीय विधानसभा सदस्यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र विधानसभेचे सन २०२२ चे चतुर्थ (हिवाळी) अधिवेशन सोमवार, दिनांक १९ डिसेंबर, २०२२ रोजी विधान भवन, नागपूर येथे सुरु होऊन शुक्रवार, दिनांक ३० डिसेंबर, २०२२ रोजी संस्थगित झाले.

संस्थगित झालेल्या चतुर्थ सत्रातील एकूण २४७ स्वीकृत लक्षवेधी सूचनांचे जोडपत्र दिनांक ३० डिसेंबर, २०२२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले. त्यापैकी ४४ निवेदने मा.सदस्यांना टपालखणाव्दारे त्याचदिवशी वितरीत करण्यात आली होती व एकूण २०३ लक्षवेधी सूचनांची निवेदने प्रलंबित होती. त्यापैकी ५५ लक्षवेधी सूचनांची निवेदने शाखेत प्राप्त झाली असून ती यासोबत वितरीत करण्यात येत आहेत.

**विधान भवन,**
**मुंबई,**
**दिनांक : ३० जानेवारी, २०२३**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

याची प्रत :

१. महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य.
२. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
३. संगणक कक्ष (website.)

लक्षवेधी सूचना क्र.४३ गृह (परिवहन) विभाग

## महाराष्ट्र विधानसभा

## सन-२०२२ चे चतुर्थ (हिवाळी) अधिवेशन

**श्री.प्रशांत ठाकूर,श्री.महेश बालदी,श्री.समीर कुणावार,श्रीमती मनिषा चौधरी,श्री. अमित साटम, वि.स.स.यांनी महाराष्ट्र विधान नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.४३ खालीलप्रमाणे आहे.:-**

""पनवेल (ता.पनवेल) येथील अतिशय महत्त्वाचे मानले जाणारे राज्य परिवहन महामंडळाच्या बस आगाराच्या नुतनीकरणाच्या कामाला मंजूरी मिळून बराच कालावधी होवूनसुद्धा अद्यापपर्यंत नुतनीकरणाच्या कामाला सुरूवात झाली नसल्याचे माहे डिसेंबर 2022 रोजी निदर्शनास येणे, अतिशय महत्त्वाच्या असणा-या या बस आगारात अनेक प्राथमिक पायाभूत सुविधांअभावी बस चालक, प्रवासी तसेच नागरिकांना अनेक गैरसोयींना सामोरे जावे लागत असणे, कोविड 19 च्या पूर्वी तसेच कोविड 19 च्या काळात जवळपास दोन वर्षे बस आगाराच्या नुतनीकरणाचे काम ठप्प झाले असणे, सध्यस्थितीत सर्वच व्यवहार व विकासकामे सुरू झाली असणे परंतु मंजूरी मिळालेल्या पनवेल बस आगाराच्या नुतनीकरणाच्या कामाला सुरूवात झाली नसणे, सदर बस आगाराच्या नुतनीकरणाच्या कामाबाबत वारंवार शासन दरबारी पाठपुरावा करूनसुद्धा संबंधीत विभागाच्या दुर्लक्षामुळेच बस आगाराच्या नुतनीकरणाच्या कामाला विलंब होत असणे, त्यामुळे बस आगारातील अनेक गैरसोयींमुळे नागरिक व प्रवाशांमध्ये पसरलेल्या चिडीच्या व असंतोषाच्या भावनेबाबत शासनाने तातडीने लक्ष घालून पनवेल बस आगाराचे नुतनीकरण करण्यासाठी करावयाची आवश्यक कार्यवाही व उपाययोजना याबाबत शासनाची प्रतिक्रिया.""

## निवेदन

## {श्री.एकनाथ शिंदे, मा.मुख्यमंत्री (परिवहन)}

राज्यातील बसस्थानकांच्या आधुनिकीकरणाच्या मोहिमेअंतर्गत राज्यात विविध १३ ठिकाणी आधुनिक सुविधायुक्त बसतळ उभारण्याच्या प्रस्तावास महामंडळ ठराव क्र.२०१६:०५:०६, दि.१८/०५/२०१६ नुसार मान्यता देण्यात आली आहे. पनवेल येथे वाहतूकीची गरज लक्षात घेवून सध्याच्या बसस्थानक, आगार व कार्यशाळा या आस्थापनांची पुनर्बांधणी सार्वजनिक-खाजगी-सहभागातून (PPP) प्रस्तावित असून त्यासाठी जाहीर ई-निविदा कार्यवाही करण्यात आली. पनवेल येथे महामंडळाच्या ताब्यात सुमारे ३.४५ हेक्टर क्षेत्रफळाचा भूखंड आहे. प्रस्तावित प्रकल्पामध्ये ३३ फलाटांचे बसस्थानक व प्रवाशांसाठी सर्व आधुनिक सुविधांचा अंतर्भाव करण्यात आलेला आहे. तसेच आगार कार्यशाळा व सेवा

सदनिकांची पुनर्बांधणीही अंतर्भूत आहे. सदर प्रकल्पाचा एकूण अंदाजित खर्च रु.२३५.०० कोटी आहे. सदरील प्रकल्पाचे बांधकाम महामंडळास विनामूल्य प्राप्त होणार असून त्या सह रु.९९.०० लाख रोख प्रिमियम प्राप्त झाला आहे.

प्रकल्पाकरीता निविदा मागवून ठेकेदार कंपनी "मे.इडुस पार्क इंटरनॅशनल प्रा.लि." यांची निवड करण्यात आली आहे. विकासकास दि.२८/०३/२०१८ रोजी स्विकृती पत्र देण्यात आले आहे.

बसस्थानकाचे काम सुरु करण्याच्या अनुषंगाने व प्रवाशांची गैरसोय होऊ नये याकरीता रा.प.पनवेल बसस्थानक घाट व कोकण मार्गावरील तसेच डोंबिवली-कल्याण मार्गावरील व उरण मार्गावरील प्रवाशांकरीता तीन स्वतंत्र शेड उभारण्यात आले असून रा.प.बसेसचे आगमन-निर्गमन सदर बसस्थानका मधून होत असून प्रवाशांची सोय करण्यात आलेली असून त्यासमोरील वाहनतळास कॉंक्रीटींग केलेले आहे. या व्यतिरिक्त बसस्थानकावर प्रवाशांकरीता चौकशी कक्ष उपलब्ध आहे. बसस्थानकावर सुलभ शौचालय तसेच स्वतंत्र प्रसाधनगृह बांधण्यात आलेले आहे. बसस्थानकावर प्रवाशांकरीता पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे. आगारामध्ये स्वतंत्र चालक/वाहक विश्रांतीगृह कार्यरत असून चालक/वाहकांची सोय करण्यात आलेली आहे.

स्विकृतीपत्र प्राप्त झाल्यानंतर प्रकल्पाकरीता आवश्यक असलेला विकासकरार करणेकामी विकासकाने विकास कराराकरीता आवश्यक कागदपत्रे अलिबाग येथील उपनिबंधक कार्यालयात सादर केली परंतु, विकासकास विकास करार करण्यास मुद्रांक शुल्क आकारण्याबाबत अडचणी आल्या. सदर बाबत स्पष्टता येण्यास बराच कालावधी गेला, अखेर प्रकल्पाचा विकास करार दि.०८/०३/२०२२ रोजी करण्यात आला आहे.

सन २०१९ मध्ये पनवेल बसस्थानक/आगाराचे नकाशे ले-आऊट मंजूरीकरीता जुन्या UDCPR नियमावलीप्रमाणे पनवेल महानगरपालिकेस सादर केले. दरम्यान डिसेंबर-२०२० साली नविन विकास नियमावली जाहीर झाल्याने पनवेल महानगरपालिकेकडून तांत्रिक छाननी केली असता सदर नकाशे नवीन UDCPR प्रमाणे तयार करुन सादर करणेबाबत पनवेल महानगरपालिकेकडून सुचीत करण्यात आले. आता जानेवारी-२०२२ साली नविन नियमावलीत काही बदलांचा समावेश करण्यात आल्याने नव्याने नकाशे तयार करणे आवश्यक होते. पनवेल महानगरपालिकेने सुचविलेल्या बदलांनुसार नवीन नकाशे विकासकाकडून बनविण्याची कार्यवाही सुरु आहे.'

सदर प्रकल्प सुरु होण्यास काही कालावधी लागणार असल्याने सदर काम सुरु होईपर्यंत बसस्थानकावरील / आगारातील पडलेले खड्डे कॉंक्रीटने भरणे तसेच चालक / वाहक विश्रांतीगृह, महिला विश्रांती गृहातील दुरुस्ती, आगारातील ड्रेनेज दुरुस्तीची कामे करणेबाबत विकासकास पत्र देण्यात आलेले असून महिला विश्रांतीगृहास रंगकाम करणेच्या कामास सुरुवात झालेली असून उर्वरित कामे सुध्दा तातडीने सुरु करणेबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

*****

3.

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२२ चे ~~तिसरे~~ (हिवाळी) अधिवेशन
चौथे

लक्षवेधी सूचना क्रमांक- ९१९

डॉ.देवराव होळी, विधान सभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधान सभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. ९१९ पुढीलप्रमाणे आहे. :-

"यावर्षी गडचिरोली जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झाल्याने व महापुरामुळे शेतीचे प्रचंड नुकसान झाल्याने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या पिकांचे पंचनामे करून तातडीने झालेल्या नुकसानीचा अहवाल सरकारला सादर करण्यात यावा असे प्रशासनाला आदेशित करणे, त्याप्रमाणे तालुका प्रशासनाने तलाठी, ग्रामसेवक व कृषी सहायकांवर पिकांचे पंचनामे करून तातडीने सरकारला झालेल्या नुकसानीचा अहवाल तातडीने सादर करण्यात यावा असे निर्देशित करणे, मात्र तलाठी, ग्रामसेवक व कृषी सहायकांनी शेतकऱ्यांना कोणतीही पूर्वसूचना न देता तसेच प्रत्यक्ष नुकसानग्रस्त पिकांचे पंचनामे न करता ज्यांचे नुकसानही झाले नाही त्यांची नावे पाठविणे व नुकसान झालेल्यांना मदतीपासून वंचित ठेवणे, आले त्यांचे अर्ज घेवून व आपल्या मर्जीतील लोकांना लाभ मिळावा यासाठी प्राधान्याने काम करून नुकसानीचा चुकीचा अहवाल पाठवून या मदतीच्या यादीमध्ये प्रचंड घोळ करणे, ज्यांचे पिक खरोखर बुडालेले होते त्यांना वगळून ज्यांचे नुकसान देखील झालेली नाही अशा लोकांची नावे पूरबुडीच्या यादीमध्ये समाविष्ट करून पुर बिडी मदतीच्या यादीत प्रचंड घोळ केलेला असणे, खऱ्या लाभार्थ्यांना पूरबुडीच्या मदतीपासून वंचित ठेवणाऱ्या तलाठी, ग्रामसेवक व कृषी सहायकांच्या या खोट्या अहवालाची सखोल चौकशी करून शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता, शासनाची उपाययोजना"

मा.मुख्यमंत्री यांचे निवेदन

गडचिरोली जिल्हयात माहे जून ते ऑक्टोंबर २०२२ या कालावधीत अतिवृष्टी व पुरामुळे शेतीपिकांच्या झालेल्या नुकसानीचे पंचनामे तलाठी, ग्रामसेवक, कृषी सहाय्यक, यांचे मार्फत पुर्ण करुन करण्यात आले असून ज्यांचे प्रत्यक्ष नुकसान झालेले आहे त्यांची नावे पूरपिडीतांच्या यादीत घेण्यात आलेली आहेत. जिल्हाधिकारी, गडचिरोली यांच्या अहवालानुसार कोणतेही पूरपिडीत मदतीच्या यादीतून सुटलेले नाहीत. तसेच चुकीच्या वा नुकसान न झालेल्या शेतक-यांची नावे पूरबाधित शेतक-यांच्या यादीत सामाविष्ट करण्यात आलेली नाहीत. तथापि, या अहवालानुसार गडचिरोली, चामोर्शी, अहेरी, सिरोंचा या तालुक्यात काही तक्रारी प्राप्त झालेल्या होत्या. त्यापैकी गडचिरोली, सिरोंचा तालुक्यातील तक्रारीचे निराकरण करण्यात आले असून चामोर्शी, अहेरी, तालुक्यात तालुकास्तरावर तक्रारीचे निराकरण करण्याकरिता चौकशीची कार्यवाही सुरु आहे. तसेच या प्रकारच्या तक्रारी उद्भवू नये व कोणताही बाधित शेतकरी मदतीपासून वंचित राहू नये, तसेच नैसर्गिक आपत्तीच्या वेळी मदत तातडीने वाटप करता यावी या

कारणास्तव यापुढे नैसर्गिक आपत्तीची मदत आधार लिंक पेमेंट सिस्टम (AEPS) व्दारे व ई-पंचनामाच्या आधारे करण्याचे प्रस्तावित आहे.

गडचिरोली जिल्हयात माहे जून ते ऑगस्ट २०२२ या कालावधीत अतिवृष्टीमुळे शेतिपिकांचे एकूण ४१,१७२.९५ हे.आर. क्षेत्र बाधित झाले असून एकुण ५४,६३७ शेतक-यांचे रू.७४०१.३२ लक्ष एवढे नुकसान झाले आहे. तसेच १५६५ शेतक-यांचे शेतजमीन खरडून गेल्यामुळे रू.१२८.३७ लक्ष इतके नुकसान झाले असल्याने त्याकरिता रू.७५२९.६९ लक्ष इतका निधी शासनाने मंजूर केला असून सदर रक्कमेपैकी रू.७४०९.३८ लक्ष एवढा निधी बाधित शेतक-यांना वितरीत करण्यात आला आहे.

तसेच, गडचिरोली जिल्हयात माहे सप्टेंबर २०२२ मध्ये अतिवृष्टीमुळे ८३.२० हे. आर क्षेत्र बाधित झाले असून एकूण २०५ नुकसानग्रस्त शेतक-यांना रू.१२.८१ लक्ष, तसेच माहे ऑक्टोंबर २०२२ या कालावधीत झालेल्या अतिवृष्टीमुळे १६६.६८ हे. आर क्षेत्र बाधित झालेले असून एकुण ५१४ शेतक-यांचे नुकसान झाले आहे. त्यानुसार शासन निर्णय, दि.१५.१२.२०२२ अन्वये रू.२४.६२ लक्ष वितरीत करण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे.

.......................

**महाराष्ट्र विधानसभा सन २०२२ चे चतुर्थ अधिवेशन**

**लक्षवेधी सूचना क्रमांक- १३२८**

**श्रीमती माधुरी मिसाळ, विधान सभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधान सभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्रमांक-१३२८ पुढीलप्रमाणे आहे -**

"पुणे शहरातील 103 पानशेत पूरग्रस्त सहकारी सोसायट्यांना भाडेपट्ट्यांनी देण्यात आलेल्या जमिनी मालकी हक्काने देण्याबाबत शासनाच्या वतीने 8 मार्च 2019 रोजी शासन निर्णयाद्वारे निर्णय घेण्यात आला, 103 सहकारी गृहनिर्माण संस्थांना भाडेपट्ट्यांनी देण्यात आलेल्या जमिनी मालकी हक्काने देण्याबाबतची कार्यवाही पूर्ण झाली नसल्याने शासनाने सदर कार्यवाही पूर्ण करण्यासाठी 21 मार्च 2022 रोजी शासन निर्णयाद्वारे तीन वर्षांची मुदत वाढ देण्यात येणे, या गृहनिर्माण सोसायटी व्यतिरिक्त अन्य पुरग्रस्थ सोसायटीच्या वतीने मालकी हक्काने जमिनी देण्याबाबत ची कार्यवाही शासनाच्या विचाराधीन असणे, मा जिल्हाधिकारी पुणे यांच्या कडून तसा प्रस्ताव शासना कडे पाठवण्यात येणे परंतु बापूजीनगर सहकारी पुनर्वसन संस्था मर्यादित या संस्थेतील सभासद यांच्या मालमत्ता पत्रकातील नोंदी हरकत अर्जदार श्री अंबादास सूर्यवंशी यांच्या अर्जावरून कमी करण्यात येणे, संबंधित सभासद हे गेल्या 35 ते 40 वर्षांपासून त्या ठिकाणी रहात असणे, अनेक सभासद यांच्या प्रॉपर्टी कार्ड वर 1981 पासून च्या नोंदी असणे, सोसायटीच्या मूळ सभासदांनी अथवा मालकांनी खरेदीखत, कुलमुखत्यार पत्र, ताबा साठेखत, नोट्री, समजुतीचा करार नामा करून आर्थिक रक्कम अदा करून खरेदी करण्यात येणे, परंतु हरकत अर्जदार ही व्यक्ती बापूजीनगर सोसायटी ची सभासद नसणे, सभासद नेणाऱ्या व्यक्तीकडून प्रशासनास दबाव टाकून सोसायटीच्या सभासद यांना नाहक त्रास देणे सुरू असणे, मा जिल्हाधिकारी यांनी पानशेत पूरग्रस्त सोसायटी यांना मालकी हक्काने जमिनी देण्याबाबत येणाऱ्या अडणीबाबत स्थानिक वि स स यांच्या बरोबर सातत्याने बैठक घेणे याबाबत शासनाकडे तसा प्रस्ताव पाठवण्यात येणे, अनधिकृत, बेकायदेशीर, घुसखोर, तसेच अन्य विषयांबाबत शासन स्थरावर निर्णय प्रलंबित असणे, पर्वती पुणे येथील पानशेत पूरग्रस्तांच्या पुनर्वसन मागासवर्गीय गृहनिर्माण संस्थांच्या मालमत्ता पत्रकामध्ये झालेल्या फेरफार नोंदणी तत्काळ रद्द करण्याबाबत स्थानिक वि.स.स. यांनी मा. मुख्यमंत्री, मा. पालकमंत्री पुणे, मा. विभागीय आयुक्त पुणे, मा. जिल्हाधिकारी पुणे, मा. जिल्हा भूमी अभिलेख यांना माहे डिसेंबर २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे मागणी करण्यात येणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाय योजना"

---

**मा. मुख्यमंत्री यांचे निवेदन**

पुणे शहरातील १०३ पानशेत पूरग्रस्त सहकारी सोसायट्यांना भाडेपट्ट्यांनी देण्यात आलेल्या जमीनी मालकी हक्काने देण्याबाबत शासनाच्या वतीने दि.०८ मार्च २०१९ रोजी शासन निर्णयाव्दारे निर्णय घेण्यात आला आहे. १०३ सहकारी गृहनिर्माण संस्थांना भाडेपट्ट्यांनी देण्यात आलेल्या जमीनी मालकी हक्काने देण्याची कार्यवाही पूर्ण झाली नसल्याने शासनाने सदर कार्यवाही पूर्ण करण्यासाठी दि.२१ मार्च २०२२ रोजी शासन निर्णयाव्दारे ३ वर्षांची मुदतवाढ देण्यात आली आहे.

या गृहनिर्माण सोसायटी व्यतिरिक्त अन्य पूरग्रस्त सोसायटीच्या वतीने मालकीहक्काने जमीनी देण्याबाबतची कार्यवाही शासनाच्या विचाराधीन असून पुणे शहरातील पानशेत पूरग्रस्तांच्या १०३ सहकारी गृहनिर्माण संस्थांना ९९ वर्षांच्या भाडेपट्ट्याने प्रदान केलेले भूखंड दि.०८ मार्च २०१९ व दि.२१ मार्च २०२२ रोजीच्या शासन निर्णयाप्रमाणे मालकी हक्काने देणेबाबतची कार्यवाही जिल्हाधिकारी, पुणे कार्यालयाकडून केली जात आहे. सदर कामी प्राप्त होणाऱ्या प्रस्तावाबाबत कार्यवाही करत असताना (१) अनाधिकृत / बेकायदेशीर सभासद, (२) सभासदाने परस्पर सोसायटीचे सभासदस्व बदलले बाबत, (३) अनोंदणीकृत दस्ताने झालेले हस्तांतरण, (४) घुसखोर / बिगर पूरग्रस्त सभासद, (५) अनाधिकृत भाडेकरू, (६) वाणिज्य वापराचे प्रयोजन व दराबाबत, (७) दिनांक ८ मार्च २०१९ नंतर झालेले अनाधिकृत हस्तांतरण, (८) मागासवर्गीय सोसायटीबाबत. (९) पूरग्रस्त सभासदाने दुबार लाभ / दोन घरे घेतलेबाबत असे मुद्दे निदर्शनास आले आहेत. सदर कामी अनेक लोकप्रतिनिधी यांचेकडून वारंवार निवेदन प्राप्त होत असून उक्त नमूद मुद्याबाबतीत शासन स्तरावरून धोरणात्मक निर्णय घेवून सुधारीत शासन निर्णय अथवा सुधारीत आदेशासाठी जिल्हाधिकारी पुणे यांनी दि.१०/१०/२०२२ रोजी शासनास सादर केलेला प्रस्ताव/अहवाल शासन स्तरावर विचाराधीन आहे.

ल.कृ.हि.पृ.

पुणे शहर पेठ पर्वती येथील पानशेत पूरग्रस्तांच्या पुनर्वसन कामी १०३ सोसायट्या पैकी मागासवर्गीय पूरग्रस्तांच्या विविध २१ संस्था स्थापन झालेल्या आहेत. त्यापैकी बापूजीनगर सहकारी पुनर्वसन संस्था मर्यादित ही एक संस्था आहे. मागासवर्गीय २१ सोसायटी यांना समाज कल्याण विभाग मार्फत PWR २१९ या योजने अंतर्गत अनुदान दिले गेले असल्याने या सोसायट्या मधील सभासद बदलास समाज कल्याण विभागाची पूर्व परवानगी घ्यावी असे आयुक्त समाज कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी माहे मे २०२२ मध्ये कळवले आहे. तसेच दि.०८ मार्च, २०१९ मधील तरतूद क्रमांक ३ मधील अनाधिकृत हस्तांतरण नियमित करणे बाबतची तरतूद या २१ मागासवर्गीय सोसायट्या ना लागू करू नका असा अहवाल समाज कल्याण विभाग यांनी शासनास सादर केला असून सदर अहवाल व जिल्हाधिकारी पुणे यांचा दि.१०/१०/२०२२ रोजीचा अहवाल यावर धोरणात्मक निर्णय घेणेकरिता शासन स्तरावर विचाराधीन आहे. बापूजीनगर सहकारी पुनर्वसन संस्था मर्यादित या संस्थेस मा. जिल्हाधिकारी यांचेकडील दि.११/०४/१९६२ चे आदेशानुसार उपरोक्त सहकारी संस्थेस स. नं. ७६ ते ८१ म्हणजेच न.भू.क्र. ३१३६ ते ३१४२, ३१६८ ते ३१७५, ३२६६ ते ३२७८ असे एकूण २८ भूखंड प्रदान करण्यात आलेले आहेत. अर्जदार श्री. अंबादास सुर्यवंशी, अध्यक्ष लहूजी आर्मी संघटना यांनी दि.०९/०६/२०२१ व दि.२२/०७/२०२१ रोजी मा. जिल्हाधिकारी, पुणे यांचकडे निवेदन दिले आहे. सदर निवेदने नगर भूमापन अधिकारी, क्र.१ पुणे कार्यालयाकडे निवेदनामध्ये नमूद विषयाबाबत कार्यवाही करणेबाबत पाठविणेत आली आहे. सदर निवेदन तसेच अर्जदार श्री अंबादास सुर्यवंशी, अध्यक्ष, लहूजी आर्मी संघटना यांनी दि.१०/०७/२०२१ रोजी सदरच्या मा.जिल्हाधिकारी पुणे यांचे परवानगी शिवाय घेण्यात आलेल्या नोंदी कमी करणे कामी नगर भूमापन अधिकारी, क्र.१ पुणे कार्यालयाकडे सादर केलेल्या हरकत अर्जाच्या अनुषंगाने मा. जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, पुणे यांचेकडे मा. जिल्हाधिकारी पुणे यांचे परवानगी शिवाय घेण्यात आलेल्या व ज्या भूखंडाबाबत रितसर भाडेपट्टा झालेला नाही अशा नोंदी कमी करणे कामी सदर फेरफार नोंदीचे पुनर्विलोकन करणेकामी नगर भूमापन अधिकारी, क्र.१ पुणे यांनी दि.०६/१०/२०२१ रोजी पुनर्विलोकन प्रस्ताव / अहवाल सादर केला होता. त्यानुसार मा.जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, पुणे यांचेकडील आदेश क्रमांक न.भू./का.वि.१३५९ पुनर्विलोकन/पर्वती/२०२१/३३८, दि.२५/०१/२०२२ रोजीच्या आदेशाने सदर नोंदींचे पुनर्विलोकन करण्यास परवानगी देण्यात आली होती. त्यानुसार नगर भूमापन अधिकारी, क्र.१ पुणे कार्यालयाकडून संबंधीतांना रितसर मुदतीच्या नोटिशीने कळवून दि.१९/०४/२०२२ व दि.२९/०४/२०२२ रोजी सुनावणी घेण्यात आलेली होती. सदर सुनावणी दरम्यान पूरग्रस्त मिळकतीवरील मूळ धारक बापूजीनगर सहकारी पुनर्वसन संस्था मर्यादित या संस्थेने अथवा लिजधारकांनी त्यांना हस्तांतरण झालेल्या मिळकतीबाबत मा.जिल्हाधिकारी यांचेकडील दि.११/०४/१९६२ च्या आदेशानुसार या हस्तांतरणास मा.जिल्हाधिकारी पुणे यांचेकडील परवानगी घेतलेबाबत कोणताही पुरावा व कागदपत्रे सादर केलेली नाहीत. सुनावणी दरम्यान सदरचे भूखंड हे महाराष्ट्र शासनाचे मालकीचे असून सदर संस्थेस भाडेपट्ट्याने दिलेले असल्याने मा. जिल्हाधिकारी पुणे यांची परवानगी न घेता बापूजीनगर सहकारी पुनर्वसन संस्था मर्यादित मधील काही मिळकतींवरील हस्तांतरण झालेले असल्याने हस्तांतरण नियमानुकूल करण्याबाबत शासनास मिळणारे अधिमूल्यभरना करणे आवश्यक होते परंतु, तशी कार्यवाही न झाल्याचे निदर्शनास आले. त्याबाबत यास्तव सदर सुनावणी अंती नगर भूमापन अधिकारी, क्र.१ पुणे या कार्यालयाकडून क्रमांक न.भू.अ.१ पुणे/प.भू.७/पर्वती/पुनर्विलोकन/२१/२२ दि.२०/०९/२०२२ रोजी नोंदी कमी करणेबाबतचा निर्णय दिला आहे. सदर निर्णयानुसार पुणे पेठ पर्वतीच्या आदेशात नमूद मिळकत पत्रिकेवर नगर भूमापन अधिकारी, क्र.१ पुणे कार्यालयाकडील फेरफार क्रमांक ८३२९ दि.०७/१०/२०२२ नुसार मिळकतपत्रिकांवर नोंद घेण्यात आली आहे.

मा. विधान सभा सदस्य श्रीमती माधुरी सतिश मिसाळ यांचे दि.०२/१२/२०२२ रोजीचे मा.जिल्हाधिकारी, पुणे यांना दिलेले पत्र, तसेच मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडील जा.क्र.पापु/कावि २७१/२०२२, दिनांक ०८/१२/२०२२ रोजीचे पत्राच्या अनुषंगाने पुणे शहर पेठ पर्वतील येथील बापूजीनगर सहकारी पुनर्वसन संस्था मर्यादित या संस्थेमधील न.भू.क्र. ३१३६, ३१३८, ३१४२, ३२६७, ३२६९, ३२७३, ३२७८, ३१४०, ३१७०, ३२६६, ३२६८, ३२७० व ३२७५ या मिळकतींबाबत नगर भूमापन अधिकारी, क्र.१ पुणे कार्यालयाकडील दि.२०/०९/२०२२ रोजीच्या पुनर्विलोकन आदेशाची महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम २५७ मधील तरतूदीनुसार फेरतपासणी करणेकामी दिनांक ३०/१२/२०२२ रोजी जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, पुणे या कार्यालयात सर्व संबंधीतांना नोटीस बजावून सुनावणी आयोजित करण्यात आलेली आहे. सदर सुनावणी दरम्यान संबंधीतांकडून सादर केले जाणारे म्हणणे, कागदपत्रे व जिल्हा प्रशासनाने राज्य शासनास सादर केलेले प्रस्ताव विचारात घेवून नगर भूमापन अधिकारी, क्र.१ पुणे यांनी पारीत केलेल्या पुनर्विलोकन आदेशावर उचित निर्णय / कार्यवाही जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख पुणे यांचे कार्यालय कडून होणार आहे.

--------------

# लक्षवेधी सूचना

सन २०२२ चे हिवाळी अधिवेशन

**डॉ. राहूल पाटील, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम- १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"महाराष्ट्र राज्यातील निराधार व्यक्तींना आधार म्हणून राज्य शासनातर्फे संजय गांधी निराधार योजना, इंदिरा गांधी निराधार पेन्शन, श्रावणबाळ पेन्शन अशा एकुण ५ प्रकारच्या योजनेतून पेन्शन दिल्या जात असणे, सदर योजनेच्या माध्यमातून निराधार व्यक्तीला फक्त १००० रुपये व त्या महिलेला मूल असेल तर १०० रुपये जास्त पेन्शन दिले जात असणे, सदर पेन्शनची रक्कम ही वाढत्या महागाईच्या काळात तूटपुंजी असणे, आजच्या महागाईच्या काळात पेन्शनच्या रक्कमेत वाढ करुन ती किमान दरमहा ३००० रुपये करण्याची आवश्यकता, तसेच शासकीय कर्मचारी यांना ज्याप्रमाणे महागाई भत्ता दिला जातो त्याप्रमाणे दरवर्षी या पेन्शनमध्ये २० टक्के वाढ करण्याची आवश्यकता, तसेच निराधार योजनेच्या पेन्शनचा लाभ मिळण्यासाठी उत्पन्नाची अट २१ हजार रुपये असणे, म्हणजे दिवसाला केवळ ५८ रुपये उत्पन्न असणा-या व्यक्तिलाच ही पेन्शन योजना लागू होत असणे, परिणामी अनेक निराधार व्यक्ति या योजनेपासून वंचित असणे, जुन्या काळातील लावलेली ही उत्पन्नाची अट बदलून ६० हजार रुपये करण्याची आवश्यकता, शासनाने याबाबत करावयाची निर्णयात्मक कार्यवाही वा शासनाची प्रतिक्रिया."

**<u>मा. मंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य यांचे निवेदन</u> :-**

विशेष सहाय्य योजनेतंर्गत संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना या दोन राज्यपुरस्कृत तर इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना आणि इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग निवृत्तीवेतन योजना या तीन केंद्रपुरस्कृत योजना राज्यात राबविण्यात येतात.

या योजनांतर्गत पात्र लाभार्थ्यांना दरमहा रु.१०००/- अर्थसहाय्य देण्यात येते. तसेच सदर योजनेत १ अपत्य असलेल्या विधवा लाभार्थ्यांना' रु.११००/- तर २ अपत्ये असलेल्या विधवा लाभार्थ्यांना रु.१२००/- इतके अर्थसहाय्य दरमहा देण्यात येते.

दिनांक २० ऑगस्ट, २०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये लाभार्थ्यांच्या अर्थसहाय्यात रुपये ६००/- वरुन रुपये १०००/- इतकी वाढ करण्यात आली असून संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेतील दिव्यांग लाभार्थ्यांसाठी वार्षिक कौटुंबिक उत्पन्न मर्यादा रु.२१,०००/- वरुन रु.५०,०००/- इतकी करण्यात आली आहे.

सध्या इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजनेचे ११ लाख ३७ हजार ४१६ लाभार्थी, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजनेचे ८९ हजार ६ लाभार्थी व इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग निवृत्तीवेतन योजनेचे १० हजार ६४१ इतके लाभार्थी आहेत.

तर संजय गांधी निराधार अनुदान योजनेचे १३ लाख ७७ हजार ७३४ लाभार्थी व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेचे २२ लक्ष २८ हजार ६३० लाभार्थी असे एकूण ३६ लक्ष ६ हजार ३६४ इतके लाभार्थी आहेत.

विशेष सहाय्य योजनांकरीता असलेले सध्याचे निकष, अटी व अर्थसहाय्याची रक्कम याकरीता सर्व योजनेतील पात्र लाभार्थ्यांना अर्थसहाय्याची रक्कम अदा करण्यासाठी सर्वसाधारणपणे दरवर्षी रुपये ४ हजार ९०० कोटी इतका खर्च करण्यात येतो.

********************

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२२ चे (चतुर्थ) हिवाळी अधिवेशन

लक्षवेधी सूचना क्र.७७३

**श्री.राजेश पवार, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.७७३ पुढीलप्रमाणे आहे :-**

**"राज्यात अनेक जाती-जमातीच्या लोकांचे वास्तव्य असून नांदेड जिल्ह्यात मनेरवारळू, कोळी समाज मोठ्या प्रमाणात असणे, सदर समाजातील नागरिकांना नोकरीसाठी, शिक्षणासाठी, निवडणुकीसाठी जात वैधता प्रमाणपत्राची आवश्यकता असणे, जात वैधता प्रमाणपत्रासाठी अर्ज केल्यास एस.डी.एम. कार्यालयातील अधिकाऱ्यांकडून लाच मागितली जाणे, प्रमाणपत्रासाठी जाणूनबुजून त्रुटी काढून प्रमाणपत्र वेळेवर न मिळाल्यामुळे अनेकांना नोकरी, शिक्षणापासून वंचित राहवे लागणे, एसडीएम कार्यालयातील अधिकाऱ्यांकडून समाजातील नागरिकांना होणारा त्रास लक्षात घेता शासनाने तातडीने दखल घेऊन संबंधीत दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची आवश्यकता, मनेरवारळू, कोळी समाजातील नागरिकांना जात वैधता प्रमाणपत्र तातडीने उपलब्ध होण्याकरीता करावयाची उपाययोजना व यावर शासनाची प्रतिक्रिया."**

मा.मुख्यमंत्री यांचे निवेदन

राज्यात अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग या मागासप्रवर्गातील नागरिकांना जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासवर्ग जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन अधिनियम २००० (सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.२३) अन्वये करण्यात येते.

अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन उपरोक्त उल्लेखित अधिनियम २००० (सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.२३) व त्या अंतर्गत अधिसूचित करण्यात आलेले अनुसूचित जमाती जात प्रमाणपत्र पडताळणीचे नियम, २००३ मधील तरतूदींनुसार करण्यात येते. अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील नागरिकांना जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही ही उक्त अधिनियम -२००० (सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.२३) व त्याअंतर्गत दि.१ सप्टेंबर, २०१२ रोजी अधिसूचित करण्यात आलेले अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २०१२ अन्वये करण्यात येते.

उपरोक्त अधिनियम-२०००(सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.२३) व अधिसूचित करण्यात आलेले नियम-२००३ व नियम-२०१२ मधील तरतूदींनुसार आवश्यक ती कागदपत्रे सादर केल्यास संबंधित अर्जदारास त्या-त्या मागासप्रवर्गाचे जात प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही सक्षम

प्राधिकारी म्हणून संबंधित उप विभागीय अधिकारी/उप जिल्हाधिकारी (महसूल) यांचेद्वारा करण्यात येते.

उप विभागीय अधिकारी (एस.डी.एम) कार्यालयांकडून कोणत्याही मागासप्रवर्गाचे जात वैधता प्रमाणपत्र देण्यात येत नाही. सबब, सदर कार्यालयातील अधिकाऱ्यांकडून जात वैधता प्रमाणपत्रासाठी लाच घेण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

केंद्र शासनाद्वारे महाराष्ट्र राज्यासाठी जाहीर करण्यात आलेल्या अनुसूचित जमातीच्या यादीमध्ये "मनेरवारलू" या जमातीचा "अनुसूचित जमाती, अनुक्रमांक २७" येथे समावेश आहे. मनेरवारलू ही जमात अनुसूचित जमातीमध्ये समाविष्ट असल्याने मनेरवारलू या अनुसूचित जमातीला जात वैधता प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही आदिवासी विकास विभागाच्या अधिनस्त कार्यरत विभागीय स्तरावरील अनुसूचित जमाती जात पडताळणी समित्यांमार्फत करण्यात येते.

राज्याकडून प्रसिध्द करण्यात आलेल्या जातींच्या यादीमध्ये "कोळी" या जातीचा विशेष मागास प्रवर्ग, अनुक्रमांक ४ येथे "कोळी व तत्सम जाती" मध्ये समावेश आहे. विशेष मागास प्रवर्गातील कोळी जातीतील नागरिकांना जात वैधता प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अधिनस्त जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांमार्फत करण्यात येते.

जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, नांदेड या समितीकडे कोळी या विशेष मागास प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र पडताळणीचे शैक्षणिक, सेवा, निवडणूक व इतर विषयक कोणतेही तीन महिन्यावरील जाती दावा प्रकरणे प्रलंबित नाहीत. कोळी या जात प्रमाणपत्राची या समितीकडून पडताळणी करतांना कोणत्याही अर्जदारांकडून लाचेची मागणी करण्यात आलेली नाही. सबब, त्याबाबत कोणतीही लेखी तक्रार केल्याचे आढळून येत नाही.

दि.१ सप्टेंबर, २०१२ रोजी अधिसूचित करण्यात नियम महाराष्ट्र अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २०१२ मध्ये जात पडताळणी समिती जात प्रमाणपत्राच्या वैधतेबाबतचा निर्णय ३ महिन्यांच्या अवधीत घेईल आणि अपवादात्मक परिस्थितीत २ महिन्यांचा जास्तीचा कालावधी समितीस घेता येईल, अशी तरतूद आहे. सदर उल्लेखित विहीत मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र प्रकरणे निकाली काढण्याच्या अनुषंगाने माहे ऑगस्ट, २०२० पासून जात वैधता प्रमाणपत्र देण्याची प्रक्रीया संपूर्णत: ऑनलाईन करण्यात आली आहे तसेच राज्यातील सर्व जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांमार्फत विशेष मोहिम राबवून विहित मुदतीत प्रकरणे निकाली काढण्यात येतात.

***************

लक्षवेधी सूचना

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२२ चे तृतीय अधिवेशन

श्रीमती. मेघना साकोरे बोर्डीकर , वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम,१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

"राज्यात मुला-मुलीची ४४५ वसतिगृहे सामाजिक न्याय विभागाच्या वतीने असून ज्यामध्ये पन्नास हजाराहून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत असून सदरहू विद्यार्थ्यांना राज्य सरकारच्या नियमानुसार निर्वाह भत्ता, शैक्षणिक साहित्य, गणवेश भत्ता, छत्र्या, रेनकोट आणि प्रकल्प अहवालासाठी आवश्यक देय असताना मागील सहा महिन्यापासून रखडलेला असल्याने तसेच कोरोना काळातील १९ महिन्याच्या निर्वाह भत्ता अद्यापी देण्यात आलेल्या नसल्यामुळे सदरहू विद्यार्थ्यांची आर्थिक कोंडी होऊन त्यांच्या शिक्षणावरही विपरीत परिणाम होणे, कोरोना काळामध्ये सामाजिक न्याय विभागाची सर्व वसतिगृहे बंद असली तरीही या दरम्यान शाळा, महाविद्यालयेही बंद असली तरीही ऑनलाइन शिक्षण सुरू असणे, वसतिगृहातील बहुतांश विद्यार्थी हे ग्रामीण भागातील असून गावांमध्ये इंटरनेटची जोडणी नसल्याने ऑनलाइन शिक्षण घेणे कठीण झाल्यामुळे विद्यार्थ्यांना शहराच्या ठिकाणी बाहेर भाड्याची खोली घ्यावी लागणे, मात्र या काळात केवळ वसतिगृहे बंद असल्याचा निकष लावून सामाजिक न्याय विभागाने पर्यायाने शासनाने या काळातील १९ महिन्याचा निर्वाह भत्ता आणि शैक्षणिक साहित्यांच्या खर्चही विद्यार्थ्यांना देण्यात नकार दिल्यामुळे या विद्यार्थ्यांना गंभीर आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागणे,वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या अनुसूचीत जातीच्या विद्यार्थ्यांना बाहेर भाड्याच्या खोलीत राहून शिक्षण पूर्ण करता यावे म्हनून स्वाधार योजना असणे, कोरोना काळात स्वाधार योजनेच्या लाभर्थ्यांना सर्व लाभ देण्यात येणे, मात्र वसतीगृहांमध्ये प्रवेशीत विद्यार्थ्यांना कोरोना काळात केवळ वसतिगृह बंद असल्याचे कारण देत त्यांना निर्वाह भत्ता व शैक्षणिक साहित्य भत्यापासून वंचित ठेवण्यात आले असल्याचे समान तत्वावर सुरू असलेल्या दोन योजनाच्या लाभार्थीमध्ये शासन भेद करीत असल्याने नाराजी व्यक्त करून कोरोना काळातील १९ महिन्याच्या निर्वाह भत्ता व शैक्षणिक साहित्य भत्ता मिळावा म्हणून शासनाकडे रीतसर लेखी निवेदनाद्वारे मागणी करण्यात येणे, सदर मागणीबाबत शासनाने अद्याप ठोस निर्णय घेतला नसणे, तसेच मागील सहा महिन्यापासून रखडलेला निर्वाह भता, शैक्षणिक साहित्य भत्ता आदी तसेच कोरोना १९ महिन्याचे भत्ते विनाविलंब देण्याचे शासनाने ठोस कार्यवाही करण्याची आवशक्यता असणे, याकडे शासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया"

..............................................................................................................

**श्री.एकनाथ शिंदे,मा.मुख्यमंत्री यांनी करावयाचे निवेदन**

सामाजिक न्याय विभागांतर्गत राज्यात मागासवर्गीय मुलामुलींची ४४१ शासकीय वसतीगृहे कार्यान्वित असून या वसतीगृहांची मान्य संख्या ४३,३५८ इतकी आहे. शासन निर्णय दिनांक १६ मे १९८४ आणि शासन निर्णय दिनांक २६ जुलै २०११ अन्वये शासकीय वसतीगृहातील प्रवेशितांना निवास, भोजन, इत्यादी आवश्यक सोयी सुविधा व निर्वाह भत्ता निर्वाह भत्ता देण्यात येतो.

राज्यात मागासवर्गीय मुलामुलींसाठी ४४१ शासकीय वसतीगृहे कार्यरत आहेत. यापैकी काही वसतीगृहातील प्रवेशित विद्यार्थ्यांना चालू शैक्षणिक वर्ष सन २०२२-२३ मध्ये माहे ऑक्टोबर २०२२ पर्यंत निर्वाह भत्ता व शैक्षणिक साहित्य गणवेश भत्ता,छत्र्या,रेनकोट आणि प्रकल्प अहवालासाठी आवश्यक देय भत्ता अदा करण्यात आलेला आहे. तर काही वसतीगृहातील प्रवेशित विद्यार्थ्यांना सन २०२२-२३ या वर्षामध्ये तरतूदीच्या अनुपलब्धतेमुळे निर्वाह भत्ता व शैक्षणिक साहित्य, गणवेश भत्ता, छत्र्या, रेनकोट आणि प्रकल्प अहवालासाठी आवश्यक देय भत्ता अदा करणे शक्य झालेले नाही.

कोविड १९ च्या प्रादुर्भामुळे राज्यातील बहुतांश वसतीगृहे ही जिल्हा प्रशासनाने क्वारंटाईन सेंटर म्हणून अधिग्रहित केली होती. या कालावधीत विद्यार्थी वसतीगृहामध्ये राहत नव्हते.परंतु शैक्षणिक संस्थाचे अभ्यासक्रम ऑनलाईन सुरू असल्यामुळे विद्यार्थ्यांचे शिक्षण ऑनलाईन सुरु होते. शासन निर्णय,दिनांक २६ जुलै, २०११ नुसार शासकीय वसतिगृहात प्रवेशित विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता देण्याची तरतूद आहे. तथापि कोविड, १९ च्या प्रादुर्भावामुळे शासन आदेशानुसार विभागांतर्गत शासकीय मुलामुलींची वसतिगृहे बंद ठेवण्यात येवून सदर वसतिगृहे शासनाने कोविड सेंटर म्हणून वापरात होती. लॉकडाऊन कालावधीतील निर्वाह भत्ता नियमानुसार देय नसल्याने निर्वाह भत्त्याची रक्कम देण्यात आलेली नाही.

सन २०२२-२३ या वर्षात निर्वाह भत्ता इ.साठी पुरेशी तरतूद करण्यात आलेली असून निधीच्या उपलब्धतेनुसार वसतीगृहातील प्रवेशित विद्यार्थ्यांचा प्रलंबित असलेला निर्वाह भत्ता प्राधान्याने अदा करण्याच्या सूचना क्षेत्रीय अधिकाऱ्यांना देण्यात आलेल्या आहेत.

*****

लक्षवेधी सूचना

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२२ चे तृतीय अधिवेशन

डॉ.विनय विलासराव कोरे (सावकर), वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम,१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

"समाज कल्याण विभागाअंतर्गत शासकीय वसतिगृहातील गृहपाल या पदावर कार्यरत असणारे कर्मचारी यांना वसतीगृह इमारतीत कुटुंबासोबत राहणे सामाजिक दृष्ट्या असुरक्षित असतानाही त्या ठिकाणी राहण्यास भाग पाडले जात असणे, त्यामुळे वसतिगृहात प्रवेशित विद्यार्थ्यांसोबत गृहपाल कुटुंबा सोबत राहणे सामाजिक दृष्ट्या सुरक्षित नसणे, शासकीय वसतिगृहातील इमारतीतच राहावे असा कोणताही नियम, कायदा, शासन निर्णय नसणे, वसतिगृहाचे २४ तास नियंत्रण देखभाल करण्याकरता गृहपाल या एकच कर्मचाऱ्याला जबाबदारी देणे, वसतिगृहाचे जनक छत्रपती राजश्री शाहू महाराज यांनी निर्माण केलेले प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग कोल्हापूर येथे कामकाज करण्यासाठी सेक्रेटरी,लिपिक,अधीक्षक, अंतर्गत लेखापरीक्षक, शिपाई इत्यादी कर्मचारी असणे, परंतु समाज कल्याण विभागातील शासकीय वसतिगृहातील नियंत्रण व देखभालीसाठी गृहपाल या एकाच व्यक्तीस जबाबदारी देणे, त्यामुळे गृहपाल या पदावर कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांमध्ये भीतीचे आणि असंतोषाचे वातावरण पसरणे, याबाबत शासनाने प्राधान्याने लक्ष घालण्याची गरज याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपायोजना"

.................................................................................................

**श्री.एकनाथ शिंदे,मा.मुख्यमंत्री यांनी करावयाचे निवेदन**

सामाजिक न्याय विभागांतर्गत राज्यात मागासवर्गीय मुलामुलींची ४४१ शासकीय वसतीगृहे कार्यान्वित असून या वसतीगृहांची मान्य संख्या ४३,३५८ (मुलांची-२२,९५८ व मुलींची-२०,४००) इतकी असून इमारत क्षमता-४१,८४३ (मुलांची-२२,१३० व मुलींची-१९,७१३) इतकी आहे.

शासन निर्णय,दिनांक १६ मे १९८४ व शासन निर्णय,दिनांक २६ जुलै २०११ अन्वये शासकीय वसतीगृहातील प्रवेशित विद्यार्थ्यांना निवास,भोजन,शैक्षणिक सोयी सुविधा इत्यादी पुरविण्यात येतात.

शासकीय वसतिगृहातील प्रवेशित मुले ही त्यांच्या कुटुंबापासून दूरच्या ठिकाणी वसतिगृहात निवासी राहत असतात. वसतिगृह ही संकल्पना कुटुंब या संज्ञेप्रमाणे अभिप्रेत आहे. गृहपाल हा वसतिगृहाचा प्रमुख असल्याने कुटुंब प्रमुख म्हणून वसतिगृहातील विद्यार्थ्यांची सर्वस्वी जबाबदारी त्यांची आहे. कुटूंबप्रमुख म्हणून विद्यार्थ्यांची काळजी घेणे,त्यांना आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध करून देणे ही गृहपालाची एक पालक म्हणून जबाबदारी आहे. यासाठी गृहपालाने वसतिगृहामध्ये निवासी राहणे अनिवार्य आहे. सदर बाबी विचारात घेता गृहपाल यांनी त्याच्या नियुक्तीच्या ठिकाणी अथवा मुख्यालयाच्या ठिकाणी निवासी राहणे अत्यंत आवश्यक आहे. जेणेकरुन वेळी अवेळी मुलांची सुरक्षितता तसेच आवश्यकतेनुसार तातडीच्या वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देणे ही गृहपालाची महत्वाची जबाबदारी ठरते.

प्रत्येक शासकीय वसतिगृह हे गृहपालाचे निवासस्थान आहे. प्रत्येक शासकीय इमारतीमध्ये गृहपालासाठी स्वतंत्र व सुसज्ज निवासाची व्यवस्था करण्यात आलेली आहे. तसेच ज्या ठिकाणी

भाड्याच्या इमारतीत वसतिगृहे चालविली जातात अशा ठिकाणी गृहपालांनी त्याच इमारतीत स्वत:साठी निवासाची स्वतंत्र व्यवस्था करणे अपेक्षित आहे.

वित्त विभाग,शासन निर्णय,दिनांक ३० मे,१९८९ अन्वये ज्या शासकीय कर्मचाऱ्याला कर्तव्याचा भाग म्हणून उपलब्ध करून दिलेल्या निवासस्थानात राहणे बंधनकारक आहे, त्यास घरभाडे भत्ता अनुज्ञेय नाही. याच धर्तीवर शासकीय वसतीगृहात निवासस्थान उपलब्ध असणाऱ्या गृहपालांना घरभाडे भत्ता देय नाही.गृहपाल निवासस्थानी राहत नसल्याबाबत महालेखापाल यांनी आक्षेप घेतला असून विधीमंडळाच्या अनुसूचित जाती समितीने याबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. गृहपाल हे निवासी पद असून या सर्व बाबी विचारात घेता त्यांनी वसतिगृहात निवासी राहणे आवश्यक आहे.

नैसर्गिक आपत्तीच्यावेळी,एखादा विद्यार्थी आजारी पडल्यास,विद्यार्थ्यास विषबाधा झाल्यास वेळेत योग्य उपचार होणे आवश्यक आहे. अन्यथा त्याचा मृत्यूही संभवू शकतो वा अनिष्ट प्रकार उध्दभवण्याची शक्याता नाकारता येत नाही.काही वसतिगृहामध्ये अनधिकृतपणे राहणाऱ्या विद्यार्थ्यांकडून विद्यार्थी, पालक, प्रशासनास नाहक त्रास सहन करावा लागतो.सदर बाबी टाळण्यासाठी गृहपालाने वसतिगृहात राहणे आवश्यक आहे. गृहपाल हा विद्यार्थ्यांचा पालक असून त्यांच्या पालकत्वाची जबाबदारी सक्षमतेने पार पाडणे गरजेचे आहे.गृहपालाने वसतीगृहात राहावे यासाठी विविध उपक्रम हाती घेण्यात आले असून याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचना क्षेत्रीय कार्यालयांना देण्यात आलेल्या आहेत. जे गृहपाल वसतिगृहात निवासी राहत नाहीत त्यांना वसतिगृहरूपी घरात परत आणण्यासाठी व तेथेच वास्तव्य करण्यासाठी प्रेरणा देणे हा घरवापसी या उपक्रमाचा प्रमुख उद्देश होता. याअनुषंगाने गृहपालांचे समुपदेशन करून त्यांना कर्तव्याची जाणीव करून देऊन त्यांच्या समस्यांचे निराकरण करून वसतिगृहात वास्तव्य करण्यासाठी सहकार्य केलेले आहे. शासकीय वसतीगृहात इयत्ता ८ वी व त्यावरील विद्यार्थी रहात असून विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने गृहपालाने वसतीगृहात निवासी राहणे आवश्यक आहे.

१०० मान्य विद्यार्थी संख्येच्या शासकीय वसतीगृहाकरीता गृहपाल (अराजपत्रित),कनिष्ठ लिपिक,शिपाई,तसेच पहारेकरी व सफाईगार संवर्गातील (बाह्यस्त्रोताव्दारे) पदे तर २५० मान्य विद्यार्थी संख्येच्या शासकीय वसतीगृहाकरीता गृहपाल (अराजपत्रित), प्रमुख लिपिक तथा रोखपाल तथा भांडारपाल, कनिष्ठ लिपिक, शिपाई,पहारेकरी (बाह्यस्त्रोताव्दारे), सफाईगार (बाह्यस्त्रोताव्दारे) पदे मंजूर आहेत.शासकीय वसतिगृहातील दैनंदिन व्यवस्थापनासाठी गृहपाल हे महत्वाचे पद असून त्यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित केलेले आहे.याशिवाय,दैनंदिन कामकाजात सहाय्य करण्यासाठी वसतिगृहातील प्रवेशित संख्या विचारात घेऊन कनिष्ठ लिपीक /वरिष्ठ लिपीक या गट-क संवर्गातील कर्मचारी तसेच,बाहेरील तातडीच्या कामकाजाकरिता शिपाई हे पद मंजूर आहे. प्रवेशितांच्या भोजनासाठी स्वयंपाकी,मदतनीस याशिवाय मेस पध्दती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत.वसतिगृहातील दैनंदिन स्वच्छता व प्रवेशितांच्या सुरक्षेसाठी बाहयस्त्रोताद्वारे एजन्सी नियुक्त केलेली असून गृहपाल यांचे नियंत्रणाखाली मनुष्यबळाची सुविधा उपलब्ध केलेली आहे.सदर बाब विचारात घेता गृहपाल यांचेवरच वसतिगृहाची संपूर्ण जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे असे म्हणता येणार नाही.

*****

नगर विकास विभाग

लक्षवेधी सूचना

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२२ चे चतुर्थ (हिवाळी) अधिवेशन

श्री. प्राजक्त तनपुरे, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सुचना पुढीलप्रमाणे आहे:-

"अहमदनगर जिल्हयातील नगर तालुक्यातील नागरदेवळे, वडारवाडी व बाराबाभळी या नगर तालुक्यातील गांवाचे झपाटयाने होत असलेले शहरीकरण, याठिकाणच्या बिगरशेती क्षेत्रामध्ये सातत्याने होत असलेली वाढ, वाढत्या नागरीकरणामुळे या गांवातील नागरी सुविधांवर येत असलेला प्रचंड ताण परंतु उक्त तीनही गांवासाठी अस्तित्वात असलेल्या ग्रामपंचायतीमुळे विकास कामांसाठी उपलब्ध होणारा अत्यल्प निधी, या सर्व बाबींचा विचार करुन शासनाने उक्त तीनही गांवासाठी दिनांक २० मे,२०२२ रोजी स्थापन केलेली नागरदेवळे नगरपालिका, नगरपालिका अस्तित्वात येऊन तीन महिन्यांचाही कालावधी पुर्ण होत नाही तोच नागरिकांचा विरोध असतांनाही या नगरपालिकेचे पुन्हा ग्रामामपंचायतीमध्ये रुपांतर करण्याचा शासनाने घेतलेला निर्णय, याबाबतचा शासन निर्णय निर्गमीत होऊन पुन्हा याठिकाणी ग्रामपंचायती अस्तित्वात येणे ही सर्व प्रक्रिया राबविताना शासनाच्या विधी विभागाचे अभिप्राय विचारात न घेताच घेण्यात आलेला निर्णय, या प्रक्रियेमध्ये लेकप्रतिनिधींना विश्वासात न घेणे, अहमदनगरच्या जिल्हाधिकाऱ्यांनी या नगरपालिकेच्या कचरा डेपोसाठी जागा उपलब्ध करण्याची सुरु केलेली प्रक्रिया, यामुळे परिसरातील नागरीकांमध्ये पसलेला तीव्र असंतोष व शासनाची प्रतिक्रिया"

---

मा. मुख्यमंत्री यांचे निवेदन

अहमदनगर जिल्ह्यातील वडारवाडी व बाराबाभळी या ग्रामपंचायतींसह मौजे नागरदेवळे या ग्रामपंचायतीचे रुपांतर नागरदेवळे नगरपरिषदेत करण्याबाबत महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम ३ चे पोटकलम (२), (२ A) व (३) च्या तरतूदींची पुर्तता होत असल्याने, अंतिम अधिसूचना दि.२०.०५.२०२२ रोजी शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आली.

रोटेर H/894 (750-1-23)     ८क्षे.मा.

सदर अधिसूचना रद्द करण्याच्या अनुषंगाने, श्रीमती सविता पानमळकर व इतर यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई, औरंगाबाद खंडपीठ येथे रिट याचिका क्र.५७६६/२०२२ दाखल केली होती. त्याचप्रमाणे श्रीमती सविता पानमळकर यांनी जुलै, २०२२ रोजी शासन अधिसूचना दि.२०.०५.२०२२ च्या अनुषंगाने नगर विकास विभागाकडे निवेदन सादर केले असून, सदर निवेदनात विविध हरकती उपस्थित केल्या. उपरोक्त नमूद रिट याचिका, निवेदनातील विविध हरकती, तसेच नागरदेवळे नगरपरिषदेअंतर्गत रहिवाश्यांचा नगरपरिषद स्थापन करण्यास असलेला विरोध विचारात घेऊन, शासनाने महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम ३ चे पोटकलम (२), (२ A) व (३) च्या तरतूदींनुसार, शासन अधिसूचना दि.२०.०५.२०२२ रद्दबातल करण्याचा निर्णय घेतला. त्यास अनुसरुन विधि व न्याय विभागाकडून मसुदा तपासून घेऊन, दि.२०.०५.२०२२ रोजीची नागरदेवळे नगरपरिषद स्थापन करण्याची शासन अधिसूचना दि.२९.०८.२०२२ रोजीच्या अधिसूचनेन्वये रद्द केली असून, या ठिकाणी पुन्हा ग्रामपंचायती अस्तित्वात आल्या आहेत. सदर दि.२९.०८.२०२२ रोजीची शासन अधिसूचना रद्द करण्यासंबंधी मा.उच्च न्यायालय, मुंबई, औरंगाबाद खंडपीठ येथे दाखल रिट याचिका क्र. १०८३६/२०२२ अद्याप न्यायप्रविष्ट आहे.

नागरदेवळे शहर हद्दीतील घनकचऱ्यांचे व्यवस्थापन करण्यासाठी मौजे बारदरी, ता. नगर येथील गट क्र.८० मधील ४.८० हे. जमिनीचा प्रस्ताव तहसिलदार, अमहदनगर यांनी जिल्हाधिकारी कार्यालय अहमदनगर यांच्याकडे सादर केला आहे. सदर प्रस्तावावर जिल्हाधिकारी कार्यालय स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

* * * * * * * * *

-१-

लक्षवेधी सूचना क्र. १४७७

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२२ चे चतुर्थ (हिवाळी) अधिवेशन

**श्री. संजय रायमुलकर, विधानसभा सदस्य यांनी उपस्थित केलेली विधानसभा लक्षवेधी सूचना क्र. १४७७ खालीलप्रमाणे आहे :-**

" भिवंडी महानगरपालिकेतील शिवाजी चौक येथील सन १९९१ रस्ता रुंदीकरणामध्ये तोडलेल्या गाळयांचे पुनर्वसन करण्याचे महापालिकेकडून शासनास सकारात्मक अहवाल प्राप्त असून महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडून चौदा गाळे पुनःश्च त्याच ठिकाणी पुनर्वसित करण्याचे प्रस्तावित करण्यासाठी दि.१७.११.२०२२ रोजी प्रधान सचिव, नगरविकास व आयुक्त, भिवंडी महापालिका यांचेकडे गाळेधारकांनी निवेदन दिलेले असून गाळेधारकांची गेल्या तीन वर्षापासून गाळे बेकायदेशीर निष्कासित असल्याने त्यांच्यावरती उपासमारीची वेळ येऊन ते बेरोजगार होणे, या गाळेधारकांना मरणावस्थेला अधिकारी जबाबदार असतील त्यामुळे ज्या ठिकाणी गाळे निष्कासनाची कारवाई झाली त्या ठिकाणी चौदा गाळेधारकांची जागा उपलब्ध असल्याने निष्कासित केलेल्या जागेवर शासनाने गंभीर दखल घेऊन तात्काळ चौदा गाळेधारकांना त्याच ठिकाणी पुनर्वसन करण्यासाठी शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

## मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

भिवंडी-निजामपुर शहर महानगरपालिकेतील शिवाजी चौक येथील सन १९९१-९२ साली रस्ता रुंदीकरणामध्ये तोडलेल्या गाळ्यांचे पुनर्वसन करण्यात आले व नंतर नोटीस न देता गाळे बेकायदेशीररित्या तोडण्यात आले असता १४ गाळे धारकांना त्याठिकाणी पुनर्वसित करण्याकरिता श्री.रामु भोईर व इतर गाळेधारकांनी भिवंडी-निजामपुर शहर महानगरपालिकेकडे निवेदन सादर केले आहे ही वस्तुस्थिती आहे. तथापि, उपरोक्त निवेदनात नमुद सम विषयाच्या अनुषंगाने सन २०२२ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात प्राप्त झालेल्या अतारांकित प्रश्नाच्या अनुषंगाने आयुक्त, भिवंडी-निजामपुर शहर महानगरपालिका यांच्या वस्तुस्थितीदर्शक अहवालानुसार उत्तर विधीमंडळास सादर करण्यात आले आहे.

सदर प्रकरणी आयुक्त, भिवंडी-निजामपुर शहर महानगरपालिका यांनी कळविल्यानुसार भिवंडी-निजामपुर शहर महानगरपालिका अंतर्गत प्रभाग समिती क्र. ५ कार्यक्षेत्रातील शिवाजी चौक ते कांबा रोड, स्मशान भुमीजवळ, सि.स.नं. ३२८० लगतच्या शिवाजी चौक परिसरात तत्कालीन नगरपालिकेने सन १९९१-९२ साली रस्ता रुंदीकरणात बाधित होणाऱ्या नागरिकांना दिनांक १७.०३.१९९२ व दिनांक १२.१०.१९९८ च्या महासभेच्या ठरावान्वये एकूण ३५ गाळयांचे पुनर्वसन करण्यात आले होते. तथापि, सदर पुनर्वसित केलेल्या गाळेधारकांपैकी केवळ ०७ गाळेधारक मनपाकडे कर भरत होते. सदर जागा तक्रारीत उल्लेखित १४ गाळेधारकांच्या मालकीची नव्हती व सदर ठिकाणी तत्कालीन नगरपरिषदेमार्फत तात्पुरते पुनर्वसन करण्यात आले होते.

डेटा H/१८८९ ७५०-१-२३)

८कृ.मा.प.

सदर जागेवर प्रत्यक्षात असलेल्या ७३ गाळे धारकांना बांधकाम परवानगी / मालकी हक्कांचे कागदपत्र सादर करण्याकरिता दिनांक २३.०१.२०२० रोजी पत्र देण्यात आले होते. तद्नंतर सदर जागेवर असलेले गाळे दिनांक २७.०१.२०२० रोजी निष्कासित करण्यात आले आहेत. तथापि, भिवंडी-निजामपुर शहर महानगरपालिकेने कळविल्यानुसार निष्कासीत केलेले दुकान गाळे हे भोगवटादारांच्या मालकीच्या जागेवर नसल्याने, सदरचे क्षेत्र सि. स. नं. ३२८६ रस्त्याखालील असल्याने तसेच अनेक भोगवटाधारक यांचेकडे कायदेशीर हक्क शाबित करण्यासाठी पुरेसे कागदपत्र नसल्याने निष्कासनाची कारवाई केली आहे. सदर प्रकरणी कायदेशीर प्रक्रिया अवलंबिण्यात न आल्याने तत्कालीन शहरविकास अधिकारी व प्रभाग अधिकारी यांना निलंबित करण्यात आले होते व याप्रकरणी त्यांची विभागीय चौकशी अंतिम टप्प्यात आहे. भिवंडी-निजामपुर शहर महानगरपालिकेने निष्कासित केलेले दुकाने, गाळे ज्या जागेवर स्थित होते ती जागा मौजे भिवंडी सर्वे नं. ७३, १०२ येथे सदर जागेचा मालकी हक्क श्री.शिवकुमार गुप्ता यांचे नावे ७/१२ उताऱ्यावर असल्याचे दिसून येते. मात्र उक्त ७/१२ उताऱ्यावर स.न.१०२ या जमिनीच्या इतर अधिकारांमध्ये महानगरपालिकेच्या नावाची नोंद आहे असे महानगरपालिकेने कळविले आहे.

दरम्यान मौजे भिवंडी येथील सर्वे नं. १०१ सि.स.न. ३२८० ही जागा खाजगी मालकीची आहे. उपरोक्त जागेवर मंजुर विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीनुसार सर्व समावेशक आरक्षक पध्दतीने आरक्षण विकसित करण्याचे मंजुर असून बांधकाम परवानगी प्रस्तावांना सन २०१७ मध्ये बांधकाम परवानगी व सन २०२१ मध्ये सुधारीत बांधकाम परवानगी दिल्याची बाब भिवंडी-निजामपुर शहर महानगरपालिकेने कळविली आहे. तसेच मंजुर बांधकाम परवानगीपैकी तळघर अंशत: तळमजला व अंशत: पहिला मजला यास अंशत: इमारत वापर दाखला दिनांक २९.१०.२०२१ रोजी देण्यात आला आहे. सदर आरक्षणामधील महानगरपालिकेकडे हस्तांतरण करावयाच्या वाहनतळाच्या बांधीव क्षेत्रापोटी २५४६.६१ चौ.मी. क्षेत्र महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्यात आले आहे.

सदर प्रकरणी निष्कासित करण्यात आलेल्या १४ गाळेधारकांच्या निवेदनाच्या अनुषंगाने महानगरपालिकेच्या स्तरावर कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. सद्यस्थितीत सदर जागेवर रस्ता विकसित करण्यात आला असून सदर गाळाधारकांचे त्याच ठिकाणी पुनर्वसन करणे शक्य नाही. सदर गाळे धारकांना कागदपत्र सादर करणेबाबत महानगरपालिका स्तरावरुन पत्र देण्यात आली असून त्यापैकी नियमानुसार पात्र ठरणाऱ्या गाळेधारकांना अन्य जागी पुनर्वसित करण्याचे प्रस्तावित असल्याची बाब महानगरपालिकेने कळविली आहे.

*****

H|935-1९

लक्षवेधी सूचना क्र. १७९१

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२२ चे चतुर्थ (हिवाळी) अधिवेशन

**श्री. संजय केळकर, श्री.किसन कथोरे, ॲड.आशिष शेलार, विधानसभा सदस्य यांनी उपस्थित केलेली विधानसभा लक्षवेधी सूचना क्र. १७९१ खालीलप्रमाणे आहे :-**

"शासनाच्या दुर्लक्षामुळे व राजकीय दबावामुळे ठाणे महानगर पालिका हद्दीत दिवसेदिवस अनाधिकृत बांधकामे वाढत असून शहराचे विद्रुपीकरण होत असणे. तथापि ठामपा हद्दतील दिवा प्रभाग समिती मधील प्रभाग क्र. २९ व ३३ येथील शिवली नगर दोस्ती पाठीमागील डी.पी. रोड लगत, खान कंपाऊंड शीळ आचार गल्ली, शीळ ठाकूर पाडा या परिसरात गेल्या दीड वर्षापासून मोठ्या प्रमाणात अनाधिकृत बांधकामे सुरु असल्याची बाब माहे नोव्हेंबर २०२२ रोजी उघडकीस येणे. या प्रकरणी स्थानिक सामाजिक कार्यकर्तानी दि. १८.१.२०२२ ते १.८.२०२२ रोजी प्रशासनाला लेखी पत्र देणे. तेथील वाढत असलेली अनाधिकृत बांधकामे रोखण्यात यावी अशी मागणी करणे, परंतु सदर अनाधिकृत बांधकामे रोखण्यास सहाय्यक आयुक्त, उपायुक्त ( अतिक्रमण ) अपयशी ठरणे. तसेच अर्थपूर्ण संबंधामुळे जाणून बुजून दुर्लक्ष होत असल्याचा तेथील नागरिकांकडून आरोप होणे. तथापी सदरचे अनाधिकृत बांधकामे, निकृष्ट दर्जाचे होत असल्याने त्यांचे आयुष्य अल्पकाळ असणे व अनेक दुर्घटना घडण्याची भीती असणे. यापूर्वी शिळफाटा येथील सन २०१३ रोजी लकी कंपाउंड दुर्घटना घडून अनेक लोकाचे बळी जाणे. तसेच माहे ऑगस्ट २०२२ रोजी कल्याण पाडा (डायघर) येथे इमारत कोसळून त्यातील निष्पाप लोंकाचे बळी जाणे, या दुर्घटना अनाधिकृत बांधकामामुळे होत असल्याची बाब उघडीस येणे. तथापि अशा दुर्घटना टाळण्यासाठी वेळीच अनाधिकृत व निष्कृट काम करणाऱ्या संबंधित विकासकावर फौजेदारी गुन्हे दाखल करून त्यांना कठोर शिक्षा करण्याची गरज असणे. तसेच तेथील अनाधिकृत बांधकामास अप्रत्यक्ष रित्या संरक्षण देणा-या संबंधित अधिका-याला निलंबित करून त्यानंतर विभागीय चौकशी करण्याची मागणी होणे. याबाबत कोणत्याही राजकीय दबावाला बळी न पडता अनाधिकृत बांधकाम करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी होणे. याबाबत शासनाने केलेली कार्यवाही, उपायोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

## मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

राज्यातील महानगरपालिकेमध्ये अनधिकृत बांधकामांवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम व महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ अन्वये कार्यवाही करण्यात येते. तथापि, राज्यातील नागरीकरण वेगाने होत असताना शहरांमधील अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणांच्या समस्येवर नियंत्रण आणण्यासाठी तसेच निर्मूलनासाठी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये या प्रयोजनाकरिता समर्पित व सक्षम यंत्रणा निर्माण करण्याकरिता शासनाने दिनांक ०२.०३.२००९ रोजीच्या शासन निर्णयान्वये सविस्तर कार्यपध्दती व मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. सदर मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे बंधनकारक आहे.

ठाणे महानगरपालिका ही "ब" वर्ग महानगरपालिका आहे. ठाणे महानगरपालिकेतील दिवा प्रभाग समितीचे क्षेत्रफळ अंदाजित ३३ चौ.कि.मी. असून लोकसंख्या साधारणत: १.४७ लक्ष आहे. सदर प्रभाग समितीच्या कार्यक्षेत्रामध्ये माहे जानेवारी, २०२२ ते ऑगस्ट, २०२२ या कालावधी दरम्यान अनधिकृत बांधकामासंदर्भात १०८ तक्रारी प्राप्त झाल्याची बाब ठाणे महानगरपालिकेने कळविली आहे. सदर तक्रारीच्या अनुषंगाने महानगरपालिका स्तरावर कार्यवाही करण्यात आली असून त्यापैकी ८८ तक्रारींमध्ये तथ्य असल्याचे महानगरपालिकेच्या निदर्शनास आले आहे. सदर क्षेत्रामध्ये निदर्शनास आलेल्या अनधिकृत बांधकामाच्या तक्रारींवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम व महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या तरतुदीन्वये कार्यवाही केली असून एकुण २२ प्रकरणांमध्ये निष्कासनाची प्रत्यक्ष कारवाई झाली आहे. तसेच एकूण १० प्रकरणांमध्ये गुन्हा दाखल केला आहे. त्याचप्रमाणे उर्वरित प्रकरणी महानगरपालिका स्तरावर कार्यवाही सुरू असल्याबाबत महानगरपालिकेने कळविले आहे. सदर क्षेत्रातील अनधिकृत बांधकामाबाबत प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने दिवा प्रभाग समितीचे सहायक आयुक्त तथा पदनिर्देशित अधिकारी यांना सर्वेक्षण करण्याचे निर्देश वेळोवेळी दिल्याची बाब आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांच्या अहवालावरुन निदर्शनास येते.

सन २०१३ मधील ठाणे महानगरपालिकेच्या मुंब्रा प्रभाग समिती कार्यक्षेत्रातील "लकी कंपाऊंड" येथील इमारत कोसळून झालेल्या भीषण दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर भविष्यात अशा प्रकारची दुर्घटना होऊ नये याबाबत उपाययोजना सुचविण्याकरिता नेमलेल्या एक सदस्यीय समितीच्या अहवालातील निष्कर्षाच्या अनुषंगाने शासनाने सर्व संबंधित विभागांना यापूर्वीच निर्देश दिले आहेत.

ठाणे महानगरपालिकेने कळविल्यानुसार माहे ऑगस्ट, २०२२ मध्ये कल्याणफाटा, डायघर नाका याठिकाणी इमारतीचा भाग कोसळला आहे, ही वस्तुस्थिती आहे. सदर घटनेत कोणतीही जिवित व वित्त हानी झाली नसल्याचे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे. ठाणे महानगरपालिका क्षेत्रामध्ये तक्रारीद्वारे अथवा पाहणी दरम्यान निदर्शनास येणाऱ्या अनधिकृत बांधकामांवर महानगरपालिकेमार्फत विनाविलंब कार्यवाही करण्याची कार्यपध्दती अवलंबिण्यात येते. तसेच या पाहणीमध्ये निदर्शनास आलेल्या अनधिकृत बांधकामाच्या परवानगीबाबत / जागेबाबत नोटीसा बजाविणे, संबंधितास समक्ष सुनावणीसाठी बोलाविणे, कार्यवाहीच्या निष्कर्षाच्या अंती बांधकाम अनधिकृत असल्याचे घोषित करणे, विहित मुदतीत सदरचे बांधकाम बांधकामधारकांनी काढून न टाकल्यास त्याबाबत आवश्यक त्या उपाययोजना करुन निष्कासनाची कारवाई करणे, अनधिकृत बांधकाम धारकांवर गुन्हा दाखल करणे इ. कार्यपध्दती अवलंबिण्यात येते. तथापि, दिवा प्रभाग समिती क्षेत्रात निदर्शनास आलेल्या व तक्रारीत उल्लेखित अनधिकृत बांधकामाबाबत वरील नमुद कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात येत असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

ठाणे महानगरपालिकेचे वाढते नागरीकरण विचारात घेऊन सदर क्षेत्रामध्ये अनधिकृत बांधकाम होऊ नये याकरिता ठाणे महानगरपालिकेमार्फत विविध उपाययोजना करण्यात आल्या आहेत. ठाणे महानगरपालिका स्तरावर प्राप्त होणाऱ्या अनधिकृत बांधकाम / अतिक्रमण संदर्भातील तक्रारींची गंभीर दखल घेण्यात येते. महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकाम व अतिक्रमण निर्मुलन व निष्कासन याकरिता केंद्रीभूत पध्दतीने पुरेसे मनुष्यबळ व यंत्रसामुग्री

पुरविण्यात येते. अनधिकृत बांधकामे कोणत्याही क्षणी महानगरपालिकेमार्फत निष्कासित होऊ शकतात, त्यामुळे अशा बांधकामामध्ये घरे किंवा रहिवास न करण्याबाबत नागरिकांना विविध माध्यमातून आवाहन करण्यात येते. तसेच विविध प्रभागांच्या सहायक आयुक्त व पदनिर्देशित अधिकारी यांच्यामार्फत त्यांच्या अधिनस्त पर्यवेक्षकीय क्षेत्राचे सर्वेक्षण करण्यात येते तसेच अनधिकृत बांधकाम निदर्शनास आल्यास अधिनियमातील तरतुदीन्वये विहित मुदतीत कार्यवाही करण्यात येते. आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांच्या स्तरावर वेळोवेळी आढावा बैठक आयोजित करुन शहरातील अनधिकृत बांधकामांवर झालेल्या किंवा सुरु असलेल्या कारवाईच्या अनुषंगाने सर्व संबधित अधिकाऱ्यांना सूचना व निर्देश देण्यात येत असल्याची बाब महानगरपालिकेने कळविली आहे. अनधिकृत बांधकामांवर नियंत्रण करण्याकरिता अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, सॅटेलाईट मॅपींग व जीओ फेन्सींग या सारख्या उपाययोजनांच्या अंमलबजावणीची कार्यवाही सुरू असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

ठाणे महानगरपालिका क्षेत्रामध्ये सन २०१८ नंतर झालेल्या अनधिकृत बांधकामांबाबत माहे एप्रिल, २०२२ मध्ये आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांच्या आढावाअंती महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील ५ अधिकाऱ्यांविरुध्द विभागीय चौकशी सुरू आहे. तसेच शासनाकडून प्रतिनियुक्तीवर नियुक्ती करण्यात आलेल्या ९ अधिकाऱ्यांविरुध्द अनधिकृत बांधकामांवर प्रभावीपणे कार्यवाही न केल्याच्या कारणाने त्यांची विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे.

सदर प्रकरणाचे गांभीर्य विचारात घेता, अनधिकृत बांधकाम व अतिक्रमण नियंत्रण व निर्मुलन संदर्भात असणाऱ्या दिनांक २.३.२००९ च्या शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचना तसेच अधिनियमातील विविध तरतुदींच्या आधारे अनधिकृत बांधकामाबाबत प्राप्त झालेल्या तक्रारींवर तात्काळ कारवाई करणे, नियमितपणे विशेष मोहिमा आखणे व अशा प्रकारच्या प्रवृत्तींना वेळीच आळा घालणे याकरिता आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना सूचना निर्गमित करण्याबाबत व अशा प्रकारच्या अंनधिकृत बांधकाम / अतिक्रमण प्रकरणात दुर्लक्ष व टाळाटाळ केल्याचे निदर्शनास आल्यास त्या क्षेत्राच्या संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्याविरोधात सक्त कार्यवाही करण्याचे आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांना निर्देश दिले आहे.

*****

लक्षवेधी सूचना क्र. २०१०

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२२ चे चतुर्थ (हिवाळी) अधिवेशन

श्री.संजय रायमुलकर, विधानसभा सदस्य यांनी उपस्थित केलेली विधानसभा लक्षवेधी सूचना क्र. २०१० खालीलप्रमाणे आहे :-

" भिवंडी महानगरपालिका नारपोली व फेणे येथील सर्व्हे क्र. १८/७ व सर्व्हे क्र. ५/१ पैकी या आदिवासी मिळकती महानगरपालिकेच्या आरक्षणासाठी भूसंपादित असून या मिळकती महानगरपालिकेच्या नावे होऊन शेतकऱ्यांच्या जमिनीवरती रोड रस्ते गार्डन आदि जमिनीचा विकास करुन जागा महापालिका वापर करीत असणे, परंतु महानगरपालिकेतील संबधित शेतकऱ्यांना अजूनही विकास हस्तांतरण न दिल्याने व शासनाकडून कलम ३६ अ व ३६ ची परवानगी अद्याप न दिल्याने संबधित शेतकरी भूमिहिन झाल्यामुळे त्यांच्यावरती उपासमारीची व बेरोजगारीची प्रश्न उद्भवलेला आहे. महानगरपालिकेने व महसुल विभागाने आदिवासी शेतकऱ्यांवरती अन्याय केल्याने शासनाने गंभीररित्या दखल घेऊन अडचणी निर्माण करणाऱ्या शासकीय अधिकाऱ्यांविरुध्द बडतर्फीची कारवाई करुन शेतकऱ्यांना चारपट भूसंपादन मोबदला अथवा तीनपट विकास हस्तांतरण देण्याचे धोरण आखून शासनाने शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

भिवंडी-निजामपुर शहर महानगरपालिका हद्दीतील मौजे-नारपोली सर्व्हे नं. १८/७ या जमिनीच्या ७/१२ उताऱ्याचे अवलोकन करता सदर ७/१२ उताऱ्यावर भोगवटादार श्री. विश्वनाथ सखाराम म्हात्रे यांचे नाव दाखल असून, आदिवासी जागा असल्याचे कुठेही नमुद करण्यात आली नसल्याची बाब भिवंडी-निजामपुर शहर महानगरपालिका यांनी कळविली आहे.

मौजे-नारपोली, सर्व्हे नं. १८/७ ही जागा भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील आरक्षण क्र. २९५, बेघरांसाठी घरे, क्षेत्र १०८६३ चौ.मी. व आरक्षण क्र. २९५ अ, पोलीस विभाग, क्षेत्र ५७३ चौ.मी. या प्रस्तावाने बाधीत होत असून, उर्वरित ११६४ चौ. मी. क्षेत्र रहिवास विभागात अंतर्भूत होत आहे. सदर जमीन भोगवटदार वर्ग-१ ची असून, जमीनधारक श्री. विश्वनाथ सखाराम म्हात्रे यांनी आरक्षणाखालील जागेचा मोबदला हस्तांतरणीय विकास हक्क प्रमाणपत्राच्या स्वरुपात घेण्याची तयारी दर्शवून तसा अर्ज महानगरपालिकेकडे दाखल केला आहे. सदरचा प्रस्ताव मान्य करण्यात येऊन, प्रस्तावाच्या अनुषंगाने आवश्यक असलेल्या बाबींची पुर्तता करण्यासंदर्भात महानगरपालिकेमार्फत अर्जदारास कळविण्यात आले असून सदर बाबींची पूर्तता झाल्यानंतर हस्तांतरणीय विकास हक्क प्रमाणपत्र निर्गमित करण्याची कार्यवाही करण्यात येईल असे भिवंडी-निजामपुर शहर महानगरपालिकेने कळविले आहे.

तसेच भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका क्षेत्रामधील मौजे-फेणे येथील स. नं. ५ चा काही भाग हा अंशतः २४ मी. विकास योजना रस्ता, विद्यमान रस्ता, ३० मी. रुंद विकास योजना रस्ता, आरक्षण क्र. २१९ (बगीचा), आरक्षण क्र. २२० (सांस्कृतिक केंद्र), आरक्षण क्र. २४३ (पार्क), आरक्षण क्र. २४४ (शॉपिंग सेंटर) या प्रस्तावाने बाधित होत असून, सदर जागेचा मोबदला हस्तांतरणीय विकास हक्क प्रमाणपत्राच्या स्वरुपात मिळण्याची विनंती जमीनधारक श्री. काळुराम पांड्या धापसी व इतर यांनी महानगरपालिकेकडे केली आहे. मौजे-फेणे, सर्व्हे नं. ५/१/अ ही जमीन भोगवटदार वर्ग-२ ची असून, ७/१२ उताऱ्यावर महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ कलम ३६ व ३६ अ अन्वये हस्तांतरणास बंदी, असे नमुद करण्यात आले आहे. अर्जदारांनी प्रस्तुत प्रकरणी आवश्यक असलेला त्यांची जमीन दर्शविणारा परिपूर्ण मोजणी नकाशा व महसूल विभागाकडील महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ कलम ३६ व ३६ अ अन्वये मंजूरी इत्यादी कागदपत्रे अद्यापपर्यंत महानगरपालिकेकडे सादर केलेली नाहीत. तथापि, महानगरपालिकेने सदर प्रकरणी जमीन महसूल अधिनियम, १९६६ कलम ३६ व ३६ अ बाबत महसूल विभागाकडून मंजूरी मिळण्यासाठी स्वतंत्ररित्या पत्र व्यवहार केला आहे.

सदर प्रकरणी मा. लोक आयुक्त कार्यालयाकडे महसुल विभागाकडून आवश्यक मंजुरी न मिळाल्याच्या कारणास्तव दाखल करण्यात आलेल्या तक्रारी अंतर्गत संबंधित अर्जदारांना नुकसान भरपाई देण्याबाबतची कार्यवाही ८ ते १० दिवसात करण्याचे निर्देश मा.लोक आयुक्त यांनी देवुन, प्रकरण निकाली काढण्यात आले आहे असे भिवंडी-निजामपुर शहर महानगरपालिकेने नमुद केले आहे.

तसेच मौजे-फेणे व मौजे-कामतघर गावातील काही जमीन ही सन १९६४ मध्ये वऱ्हाळा तलावाकरीता भू-संपादन करण्यांत आली आहे. सदरची बाब प्रस्तुत प्रकरणी अर्जदारांनी सादर केलेल्या मोजणी नकाशा वर (मो.र.नं. १०३४५/२०१८) दर्शविण्यात आलेली नसल्याने, महानगरपालिकेकडून उपअधिक्षक, भूमी अभिलेख कार्यालयास झालेल्या पत्र व्यवहारात उक्त मोजणी नकाशा (मो.र.नं. १११०/२०२२) महानगरपालिकेस उपलब्ध करुन देण्यात आला आहे. सदर मोजणी नकाशाची पडताळणी केली असता, वऱ्हाळा तलावासाठी सन १९६४ मध्ये भू-संपादन करण्यांत आलेल्या जागेमध्ये जमीनधारक श्री. काळूराम पांड्या धापसी व इतर यांना मौजे-फेणे सर्व्हे नं.५/१/अ क्षेत्र २४०० चौ. मी. या जमीनीचा मोबदला देण्यात आला आहे किंवा कसे याबाबतचे अभिप्राय तत्कालीन विशेष भूसंपादन अधिकारी, ठाणे यांचेकडून ,मागविण्यात आला असून सदरचे अभिप्राय मिळण्याबाबत पाठपुरावा महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.

प्रस्तुत प्रकरणी याबाबतचे अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमधील विनियम क्र. ११.२ नुसार पात्र जमीनधारकांना हस्तांतरणीय विकास हक्क प्रमाणपत्र देण्याबाबत नियमोचित कार्यवाही करण्याची तजविज ठेवण्यात आली असल्याची बाब भिवंडी-निजामपुर शहर महानगरपालिकेने कळविली आहे.

सदर प्रकरणी दिनांक २९.१२.२०२२ रोजीच्या पत्रान्वये महसुल विभागाचे अभिप्राय प्राप्त झाले असून त्याप्रमाणे भिवंडी-निजामपुर शहर महानगरपालिका हद्दीतील मौजे फेणे सर्व्हे नं.५/१/अ येथील श्री.काळुराम पांड्या धापशी व इतर या आदिवासी व्यक्तीच्या आरक्षित जमीनीच्या बदल्यात विकास हस्तांतरण हक्काची विक्री करण्यास शासनास प्राप्त झालेल्या

प्रस्तावा अंतर्गत असे निदर्शनास येते की, उक्त जमीन महानगरपालिकेच्या मंजुर विकास आराखड्यानुसार सार्वजनिक प्रयोजनार्थ आरक्षित झाली असून त्याकरिता आदिवासी खातेदार यांना हस्तांतरणीय विकास हक्क स्वरुपात मोबदला महानगरपालिकेमार्फत देण्यात येणार असल्याने त्याकरिता जमीन महसूल अधिनियम, १९६६ कलम ३६ अ नुसार शासनाच्या पूर्व मान्यतेची आवश्यकता नाही. तथापि, सदर प्रकरणी जिल्हाधिकारी, ठाणे यांनी शासनाच्या प्रचलित नियमानुसार पुढील कार्यवाही करण्याचे नमुद करुन प्रस्ताव सादर केला आहे. तसेच मौजे नारपोली येथील १८/७ संदर्भात शासनास प्रस्ताव प्राप्त झालेला नाही.

*****

महाराष्ट्र विधान सभा

सन २०२२ चे चतुर्थ (हिवाळी) अधिवेशन

डॉ.जितेंद्र आव्हाड, श्री.अजित पवार, श्री.छगन भुजबळ, श्री.दिलीप वळसे-पाटील, श्री.दत्तात्रय भरणे, श्री.हसन मुश्रीफ, श्री.अनिल पाटील, श्री.यशवंत माने, श्री.शेखर निकम, श्री.दिपक चव्हाण, श्रीमती सुमन पाटील, श्री.रोहित पवार, श्री.धनंजय मुंडे, श्री.राजेश टोपे, डॉ.राजेंद्र शिंगणे, श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील, कुमारी आदिती तटकरे, श्री.प्राजक्त तनपूरे, श्री.संजय बनसोडे, श्री.विनोद निकोले, श्री.मकरंद जाधव-पाटील, श्री.संदिप क्षिरसागर, श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार, ॲड.अशोक पवार, श्री.दिलीप मोहिते-पाटील, श्री.दिलीपराव बनकर, श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके, श्री.सुनिल शेळके, श्री.अतुल बेनके, श्री.निलेश लंके, श्री.इंद्रनिल नाईक, श्री.संग्राम जगताप, श्रीमती सरोज आहिरे, श्री.सुनिल भुसारा, श्री.दौलत दरोडा, श्री.धर्मरावबाबा आत्राम, श्री.अबू आजमी **मा.विधान सभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.११७ पुढीलप्रमाणे आहे :-**

"महाराष्ट्राच्या सीमा भागातील बेळगाव-कारवार या भागातील नागरीकांनी महाराष्ट्रात सामील होण्यासाठी शांततेच्या मार्गाने सुमारे ६९ वर्षांपासून सुरु असलेले आंदोलन हे जगाच्या पाठीवर एकमेव असणे, महाराष्ट्रातील सीमा प्रश्न समितीतील मा.मंत्री यांनाच कर्नाटकामध्ये प्रवेश करण्यास बंदी घालण्यात आल्याची दि.०६ डिसेंबर, २०२२ रोजी घडलेला धक्कादायक प्रकार, कर्नाटकातील समाजविघातक, गुंडप्रवृत्तीच्या हुल्लडबाजांनी बेळगाव व परिसरातील भागांमध्ये महाराष्ट्रातील वाहनांवर हल्ले करुन कर्नाटक पोलिसांसमोरच तोडफोड करण्यात येणे, सीमा परिसरात मराठी भाषिकांच्या जिविताचा प्रश्न गंभीर बनलेला असणे, कर्नाटक प्रशासनाने त्यांच्या सुरक्षिततेसाठी कोणतीही उपाययोजना केलेली नसणे, अद्यापही सीमा भागात तणावाची स्थिती असणे, महाराष्ट्रातील नागरीकांबरोबरच सीमा भागातील मराठी बांधवांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झालेला असणे, असे असतांना कर्नाटक सरकारने महाराष्ट्रातील सोलापूर, अक्कलकोट, जत तालुक्यातील भाग कर्नाटकात सामील करुन घेण्याची वल्गना दि.२२ नोव्हेंबर, २०२२ रोजी केलेल्या असल्याची धक्कादायक बाब उघडकीस येणे, सीमा भागातील लाखो मराठी भाषिकांवर तेथील प्रशासनाकडून वर्षानुवर्षे अन्याय, अत्याचार केले जात असणे, मराठी भाग कर्नाटकमध्ये समाविष्ट केल्याच्या निषेधार्थ नोव्हेंबर, २०२२ मध्ये कर्नाटकातील बेळगाव, निपाणी, खानापूर, कारवार, बिदर, भालकीसह महाराष्ट्राच्या सीमाभागातील कोल्हापूर, सांगली भागामध्ये उपोषण, पदयात्रा काढून शांततेच्या मार्गाने आंदोलने केलेली असणे, महाराष्ट्राच्या स्थापनेपासून महाराष्ट्रात सामील करुन घ्यावे व आपल्या न्याय्य हक्कांसाठी शांततेच्या मार्गाने येथील मराठी भाषिक नागरीकांची आंदोलने सुरु असणे, येथील मराठी भाषिकांनी आतापर्यंत शांततेने काढलेल्या अनेक पदयात्रांवर कर्नाटक पोलिसांनी यापूर्वी अमानुषपणे लाठीमार करुन आंदोलने चिरडलेली असणे, अखिल भारतीय मराठी साहित्य मंडळाच्या प्रत्येक संमेलनामध्ये ठराव, मागण्या, सूचना, निवेदने वर्षानुवर्षे महाराष्ट्र सरकारकडे पाठविण्यात येणे, मराठी भाषा, साहित्य, संस्कृतीचे केलेले जतन, संवर्धन या पार्श्वभूमीवर सीमा भागातील प्रश्न तेथील मराठी भाषिकांना मिळत असलेली दुय्यम वागणूक याचे महाराष्ट्र सरकारचे अक्षम्य दुर्लक्ष होत असणे, सीमा भागातील मराठी भाषिकांना न्याय देण्यासाठी लवकरात लवकर कार्यवाही करण्याची राज्यातील लोकप्रतिनिधी तसेच सामाजिक संघटनांनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक ९ डिसेंबर, २०२२ तसेच अलिकडील काळात वारंवार मागण्या केलेल्या असणे, सदर मागण्यांवर निर्णय घेण्यास होत असलेली दिरंगाई, टाळाटाळ, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी राज्यातील कोट्यावधी नागरीकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, संताप तसेच चिडीची भावना, कर्नाटकच्या निषेधार्थ राज्यात विविध ठिकाणी आंदोलने सुरु केलेली असणे, मराठी भाषिकांना दिलासा देण्यात शासनाला अपयश आलेले असणे, सीमा भागातील मराठी भाषिकांवर स्थानिक प्रशासकांकडून मोठ्या प्रमाणात अत्याचार केले जात असून त्यांच्या न्याय्य मागण्यांसंदर्भात युध्दस्तरावर कार्यवाही केली जात नसल्याने राज्यातील जनतेने पुढील काळात अधिक तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिलेला असणे, प्रशासनाच्या असंवेदनशीलतेमुळे सदरचा प्रश्न एवढ्या काळापासून रखडलेल्या स्थितीत असून अन्यायपिढीत मराठी भाषिकांच्या समस्या मार्गी लावण्याची नितांत आवश्यकता, याबाबत प्रशासनाचे हेतुपुरस्पर दुर्लक्ष होत असल्याने, सदर गंभीर प्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

## मा.मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

महाराष्ट्राच्या सीमा भागातील बेळगाव - कारवार या भागातील नागरीकांनी महाराष्ट्रात सामील होण्यासाठी शांततेच्या मार्गाने सुमारे ६९ वर्षांपासून सुरु असलेले आंदोलन हे जगाच्या पाठीवर एकमेव उदाहरण नसून भारतात एकुण ११ राज्यांमध्ये तसेच एका केंद्रशासित प्रदेशात सीमाभागामध्ये वाद असल्याचे दिसून येते.

सामान्य प्रशासन विभाग, दि.२२.११.२०२२ रोजींच्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र - कर्नाटक सीमा प्रश्नाचे समन्वयक मंत्री म्हणून श्री.चंद्रकांत (दादा) पाटील, मा.मंत्री (उच्च व तंत्रशिक्षण, वस्त्रोदयोग व संसदीय कार्य) व श्री.शंभुराज देसाई, मा.मंत्री (राज्य उत्पादन शुल्क) यांची नियुक्ती केली आहे. सदर मंत्री महोदयांनी महाराष्ट्र मध्यवर्ती एकिकरण समितीबरोबर सीमाप्रश्नावर चर्चा करण्यासाठी बेळगाव येथे सुनियोजित दौऱ्याचे आयोजन केले होते. तथापि, दि.०६ डिसेंबर २०२२ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनाच्या अनुषंगाने सदरचा दौरा त्यावेळेस होऊ शकला नाही.

कर्नाटकातील कन्नड रक्षक वेदिकेच्या कार्यकर्त्यांकडून दि.०६.१२.२०२२ रोजी दुपारी बेळगांव जवळील हिरेबागवाडी येथील टोलनाक्याजवळ महाराष्ट्रातील ६ ट्रकवर शाईफेक व दगडफेक केली. या हल्ल्याचा महाराष्ट्र शासनाकडून निषेध करण्यात आला.

महाराष्ट्र - कर्नाटक सीमा भागातील जिल्हयात कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून सीमावर्ती भागात असणाऱ्या बस स्थानकाच्या ठिकाणी तसेच महत्वाच्या व गर्दीच्या ठिकाणी आंतर राज्य सीमेवरील चेकपोस्टच्या ठिकाणी योग्य तो पोलीस बंदोबस्त नेमला असून सद्य:स्थितीत सीमावर्ती भागातील परिस्थिती शांत व सामान्य आहे.

श्री.सुनील पोतदार, अध्यक्ष (पाणी संघर्ष समिती) यांच्या नेतृत्वाखाली पाणी संघर्ष समितीच्या बैठकीतील चर्चेमध्ये कर्नाटक शासन व महाराष्ट्र शासनाच्या विकासात्मक ध्येयधोरणांचा तुलनात्मक अभ्यास करुन विचार मांडले. कर्नाटक शासनाने शेतकऱ्यांना मोफत वीज, शिक्षण व पाणी दिलेले आहे. परंतु वेळोवळी आंदोलने करुन सुध्दा महाराष्ट्र शासनाने कोणत्याही सोयी-सुविधा पुरविलेल्या नाहीत. त्यामुळे महाराष्ट्र शासनाने व त्यांच्या राज्यकर्त्यांनी ४२ गावांवर अन्याय केलेला आहे. त्यांनी या सुविधा दिल्या पाहिजेत, अन्यथा आपण कर्नाटकमध्ये जाऊ असा इशारा दिल्याचे जिल्हाधिकारी, सांगली यांच्या अहवालानुसार दिसून येते. तथापि, जत तालुक्यातील ४२ गावे कर्नाटक राज्यात जाणार असल्याबाबतच्या बातम्या सांगली जिल्ह्यातील स्थानिक वृत्तपत्रे व मराठी वृत्त वाहिन्यांवर प्रसिध्द झाल्या होत्या. यासंदर्भात जिल्हाधिकारी, सांगली यांच्या अहवालानुसार जत तालुक्यातील संबंधीत ४२ ग्रामपंचायतींमध्ये कर्नाटक राज्यामध्ये विलीन करण्याबाबतचा कोणताही ठराव झालेला नाही.

तथापि, वरील वस्तुस्थितीच्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनामार्फत जत तालुक्यातील सर्वांगीण विकासासाठी आरोग्य, शिक्षण, वीज व पायाभूत सुविधा यासाठी मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री राज्य अतिथीगृह, मुंबई येथे दि.०२.१२.२०२२ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत म्हैसाळ प्रकल्पांतर्गत जत विस्तारित पाणी योजनेसाठी सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला. तसेच सांगली जिल्हयातील जत-आटपाडी, कवठे-महाकाळ व तासगाव तालुक्यातील कृषी पंप धारकांना ८ तास वीज पुरवठ्याऐवजी त्यांनी केलेल्या मागणीनुसार पुढील १ महिन्याकरिता १२ तास वीज पुरवठा करण्यात यावा याकरिता महावितरण कंपनीस राज्य शासनाकडून आवश्यक ते अनुदान देण्यात यावे, असा निर्णय घेण्यात आला.

कर्नाटक राज्याचे मुख्यमंत्री यांनी सोलापूर, अक्कलकोट, जत तालुक्यातील भाग कर्नाटक राज्यात सामील करुन घेण्याबाबत केलेल्या वल्गनेच्या निषेधार्थ व महाराष्ट्रातील सीमावर्ती भागातील मराठी भाषिकांवर होत असलेल्या अन्यायाविरोधात साकीनाका, पवई, नवी मुंबई, स्वारगेट (पुणे), नाशिक, औरंगाबाद शहर, उमरोजी (चिपळूण), कुडाळ (सिंधुदुर्ग), चाळीसगाव (जळगांव), अंमळनेर, देगलूर (नांदेड), कोल्हापूर, मिरज (सांगली), दौंड (पुणे) येथे विविध पक्षाच्या संघटना, कार्यकर्ते यांचेकडून आंदोलने करण्यात आली. तथापि, तुरळक बाबी वगळता या आंदोलनामध्ये कोणताही अनुचित प्रकार घडलेला नाही.

**कर्नाटक शासनाकडून सीमा भागातील मराठी भाषिक नागरीकांची होणारी मुस्कटदाबी, त्यांच्यावर होणारे अत्याचार, त्यामुळे सीमा भागातील मराठी बांधवाना संरक्षण मिळावे व त्यांची प्रगती व्हावी यासाठी महाराष्ट्र शासनाकडून खालील विशेष प्रयत्न करण्यात आले आहेत :**

- महाराष्ट्र - कर्नाटक सीमा आंदोलनामध्ये ज्या व्यक्तींनी बलिदान दिले आहे त्या व्यक्तींना "हुतात्मा" म्हणून घोषित केले असून त्यांच्या जवळच्या एका नातेवाईकास स्वातंत्र्य सैनिकाप्रमाणे दरमहा रु.१०,०००/- निवृत्तीवेतन, रु.५००/- वार्षिक प्रवास भत्ता व रु.५०००/- वार्षिक तात्कालिक कारणास्तव मदत देण्यात येते.

सदर निवृत्तीवेतन दि.०१.११.२०२२ पासून रु.२०,०००/- करण्याबाबतचा निर्णय दि.२१.११.२०२२ च्या मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या उच्चाधिकार समितीच्या बैठकीत घेतला असून त्याबाबतचा अंतिम शासन निर्णय निर्गमित करण्यासाठीची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. सद्य:स्थितीत कोल्हापूर येथे ८, मुंबई व मुंबई उपनगर येथे ३, पुणे व रत्नागिरी येथे प्रत्येकी १ याप्रमाणे एकूण १३ लाभार्थी निवृत्तीवेतन घेत आहेत.

- सामान्य प्रशासन विभागाच्या दि.१०.०७.२००८ च्या शासन निर्णयान्वये कर्नाटकातील सीमावादीत ८६५ गावातील मराठी भाषिक उमेदवारांना सेवाभरती नियमातील सर्व अटींची पूर्तता करीत असल्यास महाराष्ट्र शासनाच्या सेवेतील पदांवर नियुक्तीसाठी अर्ज करण्यास व गुणानुक्रमे निवड होत असल्यास नेमणुकीसाठी पात्र ठरविण्यात आले आहे. महाराष्ट्रात सलग १५ वर्षे वास्तव्याची छाननी करताना ८६५ गावातील १५ वर्षांचे वास्तव्य विचारात घेऊन वास्तव्याचा विहित नमुन्यातील दाखला सक्षम अधिकाऱ्यास सादर करणे आवश्यक आहे.
- महाराष्ट्रातील गृहनिर्माण मंडळामार्फत गाळेवाटपाचे अर्ज करताना कर्नाटक राज्यात असलेल्या महाराष्ट्र शासनाने दावा केलेल्या सीमावादीत ८६५ गावांतील १५ वर्षे वास्तव्य हे त्यांचे महाराष्ट्र राज्यातील वास्तव्य असल्याचे समजण्याबाबत गृहनिर्माण विभागाच्या सूचना आहेत.
- पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाकडून सांस्कृतिक विभागामार्फत दरवर्षी प्रयोगात्मक क्षेत्रात कार्य करणाऱ्या सीमाभागातील नोंदणीकृत संस्था शासन निकषानुसार सहाय्य अनुदान मिळण्यास पात्र होतील.
- डी.एड., पदवीका अभ्यासक, डी.एड. शिक्षक, कर्नाटकातील मराठी माध्यमाच्या टि.सी.एच. अर्हता धारकास शिक्षणसेवक पदासाठी गुणवत्तेनुसार पात्र ठरविण्याबाबत, शालेय शिक्षण विभागाकडून सीमावादीत भागातील उमेदवारांना सवलती देण्यात आलेल्या आहेत.
- सीमावादीत भागातील मराठी भाषिक उमेदवारांना इतर मंत्रालयीन विभागांकडूनही सवलती देण्यात येतात. उदा. उच्च व तंत्रशिक्षण विभागामार्फत सीमावादीत भागातील उमेदवारांसाठी भारतीय प्रशासकीय सेवा (I.A.S.) पूर्व प्रशिक्षण केंद्रात ५ टक्के राखीव जागा व अभियांत्रिकी पदवी परिक्षेसाठी २० जागा उपलब्ध करण्यात आल्या आहेत.
- वैद्यकीय शिक्षण विभागाकडून शासकीय वैद्यकीय महाविद्यालये ८ जागा, दंत महाविद्यालये २ जागा व शासकीय अनुदानीत आयुर्वेदीक महाविद्यालये ५ जागा राखीव ठेवण्यात येतात.
- सीमाभागातील अल्पभाषिक नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण करणे व घटनेनुसार द्यावयाच्या सुविधा/ सवलती यांचा आढावा घेऊन सवलती प्रस्तावित करण्यासाठी अपर मुख्य सचिव (अल्पसंख्यांक विकास विभाग) यांच्या अध्यक्षतेखाली दि.०७.०३.२०१३ च्या शासन निर्णयान्वये समिती गठीत केलेली आहे.
- महाराष्ट्र - कर्नाटक सीमावर्ती भागात मराठी भाषेचा विकास, संवर्धन, संगोपन आणि अभिवृध्दी होण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र - कर्नाटक सीमा भागातील ८६५ गावांमध्ये मराठी भाषिकांसाठी कार्य करणाऱ्या मराठी संस्थांना / मंडळांना अर्थसहाय्य देण्याबाबत मराठी भाषा विभागाच्या दि.१४.०६.२०२२ च्या शासन निर्णयान्वये निर्णय घेण्यात आलेला आहे. सदर उपक्रम राज्य मराठी विकास संस्थेमार्फत राबविण्यात येणार आहे. या उपक्रमासाठी सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाकरिता रुपये १.०० कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे. मराठी भाषा विभागाच्या दि.३०.११.२०२२ च्या शासन परिपत्रकान्वये मराठी भाषेचा विकास, संवर्धन, संगोपन आणि अभिवृध्दी होण्याच्या दृष्टीने शासन निर्णयात नमूद उपक्रमांपैकी प्रत्येक उपक्रमास कमाल रुपये १.०० लाखाच्या मर्यादेत अनुदान मंजूर करण्यात येणार आहे व एका मराठी भाषिक संस्थेने/ मंडळाने एकापेक्षा जास्त उपक्रम राबविण्याचे ठरविल्यास अशा उपक्रमांसाठी मिळून रुपये १.०० कोटीच्या कमाल मर्यादेत अनुदान मंजूर करण्यात येणार आहे.
- महाराष्ट्र - कर्नाटक सीमा भागातील मराठी भाषिक जनतेवर दाखल करण्यात आलेले गुन्हे मागे घेण्याबाबत, ७/१२ उतारे तसेच कार्यालयातील सूचना फलक मराठी भाषेत लावणे, मराठी भाषेचा सर्व स्तरावर उपयोग करणे तसेच कन्नड भाषेची मराठी भाषिक जनतेवर सक्ती न करणे इ. करिता कर्नाटक शासनाशी समन्वय साधण्यात यावा असा निर्णय दि.२१.११.२०२२ रोजी मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या

उच्चाधिकार समितीच्या बैठकीत घेण्यात आला आहे. महाराष्ट्र - कर्नाटक सीमा भागातील ८६५ गावात महात्मा फुले जन आरोग्य योजना राबविण्याबाबत सार्वजनिक आरोग्य विभागास निर्देश देण्यात आले आहेत. तसेच मुख्यमंत्री सहायता देणगी या योजनेत सीमाभागातील ८६५ गावांचा पुन्हा समावेश करण्याबाबतचा शासन निर्णय सामान्य प्रशान विभागाने दि.२४.११.२०२२ रोजी निर्गमित केला आहे.

सीमा भागातील मराठी भाषिकांना न्याय देण्यासाठी लवकरात लवकर कार्यवाही करण्याबाबत राज्यातील लोकप्रतिनिधी तसेच सामाजिक संघटनांनी दि.९ डिसेंबर, २०२२ रोजी मा.मुख्यमंत्री महोदयांना पाठविलेले निवेदन मा.मुख्यमंत्री कार्यालयास प्राप्त झालेले नाही. तथापि, मा.मुख्यमंत्री कार्यालयाकडून समविषयाची पाठविलेली निवेदने/ पत्रांवर वेळोवेळी कार्यवाही करण्यात आली आहे.

**कर्नाटक शासनाकडून मराठी भाषिक जनतेवर झालेल्या अन्यायाबाबत महाराष्ट्र शासनाचा पाठपुरावा -**

१) कर्नाटक राज्यातील मराठी भाषिक सीमावासीयांवरील अन्यायाबाबत विधान मंडळाच्या दोन्ही सभागृहांनी दि.१३.०७.२०१० रोजी एकमतांनी मंजूर केलेल्या ठरावाच्या अनुषंगाने एक निवेदन मा.मुख्यमंत्री महोदयांच्या वतीने मा.पंतप्रधान महोदयांना दि.१४.०७.२०१० रोजी दिलेले आहे.

२) मराठी भाषिकांची बहुमत असलेली बेळगाव महानगरपालिका कर्नाटक शासनाने भाषिक द्वेषातून दि.१५.१२.२०११ व दि.०३.०७.२०१२ रोजी बरखास्त केली होती.

३) सीमाभागातील मराठी भाषिक अल्पसंख्यांकावर होत असलेल्या अन्यायाबाबत चौकशी करून कार्यवाही करण्याची विनंती मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी राष्ट्रीय भाषिक अल्पसंख्यांक आयुक्त, अलाहाबाद यांना दि.११.०९.२०१२ रोजीच्या पत्रान्वये केली. तसेच मा.पंतप्रधानांचे लक्ष वेधण्याची विनंती मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांनी दि.०३.१०.२०१२ रोजीच्या पत्रान्वये मा.पंतप्रधान यांचे प्रधान सचिव यांना केली आहे. या पत्राची प्रत केंद्रीय गृह सचिव यांनाही अग्रेषीत केली आहे.

४) दिनांक २७.०७.२०१४ रोजी येळ्ळूर, जि.बेळगाव येथील "महाराष्ट्र राज्य, येळ्ळूर" हा फलक व चौथरा कर्नाटक पोलीसांनी तोडून टाकला. या प्रकारास विरोध करणाऱ्या स्थानिक मराठी भाषिक ग्रामस्थांना कर्नाटक पोलीसांनी अमानुष मारहाण केली. राज्य मंत्रिमंडळाने दि.३०.०७.२०१४ च्या बैठकीत या घटनेचा तीव्र निषेध करुन तसा ठराव पारित केला. तत्कालीन मा.मुख्यमंत्री यांनी दि.१४.०८.२०१४ च्या पत्रान्वये मा.पंतप्रधान, मा.केंद्रीय गृहमंत्री व मा.मुख्यमंत्री, कर्नाटक राज्य यांना महाराष्ट्रीय जनतेच्या तीव्र भावना कळविल्या असून, मा.पंतप्रधान व मा.केंद्रीय गृहमंत्री यांचे कार्यालयांकडूनही सदर पत्राची दखल घेतली आहे.

५) कर्नाटक सरकारच्या स्थानिक स्वराज्य संस्थाचे निर्वाचित प्रतिनिधी व कर्नाटकचे आमदार यांनी "जय महाराष्ट्र" असे म्हणण्यास प्रतिबंध करण्यात येईल असे कर्नाटकचे नगरविकास मंत्री, श्री.रोशन बेग यांच्या या असंवैधानिक कृतीचा निषेध करुन याबाबतची महाराष्ट्र शासनाची तीव्र नाराजी व्यक्त करुन कर्नाटकचे मा.मुख्यमंत्री महोदयांना दि.२३.०५.२०१७ रोजीच्या पत्राद्वारे, वादग्रस्त सीमा भागातील जनतेच्या, लोक प्रतिनिधींच्या संविधानिक हक्कांच्या प्रती सजग, संवेदनशील व गंभीर असून कर्नाटक शासनाच्या जबाबदार मंत्र्यांकडून असे बेकादेशीर कृत्य घडल्यास महाराष्ट्र शासन वादग्रस्त सीमा भागातील जनतेच्या संविधानिक हक्कांच्या संरक्षणासाठी आवश्यक ती सर्व कायदेशीर कार्यवाही करील असे कळविले आहे.

६) मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी मा.पंतप्रधान यांना दि.२९.०७.२०१७ च्या पत्रान्वये गृह मंत्रालय, केंद्र शासन यांनी मा.सर्वोच्च न्यायालयात सुनावणीवेळी नि:पक्ष भूमिका घेण्याबाबत निर्देश द्यावेत अशी विनंती केली आहे. याबाबत दि.२६.०९.२०१७ रोजी मा.समन्वयक मंत्री, सीमाप्रश्न श्री.चंद्रकांत पाटील यांनी केंद्र शासनाचे मा.कायदा मंत्री श्री.रविशंकर प्रसाद यांची नवी दिल्ली येथे भेट घेऊन त्यांना अवगत केले आहे.

७) सीमाप्रश्न सोडविण्यासाठी महाराष्ट्र शासन करित असलेले प्रयत्न वादग्रस्त सीमाभागातील व संपूर्ण राज्यातील जनतेला त्याची माहिती मिळण्याच्या अनुषंगाने शासनाने दि.२७.०१.२०२१ रोजी तत्कालीन मा.मुख्यमंत्री महोदयांच्या हस्ते "महाराष्ट्र-कर्नाटक सीमावाद : संघर्ष आणि संकल्प" या पुस्तकाचे प्रकाशन केले आहे.

८) मध्यवर्ती महाराष्ट्र एकिकरण समितीचे अध्यक्ष श्री.दिपक दळवी यांचेवर दि.१३.१२.२०२१ रोजी कन्नड वेदीके रक्षक संघटनेच्या गुंडांनी शाईफेक केली. दि.१६.१२.२०२१ रोजी कन्नड वेदीके रक्षक संघटनेच्या गुंडांनी बेंगळूर येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाचीही विटंबना केली होती. या दोन्ही घटनांचा मध्यवर्ती महाराष्ट्र एकिकरण समिती व महाराष्ट्र शासनाने तीव्र निषेध केला आहे.

९) या दोन्ही घटनांच्या अनुषंगाने सीमा भागातील मध्यवर्ती महाराष्ट्र एकिकरण समितीच्या युवा आघाडीचे अध्यक्ष श्री.शुभम शेळके व अन्य पदाधिकारी तसेच शेकडो कार्यकर्त्यांनी सनदशीर मार्गाने विरोध केला असता, त्यांच्यावर कर्नाटक पोलिसांनी गुन्हे दाखल करुन त्यांना अटकही केली होती. कर्नाटक पोलिसांचा त्यांचेवर राजद्रोहाचे गुन्हे दाखल करण्याचा केलेला प्रयत्न न्यायालयात यशस्वी झाला नाही.

महाराष्ट्र शासनाने सीमा प्रश्न सोडविण्याच्यादृष्टीने मा.मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली उच्चाधिकार समिती व मा.श्री धैर्यशील माने, खासदार यांच्या अध्यक्षतेखाली तज्ञ समिती स्थापन केली आहे.

सामान्य प्रशासन विभाग, दि.२२.११.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र - कर्नाटक सीमा प्रश्नाचे समन्वयक मंत्री म्हणून श्री.चंद्रकांत (दादा) पाटील, मा.मंत्री (उच्च व तंत्रशिक्षण, वस्त्रोद्योग व संसदीय कार्य) व श्री.शंभुराज देसाई, मा.मंत्री (राज्य उत्पादन शुल्क) यांची नियुक्ती केली आहे.

मा.सर्वोच्च न्यायालयात महाराष्ट्र शासनाने दाखल केलेल्या दावा क्र.४/२००४ मध्ये केंद्र शासनाने नि:पक्ष भूमिका घ्यावी तसेच मा.सर्वोच्च न्यायालयातील याचिकेचा निकाल लागेपर्यंत सीमावादीत भागाबाबत संसदेत पाठपुरावा करण्यासाठी विविध संसदीय आयुधांचा वापर करणेबाबत महाराष्ट्रातील सर्वपक्षीय संसद सदस्यांना आवश्यक सूचना देण्यात येतात.

नोव्हेंबर, १९५६ मध्ये राज्यांची पुनर्रचना झाल्यानंतर तत्कालीन मुंबई राज्यातील बेळगाव (चंदगड तालुका वगळून) विजापूर, धारवाड व कारवार हे मराठी भाषिक जिल्हे पूर्वीच्या म्हैसूर राज्यात विलिन करण्यात आले. महाराष्ट्र शासनाने खेडे हे एक घटक, भौगोलिक सलगता, मराठी किंवा कन्नड भाषिक लोकांची सापेक्ष बहुसंख्या व लोकेच्छा या सूत्रानुसार फेररचनेची मागणी करुन कर्नाटकातील ८६५ सीमावादीत गावांवर महाराष्ट्र शासनाने दावा केला. यासंदर्भात केंद्र शासनाने १९६६ मध्ये नियुक्त केलेल्या महाजन आयोगाच्या शिफारशी मान्य न झाल्याने व सामोपचाराने प्रश्न सोडविण्याचे सर्व उपाय संपल्यामुळे महाराष्ट्र शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात केंद्र शासन व कर्नाटक शासन यांच्याविरुध्द मूळ दावा क्र.४/२००४, दिनांक २९.०३.२००४ रोजी दाखल केला आहे.

सदर न्यायालयीन दाव्यात राज्याची बाजू प्रभावीपणे मांडण्यासाठी वरिष्ठ विधीज्ञ श्री.हरिष साळवे, विशेष समुपदेशी श्री.राकेश द्विवेदी, श्री.वैद्यनाथन व तज्ञ तसेच अनुभवी वकीलांची टीम (Battery of Advocates) शासनाकडून नियुक्त करण्यात आलेली असून सद्य:स्थितीत सदर प्रकरण मा.सर्वोच्च न्यायालयात न्यायप्रविष्ठ आहे.

*****

लक्षवेधी सूचना क्रमांक: १८६

**श्री. छगन भुजबळ, श्री.अजित पवार, श्री.धनंजय मुंडे, श्री.दिलीप वळसे-पाटील, डॉ.जितेंद्र आव्हाड मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम, १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे.**

"राज्य लोकसेवा आयोगाने अराजपत्रित गट-ब आणि गट-क साठीच्या मुख्य परीक्षेच्या अभ्यासक्रमातून "महाराष्ट्राचा इतिहास" हा विषयच वगळला असणे, दिनांक १५ नोव्हेंबर, २०२२ ला आयोगाने जाहीर केलेल्या नव्या अभ्यासक्रमात महाराष्ट्राच्या इतिहासाचा समावेश नसल्याने आश्चर्य व्यक्त केले जात असणे, याआधी अराजपत्रित गट-ब आणि गट-क च्या पूर्व आणि मुख्य परीक्षेत भारताचा इतिहास (महाराष्ट्राच्या इतिहासासह) असा अभ्यासक्रम असणे, मात्र नवीन अभ्यासक्रमात मुख्य परिक्षेसाठी महाराष्ट्राचा इतिहास समाविष्ट करण्यात आलेला नसणे, लोकाभिमुख प्रशासनात अधिकारी म्हणून सहभागी होताना राज्यातील महापुरुषांची कारकीर्द, त्यांच्या कार्याचे योगदान, उभारलेल्या सामाजिक आणि शैक्षणिक संस्था त्यातून समाजात घडलेला बदल याबाबतचा अभ्यास परीक्षार्थी करत असणे, विशेषत: छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, राजर्षी छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महर्षि कर्वे, गोपाळ गणेश आगरकर, क्रांतिसिंह नाना पाटील व त्यांचे पत्री सरकार, कर्मवीर भाऊराव पाटील, शिक्षण महर्षी वि.रा. शिंदे, धोंडो केशव कर्वे, र. धों कर्वे, संत गाडगेबाबा, तुकडोजी महाराज यासारख्या सामाजिक परिवर्तनाची चळवळ उभारणाऱ्या बहुजनवादी महापुरुषांच्या जीवनचरित्रांना अभ्यासक्रमात महत्वाचे स्थान असणे, त्यातून महाराष्ट्राच्या सामजिक, शैक्षणिक आणि आर्थिक स्थित्यंतरासोबतच स्वातंत्र, समता आणि बंधुता याबाबत या युवा पिढीची वैचारिक बैठक पक्की होत असणे, लोकभिमुख प्रशासनात काम करताना या महापुरुषांच्या कार्याचा आदर्श घेऊन नवीन पिढी निर्माण होण्यास मदत होत असणे, असा या अभ्यासक्रमाच्या मागील हेतू असणे, हाच भाग अभ्यासक्रमातून वगळल्यास नव्या पिढीला समाजसुधारकांचे कार्य व बलिदान कधीच समजणार नसल्याबाबत चिंता व्यक्त होत असणे, राज्य लोकसेवा आयोगाच्या आचारसंहितेच्या धास्तीने तयारी करणारे परीक्षार्थी जाहीरपणे याबाबत बोलण्याचे टाळत असणे, त्यामुळे राज्य सरकारनेच याबाबतची भूमिका घेत महाराष्ट्रातील समाजसुधारकांचा पूर्वीच्या पध्दतीनेच अभ्यासक्रमात समावेश करण्याची आवश्यकता असणे, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

<u>मा.मुख्यमंत्री यांचे निवेदन</u>

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या महाराष्ट्र अराजपत्रित सेवा गट-ब व महाराष्ट्र अराजपत्रित सेवा गट-क या दोन्ही संवर्गाच्या मुख्य परीक्षेचा अभ्यासक्रम दिनांक १५ नोव्हेंबर,२०२२ रोजी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला होता. सदर दोन्ही संवर्गाच्या संयुक्त पूर्व परीक्षेच्या अभ्यासक्रमात इतिहास हा विषय समाविष्ट होता. त्यामुळे मुख्य परीक्षेच्या अभ्यासक्रमात सदर घटक वगळण्यात आला होता. परंतु इतिहास हा विषय मुख्य परीक्षेतही समाविष्ट करण्याची मागणी विचारात घेऊन सुधारित अभ्यासक्रमात इतिहास हा विषय समाविष्ट करण्यात आला आहे. त्यानुसार सुधारित अभ्यासक्रमात आधुनिक भारताचा विशेषत: महाराष्ट्राच्या इतिहासाचा समावेश करण्यात आला असून त्यामध्ये सामाजिक व आर्थिक जागृती (सन१८८५ ते १९४७), महत्वाच्या व्यक्तींचे कार्य, समाजसुधारकांचे कार्य, स्वातंत्र्यपूर्व भारतातील सामाजिक जागृतीतील वर्तमानपत्रे, शिक्षणाचा परिणाम, स्वातंत्र्यपूर्व काळातील इतर समकालीन चळवळी, राष्ट्रीय चळवळी या विषयांचा समावेश करण्यात आला आहे. सुधारित अभ्यासक्रम महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या संकेतस्थळावर दिनांक ०५ डिसेंबर, २०२२ रोजी प्रसिध्द करण्यात आला आहे.



..........

सामान्य प्रशासन विभाग

लक्षवेधी सूचना क्र.१७५५

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२२ चे तृतीय अधिवेशन

श्री.अभिमन्यु पवार, श्री. राणाजगजीतसिंह पाटील, श्री.राजेश पवार, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सुचना क्र. १७५५ खालीलप्रमाणे आहे-

"राज्यसेवा २०१९ चा निकाल १९ जून २०२० रोजी लागला असणे. यात वर्ग एक व वर्ग दोन मधून एकूण ४१३ अधिकाऱ्यांची निवड झाली असून ४८ उमेदवार हे एस ई बी सी प्रवर्ग म्हणजे मराठा समाजाचे असणे. दरवर्षीप्रमाणे एक ऑगस्टला या नवीन निवड झालेल्या अधिकाऱ्यांना नियुक्ती पत्र देणे आवश्यक असताना मात्र करोनाच्या प्रसाराचे कारण देऊन सामान्य प्रशासन विभागाने नियुक्तीपत्रे देण्यास विलंब केला असणे. राज्यसेवा २०१९ चा परीक्षेचे सर्व प्रक्रिया पूर्ण झाली होती फक्त नियुक्ती पत्र देणे बाकी असणे. दरम्यान चा काळात मराठा आरक्षणाच्या विरोधात सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले गेले असणे. सर्वोच्च न्यायालयाने ९ सप्टेंबर २०२० रोजी मराठा आरक्षण लागू असणाऱ्या नवीन नियुक्ती साठी प्रतीक्षेत असलेल्या उमेदवारांना स्थगिती दिली असणे. १९ जून २०२० ला निकाल लागल्यापासून केवळ नियुक्तीपत्रे देण्यास सामान्य प्रशासन विभागाने विलंब केल्यामुळेच ९ सप्टेंबर २०२० रोजी सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिली असल्याने आणि ४१३ उमेदवारांच्या निवडीची सर्व प्रक्रिया म्हणजे पूर्व परीक्षा मुख्य परीक्षा आणि मुलाखत होऊन सर्व टप्पे पार करून उमेदवारांची निवड झाली असतांनाही केवळ सामान्य प्रशासन विभागाच्या दिरंगाईमुळे हे उमेदवार नियुक्ती पासून वंचित राहिले असणे. ५ मे २०२१ रोजी माननीय सर्वोच्च न्यायालयाने मराठा आरक्षण असंविधानिक घोषित करून रद्दबातल ठरविले त्यामुळे दिनांक १५ जुलै २०२१ च्या शासन निर्णयानुसार वरील सर्व ४८ जागा ज्या मराठा उमेदवारांसाठी राखीव होत्या त्या सर्व खुल्या प्रवर्गासाठी वर्ग करण्यात आल्या असणे. राज्यसेवा २०१९ चा एमपीएससी ने सुधारित निकाल २८ सप्टेंबर २०२१ रोजी परत जाहीर केला असणे. या सुधारित निकालात मराठा समाजा सोबत इतर समाजाचे अनेक उमेदवारांच्या निवडी रद्द झाल्या असणे. तसेच बऱ्याच उमेदवारांना पसंती क्रमातील खालच्या कनिष्ठ क्रमांकाचे कनिष्ठ दर्जाचे पदे स्वीकारावे लागणे, मूळ निकालानंतर १९ महिन्याच्या कालावधीनंतर १७ जानेवारी २०२२ रोजी उमेदवारांना अंतिम नियुक्त दिल्या असणे, या १९ महिन्यांच्या कालावधीत उमेदवारांना मानसिक आणि आर्थिक त्रास सहन करावा लागला असणे, दिनांक २५ ऑगस्ट २०२२ रोजी महाराष्ट्र विधिमंडळाने पारित केलेल्या अधिसंख्य पदांबाबतच्या विधेयकानुसार राज्यसेवा २०१९ चे जे उमेदवार अंतिम यादीतून बाहेर पडले आहेत तसेच ज्यांच पद पदावनत (उपजिल्हाधिकारी चे तहसीलदार) झाले आहे त्यांचा साठी अधिसंख्य पदे निर्माण करण्यात आली असणे. राज्य शासनाकडून प्राप्त माहितीच्या आधारे आधीसंख्य पदांची निर्मिती व पदस्थपणा सुरू असणे. या अधिसंख्य पदांच्या सेवाशर्तीबाबत कोणतीही बाब शासनाने स्पष्ट केलेली नसणे. अधिसंख्य पदांबाबतच्या सेवाशर्ती पदोन्नती व इतर

सेवा विषयक लाभ याबाबत स्पष्टता नसणे.. तसेच या उमेदवारांना खुद्द माननीय मुख्यमंत्री महोदय आणि माननीय उपमुख्यमंत्री यांच्या हस्ते दि.२७ सप्टेंबर २०२२ रोजी नियुक्तीपत्रे प्रदान करूनही उमेदवारांची कागदपत्रे पडताळणी झालेली नसल्याने तसेच उमेदवाराना अजूनही रुजू करून घेतले नसणे. सबब ही अधिसंख्य पदे नियमित करण्याबाबत तरतूद करून या उमेदवारांना तात्काळ रुजू करून घेण्याबाबत व अधिसंख्य पदांबाबतच्या सेवाशर्ती, पदोन्नती व इतर सेवा विषयक लाभ याबाबत स्वतंत्र परिपत्रक निर्गमित करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.'

## मा.मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने राज्यसेवा परीक्षा, २०१९ चा निकाल दिनांक १९ जून २०२० रोजी घोषित केला असून ४१३ उमेदवारांची शिफारस करण्यात आली होती. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग दिनांक ०४/०१/२०१७ अन्वये राज्यसेवा परीक्षेद्वारे शिफारसप्राप्त उमेदवारांचे प्रशिक्षण दिनांक १ ऑगस्ट पासून सुरु करण्याची तरतूद विहित करण्यात आली आहे. तथापि, राज्यातील कोविड प्रादुर्भावामुळे राज्यसेवा परीक्षेच्या निकालाद्वारे शिफारसप्राप्त ठरलेल्या उमेदवारांच्या नियुक्तीकरीता आवश्यक चारित्र्य पडताळणी व वैद्यकीय तपासणीसंदर्भातील कार्यवाही तातडीने करणे शक्य नव्हते. तसेच राज्य सेवा परीक्षेमार्फत शिफारसप्राप्त ठरणाऱ्या वर्ग २ च्या उमेदवारांना प्रशिक्षण देण्यात येत असलेल्या वनामती, नागपूर या प्रशिक्षण संस्थेमध्ये कोविड केंद्र सुरू करण्यात आले होते. तसेच कोविड प्रादुर्भावामुळे शारिरिक अंतर राखणे इ. स्वरुपांच्या निर्बंधामुळे उमेदवारांचे प्रशिक्षण संस्थांमध्ये एकत्रित प्रशिक्षण सुरु करणे शक्य नव्हते. त्यामुळे राज्य सेवा परीक्षा, २०१९ च्या निकालान्वये शिफारसप्राप्त उमेदवारांच्या नियुक्तीपूर्व प्रक्रीया पूर्ण झाली होती, फक्त नियुक्तीपत्र देण्यात आले नाही अशी बाब नाही.

कोविड प्रादुर्भावाच्या सदर परिस्थितीस अनुसरुन राज्य सेवा परीक्षा, २०१९ अन्वये शिफारसप्राप्त ठरलेल्या उमेदवारांचे एकत्रित परिवीक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम (सीपीटीपी) अंतर्गत प्रशिक्षण कोविड प्रादुर्भावाची परिस्थिती पाहून ऑगस्ट, २०२० ऐवजी नोव्हेंबर, २०२० पासून सुरु करण्याचे नियोजित होते. दरम्यान राज्य सेवा परीक्षा, २०१९ च्या निकालाअन्वये शिफारस केलेल्या उमेदवारांमध्ये सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग आरक्षणाद्वारे शिफारस करण्यात आलेल्या उमेदवारांचा समावेश होता. सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग आरक्षण

संदर्भातील मा. सर्वोच्च न्यायालयातील याचिका क्रमांक ३१२३/ २०२० (जयश्री लक्ष्मणराव पाटील वि. मुख्यमंत्री) प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ९ सप्टेंबर, २०२० रोजी दिलेल्या अंतरिम स्थगितीच्या अनुषंगाने राज्य सेवा परीक्षा, २०१९ अन्वये शिफारसप्राप्त उमेदवारांना नियुक्ती देणे शक्य झाले नाही.

मा.सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक ५ मे २०२१ रोजीच्या अंतिम आदेशांच्या अनुषंगाने शासन निर्णय दिनांक १५ जुलै, २०२१ अनुसार महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने राज्य सेवा परीक्षा, २०१९ चा सुधारित निकाल दिनांक २८ सप्टेंबर, २०२१ रोजी घोषित केला असून ४१६ उमेदवारांची शिफारस शासनाकडे केली. या शिफारसप्राप्त उमेदवारांची चारित्र्य पडताळणी, वैद्यकीय तपासणी तसेच विहित कागदपत्रे / प्रमाणपत्रे पडताळणीची कार्यवाही करुन पात्र उमेदवारांना दिनांक १७ जानेवारी, २०२२ पासून "सीपीटीपी ७ या तुकडीमध्ये प्रशिक्षणासाठी नियुक्ती देण्यात आली आहे.

मा.सर्वोच्च न्यायालयाच्या दि.९.९.२०२० च्या स्थगिती आदेशानंतर सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास वर्ग आरक्षण अधिनियम, २०१८ अनुसार कुणालाही शासन सेवेत नियुक्त्या देता येणे शक्य नव्हते.त्यामुळे महाराष्ट्र लोकसेवा आयोग,जिल्हा निवड मंडळे व इतर सक्षम निवड यंत्रणांनी ईएसबीसी व एसईबीसी प्रवर्गातून नियुक्तीकरीता शासनाकडे/नियुक्ती प्राधिका-यांकडे शिफारस केलेल्या उमेदवारांना न्यायालयीन स्थगिती आदेशामुळे तसेच कोविड-१९ लॉकडाऊन यामुळे नियुक्ती आदेश देता आली नाही, तसेच मा.सर्वोच्च न्यायालयाच्या दि.५ मे, २०२१ च्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी निर्गमित करण्यात आलेल्या दि.५ जुलै,२०२१ व दि.१५ जुलै,२०२१ च्या शासन निर्णयानुसार निवडयाद्या सुधारीत केल्यामुळे ईडब्ल्युएस, अराखीव, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विजा/भज, इमाव व विशेष मागास प्रवर्ग या सर्वच प्रवर्गातील काही उमेदवार देखील नियुक्तीपासून वंचित झाले होते, अशा सर्वच प्रवर्गातील उमेदवारांना नियुक्ती देण्यासाठी महाराष्ट्र अधिसंख्य पदाची निर्मिती व निवड केलेल्या उमेदवारांची नियुक्ती अधिनियम,२०२२ पारित करण्यात आला.या अधिनियमानुसार १०६४ उमेदवरांना अधिसंख्य पदावर नियुक्ती देण्यासंदर्भात दि.२१.९.२०२२ च्या शासन निर्णयान्वये सविस्तर सूचना देण्यात

आल्या.त्यानुसार संबंधित उमेदवारांच्या कागदपत्रांची पडताळणी करून त्यांना नियुक्ती देण्याची कार्यवाही ब-याच प्रशासकीय विभागांनी पुर्ण केली आहे.

महाराष्ट्र अधिसंख्य पदाची निर्मिती व निवड केलेल्या उमेदवारांची नियुक्ती अधिनियम,२०२२ अन्वये १०६४ अधिसंख्य पदाची निर्मिती करण्यात आल्यानंतर दि.९.९.२०२० पुर्वी महाराष्ट्र लोकसेवा आयोग,जिल्हा निवड मंडळे व इतर निवड यंत्रणांनी नियुक्तीकरीता शासनाकडे/नियुक्ती प्राधिका-यांकडे शिफारस केलेल्या आणखी ४८९ उमेदवारांना उमेदवारांना न्यायालयीन स्थगिती आदेशामुळे तसेच कोविड-१९ लॉकडाऊन आणि नोकर भरतीवरील निर्बंध यामुळे नियुक्ती आदेश देता आले नसल्याचे शासनाच्या निदर्शनास आणण्यात आले.त्यामुळे या ४८९ उमेदवारांसाठी अधिसंख्य पदे निर्माण करून त्यांना नियुक्ती देण्यासाठी महाराष्ट्र अधिसंख्य पदाची निर्मिती व निवड केलेल्या उमेदवारांची नियुक्ती (सुधारणा)विधेयक,२०२२ राज्य विधानमंडळाने नागपूर येथिल चालू हिवाळी अधिवेशनात (२०२२ च्या) मध्ये पारित झाले आहे. पारीत झालेले विधेयक राज्यपालांद्वारे अधिनियमाच्या रुपात प्रसिद्ध झाल्यावर ४८९ उमेदवारांना नियुक्ती देण्यासंदर्भात सविस्तर शासन निर्णय निर्गमित करण्यात येईल. त्यामुळे यापुर्वी निवड झालेल्या उमेदवारांना अधिसंख्य पद अथवा नियमित पद यापैकी कोणतेही एक पद निवडण्याचा / स्वीकारण्याचा पर्याय उपलब्ध राहील.

अधिसंख्य पदावर नियुक्ती देण्यात आलेल्या उमेदवारांच्या सेवाशर्ती व अनुषंगिक बाबींसंदर्भातील निर्णय लवकरच घेण्यात येईल.

---

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२२ चे चौथे (हिवाळी) अधिवेशन

**मा. श्री. नारायण कुचे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ८५७ पुढीलप्रमाणे आहे :-**

"सन २०१८ ते सन २०२० याकालावधीत जालना जिल्ह्यामध्ये मे. भारत इलेक्ट्रिकल सांगली या एजन्सीने काम न करता बिल काढण्यात आली असे निदर्शनास आले असणे, तसेच उक्त प्रकरणी चौकशी झाली नसून याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दि.१५.१०.२०२० रोजी मा.अभियंता अभियंता, पायाभूत आराखडा, म.रा.वि.वि.कंपनी लि.,औरंगाबाद यांना निवेदन देऊन चौकशी करण्याची मागणी केली होती असेही आढळून येत असणे, तसेच संबंधीत कामात एजन्सीने गावठाण फिडर आणि गावठाण लाईनचे काम हे निकृष्ट दार्जचे झाले आहे असेही आढळून आले असणे, तसेच उक्त मागणीनुसार सदरहू प्रकरणी चौकशी करण्यात आली नसल्याचेही आढळून येत असणे,तसेच चौकशीनुसार सदरहू प्रकरणी शासनाने दोषी असणा-यांविरुद्ध कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्याचे निदर्शनास येत असणे? परिणामी स्थानिक पातळीवर सामान्य जनतेतून शासनाच्या प्रती तीव्र असंतोष पसरलेला असणे, परिणामी शासनाने तातडीने करावयाची कारवाई किंवा उपाय योजना व शासनाची प्रतिक्रिया.? "

## <u>मा. उप मुख्यमंत्री तथा मंत्री (ऊर्जा) यांचे निवेदन</u>

जालना जिल्ह्यामध्ये मे. भारत इलेक्ट्रिकल, सांगली या एजन्सीला दिनदयाळ उपाध्याय ग्राम ज्योती योजने अंतर्गत दि.१७.०६.२०१७ च्या कार्यादेश अन्वये वाहिनी विलगीकरण व इतर कामे देण्यात आली होती. मे. भारत इलेक्ट्रिकल सांगली या एजन्सीला देण्यात आलेली कामे व एजन्सीने पूर्ण केलेल्या कामाचा तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | कामाचा तपशिल | एजन्सीला देण्यात आलेली कामे | एजन्सीने पूर्ण केलेली कामे |
|---|---|---|---|
| १ | रोहित्रे | ५७१ | ५१४ |
| २ | वाहिनी विलगीकरण | ६५ | ५१ |
| ३ | SDT | ६० | ४० |
| ४ | १०० KVA बॉक्स बदलणे | १०० | १०० |
| ५ | उच्चदाब वाहिनी | ८३१.४ | ७८८.१२ |
| ६ | लघुदाब वाहिनी | १८६.५७ | ११२.८५ |
| ७ | फीडर बे | ६५ , | ६१ |
| ८ | दारिद्र्य रेषेखालील ग्राहकांना वीज जोडण्या | २३४८ | २३४८ |

सद्यस्थितीत दिनदयाळ उपाध्याय ग्राम ज्योती योजना मे, २०२२ मध्ये पूर्ण झालेली असून, सदर योजनेचा पूर्णत्वाचा अहवाल आरईसी (Rural Electricity Corporation), भारत सरकार यांना पाठविण्यात आलेला आहे. सदर योजनेअंतर्गत मे. भारत इलेक्ट्रिकल सांगली यांनी पूर्ण केलेल्या

कामाचे बिल अदा करण्यात आले आहे व पूर्ण न झालेल्या कामाचे कोणतेही पैसे अदा करण्यात आलेले नाही.

स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जालना जिल्ह्यामध्ये मे. भारत इलेक्ट्रिकल सांगली या एजन्सीने सन २०१७-१८, २०१८-१९ व २०१९-२० या कालावधीमध्ये केलेल्या कामाची माहिती देण्याबाबत, तसेच पंडित दिनदयाळ उपाध्याय ग्राम ज्योती योजना अंतर्गत गावठाण फिडरचे कामे व बदनापुर मतदार संघामध्ये करण्यात आलेल्या कामाबाबत माहिती मागविली होती. सदर माहिती त्यांना पायाभूत आराखडा मंडळ कार्यालय, औरंगाबाद यांचे दिनांक ०३/११/२०२० च्या पत्रानुसार उपलब्ध करून देण्यात आली आहे.

उपरोक्त पत्रास अनुसरुन, मा. सह व्यवस्थापकीय संचालक, औरंगाबाद यांनी चौकशी समिती गठित केली. सदर समितीस साहित्याचा दर्जा व कामाचा दर्जा कंपनीच्या निकषानुसार आढळून आला. चौकशी समितीस ज्या किरकोळ त्रुटी आढळुन आल्या त्या त्रुटींचे निराकरण एजन्सीकडून करुन घेण्यात आले.

दिनदयाळ उपाध्याय ग्राम ज्योती योजनेअंतर्गत करण्यात येणाऱ्या कामाच्या गुणवत्तेची तपासणी विविध स्तरावर करण्यात येते. कामासाठी लागणाऱ्या मेजर मटेरिअलची तपासणी कामाच्या ठिकाणी मटेरिअल पाठविण्यापूर्वी फॅक्टरीमध्ये करण्यात येते. तसेच, सदर योजनेमध्ये गुणवत्तेची तपासणी करण्यासाठी आरईसी, भारत सरकार यांनी आरईसीपीडीसीएल या त्रयस्थ एजन्सीची नेमणूक केलेली होती व सदर एजन्सीने मे. भारत इलेक्ट्रिकल सांगली यांनी जालना जिल्ह्यामध्ये केलेल्या कामाच्या गुणवत्तेची तपासणी वेळोवेळी केलेली आहे व आढळून आलेल्या त्रुटींची पुर्तता मे. भारत इलेक्ट्रिकल सांगली यांनी केलेली आहे.

******************

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२२ चे चौथे (हिवाळी) अधिवेशन

मा. श्री. राजेश पवार, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १०४४ पुढीलप्रमाणे आहे :-

"'राज्याच्या ग्रामीण भागात शेतकऱ्यांच्या शेतीसाठी नियमीत विज सेवा मिळणे अनिवार्य असणे, शेतकऱ्यांचे शेतातील किंवा गावातील रोहित्र खराब झाल्यास दुरुस्तीसाठी प्रचंड विलंब होत असणे, रोहित्र साठी लागणारे पुरेसा ऑईल साठा महावितरण कडे कधीचं उपलब्ध नसल्याचे निदर्शनास येणे, रोहित्र मधील ऑईल चोरीला जात असणे, त्यामुळे ऑईलचा साठामध्ये मोठा घोटाळा होणे, ऑईल घोटाळ्यामध्ये महावितरणचे अधिकारि सुद्धा सामील असणे, ऑईल चोरी घोटाळाची व्याप्ती संपूर्ण राज्यभर असणे, त्यामुळे शासनाचे प्रचंड आर्थिक नुकसान होत असणे, ग्रामीण भागातील सर्वसामान्य गोर गरीब मजुर शेतकरी वर्गाचे आर्थिक, सामाजिक, मानसिक नुकसान होत असणे, त्यामुळे शासनाने ऑइल चोरी महाघोटाळ्याची समिति नेमून या गंभीर प्रकरनि चौकशी करून ऑईल चोरी महाघोटाळ्यात जे दोषी असणाऱ्या अधिकारांविरुद्ध तातडीने करावायची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."'

<u>मा. उप मुख्यमंत्री तथा मंत्री (ऊर्जा) यांचे निवेदन</u>

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीमार्फत राज्यात विविध वर्गवारीच्या २.९२ कोटी वीज ग्राहकांना ८,४९,३५३ वितरण रोहित्रांमार्फत वीज पुरवठा करण्यात येतो. सदर वितरण रोहीत्रांचे तापमान नियंत्रित करण्याकरीता इन्सुलेटिंग ऑईलचा वापर करण्यात येतो. नैसर्गिक, तांत्रिक कारणामुळे तसेच वितरण रोहीत्रे जुनी झाल्यामुळे नादुरुस्त होत असतात. सदर वितरण रोहीत्रे तातडीने दुरुस्त करण्यासाठी महावितरण मार्फत संपूर्ण राज्यात १,९३४ एजन्सी नेमलेल्या आहेत.

महावितरणमार्फत सन २०२२-२३ मध्ये (दि.२२.१२.२०२२) अखेर नादुरुस्त झालेल्या ४६,८४२ रोहित्रांपैकी ४६,४९५ रोहीत्रे बदलण्यात आलेले असून, उर्वरीत ३४७ रोहीत्रे बदलण्याचे काम प्रगतीपथावर आहे. दि. ३०.११.२०२२ पर्यंत नादुरुस्त झालेले सर्व रोहीत्रे दि. १०.१२.२०२२ पर्यंत बदलण्यात आली आहेत. नादुरुस्त वितरण रोहित्रे तसेच ऊर्जा रोहित्रे (Power Transformer) दुरुस्त करण्यासाठी प्रामुख्याने इन्सुलेटिंग ऑईलचा वापर करण्यात येतो. सन २०२१-२२ मध्ये पुर्वतयारी म्हणून ८,००० किलोलिटर ऑईलचा पुरवठा आदेश मेसर्स भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड व मेसर्स इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लिमिटेड (प्रत्येकी ४,००० किलोलिटर) या कंपन्यांना देण्यात आला होता. नादुरूस्त रोहित्रे दुरूस्त करण्यासाठी ऑईलचा मुबलक पुरवठा करण्यात आल्याने मार्च, २०२२ अखेरीस २,५४५ किलोलिटर ऑईलचा साठा उपलब्ध होता. सन २०२२-२३ मध्येही ऑईलची कमतरता भासू नये म्हणून ७,००० किलोलिटर ऑईलचा पुरवठा आदेश मेसर्स भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड व मेसर्स इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लिमिटेड (प्रत्येकी ३,५०० किलोलिटर) या कंपन्यांना देण्यात आलेला असून, सदर

पुरवठा आदेशाअंतर्गत आजतागायत ५,४४४ किलोलिटर ऑईल प्राप्त झाले आहे. तसेच उर्वरीत १,५५६ किलोलिटर ऑईलचा पुरवठा माहे फेब्रुवारी, २०२३ पर्यंत प्राप्त होणार आहे. सन २०२२-२३ मध्ये आजतागायत क्षेत्रिय कार्यालयांना ६,८०० किलोलिटर ऑईलचा पुरवठा करण्यात आलेला आहे. सध्या मध्यवर्ती भांडारगृहात १,१९० किलोलिटर ऑईलचा साठा उपलब्ध असून ऑईल अभावी रोहीत्रे नादुरुस्त राहणार नाहीत याची दक्षता घेण्यात येत आहे.

सन २०२२-२३ मध्ये आजतागायत १,२६३ रोहित्रातील ऑईल चोरीच्या घटना घडल्या असून सुमारे २८३ किलोलिटर ऑईलची चोरी झाल्याचे निर्दशनास आले आहे. सदर गुन्ह्यांची नोंद पोलीस स्टेशन मध्ये करण्यात आलेली आहे. पुढील तपास पोलीस यंत्रणेमार्फत सुरु आहे.

नादुरुस्त रोहीत्रे महावितरणच्या फिल्टर युनीट मध्ये आणल्यावर त्यातील ऑईल काढून वितरण रोहित्रे दुरुस्तीसाठी पाठविली जातात. रोहीत्रातील काढलेल्या ऑईलचे शुध्दीकरण करुन पुनर्वापर करण्यात येतो. सदर ऑईलचे (नवीन प्राप्त झालेले तसेच शुध्दीकरण केलेले) मंडळ कार्यालय स्तरावर ऑडिट करण्यात येते. ऑईलच्या आवक जावक व साठ्याची ईआरपी (ERP) या संगणकीय प्रणालीमार्फत नोंद घेण्यात येते. ऑईलच्या साठ्यामध्ये घोटाळ्याची कुठलीही तक्रार महावितरण कार्यालयात प्राप्त झाली नाही.

*******************

लक्षवेधी सूचना क्र. १८२.

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२२ चे हिवाळी अधिवेशन

**श्री. छगन भुजबळ, श्री. अजित पवार, श्री. धनंजय मुंडे, श्री. दिलीप वळसे-पाटील, , डॉ. जितेंद्र आव्हाड, श्री. चेतन तुपे, श्री. दिपक चव्हाण, श्री. हसन मुश्रीफ, श्री. राजेश टोपे, डॉ. राजेंद्र शिंगणे, श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील, श्री. दत्तात्रय भरणे, कुमारी आदिती तटकरे, श्री. प्राजक्त तनपुरे, श्री. संजय बनसोडे, श्री. अनिल पाटील, श्री. यशवंत माने, श्रीमती सुमन पाटील, श्री. रोहित पवार, श्री. शेखर निकम, श्री. संजय केळकर, श्री. किसन कथोरे, ॲड. आशिष शेलार, श्री. अजय चौधरी, श्री. भास्कर जाधव, श्री. रमेश कोरगांवकर, श्री. राजकुमार पटेल, श्री. प्रमोद (राजू) रतन पाटील, श्री. अस्लम शेख, श्री. अमिन पटेल, श्री. झीशान सिद्दिकी, श्री. नानाभाऊ पटोले, श्री. सुनिल केदार, श्री. विजय वडेट्टीवार, श्री. बाळासाहेब थोरात, श्री. कुणाल पाटील, प्रा. वर्षा गायकवाड, श्री. अतुल भातखळकर, वि. स .स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १८२ पुढीलप्रमाणे आहे-**

"धडगाव तालुक्यातील (जि. नंदुरबार) विवाहित तरुणीवर सामुहीक अत्याचार करुन तिचा दिनांक १ ऑगस्ट २०२२ रोजी वा त्यासुमारास खून केल्याची संतापजनक घटना दिनांक १३ सप्टेंबर २०२२ रोजी वा त्या सुमारास उघडकीस येणे, या संशयास्पद मृत्यू प्रकरणी पोलिसांनी अन्याय करून आत्महत्येचा गुन्हा दाखल केल्यामुळे पिडीत मुलीला न्याय मिळण्यासाठी मुंबईतील डॉक्टरांकडून तिचे शवविच्छेदन करण्याकरिता मुलीच्या पालकांनी तब्बल ४४ दिवसांपासून मृतदेह मिठामध्ये राखून ठेवल्याची हृदयद्रावक घटना दिनांक १३ सप्टेंबर २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आलेली असणे, मुलीवर चार नराधमांनी सामूहिक अत्याचार करून तिचा खून केला असताना पोलिसांनी फक्त आत्महत्येचा गुन्हा नोंदविलेला असणे, शवविच्छेदनावेळी तिच्यावरील अत्याचाराबाबत तपासणी न केल्याचा आरोप पित्याने केला असणे, आपल्या मुलीला न्याय मिळावा यासाठी पित्याने ग्रामस्थांच्या मदतीने व्यवस्थेविरोधात लढा सुरु करणे, मुलीवर अत्याचार झाल्याचे पोलिसांना सांगूनही शवविच्छेदनात तपासणी झाली नसल्याचा आरोप पित्याने केलेला असणे, मुलीला फाशी दिली असून पोलिसांच्या मदतीने ती आत्महत्या भासवण्याचा प्रयत्न झालेला असणे, जोपर्यंत पुन्हा शवविच्छेदन केले जात नाही. तोपर्यंत अंत्यसंस्कार करणार नाही. असा पीडितेच्या वडिलांनी पवित्रा घेणे, सदर प्रकरणी पोलीस यंत्रणा आणि स्थानिक वैद्यकीय अधिका-यांकडून दिरंगाई व टाळाटाळ झालेली असणे, त्यामुळे या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून चौकशी अहवालाच्या अनुषंगाने संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन दोषी पोलीस अधिकारी व वैद्यकीय अधिका-यांवर कारवाई करण्याची आवश्यकता, तसेच पिडीत कुटुंबाला न्याय मिळण्यासाठी शासनाने उपाययोजना करण्याची आवश्यकता, मात्र याबाबत शासनाकडून दिरंगाई व टाळाटाळ केली जात असल्याने नागरिकांमध्ये निर्माण झालेले संशयाचे वातावरण, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

---

### मा. उपमुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन

पिडीतेच्या वडिलांनी दिलेल्या फिर्यादीवरुन पोलीस स्टेशन, धडगाव, जि. नंदुरबार येथे दिनांक ०२.०८.२०२२ रोजी गु.र नं. २०७/२०२२, भादवि कलम ३०६, ३४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात एकूण ०४ आरोपी असून ०१ विधीसंघर्षात बालक आहे.

पिडीत तरुणीच्या मृतदेहाचे दि. ०२.०८.२०२२ रोजी ग्रामीण रुग्णालय, धडगाव येथे शवविच्छेदन करण्यात आले. पिडीतेच्या वडिलांचा वैद्यकीय अधिकारी यांनी केलेल्या शवविच्छेदनाबाबत आक्षेप होता.

मा. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, धडगांव यांनी दि. १२.०९.२०२२ रोजी सदर पिडीत तरुणीच्या मृतदेहाचे पुन्हा शवविच्छेदन करण्याची परवानगी दिली. यामध्ये मृत्युचे अंतिम कारण "ASPHYXIA DUE TO HANGING WITH EVIDENCE OF DECOMPOSITION (un-natural)" असे नमूद केले आहे.

सदर गुन्ह्यामध्ये तपासाअंती सदर प्रकरणी खून न झाल्याचे निष्पन्न झाले असून भादवि कलम ३०६, ३७६ (अ) (ड), ३५४, ३६३ आणि ३४ अन्वये मा. न्यायालयात दिनांक ३१.१०.२०२२ रोजी दोषारोप पत्र दाखल करण्यात आले आहे. सदर गुन्ह्याचा तपास विशेष तपास पथक यांचेमार्फत करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी पोलीस ठाण्याचे तत्कालीन प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक व तत्कालीन तपासी अधिकारी पोलीस उपनिरीक्षक यांना हलगर्जीपणा केल्याच्या कारणास्तव तात्काळ निलंबित करण्यात आले असून त्यांचे विरुध्द विभागीय चौकशी करण्यात येत आहे. तसेच अन्य ४ कर्मचाऱ्यांची इतरत्र बदली करण्यात आली आहे. वैद्यकीय अधिकारी, ग्रामीण रुग्णालय, धडगाव यांनी केलेल्या प्रथम शवविच्छेदनाची चौकशी करण्याकरिता जिल्हा शल्यचिकित्सक, नंदुरबार यांच्या स्तरावर त्रिसदस्यीय चौकशी समिती गठीत करण्यात आली होती. सदर चौकशी समितीने दिनांक ३०.११.२०२२ रोजी अहवाल सादर केला असून पुढील कार्यवाही सुरू आहे.

---

लक्षवेधी सूचना क्र.२०५ गृह विभाग

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२२ चे चौथे (हिवाळी) अधिवेशन

डॉ. जितेंद्र आव्हाड, श्री. अजित पवार, [redacted], श्री. छगन भुजबळ, श्री.दिलीप वळसे-पाटील, श्री. हसन मुश्रीफ, श्री. दत्तात्रय भरणे, श्री. रोहित पवार, श्री.अनिल पाटील, श्री. यशवंत माने, श्रीमती सुमन पाटील, श्री. शेखर निकम, श्री. दिपक चव्हाण, श्री.राजेश टोपे, श्री. धनंजय मुंडे, कुमारी आदिती तटकरे, डॉ. राजेंद्र शिंगणे, श्री.दिलीपराव बनकर, श्री. सुनिल भुसारा वि.स.स.यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२०५ पुढीलप्रमाणे आहे :-

"ठाणे येथील पोलिस वसाहतींमधील इमारतींची मोठ्या प्रमाणावर दुरवस्था झालेली असून जीर्णावस्थेत असलेल्या इमारती कोसळण्याच्या स्थितीत असल्याची माहे डिसेंबर, २०२२ च्या दुस-या आठवड्यात धक्कादायक माहिती उघडकीस येणे, या पोलिस वसाहतींमध्ये मुलभूत सोयीसुविधांचा प्रचंड अभाव असल्याने पोलिस कुटूंबियांना त्रासदायक अडचणींचा सामना करावा लागत असणे, जरीमरी पोलिस वसाहतीमधील इमारती १०० वर्षापुर्वीच्या असणे, ठाणे शहर व वर्तकनगर पोलिस वसाहतींमध्येही प्रचंड गैरसोयीमुळे पोलिस कुटूंबियांना त्रासदायक अडचणींचा सामना करावा लागत असणे, घरांच्या भिंतीतुन गळती होत असणे, प्लॅस्टर पडल्याने सळ्या दिसू लागलेल्या असणे, वसाहतीमध्ये साफसफाई व्यवस्थित होत नसणे, घरांमध्ये नेहमीच दुरुस्तीची कामे स्वतः करावी लागत असणे, पोलिस वसाहतीमध्ये सुसज्ज इमारतींची उभारणी करुन पोलिसांना सुसज्ज निवासस्थाने देण्यासंदर्भात आतापर्यंत अनेकदा बैठका घेण्यात आलेल्या असणे, मात्र कोणताही निर्णय झालेला नसल्याने वसाहतींमधील पोलिसांना असुविधांचा सामना करावा लागत असल्याची गंभीर बाब उघडकीस येणे, यासंदर्भात लवकरात लवकर आवश्यक कार्यवाही व उपाययोजना करण्याची लोकप्रतिनिधींनी, सामाजिक संघटनांनी मा. मुख्यमंत्री, मा. उपमुख्यमंत्री यांचेकडे दि. ०९ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास वारंवार मागणी करुनही आवश्यक कार्यवाही करण्यास होत असलेली दिरंगाई, टाळाटाळ, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी ठाणे येथील धोकादायक वसाहतींमध्ये रहात असलेल्या पोलिस कुटुंबियांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, संताप तसेच चिडीची भावना, धोकादायक स्थितीत असलेल्या इमारती कोसळुन गंभीर अपघात होऊन जिवीत तथा प्रचंड वित्त हानी होणार असल्याने त्यांचेमध्ये चिंतेचे तथा असुरक्षिततेचे पसरलेले वातावरण, जनतेच्या रक्षणासाठी अहोरात्र झटणा-या पोलिस व त्यांच्या कुटूंबियांच्या डोक्यावर सुरक्षित छप्पर नसल्याने नेहमीच भितीदायक स्थितीत रहावे लागत असणे, पोलिसांना सर्वसोयीसुविधांनियुक्त अशी सुसज्ज घरे देण्यासंदर्भात आवश्यक कार्यवाही करण्यास प्रशासनाचे हेतुपुरस्पर दुर्लक्ष होत असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

### मा. उप मुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन

ठाणे येथील ४ विविध परिसरातील पोलीस वसाहतीमध्ये सन १९३९ मध्ये १२ बैठया चाळी, १९५७ मध्ये ६ इमारती, १९८२ मध्ये १७ व २०१२ मध्ये ५ ईमारती पोलीस अधिकारी/ कर्मचारी यांच्याकरिता बांधण्यात आलेल्या असून तेथे एकूण १०६४ निवासस्थाने आहेत.

ठाणे शहर परिसरातील कोर्ट नाका येथील जरीमरी पोलीस वसाहत अंतर्गत १२ इमारतींचे संरचनात्मक परिक्षण करणेकरिता सार्वजनिक बांधकाम विभागास निधी वर्ग करण्यात आलेला आहे. त्या अनुषंगाने जरीमरी पोलीस वसाहतीमधील इमारतीचे संरचनात्मक परीक्षण केले आहे. त्यामध्ये एकही रुम धोकादायक घोषित केलेली नाही. परंतू इमारतींची तात्काळ दुरुस्ती करणेबाबत कळविल्यानुसार संरचनात्मक अहवालामध्ये नमूद केलेल्या उपाययोजना व दुरुस्तीबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग, ठाणे यांना पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे.

तसेच उपरोक्त १२ इमारतींचे दुरुस्ती व नुतनीकरण करण्याकरिता सार्वजनिक बांधकाम विभाग [illegible] अंदाजपत्रकातील रक्कम रु.१५,३४,८५,८१०/- इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता व निधी

उपलब्ध करण्याबाबतचा प्रस्ताव गृह विभागास प्राप्त झाला आहे. सदरचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागास पाठवण्यात येत आहे.

ठाणे शहर परिसरातील कोर्ट नाका येथील नवीन पोलीस लाईन व ड्रायव्हर पोलीस लाईन, जुने अधिकारी निवासस्थान येथील १० इमारतीचे परिक्षण करण्यासाठी रु.१५,५३,५८०/- इतका निधी सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.१, ठाणे यांना वर्ग करण्यात आलेला आहे. सदर पोलीस इमारतीचे संरचनात्मक परिक्षण अहवाल प्राप्त झाले असुन, त्यानुसार पी. आय. क्वार्टर्स ८ ही एक इमारत संपूर्ण व व इतर ९ इमारतीमधील एकूण ११६ रुम धोकादायक घोषित केलेल्या आहेत. तथापि, सदर रुममध्ये कोणीही राहत नाही. धोकादायक घोषित केलेल्या रुममध्ये तात्काळ दुरुस्ती करणेबाबत व संरचनात्मक परिक्षण अहवालामध्ये नमूद केलेल्या उपाययोजना व दुरुस्तीबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.१, ठाणे यांचेकडून सदर निवासस्थानांची दुरुस्ती सुरु आहे.

कोर्ट नाका येथील ९ इमारतीमधील एकूण ३७ क्वार्टर्स धोकादायक रुमची दुरुस्ती केलेली असून धोकादायक रुममध्ये राहत असलेले पोलीस अंमलदार यांना स्थलांतरित करण्यासाठी रिक्त असलेल्या ७३ अशा ११० रुमची देखील दुरुस्ती केलेली आहे.

कोर्ट नाका ठाणे येथील नवीन पोलीस वसाहत बि.नं. १, ३, ४, ५ व ६ या इमारतीमध्ये असलेल्या निवासस्थानांच्या मोऱ्यांची पाणी गळती दुरुस्तीचे कामकाज करणेकरिता व इतर दुरुस्ती आणि नुतणीकरण करण्याकरीता अंदाजपत्रकातील नमूद रक्कम यास प्रशासकीय मान्यता व निधी मंजूरी मिळणेसाठीच्या प्रस्तावास पोलीस महासंचालक कार्यालयामार्फत तांत्रिक मंजुरी प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही सुरु असुन, त्यानंतर प्रशासकीय मंजूरी व निधी उपलब्धतेची कार्यवाहीबाबत शासन स्तरावर निर्णय घेण्यात येईल.

जरीमरी पोलीस वसाहती समोरील १२ बैठया चाळी पाडून त्या ठिकाणी नवीन १३६ शासकीय निवासस्थाने बांधणेबाबतचा प्रस्ताव पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ, वरळी, मुंबई यांचेकडे सादर केला असुन, त्यासाठी त्यांनी मे. डीझाइन कंन्स्ट्रक्शन यांची वास्तुविशारद म्हणून नेमणूक केलेली आहे.

वर्तकनगर, ठाणे येथील सन १९९३ मध्ये पोलीस विभागाने म्हाडाकडून १० इमारती (५५६ सदनिका) खरेदी केलेल्या असुन सद्यस्थितीत धोकादायक झालेल्या आहेत. १० इमारतीपैकी ५ इमारती निष्कासित करण्यात आल्या असुन उर्वरित ५ इमारतीमध्ये कोणीही राहत नाही. वर्तकनगर येथील पोलीस वसाहतीचा पुनर्विकास म्हाडाकडून करण्यासाठी ना-हरकत प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही गृह विभागाकडून सुरु आहे.

ठाणे शहर परिसरातील कापुरबावडी येथील पोलीस विभागाच्या नांवे असलेल्या मौजे माजीवडे ठाणे येथील जागेवर पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचेकरीता शासकीय निवासस्थान बांधकामाबाबतचे प्रस्ताव पोलीस आयुक्त, ठाणे कडून पोलीस महासंचालक कार्यालयाकडे सादर करण्यात आलेले आहेत. पोलीस महासंचालक स्तरावर राज्यातील ३०६ पोलीस सेवा निवासस्थान बांधकाम प्रकल्पाच्या यादीस प्राधान्यक्रम ठरविण्याची कार्यवाही सुरू असून सदर प्राधान्यक्रम यादीमध्ये या प्रस्तावांचा समावेश करण्यात आलेला आहे.

पोलीसांसाठी जास्तीत जास्त निवासी बांधकामे करण्यासाठी नुकतीच मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत पोलीस विभागाच्या गृहनिर्माण कार्यक्रमांतर्गत शिघ्र, मध्यम, व दीर्घकालीन योजना असे तीन टप्पे करून, त्यामध्ये शिघ्र टप्पा योजनेमध्ये युएलसी अंतर्गत उपलब्ध १२०० घरे विविध ठिकाणी विखुरलेल्या अवस्थेत तयार आहेत, ती पोलीसांना सध्या निवासस्थान म्हणून वाटप करण्याच्या अनुषंगाने विचार करुन ही घरे तातडीने उपलब्ध करण्याबाबत प्रस्ताव विचाराधीन आहे. त्यानुषंगाने जिल्हाधिकारी, ठाणे यांचे यादीनुसार नागरी जमीन कमाल धारणा (नाजकधा) अधिनियमाच्या कलम २० अन्वये (युएलसी, शासनाच्या ५टक्के कोटयातील सदनिका) मंजूर गृहबांधणी योजनेतील ठाणे शहर परिसरातील १९० सदनिका तसेच ठाणे, कल्याण, अंबरनाथ, डोंबिवली, उल्हासनगर, बदलापूर परिसरातील ४२७ तसेच इतर यादीतील २५ असे एकूण ६४२ सदनिका नागरी जमीन कमाल धारणा अधिनियमाच्या कलम २० अन्वये मंजूर गृहबांधणी योजनेतून पोलीस आयुक्तालय, ठाणे शहर यांच्या आस्थापनेवर उपलब्ध करण्याचे विचाराधीन आहे.

XXXXX

H1893- 19_

लक्षवेधी सूचना

गृह विभाग

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२२ चे हिवाळी अधिवेशन

मा. श्री. सुभाष धोटे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. ५६८ पुढीलप्रमाणे आहे :-

" राज्यातील चंद्रपूर जिल्हाअंतर्गत बल्लारपूर पोलीस ठाणे येथे दिनांक ७ सप्टेंबर २०२२ रोजी ठाणेदार श्री. उमेश पाटील यांच्या कक्षात ठाणेदारांच्याच टेबलावर एका विशिष्ट राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्याचा वाढदिवस केक कापुन साजरा करण्यात आला असणे, याबाबतची क्लिप ही समाजमाध्यमांवर व्हायरल झाल्याने सदरील व्हीडिओची समाजमाध्यमावर जोरदार चर्चा सुरु असणे, बल्लारपूर शहरात अनेक अवैध व्यवसाय सुरु असून गांजा, ब्राऊनशुगर, कोसोतस्करी यासह इतरही अवैध व्यवसायावर आळा घालण्याचे ठाणेदार यांच्यासमोर आव्हान असणे, परंतु या अवैध व्यवसायिकांना स्थानिक पोलीस विभागाकडून मूकसंमती असल्याने या अवैध व्यवसायाला अभय मिळत असल्याचे निदर्शनास येणे, परिणामी येथील जनतेत पसरलेले तीव्र असंतोषाचे वातावरण, सरकारी कार्यालयात गैरशासकीय कर्मचारी/व्यक्तीचा अथवा राजकीय कार्यकर्त्यांचा वाढदिवस, लग्नाचा वाढदिवस वा तत्सम कार्यक्रम आयोजित करण्यासंदर्भात शासनाने काही धोरणात्मक निर्णय घेतला वा भविष्यात प्रस्तावित आहे का ? अशा बेकायदेशीर अवैध व्यवसायिकांना कामे करण्यास शासकीय कर्मचारी एकप्रकारे मूकसंमती देत असल्यास सदरहू वर्तन कर्मचारी सेवा आचारसंहितेचे उल्लंघन होत असल्याचे निदर्शनास येणे, परिणामी आपल्या हितसंबंधी लोकांना खुश करण्यासाठी असा चुकीचा पायंडा पाडणाऱ्या अधिकाऱ्यांची चौकशी करुन शासनाने सदरहू प्रकरणी संज्ञान घेऊन प्रतिबंधात्मक खबरदारी भविष्यात घेण्याबाबत संबंधित दोषींवर तातडीने करावयाची कठोर कारवाई व यावर प्रतिक्रिया. "

---

मा. उप मुख्यमंत्री (गृह) महोदयांचे निवेदन

दैनिक लोकमत या वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या बातमीच्या अनुषंगाने विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र यांनी दिलेल्या आदेशानुसार याप्रकरणी उपविभागीय पोलीस अधिकारी, राजूरा यांचेमार्फत सविस्तर चौकशी केली असता बल्लारपूर शहराचे तत्कालीन नगराध्यक्ष श्री. हरीश शर्मा यांचा पोलीस

स्टेशन बल्लारपूर येथील ठाणेदार श्री. उमेश पाटील यांनी पोलीस स्टेशन मध्ये वाढदिवसानिमित्त केक कापून शुभेच्छा दिल्याचे निदर्शनास आले. तथापि, श्री. शर्मा नेहमीच पोलीसांच्या कार्यात सहभाग व सहकार्य करतात या दृष्टीकोणातून त्यांचा वाढदिवस साजरा केलेला असून यामध्ये कोणत्याही प्रकारचा स्वार्थ किंवा हेतू दिसून येत नाही असा अहवाल उपविभागीय पोलीस अधिकारी, राजूरा यांनी दिलेला आहे. मात्र पोलीस निरीक्षक श्री. उमेश पाटील यांनी केलेल्या कसूरीच्या अनुषंगाने विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र, नागपूर यांनी महाराष्ट्र पोलीस (शिक्षा व अपील) नियम १९५६ अंतर्गत "सक्त ताकीद" ही शिक्षा दिलेली आहे.

पोलीस स्टेशन बल्लारपूर यांचेकडून अवैध व्यवसायांवर आळा घालण्याच्या दृष्टीने वेळोवेळी कारवाई करण्यात आलेली असून नाकाबंदी,ऑलआऊट ऑपरेशन, माहित असलेले गुन्हेगार तपासणी अशी मोहीम राबविण्यात येत असते. नोव्हेंबर २०२२ अखेर एकूण २७६ एवढे गुन्हे दाखल झालेले असून त्यापैकी रेती यामध्ये १, दारुबंदी कायद्यांतर्गत २३३, जुगार कायद्यांतर्गत ३२, आर्म्स अॅक्ट अंतर्गत १० गुन्हे अंतर्भूत आहेत. यामध्ये एकूण ११७ आरोपी अटक असून रु. ३३,३२,३१०/- एवढ्या किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. पोलीस स्टेशन कडून करण्यात आलेली सदरहू कारवाई विचारात घेता अवैध व्यवसायावर नियमीत कारवाई होत असल्याचे दिसून येते.

******************

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२२ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन

चतुर्थ

लक्षवेधी सूचना क्र.१९८९

**ॲड.माणिकराव कोकाटे विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"जि.नाशिक, मालेगाव येथील संगमेश्वर भागातील भूखंड क्र. ९६ ते १०० सदर भूखंडावर गेले ५० वर्षाहून अधिक काळ लघु व्यवसाय करणारे दुकानदार, हॉटेल आदी व्यवसायीकांना प्रस्तावित समावेश न करता, मिळकतधारकांनी महापालिका आयुक्ताची दिशाभूल करून बेकायदेशीररित्या बांधकाम परवानगी दिल्याचा प्रकार नुकताच उघडकीस येणे. सदर प्रकरणी मिळकत मालक बाळू अहिरे व आर्किटेक्ट मुकुंद चिंधडे यांना महापालिकेने नोटीस बजावण्यात येणे, परंतु नोटीसला उत्तर देण्यापूर्वीच मिळकतधारकांनी वहिवाटीचा रस्ता खोदल्याने येथील लघु व्यवसायीकांमध्ये सतापाचे वातावरण निर्माण होणे, मिळकत मालक तथा आर्किटेक्ट यांनी मंजुर नकाशाप्रमाणे काम न करणे, जुना आग्रा रोड येथे सुमारे ३५ तर पाठिमागे १५ पत्राशेड दुकाने असणे. परवानगी दिलेल्या मंजुर नकाशात सदरहू दुकानांचा कोणताही समावेश नसल्याने सदरहू अनेक वर्षापासून व्यवसाय करीत असलेल्या दुकानदारांवर बेकारीचे संकट कोसळणे, सदरहू जागेत पालिका प्रशासनाने आर्थिक संगनमताने भ्रष्ट मार्गाचा अवलंब करुन बेकायदेशीरपणे अटी व शर्तीचे उल्लंघन करून बांधकाम परवानगी दिल्याचा प्रकार उघडकीस येणे, कब्जेदार भाडेकरूंच्या ताब्यातील क्षेत्रात तफावत निर्माण करुन कमी दर्शविणे, वहिवाटीचे रस्ते बंद करणे. डी. पी. रोड मोकळे नसतानाही मोकळे दर्शविणे. कलम ४७ अन्वये अपिलातील निर्णयाप्रमाणे न्यायप्रविष्ट क्षेत्राची अद्याप पालिकेने मोजणी न करणे, विविध शासकीय स्तरावरील या प्रकरणी झालेले आदेश प्रलंबित ठेवणे. जे बनावट कागदपत्र महापालिकेत बांधकाम परवानगीसाठी दाखल केले त्या कागदपत्रां विरोधात जागा मालकावर फौजदारी दावा क्र. ५३६/२०१४ दाखल असून पुन्हा तिच कागदपत्रे विचारात घेऊन बांधकाम परवानगी देणे, बांधकाम परवानगी मिळवताना कब्जेदार भाडेकरूंना मोजणी नकाशात न दर्शवणे. मा.लोकआयुक्त यांच्या चौकशी आदेशानुसार सहाय्यक संचालक, नगररचना, श्री. माने यांनी सादर केलेल्या दि. २०/१२/२०१९ रोजीच्या अहवालावर अंमलबजावणी न करणे. पीआयएल ६३/२०१५ या मा. उच्च न्यायालयातील दाव्यात महापालिकेने सादर केलेल्या प्रतिज्ञापत्राप्रमाणे वस्तूस्थिती जागेवर नसणे, महासभेत सदर बांधकाम परवानगी रद्द करणे कामी ठराव सर्वानुमते मंजूर झाला असतानादेखील सदर

HB 1092 (2) 725 प्रती

ठरावाची अंमलबजावणी न करणे, सदरहू प्रकरणी पालिका आयुक्त श्री.भालचंद्र गोसावी यांच्यासह त्यांचे विविध अधिकारी यांनी आर्थिक संगनमताने मिळकत मालक व विकासक यांना झुकते माप देऊन लघु व्यवसायीक भाडेकरुंवर बेदखल होण्याची पाळी आणणे, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया"

**मा.मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन**

विषयांकित लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने निवेदन खालीलप्रमाणे आहे.

मालेगांव शहराची नगर रचना योजना क्र. १ सन १९६२ मध्ये मंजूर झालेली आहे. तर मालेगांव शहराची दुसरी सुधारित विकास योजना सन २००६ मध्ये भागश: मंजूर असून, उर्वरीत विकास योजना सन २००९ मध्ये मंजूर झालेली आहे. सदरच्या मंजूर विकास योजनेनुसार अर्जदार यांचा अंतिम भुखंड क्र. ९६ ते १०० या जागा १२.० मी., १८.० मी. व ३०.० मी. विकास योजना रस्त्यांने बाधीत होत असून, उर्वरीत जागा रहिवास विभागात समाविष्ट आहे.

विषयाधिन जागेपैकी अंतिम भुखंड क्र. ९६ व ९७ च्या एकत्रिकरण व उपविभागणी नकाशास मालेगांव महानगरपालिकेने पत्र क्र. ५०, दि. १६.१.२०१४ अन्वये मंजुरी दिली असून, अंतिम भुखंड क्र. (९६+९७)/ब व भुखंड क्र. ९८,९९ व १०० च्या एकत्रिकरणास मालेगांव महानगरपालिकेने पत्र क्र. ५१, दि. १६.१.२०१४ अन्वये मंजुरी दिलेली आहे. तर अंतिम भुखंड क्र. (९६+९७)/अ [सध्याचे भु.क्र.९६/क] या जागेवरील बांधकामास पत्र क्र. ४६५, दि. १६.१.२०१४ अन्वये मंजुरी दिली आहे व अंतिम भुखंड क्र. (९६+९७)/ब+९८+९९+१०० [सध्याचे भु.क्र.९६/अ] या जागेवरील बांधकामास पत्र क्र. ४६६, दि. १६.१.२०१४ अन्वये मंजुरी दिलेली आहे.

सदर भु.क्र.९६/अ या जागेवर आग्रारोड सन्मुख ३५ टपऱ्या व पश्चिमेस १५ टपऱ्या अश्या कच्च्या स्वरुपाची अस्तित्वातील बांधकामे असून ती बांधकाम नकाशावर दर्शविण्यात आलेली नसल्याची बाब जागा मालक यांनी कामास प्रत्यक्ष सुरुवात केल्यानंतर मालेगांव महानगरपालिकेस याबाबत प्राप्त अनेक लेखी तक्रारीद्वारे निदर्शनास आल्यावर याबाबत खुलासा करावा अन्यथा, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ५१ अन्वये बांधकाम परवानगी रद्द करण्यात येईल, असे जागा मालक यांना महानगरपालिकेने कळविले होते.

अंतिम भुखंड क्र. (९६+९७) /ब+९८+९९+१०० [सध्याचे भु.क्र.९६/अ] वरील ताबेदार यांनी मा. न्यायालयात रे.मु.न. ८१, ८२ व ८३ व इतर अपिल दाखल केली होती. मा. न्यायालयाने दि. २६.३.२०१४ अन्वये दिलेल्या आदेशानुसार, जमीन मालकास विद्यमान कच्च्या मिळकतीचा ताबा घेण्यास तात्पुरती स्थगिती दिली होती. त्या अनुषंगाने मालेगांव महानगरपालिकेने संपुर्ण जमीनीचा ताबा प्राप्त होईपर्यंत बांधकाम परवानगीस स्थगिती देण्यात येत आहे, असे पत्र क्र. २५९२, दि. २.८.२०१४

अन्वये जागामालक व वास्तुविशारद यांना कळविले होते. मालेगांव महानगरपालिकेने दिलेली स्थगिती अन्यायकारक असून, मालेगांव महानगरपालिकेने दिलेल्या बांधकाम परवानगीच्या आदेशासी सदरची स्थगिती विसंगत आहे. असे नमूद करुन सदरचे स्थगिती आदेश रद्दबातल करण्यात यावे, अशी विनंती कमलाकर शंकर पवार यांनी शासनास कलम ४७ अन्वये दाखल अपीलाद्वारे केली होती.

विषयाधीन जागेवरील न्यायप्रविष्ठ / वादग्रस्त क्षेत्र बगळुन उर्वरित जागेवर सुधारित बांधकाम परवानगी प्रस्ताव अर्जदार यांनी मालेगांव महानगरपालिकेस सादर केला असून त्यास मान्यता देण्याची बाब अंतिम टप्प्यात असल्याबाबतचा मालेगांव महानगरपालिकेने शासनास कलम ४७ अपील प्रकरणी सादर केलेला अहवाल विचारात घेवून सदर प्रकरणी मालेगाव महानगरपालिकेने न्यायप्रविष्ट क्षेत्र सोडून उर्वरित क्षेत्रावरील सुधारित बाधकाम नकाशे प्रचलित विकास नियंत्रण नियमावलीस अधीन राहून मंजूर करावेत असा शासनाने कलम ४७ अपील प्रकरणी फेब्रुवारी, २०१६ मध्ये निर्णय दिलेला आहे.

नगरभूमापन कार्यालयाकडील मो.र.नं.०५/२०१४ मोजणी दि. १२.०८.२०१४ व मो.र.नं. ११०/२०१४, मोजणी दि. २१.०७.२०१४ रोजीच्या मोजणी नकाशाच्या आधारे मालेगाव महानगरपालिकेचे तत्कालीन आयुक्त यांनी मौजे संगमेश्वर येथील अं.भू.क्र. ९६-अ येथे पत्र क्र. ३१८, दि. १८.०८.२०१८ अन्वये Commercial Complex करिता सुधारित बांधकाम परवानगी दिली आहे. जागेवरील भाडेकरू / कब्जेदार / तक्रारदार यांच्या बांधकामाचे क्षेत्र उक्त मोजणी नकाशावर लाल रंगाने दर्शविण्यात आले असून सदर दर्शविलेल्या क्षेत्रापेक्षाही अधिकचे क्षेत्र बांधकाम नकाशावर दर्शविले आहे व सदर बांधीव क्षेत्र अनुज्ञेय बांधीव क्षेत्रामधून वगळण्यात आले आहे. तसेच सदरची बांधकामे To be Demolish म्हणून दर्शविण्यात आलेली नाहीत. मात्र सदर सुधारीत बांधकाम परवानगी नकाशात दर्शविण्यात आलेली बांधकामे ही न्यायप्रविष्ठ / वादग्रस्त क्षेत्र क्षेत्राची खात्री करण्यासाठी नव्याने मोजणी करण्यात आलेली नाही.

सदर अं.भु.क्र. ९६-अ साठी पूर्व हदी लगतचा अस्तित्वातील जुना मुंबई-आया रस्ता पोहोच रस्ता म्हणून उपलब्ध आहे. तसेच वहिवाटीच्या रस्त्यावर बांधकाम परवानगी देण्याचा प्रश्न उदभवत नाही. विकास परवानगी देताना अं.भु.क्र. ९६-ब व ब पै म्हणून मोजणी नकाशावर दर्शविलेल्या विकास योजना रस्त्याखालील क्षेत्रासाठी चटई क्षेत्र निर्देशांकाचा लाभ देण्यात आलेला नाही. उक्त डी. पी. रस्ते व सदरची बांधकाम परवानगी यांचा कोणताही संबंध नाही. सदर डी.पी रस्त्यावरील अतिक्रमणे हा स्वतंत्र वेगळा विषय असून सदर बांधकाम परवानगीशी त्याचा कोणताही संबंध नाही. तसेच कोणत्याही बनावट कागदपत्राच्या आधारे बांधकाम परवानगी देण्यात आलेली दिसून येत नाही.

प्रस्तुत प्रकरणी श्री. सुरेश महेंद्र पवार यांनी मा. लोक आयुक्त आणि उपलोक आयुक्त कार्यालयाकडे दि.२८/११/२०१७ रोजी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने मा. लोक आयुक्त आणि उपलोक आयुक्त यांचे कार्यालयाने दिलेल्या निर्देशानुसार तत्कालीन आयुक्तांच्या आदेशानुसार

मालेगाव महानगरपालिकेचे तत्कालीन सहायक संचालक, नगररचना, श्री. संजय माने (शासकीय आस्थापना) यांनी तपासणी केली असून त्यांनी दि.०५.१२.२०१९ रोजी सादर केलेल्या कार्यालयीन टिपणीमध्ये महानगरपालिकेकडून देण्यात आलेली बांधकाम परवानगी लागू असलेल्या नियमावलीनुसार नसल्याने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ५१ नुसार रद्द होणेस व जागेवरील बांधकाम मंजूर बांधकाम परवानगी नकाशाशी विसंगत असल्याने कलम ५२, ५३ नुसारच्या कार्यवाहीस पात्र ठरत असल्याचे नमूद करण्यात आले होते. सदर टिपणीच्या आधारे महानगरपालिकेकडून दि. २०/१२/२०१९ चे पत्राव्दारे मा. लोक आयुक्त आणि उपलोक आयुक्त कार्यालयास अहवाल सादर करण्यात आला होता.

तसेच जमीनधारकाने ४.५० मी. सामासिक अंतरात (रस्त्यालगतची अस्तित्वातील बांधका बांधकाम यामधील अंतर) नकाशाव्यतिरिक्तचे अतिरिक्त बांधकाम (Projected Passage / Cantilever Projection) केले असल्याने दि. ०१/०२/२०२० रोजी महानगरपालिकेने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ५२ व ५३ अन्वये नोटीस बजावलेली होती.

त्यावर जमीनधारक / विकासक यांनी दि. १४/०२/२०२० रोजीच्या पत्रान्वये सुधारित बांधकाम परवानगी मिळणेकामी प्रस्ताव, टी.पी. स्कीम प्रमाणे किंवा 'ड'-वर्ग विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीप्रमाणे दाखल करावा याबाबत महानगरपालिकेकडे विचारणा केली असता नगर रचना योजना क्र. १ मध्ये समाविष्ठ क्षेत्रात कोणते नियम लागू करावेत याबाबत तत्कालीन मालेगाव महानगरपालिका आयुक्त यांनी पत्र ३९, दि. ०९/०३/२०२० अन्वये मा. संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मार्गदर्शन अपेक्षिले होते. त्या अनुषंगाने मा. संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दि.०३/०८/२०२१ रोजी महानगरपालिकेस मार्गदर्शन केले आहे. त्यात सद्यस्थितीत मालेगाव महानगरपालिका क्षेत्राकरीता लागू असलेल्या एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमधील विनियम क्र. १.१ व्याप्ती आणि कार्यक्षेत्र मधील अ.क्र. (ii) हा स्वंयस्पष्ट असून त्यास अनुसरून महानगरपालिकेकडील दि.०९/०३/२०२० रोजीच्या पत्रात बाबीस अनुसरून महापालिकेकडून यथोचित कार्यवाही करणे योग्य राहील. त्याच बरोबर अशा प्रकरणामध्ये अनधिकृत विकास झालेला असल्यास मालेगाव महानगरपालिकेने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ५२ व ५३ अंतर्गत कार्यवाही करणे अभिप्रेत व आवश्यक आहे, असे मालेगांव महानगरपालिकेस कळविले आहे.तसेच सदर मुद्द्याचे अनुषंगाने शासनाने दि.२२/१०/२०२१ रोजीच्या पत्रान्वये मालेगांव महानगरपालिकेसाठी वेळोवेळी मंजूर नगर रचना योजना व विकास योजना क्षेत्रासाठी लागू असलेल्या विकास नियंत्रण नियमावलीबाबत महानगरपालिकेस मार्गदर्शन केले आहे त्यामधील अ.क्र.४ अन्वये "दि.२०/०९/२०१६ पासून ड-वर्ग महानगरपालिकेची विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली लागू झालेली आहे. त्यामध्येही नगररचना योजना क्षेत्राबाबतचा उल्लेख नाही,

तथापि, यामधील विनियम क्र. १ (iii) नुसार खालीलप्रमाणे तरतूद समाविष्ट करण्यात आली आहे.

All development work shall conform to the respective provision made under these regulations. If there is any conflict between the requirements of these regulations and those of any other rules or byelaws, these regulations shall prevail."

सबब,उक्त विनियम क्र. १ (iii) मधील तरतूद पाहता ,मालेगाव महानगरपालिकेचे तत्कालीन सहायक संचालक, नगररचना श्री संजय माने (शासकीय आस्थापना) यांनी तपासणी अहवालात नगर रचना योजनेच्या तरतूदीनुसार छाननी करण्याबाबत उपस्थित केलेल्या मुद्या याठिकाणी लागू ठरत नसल्याने त्याचे प्रयोजन शिल्लक राहत नाही. त्यामुळे सदर मुद्याचा अनुषंगाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ५१ अन्वये कार्यवाही करण्याबाबतचा मुद्या देखील याठिकाणी लागू ठरत नसून निकाली निघतो.

तसेच जनहित याचिका क्र. ६३/२०१५ मा. उच्च न्यायालयाच्या दि. २२/०८/२०१९ रोजीच्या आदेशान्वये Disposed off करण्यात आलेली आहे. बांधकाम परवानगी हो सर्वस्वी तांत्रिक बाब आहे. महासभेने पारित केलेला ठराव शासन नियमांच्या विरुध्द असल्यास अंमलबजावणी करणेचे बंधन नाही.

सदर जागेवर तत्कालीन आयुक्तांनी बांधकाम परवानगी प्रदान केलेली असून विद्यमान आयुक्तांनी नव्याने कोणतीही बांधकाम परवानगी प्रदान केलेली नाही. तसेच विद्यमान आयुक्त व यानी वेळोवेळी तक्रारदार कब्जेदार यांच्या तक्रारीचे निवारण केले आहे. सबब, विद्यमान पालिका आयुक्त व इतर अधिकारी यानी कोणासही झुकते माप दिलेले नाही.

प्रकरणी मा. उच्च न्यायालयात जमीनधारक श्री. कमलकार शंकर पवार व इतर यांनी दाखल केलेल्या रिट याचिका क्र. ३५४४/२०१८ यामध्ये मा. उच्च न्यायालयाने दि. १४/०१/२०२० रोजी "The Municipal Corporation, therefore, shall be at liberty to take further action by following due process of law" असे आदेश पारित केले आहेत.

तथापि, सदर अनधिकृत बांधकामावर कार्यवाही न केल्याचे नमूद करून जमीनधारक श्री. कमलाकर शंकर पवार व इतर यांनी मा. उच्च न्यायालयात अवमान याचिका क्र. CP-ST-93965-2020 IN WP-3544-2018 दाखल केली आहे. सदर अवमान याचिका अंतिम सुनावणी व निकालासाठी प्रलंबित असून, मा. उच्च न्यायालयाचे आदेश लवकरच अपेक्षित आहेत. प्रकरणी जमीनधारक श्री. कमलाकर शंकर पवार यांनी मा. उच्च न्यायालयात दाखल केलेली रिट याचिका क्र. ३८७२/२०२१ मध्ये महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील श्री. संजय जाधव, नगररचनाकार-II

यांनी दि.२४/०८/२०२२ रोजी आयुक्त व मालेगाव महानगरपालिका यांच्यावतीने प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. सदर प्रतिज्ञापत्राद्वारे भाडेकरू / कब्जेदार यांची उक्त अनधिकृत बांधकामे काढून टाकणेबाबत मालेगाव महानगरपालिकेने पोलीस विभागाकडून पोलीस बंदोबस्ताची मागणी केली असून, सदर अनधिकृत बांधकामे निष्कासित करणेकामी येणारा खर्च व पोलीस बंदोबस्तासाठी येणा-या अंदाजित खर्चाच्या रक्कमेचा भरणा संबंधित जमीनधारक श्री. कमलाकर शंकर पवार यांनी मालेगाव महानगरपालिकेकडे केला आहे. तथापि, शासनाने दि.१०/११/२०२२ रोजीचे पत्राद्वारे मालेगाव महानगरपालिका हद्दीतील संगमेश्वर वार्डातील अं.भू.क्र. ९६ ते १०० (सध्याचा ९६-अ, ९६-ब ९६-क) वरील भाडेकरूंना मालेगाव महानगरपालिकातर्फे महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियमाच्या कलम ५२/५३ अन्वये बजावण्यात आलेल्या नोटीसीना स्थगिती दिली आहे. त्यावर मालेगांव महानगरपालिकेने नुकतेच दि. १४/१२/२०२२ रोजी शासनास अहवाल सादर केलेला आहे. त्याची पडताळणी व छाननी करुन तसेच न्यायालयीन याचिकेबाबत माहिती घेवून योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

************

लक्षवेधी सूचना

गृह विभाग

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२२ चे हिवाळी अधिवेशन

मा. श्री. नारायण कुचे वि. स. स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ .अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. ८५८ पुढीलप्रमाणे आहे :-

" जालना जिल्ह्यातील, श्री. शितलकुमार बल्लाळ, ( पोलिस निरीक्षक, गोंदी पोलिस स्टेशन, ) जालना आणि श्री. मारोती खेडकर, (पोलिस निरीक्षक, तालुका पोलिस स्टेशन), जालना येथे कार्यरत असणे. तसेच यादोघांचे पोलिस स्टेशन येथुन पोलिस नियंत्रण कक्ष जालना येथे जमा करण्यात आले असणे. तसेच श्री. शितलकुमार बल्लाळ हे गोंदी पोलिस स्टेशन येथे कार्यरत असतांना, त्यांनी याकाळामध्ये अल्पवयीन मुलींच्या काही तक्रारी आल्या कि, त्याविषयी साधी NC नोंद करून घेणे आणि संबंधित आरोपीला मदत करून वसुली करणे, तसेच तालुक्यामध्ये चालणारे जुगार, मटके यांच्या सहकार्याने चालवत असल्याचे आढळून येणे, परिणामी यामुळे गुन्हेगारी वाढत असणे, वाळू- रेती माफिया यांच्या कडून वसुली केली जात असणे. अवैध धंदे मटका, गुटखा, ऑनलाईन लॉटरी, देशी दारू विक्री, गांजा, वाईनशॉप, बार, रेशन दुकानदार यांचा रेशनचा काळाबाजार, रेती, हॉटेल-धाबा यांच्याकडून महिन्याला ८-१० लाख रुपये महिन्याला वसुली केली होती असे निदर्शनास येत असणे,दोन फिर्यादी तक्रार देण्यास आले कि त्यांची NC नोंद करून घेणे, नंतर एक एकास बोलावून प्रकरण तडजोड करण्यासाठी १०-२० लाख रुपये मागणी करून वसुली करणे. तसेच श्री.खेडकर हे दि. ०५ सप्टेंबर २०१९ ते २२ एप्रिल २०२१ बदनापूर पोलिस स्टेशन आणि ऑगस्ट २०२१ ते १८ ऑगस्ट २०२२ तालुका पोलिस स्टेशन जालना येथे कार्यरत होते, असे निदर्शनास येत असणे, तसेच उपरोक्त तालुक्यामध्ये अवैध चालणारे जुगार, मटके यां भ्रष्ट अधिकारी यांच्या सहकार्याने चालतात असेही आढळून येत असणे, परिणामी गुन्हेगारीत वाढ होत असणें, तसेच रेती माफिया यांच्या कडून पैशाची वसुली केली जात असल्याचे ही निदर्शनास येत असणे,तसेच श्री. खेडकर यांच्याकडे महिला तक्रार देण्यासाठी आल्यावर त्यांना अपशब्द वापरतात अशा अनेक तक्रारी येत असणे, तालुका पोलिस स्टेशन येथे अल्पवयीन मुलीवर अत्याचार झाल्याची तक्रार दिली असता, गुन्हा दाखल न करता साधी NC दाखल करण्यात आला असणे, अत्याचार करणाऱ्या विरुद्ध गुन्हा दाखल न करता त्यांच्या कडून लाखो रुपयांची वसुली केली असल्याचे आढळून येत असणे. तसेच याविषयी मुलीच्या वडिलांनी जालना पोलिस अधीक्षक डॉ. शिंदे यांना भेटुन सर्व परिस्थितीची माहिती दिली असता, श्री. शिंदे यांनी त्वरित गुन्हा दाखल करून, खेडकर यांना पोलिस नियंत्रण कक्ष येथे जमा केले होते असे आढळून येत असणे, जालना जिल्ह्यामध्ये पोलिस निरीक्षक श्री. बल्लाळ आणि पोलिस निरीक्षक श्री. खेडकर यांनी पुर्ण कायदा हातात घेतल्यामुळे, कायदा व सुव्यवस्था प्रश्न निर्माण होत असणे, तसेच जालना जिल्ह्याची बदनामी करण्याचे काम यांनी केले असल्याचे निदर्शनास येत असणे, तसेच उपरोक्त प्रकरणी स्थानिक अंबड-बदनापूर लोकप्रतिनिधी यांनी उपमुख्यमंत्री महोदय यांचेकडे श्री. शितलकुमार बल्लाळ, पोलिस निरीक्षक, गोंदी पोलिस स्टेशन, जालना आणि श्री.मारोती खेडकर, पोलिस निरीक्षक, तालुका पोलिस स्टेशन, जालना यांच्यावर त्वरित

निलंबनाची कार्यवाही करावी अशी मागणी करणेत आली होती असे निदर्शनास येत असणे, परिणामी स्थानीक सामान्य जनतेत शासनाच्या विरोधात तीव्र संताप पसरलेला असणे,शासनाने तातडीने करावयाची कारवाई किंव्हा उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया.? "

---

**मा. उप मुख्यमंत्री (गृह) महोदयांचे निवेदन**

जालना जिल्ह्यातील पोलीस निरीक्षक श्री. शितलकुमार बल्लाळ, तत्कालीन नेमणूक पोलीस ठाणे गोंदी व पोलीस निरीक्षक श्री. मारोती खेडकर, तत्कालीन नेमणूक पोलीस ठाणे तालूका जालना यांच्याविरुद्ध प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने अनुक्रमे उप विभागीय पोलिस अधिकारी अंबड व उप विभागीय पोलीस अधिकारी जालना यांचेकडून सखोल चौकशी करण्यात आली असून श्री. बल्लाळ यांचेविरुद्ध असलेल्या तक्रारीमध्ये कोणतेही तथ्य आढळून आलेले नाही.

तालुका पोलीस स्टेशन जालना येथे अल्पवयीन मुलीवर अत्याचार झाल्याची तक्रार तिच्या वडीलांनी केली असता गुन्ह्याचे स्वरुप कमी करुन एन सी दाखल करण्यात आली होती तथापि, प्राप्त तक्रारीनंतर या प्रकरणी पोस्को कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक मारोती खेडकर यांनी प्रभारी अधिकारी म्हणून एन सी प्रकरणांचा आढावा घेवून महिलांविषयीच्या तक्रारीमध्ये संवेदनशिलता ठेवून कार्यवाही करणे अपेक्षित होते. त्यामुळे सदर प्रकरणी केलेल्या कसूरीच्या अनुषंगाने श्री. खेडकर तसेच सहकसूरदार ठाणे अंमलदार श्री. फुसे व पोलीस हवालदार श्री. डोईफोडे यांना पोलीस नियंत्रण कक्ष येथे संलग्न करण्यात आले असून या प्रकरणी विशेष पोलीस महानिरीक्षक औरंगाबाद यांनी कसुरदार पोलीस निरीक्षक श्री. खेडकर यांना एक वार्षिक वेतनवाढ स्थगित का करण्यात येऊ नये याबाबत कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आलेली आहे.

जालना जिल्हा घटकात अवैध धंदे पूर्णपणे बंद असून चोरुन लपून अवैध धंदे करणा-या ईसमा विरुद्ध पोलीस निरीक्षक श्री. खेडकर यांनी पोलीस ठाणे तालुका जालना व पोलीस ठाणे बदनापूर येथे कार्यरत असताना दारुबंदी कायद्यान्वये २०४ गुन्हे दाखल करुन २१० आरोपींवर कारवाई केली आहे. यामध्ये एकुण रु. ४८,४४,९४४/- चा मुद्देमाल जप्त केला आहे. जुगार कायद्यान्वये ३८ गुन्हे दाखल करुन १९८ आरोपींवर कारवाई केली आहे. यामध्ये एकुण रु. २२,३४,५७६/- चा मुद्देमाल जप्त केला आहे. अवैध वाळू उपसा व वाहतूक करणा-या ईसमांविरुद्ध २१ गुन्हे दाखल करुन ४२ आरोपींवर कारवाई केली आहे. यामध्ये एकुण रु. २५,१९,१५,०००/- चा मुद्देमाल जप्त केला आहे.

पोलीस निरीक्षक, श्री शितलकुमार बल्लाळ यांनी पोलीस ठाणे गोंदी येथे कार्यरत असताना दारुबंदी कायदयान्वये १५१ गुन्हे दाखल करुन १५६ आरोपींवर कारवाई केली आहे यामध्ये एकूण रु. ३९,०३,१७५/- चा मुद्देमाल जप्त केला आहे. जुगार कायदयान्वये ४५ गुन्हे दाखल करुन ५९ आरोपींवर कारवाई केली आहे यामध्ये एकुण रु. २२,५४,८९०/- चा मुद्देमाल जप्त केला आहे. अवैध वाळू उपसा व वाहतूक करणाऱ्या इसमांविरुध्द ४१ गुन्हे दाखल करुन ६६ आरोपींवर कारवाई केली आहे. यामध्ये रु.२,५२,४२,५००/- चा मुद्देमाल जप्त केला आहे.

******************

गृह विभाग

लक्षवेधी सूचना क्र. ९०४
सन २०२२ चे चतुर्थ (हिवाळी) अधिवेशन

ॲड.राहूल कूल, श्री.जयकुमार गोरे, श्री.महेश (दादा) किसन लांडगे, श्री.अभिमन्यु पवार, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

"सध्या ऑनलाइन खरेदीकडे नागरिकांचा मोठ्या प्रमाणात ओढा असणे, त्याशिवाय ऑनलाइन व्यवहाराचे प्रमाणही दिवसेंदिवस वाढत असल्याचं दिसून येणे. परंतु या सोबतच गुन्हेगारीला देखील वाव मिळाला आहे. राष्ट्रीय अपराध रिकॉर्ड ब्यूरो (NCRB) ने नुकत्याच जाहीर केलेल्या अहवालानुसार आधुनिक तंत्रज्ञान वाढी बरोबरच, राज्यात सायबर गुन्ह्यांचे प्रमाणही वाढले असणे. ऑनलाईन गुन्ह्यांच्या तपासात होणारी गुंतागुंत आणि क्लिष्टता यामुळे सायबर गुन्ह्यांचा तपास करणे सध्या आव्हानात्मक ठरत असणे. यासाठी विशेष सायबर पथकाची स्थापना जरी केली असेल तरी देखील या क्षेत्रातील तज्ज्ञांसह वेगळे पोलीस ठाणे उभारण्याची आवश्यकता सध्याच्या परिस्थितीवरुन दिसून येत असणे. २ लक्ष रुपये व त्यापुढील रक्कम असेल तरच सायबर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल केला जातो व तपास केला जातो. त्याखालील रक्कमांसाठी पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल करून तपास केला जात असणे, यापूर्वी राज्यातील सर्व जिल्ह्यात पोलीस स्टेशन स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला असून अद्याप त्याबाबत कार्यवाही करण्यात आली आहे त्याची माहिती देखील उपलब्ध नसणे राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात स्वतंत्र सायबर पोलीस ठाणे उभारण्याची गरज निर्माण झाली असणे, सायबर गुन्हे अन्वेषण यंत्रणेतील सर्व कर्मचाऱ्यांना नियमित प्रशिक्षण देणे, सायबर क्षेत्रातील तज्ज्ञांसह या विभागात पुरेश्या कुशल मनुष्यबळाची भरती करुन घेणे आवश्यक असणे, सायबर गुन्ह्यांचा तपास लवकरात लवकर पूर्ण होण्यासाठी विशेष पथक व तंत्रज्ञानाचा वापर योग्य पद्धतीने करण्याची आवश्यकता असणे शाळा, महाविद्यालये आणि संस्था संघटनांमध्ये सायबर गुन्हे प्रतिबंध जागरुकता कार्यक्रमांचे आयोजन, व्यवस्था करणे आवश्यक असणे, याबाबत शासनाने करायची कार्यवाही करण्याची आवश्यकता."

मा. उपमुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन

राज्यात जानेवारी ते नोव्हेंबर २०२२ या कालावधीत ऑनलाईन आर्थिक फसवणुकीचे ४८८३ गुन्हे दाखल असून त्यापैकी २१५ गुन्हयांची उकल झाली असून एकूण ३४५ आरोपींना अटक करण्यात आली आहे. नागरिकांचे दैनंदिन आर्थिक, व्यावसायिक व्यवहार हे ऑनलाईन माध्यमातून होण्याच्या प्रमाणात झालेली वाढ व सोशल मिडीयाचा वाढता वापर या कारणांमुळे सायबर गुन्हयांमध्ये वाढ झाली आहे.

दोन लक्ष रूपये व त्यापुढील रक्कम असेल तरच सायबर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करून तपास करण्याबाबत कोणतेही शासन आदेश नाहीत. त्यामुळे, सर्वसामान्य नागरीक सायबर गुन्हयांसंबंधीची कोणतीही तक्रार राज्यातील कोणत्याही सायबर पोलीस ठाण्यामध्ये किंवा संबंधित स्थानिक पोलिस ठाण्यामध्ये दाखल करू शकतात.

सायबर गुन्हयांचा तपास तांत्रिक व क्लिष्ट स्वरूपाचा असल्याने तसेच गुन्हेगार देशात किंवा परदेशात कोठेही बसुन सायबर गुन्हे करीत असल्याने तज्ञांची मदत घेऊन गुन्हे उघड करण्यात येत आहेत. मोठ्या प्रमाणावर फसवणूक होत असलेल्या विशिष्ट प्रकारच्या गुन्हयांची उकल करण्यासाठी विशेष पथकाची नियुक्ती करण्यात येते. राज्यात सायबर गुन्ह्यांच्या तपासाकरिता ४३ सायबर पोलीस ठाणी उभारण्यात आली आहेत. तसेच, मुंबई पोलीस आयुक्तालयात प्रादेशिक स्तरावर ५ सायबर पोलीस ठाणी उभारण्यात आली आहेत.सायबर गुन्ह्यांचा तपास जलद गतीने होण्यासाठी सायबर लॅब व पोलिस ठाण्यांना अत्याधुनिक यंत्रसामुग्री उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच, सायबर पोलिस ठाण्यात कार्यरत असलेल्या अधिकारी व अंमलदार यांना सायबर गुन्ह्यांचा तपास करण्याबाबतचे प्रशिक्षण देण्यात येते. संभाव्य सायबर गुन्हे टाळण्यासाठी सोशल मिडियाद्वारेदेखील सर्वसामान्य नागरिकांना सायबर गुन्ह्याच्या अनुषंगाने सावध राहण्याचे आवाहन केले जाते. फेसबुक, ट्विटर, इन्स्टाग्राम, व्हॉटसअॅप यासारख्या सोशल मिडीयाचा वापर व त्याबाबत घ्यावयाची दक्षता यासाठी जनजागृती करण्यात येते. तसेच,शाळा, महाविद्यालये व इतर संस्था यासारख्या ठिकाणी ऑनलाईन जनजागृती करण्यात येते. सायबर गुन्हयांना आळा घालण्यासाठी मार्गदर्शिका (अॅडवायझरी) प्रसारित करून सायबर गुन्ह्यांबाबत माहिती दिली जाते.

..................

लक्षवेधी सूचना क्र.१८१९

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२२ चे चतुर्थ (हिवाळी) अधिवेशन

**श्रीमती मंदा म्हात्रे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१८१९ पुढीलप्रमाणे आहे: -**

""नवी मुंबईतील बेलापूर विधानसभा क्षेत्रातील पोलिसांची घरे ही अतिशय जीर्ण झाली असून मोडकळीस आलेली असणे, सदर ठिकाणी रहिवास करणारे पोलिसांचे कुटुंब हे जीव मुठीत घेऊन राहत असून तेथे जीवितहानी होण्याची शक्यता, सदरबाबत मी अनेक वेळा विधानसभेत प्रश्न उपस्थित केला असून तत्कालीन गृह राज्यमंत्री यांजसह अनेक बैठकाही घेतल्या गेल्या असणे, सदर घरांचा पुर्नविकास करणेसंदर्भात राज्य शासनाने सिडको प्रशासनास निर्देश दिलेले असणे, सिडको प्रशासनाने पोलीस विभागास भरणा करण्यात येणाऱ्या रकमेची पॅनल्टी माफ केली असून पुनर्बांधणीबाबत पुढील कोणतीही कार्यवाही न होणे, त्यामुळे पोलिसांच्या कुटुंबामध्येही निर्माण होणारी असंतोषाची भावना, तसेच पोलीस भरतीसाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातून हजारो विद्यार्थी परीक्षा व ट्रेनिंगसाठी नवी मुंबई येथे येत असून त्यांनाही राहण्याची व जेवणाची सुविधा उपलब्ध होत नसणे, याकरीता पोलीसांच्या मोडकळीस आलेल्या घरांची पुर्नबांधणी करण्याची आवश्यकता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.""

---

## मा.उप मुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन

नवी मुंबईतील बेलापूर विधानसभा क्षेत्रात तुर्भे आणि सीबीडी बेलापूर येथे पोलीस वसाहती असून बेलापूर येथे पोलीस कर्मचाऱ्यांसाठी बॅरेक्स व ५ इमारती अशी एकूण ३२४ सेवा निवासस्थाने सिडकोने त्यांच्या भूखंडावर बांधून उपलब्ध करुन दिली आहेत.

तुर्भे येथील पोलीस वसाहतीमधील घरे ही अतिशय जीर्ण व धोकादायक असल्याची बाब सार्वजनिक बांधकाम विभागाने कळविल्याने, सदर निवासस्थाने खाली करण्याबाबत पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांच्या कार्यालयाने दि.३१/१२/२०२१ अन्वये संबंधीतांना आदेश दिले आहेत. सध्या तुर्भे पोलीस वसाहतीत कोणीही पोलीस कुटूंबिय राहत नसल्याने, तेथे जीवीत हानी होण्याची शक्यता नाही.

सीबीडी बेलापूर येथील पोलीस वसाहतीमधील निवासस्थाने ही जुनी आहेत. तथापि, ती राहण्यास योग्य आहेत. सदर निवासस्थानांचे दुरुस्तीकरीता शासनाने दि.०२/०९/२०१५ अन्वये रक्कम रु.१०,४०,७१,४०६/- इतक्या रकमेस प्रशासकिय मान्यता दिली असून सदरचा निधी धनादेशाद्वारे कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पनवेल (भिंगारी) यांना दि.२९/०९/२०१८ अन्वये दिला आहे. त्यापैकी रु.९.०५ कोटी मधून सी.बी.डी. येथील निवासस्थानांची सद्य:स्थितीत स्थापत्य व विदयुत कामे यांचे अनुषंगाने दुरुस्ती करण्यांत आलेली आहे. उर्वरित रु.१.३५ कोटी निधीपैकी रु.६९ लाख रक्कम सीबीडी पोलीस वसाहत इमारत क्र. सी-४, ५, ६, ७ आणि इ-३ च्या दुरुस्तीसाठी सा.बां. विभागाने दि.०८/०२/२०२२ रोजी कळविल्यानुसार पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांनी दि. १४/०२/२०२२ अन्वये मान्यता दिली आहे.

पोलीस विभागाने एकूण ३२४ निवासस्थाने रु.६५,४०,५६४/- किंमतीत खरेदी केली होती. त्यापैकी सिडकोला रु.३५,१७,३३७/- भरणा केलेली असून माहे जून, २०१४ पर्यंत एकूण विलंब

शुल्कासह थकीत रक्कम रु.२,८०,७९,१९८/- इतकी पोलीस विभागाकडून सिडकोस देणे बाकी आहे. तदनंतर आज रोजीपर्यंत सुधारीत परीगणना केल्यानंतर सदर रकमेमध्ये वाढ होईल. तथापि, सिडको महामंडळाकडे विलंब शुल्काचे पैसे माफ करण्याचे कोणतेही धोरण नाही. अद्याप विलंब शुल्कासह कोणतीही रक्कम माफ करण्यात आली नाही.

सीबीडी आणि तुर्भे येथील पोलीस वसाहतीचा पुनर्विकास करण्याच्या दृष्टीकोनातून आवश्यक त्या कायदेशीर बाबी, ना-हरकती, परवानग्या व निधीची उ.लब्धता या बाबी विचारात घेऊन इमारतींचा लवकरात लवकर पुनर्विकास करण्याची कार्यवाही विचाराधीन आहे.

पोलीस महासंचालक कार्यालयाकडून राज्यातील पोलीस निवासस्थान बांधकामाच्या प्रकल्पांना प्राधान्यक्रम ठरविण्याची बाब विचाराधीन आहे. त्यामध्ये सी.बी.डी. बेलापूर येथे ३२४ निवासस्थानांची पुनर्बांधणी करण्याचा प्रकल्प समाविष्ट आहे. या प्राधान्यक्रम यादी व निधी उपलब्धतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाचे स्तरावर पोलीस भरतीसाठी मोठ्या संख्येने उमेदवार येत असून एवढ्या मोठ्या प्रमाणावर उमेदवारांची निवासव्यवस्था व जेव. .ी व्यवस्था शासन स्तरावरुन करणे अपेक्षित नाही. सबब या उमेदवारांनी राहण्याची व जेवणाची सोय स्वत: करीत आहे.

---------

लक्षवेधी सूचना क्र.१९२५ सामान्य प्रशासन विभाग/३६

महाराष्ट्र विधान सभा

सन २०२२ चे चतुर्थ (हिवाळी) अधिवेशन

श्री.राजेश नरसिंगराव पाटील, **मा.विधान सभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१९२५ पुढीलप्रमाणे आहे :-**

"कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड विधानसभा मतदार संघ हा महाराष्ट्र व कर्नाटक राज्याच्या सीमेवर वसलेला असणे, महाराष्ट्र कर्नाटक सीमा वाद हा बऱ्याच वर्षापासून प्रलंबित असून त्यावर अद्यापही तोडगा निघालेला नसताना कर्नाटकच्या मा.मुख्यमंत्री यांनी या संदर्भात राज्या विरोधात विधाने करुन त्याचप्रमाणे महाराष्ट्रातील खेडी कर्नाटक राज्यात येऊ इच्छितात तसेच राज्याचे आराध्य दैवत असलेल्या पंढरपूर देवस्थानावर हक्क सांगत असून महाराष्ट्र राज्यातील पासिंग असलेला वाहनांची कर्नाटक राज्यात तोडफोड केली जात असणे, चंदगड विधानसभा बेळगाव नजीक असल्यामुळे बेळगाव येथे मराठी बांधव जा-ये करीत असतांना चंदगड विधानसभा मतदार संघातील मराठी बांधवांना झळ पोहचत असून कायदा व सुव्यवस्थेचा निर्माण झालेला गंभीर प्रश्न, सीमा भागातील ८६५ गावांमध्ये मराठी भाषीकांना मराठी भाषेतून परिपत्रके दिली जात नसणे, महाराष्ट्र व कर्नाटक राज्यातील नागरीकांच्या दृष्टीने केंद्र शासनाचे व महाराष्ट्र शासनाचे पर्यवेक्षक याठिकाणी पाठवून मराठी भाषिकांवर होणाऱ्या अन्यायासंबंधात मा.गृह मंत्री यांच्याकडे वस्तुनिष्ठ अहवाल देवून मा.सुप्रिम कोर्टाचा निर्णय लागेपर्यंत महाराष्ट्र व कर्नाटक राज्याच्या सीमेवरील भाग हा केंद्रशासित घोषित करावा अशी होत असलेली मागणी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व त्याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

---

## मा.मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

नोव्हेंबर, १९५६ मध्ये राज्यांची पुनर्रचना झाल्यानंतर तत्कालीन मुंबई राज्यातील बेळगाव (चंदगड तालुका वगळून) विजापूर, धारवाड व कारवार हे मराठी भाषिक जिल्हे पूर्वीच्या म्हैसूर राज्यात विलिन करण्यात आले. खेडे हे एक घटक, भौगोलिक सलगता, मराठी किंवा कन्नड भाषिक लोकांची सापेक्ष बहुसंख्या व लोकेच्छा या सूत्रानुसार फेररचनेची मागणी करुन कर्नाटकातील ८६५ सीमावादीत गावांवर महाराष्ट्र शासनाने दावा केला. यासंदर्भात केंद्र शासनाने १९६६ मध्ये नियुक्त केलेल्या महाजन आयोगाच्या शिफारशी मान्य न झाल्याने व सामोपचाराने प्रश्न सोडविण्याचे सर्व उपाय संपल्यामुळे महाराष्ट्र शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात केंद्र शासन व कर्नाटक शासन यांच्याविरुध्द मूळ दावा क्र.०४/२००४, दिनांक २९.०३.२००४ रोजी दाखल केला आहे.

सदर न्यायालयीन दाव्यात राज्याची बाजू प्रभावीपणे मांडण्यासाठी वरिष्ठ विधीज्ञ, श्री.हरिष साळवे, विशेष समुपदेशी श्री.राकेश द्विवेदी व श्री.वैद्यनाथन, घटनातज्ञ तसेच अनुभवी वरिष्ठ वकीलांची टीम (Battery of Advocates) शासनाकडून नियुक्त करण्यात आलेली असून सद्य:स्थितीत सदर प्रकरण मा.सर्वोच्च न्यायालयात न्यायप्रविष्ठ आहे.

श्री.सुनील पोतदार, अध्यक्ष (पाणी संघर्ष समिती) यांच्या नेतृत्वाखाली पाणी संघर्ष समितीच्या बैठकीतील चर्चेमध्ये कर्नाटक शासन व महाराष्ट्र शासनाच्या विकासात्मक ध्येयधोरणांचा तुलनात्मक अभ्यास करुन विचार मांडले. कर्नाटक शासनाने शेतकऱ्यांना मोफत वीज, शिक्षण व पाणी दिलेले आहे. परंतु वेळोवळी आंदोलने करुन सुध्दा महाराष्ट्र शासनाने कोणत्याही सोयी-सुविधा पुरविलेल्या नाहीत. त्यामुळे महाराष्ट्र शासनाने व त्यांच्या राज्यकर्त्यांनी ४२ गावांवर अन्याय केलेला आहे. त्यांनी या सुविधा दिल्या पाहिजेत, अन्यथा आपण कर्नाटकमध्ये जाऊ असा इशारा दिल्याचे जिल्हाधिकारी, सांगली यांच्या अहवालानुसार दिसून येते. तथापि, जत तालुक्यातील ४२ गावे कर्नाटक राज्यात जाणार असल्याबाबतच्या बातम्या सांगली जिल्ह्यातील स्थानिक वृत्तपत्रे व मराठी वृत्त वाहिन्यांवर प्रसिध्द झाल्या होत्या. यासंदर्भात जिल्हाधिकारी, सांगली यांच्या अहवालानुसार जत तालुक्यातील संबंधीत ४२ ग्रामपंचायतींनी व राज्यातील सीमालगत असलेल्या कोणत्याही गावाने अथवा ग्रामपंचायतीने कर्नाटक राज्यात समाविष्ट होण्याबाबतचा ठराव केलेला नाही.

कर्नाटक राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी सोलापूर, अक्कलकोट, जत तालुक्यातील भाग कर्नाटक राज्यात सामील करुन घेण्याबाबत केलेल्या वल्गनेच्या निषेधार्थ व महाराष्ट्रातील सीमावर्ती भागातील मराठी भाषिकांवर होत असलेल्या अन्यायाविरोधात महाराष्ट्रातील साकीनाका, पवई, नवी मुंबई, स्वारगेट (पुणे), नाशिक, औरंगाबाद शहर, उमरोजी (चिपळूण), कुडाळ (सिंधुदुर्ग), चाळीसगाव (जळगांव), अंमळनेर, देगलूर (नांदेड), कोल्हापूर, मिरज (सांगली), दौंड (पुणे) येथे विविध पक्षाच्या संघटना, कार्यकर्ते यांचेकडून आंदोलने करण्यात आली. तुरळक बाबी वगळता आंदोलनामध्ये कोणताही अनुचित प्रकार घडलेला नाही. कर्नाटकातील कन्नड रक्षक वेदिकेच्या कार्यकर्त्यांकडून दि.०६.१२.२०२२ रोजी दुपारी बेळगाव जवळील हिरेबागवाडी येथील टोलनाक्याजवळ महाराष्ट्रातील ६ ट्रकवर शाईफेक व दगडफेक केली. या हल्ल्याचा महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांचेकडून तीव्र शब्दांत निषेध करण्यात आला आहे आणि कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांनी संबंधीत गुन्हेगारांवर नियमानुसार कारवाई करण्यात येईल याबाबत वृत्तपत्रामध्ये बातमीद्वारे प्रसारित झाले आहे. तसेच दोनही राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनी सीमावादीत क्षेत्रामध्ये शांतता राहील याची काळजी घेण्याचे आश्वासित केले आहे.

कर्नाटक राज्याचे मुख्यमंत्री यांनी सीमाभागातील इंच न इंच जागा महाराष्ट्राला मिळू देणार नाही या केलेल्या वक्तव्याचा महाराष्ट्र शासनाने निषेध केलेला असून कर्नाटक प्रशासनाच्या मराठी विरोधी प्रवृत्तीचा तीव्र शब्दात निषेध करण्याबरोबरच महाराष्ट्र कर्नाटक राज्याच्या सीमावर्ती भागातील ८६५ भागातील मराठी भाषिक जनतेसोबत महाराष्ट्र शासन खंबीरपणे निर्धाराने व सर्व ताकदीनिशी उभे आहे असा ठराव महाराष्ट्र विधानमंडळाच्या दोनही सभागृहांनी दिनांक २७ डिसेंबर, २०२२ रोजी एकमताने पारित केलेला आहे.

महाराष्ट्र - कर्नाटक सीमा भागातील जिल्ह्यात कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून सीमावर्ती भागात असणाऱ्या बस स्थानकाच्या ठिकाणी तसेच महत्वाच्या व गर्दीच्या ठिकाणी आंतर राज्य सीमेवरील चेकपोस्टच्या ठिकाणी योग्य तो पोलीस बंदोबस्त नेमला असून सद्य:स्थितीत सीमावर्ती भागातील परिस्थिती शांत व सामान्य आहे.

महाराष्ट्र - कर्नाटक सीमा भागातील मराठी भाषिक जनतेवर दाखल करण्यात आलेले गुन्हे मागे घेण्याबाबत, ७/१२ उतारे तसेच कार्यालयातील सूचना फलक मराठी भाषेत लावणे, मराठी भाषेचा सीमावादीत भागामध्ये सर्व स्तरावर उपयोग करणे तसेच कन्नड भाषेची, मराठी भाषिक जनतेवर सक्ती न करणे इ. बाबत कर्नाटक शासनाशी समन्वय साधण्यात यावा असा निर्णय दि.२१.११.२०२२ रोजी मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या उच्चाधिकार समितीच्या बैठकीत घेण्यात आला आहे.

सीमावर्ती भागातील मराठी भाषिकांना कोणतेही कागदपत्र मराठी भाषेत न देणे, सीमावर्ती भागातील मराठी भाषिक जनतेला स्वतंत्र भारतात दुर्लक्षित घटकासारखे जीवन जगावे लागत असणे या व अशा अन्य मुद्यांबाबत महाराष्ट्र शासनाने आपले म्हणणे मा.सर्वोच्च न्यायालयात अर्ज क्र. I.A. 14/2015 व्दारे दाखल केले आहे.

*****

**डॉ. जितेंद्र आव्हाड, श्री. अजित पवार, [redacted], श्री. छगन भुजबळ, श्री. दिलीप वळसे-पाटील, श्री.दत्तात्रय भरणे, श्री. हसन मुश्रीफ, श्री. अनिल पाटील, श्री. यशवंत माने, श्री.शेखर निकम, श्री. दिपक चव्हाण, श्रीमती सुमन पाटील, श्री.रोहित पवार, श्री. अमित विलासराव देशमुख, श्री. बाळासाहेब थोरात, श्री. कुणाल पाटील, श्री.नानाभाऊ पटोले, डॉ. नितिन राऊत, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), श्री. धिरज देशमुख, श्री.झीशान सिद्दिकी, श्री. अमिन पटेल, श्री. अशोकराव चव्हाण, श्री. विजय वडेट्टीवार, श्री. सुरेश वरपुडकर, श्री. अमित झनक, श्रीमती सुलभा खोडके, श्रीमती प्रतिभा धानोरकर, श्री. अस्लम शेख, प्रा. वर्षा गायकवाड, कुमारी प्रणिती शिंदे, श्री. संग्राम थोपटे, श्री. संजय जगताप, श्री. ऋतुराज पाटील, श्री. सुनिल केदार, श्री. विकास ठाकरे, श्री. राजु पारवे, श्री. जितेश अंतापूरकर, श्री. राजु (बाबा) जयवंतराव आवळे, श्री. राजेश एकडे वि. स. स. यांच्या लक्षवेधी सूचना क्र.१७४ वरील निवेदन उपमुख्य मंत्री सभागृहासमोर ठेवतील:-**

"मुंबईतील बंद पडलेल्या गिरणी कामगारांना हक्काची घरे मिळवून देण्यात शासनास अपयश आलेले असणे, मागील १३ वर्षापासून हक्काच्या घरापासून गिरणी कामगारांना वंचित रहावे लागत असणे, घराच्या प्रतिक्षेत अनेक कामगारांचा मृत्यु झालेला असणे, गिरणी कामगारांच्या हक्काची घरे मिळावीत यासाठी आतापर्यंत अनेकदा मोर्चे काढून आंदोलने केलेली असणे, शासन पातळीवर अनेकवेळा बैठका घेऊनही घरे मिळालेली नसणे, सुमारे १ लाख ७५ हजार कामगार घरांच्या प्रतिक्षेत असून आतापर्यंत केवळ १५ हजार कामगारांनाच शासनाकडून घर मिळालेले असणे, उर्वरित कामगारांना घरे देण्यासाठी प्रशासकीय पातळीवर दुर्लक्षपणा केला जात असून उदासिनता असणे, गिरणी कामगारांना एमएमआरडीए क्षेत्रात घरे देण्याचा घेतलेल्या निर्णयाचीही अंमलबजावणी केली जात नसणे, गिरणी कामगारांना त्यांच्या हक्काची घरे शासनाच्या निर्णयानुसार आठ लाख रुपयाच्या मर्यादेतच उपलब्ध करुन द्यावीत यासंदर्भात लवकरात लवकर कार्यवाही करण्यासाठी मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री यांचेकडे दिनांक ३ डिसेंबर, २०२२ रोजी तसेच अलिकडील काळात वारंवार मागणी केलेली असतांनाही, आवश्यक कार्यवाही करण्यास होत असलेली दिरंगाई, टाळाटाळ, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी हक्काची घरे मिळत नसल्याने गिरणी कामगारांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, संताप तसेच चिडीची भावना, दिनांक १९ डिसेंबर, २०२२ पासून नागपूर येथे सुरु होणाऱ्या विधिमंडळ अधिवेशनकाळात आंदोलन करण्याचा गिरणी कामगारांनी घेतलेला निर्णय, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

## मा. उप मुख्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे निवेदन

बृहन्मुंबईतील कापड गिरण्यांच्या सन १९८२ च्या संपानंतर बंद पडलेल्या/आजारी कापड गिरण्यांच्या विक्री व विकासासंदर्भात राज्य मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार, बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली-१९९१ मध्ये विनियम ५८ (१) (ब) समाविष्ट करण्यात आला. तसेच बृहन्मुंबई विकास नियंत्रण व प्रोत्साहनात्मक नियमावली-२०३४ च्या विनियम ३५ मध्ये तरतूद करण्यात आलेली आहे. सदरहू तरतुदीनुसार मुंबईतील ५८ बंद /आजारी कापड गिरण्यांची मोकळी जागा व शिल्लक चटई क्षेत्र यांचे वाटप १/३ हिस्सा बृहन्मुंबई महानगरपालिका, १/३ हिस्सा म्हाडा व १/३ हिस्सा गिरणी मालक यांना देण्याची तरतूद केली आहे. म्हाडास उपलब्ध होणाऱ्या जमिनीवर गिरणी कामगारांसाठी

२/३ गाळे व संक्रमण सदनिकांसाठी १/३ गाळे बांधण्याची तरतूद नगर विकास विभागाकडून उक्त नियमावलीमध्ये करण्यात आलेली आहे.

म्हाडाने गिरणी कामगारांच्या माहिती संकलनासंदर्भात राबविलेल्या तीन मोहिमांमध्ये (सन २०१०, सन २०११ व सन २०१७) सुमारे १,७४,००० गिरणी कामगार/त्यांच्या वारसांनी गिरणी कामगारांच्या घरांसाठी अर्ज केले आहेत. म्हाडास ताबा प्राप्त झालेल्या जमिनीपैकी गिरणी कामगारांसाठी ६९२५ सदनिकांसाठी दि.२८/६/२०१२ रोजी पहिली, २६३४ सदनिकांसाठी दि.९/५/२०१६ रोजी दुसरी, मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणाकडून रेंटल हाऊसिंग योजनेंतर्गत उपलब्ध झालेल्या २४१७ जोड सदनिकांची दि.२/१२/२०१६ रोजी तिसरी तसेच ३८९४ सदनिकांची दि.१/३/२०२० रोजी चौथी अशा एकूण ४ सोडतीमध्ये एकूण १५,८७० सदनिका गिरणी कामगारांना उपलब्ध करुन देण्यासाठी म्हाडाकडून कार्यवाही करण्यात आलेली आहे.

वर नमूद केलेल्या गिरणी कामगारांच्या घरांच्या सन २०१२ च्या सोडतीमधील घरांची विक्री किंमत रू.७.५० लाख होती. तर सन २०१६ मधील मुंबईमधील घरांची किंमत रू.९.५० लाख ठेवली आहे. तर मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडील मौजे कोन, पनवेल येथील घरांची किंमत रू.६.०० लाख ठेवलेली आहे.

रेन्टल हाउसिंग स्कीम अंतर्गत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे मौजे कोन, ता.पनवेल, जि. रायगड येथे बांधण्यात आलेल्या २४१७ सदनिकांची सोडत दि.२/१२/२०१६ रोजी म्हाडाच्या मुंबई मंडळाकडून काढण्यात आली आहे.

**गिरणी कामगारांना घरे उपलब्ध करून देण्यासंदर्भात पुढील कार्यवाही सुरू आहे:-**

I. गिरणी कामगार/त्यांचे वारस यांची एकूण संख्या विचारात घेता, मुंबईमध्ये गिरण्यांच्या जागेवर म्हाडाकडून गिरणी कामगारांसाठी बांधण्यात येणाऱ्या घरांची संख्या अत्यंत कमी आहे. मुंबईबाहेर मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणांतर्गत गिरणी कामगारांसाठी घरे बांधण्याकरीता जमीन उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. त्यानुसार ठाणे जिल्ह्यातील कल्याण, ठाणे व अंबरनाथ तालुक्यातील ५ गांवातील एकूण क्षेत्र ४३.४५ हे.आर. (सुमारे ११० एकर) जमिनी गिरणी कामगारांच्या घरांसाठी म्हाडास विनामूल्य किंवा नाममात्र दराने उपलब्ध करुन देण्यासंदर्भातील कार्यवाही सुरू आहे.

II. म्हाडाचे अधिकारी व गिरणी कामगार संघटनांच्या प्रतिनिधींनी जून, २००२ मध्ये ठाणे जिल्ह्यातील प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत ९ ठिकाणच्या घरांची पाहणी केली व त्यापैकी शिरढोण व खोणी (कल्याण), अजान होम्स (सेलू) व सुरक्षा स्मार्ट सिटी, वसई या ४ ठिकाणच्या बांधलेल्या/बांधण्यात येत असलेल्या घरांना गिरणी कामगार संघटनांच्या प्रतिनिधींनी पसंती दर्शविली आहे. त्यानुषंगाने याबाबतची पुढील कार्यवाही शासनाच्या विचाराधीन आहे.

III. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून नव्याने उपलब्ध होणाऱ्या मे.टाटा हाऊसिंग, राजनोली-कल्याण येथील १२४४ व श्री. विनय अगरवाल शिलोटर, रायचूर, जि.रायगड येथील १०१९ तसेच मे. सान्यो व्हिलेज, कोल्हे, ता.पनवेल, जि.रायगड येथील २५८ अशा एकत्रित एकूण २५२१ सदनिकांची सोडत काढण्याचे म्हाडाकडून नियोजन करण्यात आले आहे. त्यानुसार सदरहू संगणकीय सोडत म्हाडामार्फत लवकरच काढण्यात येणार आहे.

**********

**सन २०२२ चे हिवाळी अधिवेशन** **लक्षवेधी सूचना क्र.८४३**

श्री.सुनिल प्रभू, श्रीमती विद्या ठाकूर, मा. वि.स.स. यांच्या लक्षवेधी सूचना क्र.८४३ वरील निवेदन उपमुख्य मंत्री सभागृहासमोर ठेवतील:-

"मुंबईतील गोरेगांव पश्चिम सिद्धार्थ नगर सहकारी गृहनिर्माण संस्थेचा (पत्राचाळ) पुनर्विकास प्रकल्पातील ६७२ कुटुंबियांना तत्कालीन गृहनिर्माण मंत्री महोदयांच्या झालेल्या बैठकीत जानेवारी २०१८ पासूनचे ४० हजार रुपये भाडे देऊन त्रिपक्षीय कराराची म्हाडातर्फे अंमलबजावणी करणेबाबतचा निर्णय होऊनही विद्यमान गृहनिर्माण मंत्र्यांनी २४.८.२०२२ रोजी सदरहू प्रकल्पातील कुटुंबियांना जानेवारी २०१८ पासून ४० हजार रुपये ऐवजी २५ हजार रुपये मासिक भाडे देऊ असे सांगून पत्राचाळीची तुलना बी.डी.डी. चाळीबरोबर केल्याने पत्राचाळीतील रहिवाश्यांमध्ये तीव्र नाराजीची भावना पसरणे, विकासकास निष्कासीत केल्यापासूनचे सन २०१४ पासूनचे भाडे म्हाडाने अनिवार्य असणे, परंतु, प्रकल्पातील गैरप्रकार व गैरव्यवहारामुळे अद्याप पर्यंतचे ७ वर्षापासूनचे भाडे थकीत असणे, सन २००८ पासून सुरु असलेल्या पत्राचाळ पुनर्विकास प्रकल्पाची बी.डी.डी. चाळ पुनर्विकास प्रकल्पाबरोबर तुलनाच होऊ न शकणे, पत्राचाळ पुनर्विकास प्रकल्पात म्हाडाने त्रिपक्षीय कराराची योग्य अंमलबजावणी न केल्यामुळे प्रकल्प १४ वर्ष प्रकल्प रखडून ६७२ कुटुंबे बेघर होऊन घरापासून वंचित राहणे, गेली ७ वर्षापासून रहिवाशी कुटुंबांना थकीत भाडे न मिळाल्याने स्वखर्चातून भाडे भरावे लागत असल्याने त्यांच्यावर आर्थिक संकट कोसळणे, तसेच तत्कालीन म्हाडा उपाध्यक्ष यांचे बरोबर दि.१४.९.२०२२ रोजीच्या झालेल्या बैठकीत २०१८ पासूनचे ४० हजार रुपये भाडे देणेबाबत निर्णय होऊनही सदरहू सुधारित अभिप्राय दि.३०.९.२०२२ पूर्वी पाठविणेबाबत निर्णय होऊनही अद्याप म्हाडा तर्फे सुधारित अभिप्राय शासनास पाठविण्यात न येणे, यामुळे अद्याप पर्यंत ६७२ कुटुंबियांना सुधारित अभिप्रायानुसार ४० हजार रुपये भाडे मिळू न शकणे, शासनाने रहिवाशी कुटुंबांना थकीत भाडे त्वरीत मंजूर करुन संस्थेची उर्वरित ८.६८ एकर म्हाडाने शिफारस केलेली जॉनी जोसेफ कमिटीच्या अहवालानुसार जमीन रहिवाशी संस्थेस मिळवून देणेबाबत, संस्थेच्या ६७२ घरांचा ताबा म्हाडामार्फत मिळविण्यापूर्वी कोणत्याही त्रयस्त विकासकांच्या इमारतीला ओ.सी. देण्यात येऊनही आदि संस्थेने केलेल्या मागण्या मान्य करुन शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता, याकडे झालेले व होत असलेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी पत्रा चाळ प्रकल्पातील ६७२ कुटुंबातील हजारो रहिवाश्यांमध्ये निर्माण झालेले तीव्र असंतोषाचे आणि चिंतेचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया"

---

## मा. उप मुख्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे निवेदन

गोरेगाव, मुंबई येथील सिध्दार्थ नगर सहकारी गृहनिर्माण संस्था (पत्राचाळ) येथील म्हाडाच्या जमिनीवरील गाळेधारकांचे पुनर्वसन करण्याचा शासनाने निर्णय घेतला. या पुनर्वसन प्रकल्पात एकूण ६७२ मूळ गाळेधारक आहेत. सदरहू गाळेधारकांनी सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन करुन मे. लोखंडवाला इस्टेटस् ॲन्ड डेव्हलपर्स लि. यांची विकासक म्हणून नेमणूक केली होती. तथापि, रहिवाशी व उक्त विकासकामध्ये वाद होऊन पूर्वीच्या विकासकाची नेमणूक रद्द करुन, मे.गुरुआशिष कन्स्ट्रक्शन प्रा.लि. या नवीन विकासकाची नेमणूक संस्थेने केली.

सदर पुनर्विकास प्रकल्प अनेक वर्ष रखडल्याने तसेच रहिवाशांना विकासकाकडून भाडे प्रदान न झाल्यामूळे, करारपत्रातील अटीनुसार सदर प्रकल्प ताब्यात घेण्यासाठी म्हाडाने दि.१२.१.२०१८ रोजी संबंधित विकासकास टर्मिनेशन नोटीस जारी केली होती. सदर नोटीसीविरुध्द विकासकाने (मे.गुरुआशिष कंन्स्ट्रक्शन) या प्रकल्पातील विक्री हिस्सा म्हाडाच्या परवानगीशिवाय ९ विकासकांना परस्पर विकला असल्याने, सदरहू ९ विकासकांनी मा. उच्च न्यायालयात दावे दाखल केले आहेत. सदर प्रकरणे अद्यापही न्यायप्रविष्ट आहेत.

सदरहू पुनर्विकास प्रकल्प गेली अनेक वर्ष रखडलेला आहे. या पनुर्विकास प्रकल्पामधील मुळ रहिवाशांचे पुनर्वसन करणे, मुळ रहिवाशांचे थकीत भाडे देणे इत्यादी मुद्यांच्या अनुषंगाने उपाययोजना सूचविण्यासाठी श्री. जॉनी जोसेफ, सेवानिवृत्त मुख्य सचिव यांची नियुक्ती करण्यात आली होती. श्री. जॉनी जोसेफ, सेवानिवृत्त मुख्य सचिव यांनी सादर केलेल्या अहवालातील शिफारशीं व म्हाडाचे अभिप्राय विचारात घेऊन हा रखडलेला पुनर्विकास प्रकल्प मार्गी लावण्यासाठी मंत्रिमंडळाच्या मान्यतेने दि.९.७.२०२१ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. या शासन निर्णयानुसार म्हाडाने स्वत: विकासक म्हणून या संपूर्ण प्रकल्पाचे काम करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हे काम करताना, पत्राचाळ येथील मूळ ६७२ गाळेधारकांच्या पुनर्वसनाचा हिस्सा / इमारतीचे बांधकाम पूर्ण करुन त्यांना रितसर गाळयांचा ताबा द्यावा. तसेच संपुर्ण पुनर्विकास प्रकल्पाचे काम म्हाडातर्फे पुर्ण करावयाचे असल्याने प्रकल्पाचे काम म्हाडाने सुरु केल्यानंतर रहिवाश्यांचे भाडे देण्याचे दायित्व म्हाडावर सोपविण्यात आले. तसेच मूळ रहिवाशांच्या थकीत भाडयाबाबत म्हाडाने सूचित केल्यानुसार, मा. कंपनी लॉ ट्रिब्युनलच्या (NCLT) अंतिम आदेशानुसार निर्णय घेण्याचे ठरले.

दिनांक ९.७.२०२१ रोजीचा शासन निर्णय निर्गमित झाल्यानंतर या पुनर्विकास प्रकल्पांतर्गत ज्या प्लॉटवर ६७२ गाळयांचे काम अर्धवट राहिलेले आहे, ते काम पूर्ण करण्यासाठी म्हाडाच्या स्तरावर निविदा काढण्यात आली. प्राप्त निविदाकारांमधून निम्नतम निविदाकारास स्विकृती पत्र देण्यात आले असून, दि.१.७.२०२२ रोजी कार्यादेश देखील देण्यात आला आहे. तसेच प्रकल्पाच्या जागेवर प्रत्यक्षात काम देखील सुरु करण्यात आले आहे. उपरोक्त दि.९.७.२०२१ च्या शासन निर्णयानुसार प्रकल्पाचे काम म्हाडाने सुरु केल्यानंतर रहिवाशांचे भाडे देण्याचे दायित्व म्हाडाचे आहे. त्यानुसार म्हाडाने रहिवाश्यांना दरमहा रु.१८,०००/-इतके भाडे देण्याचे ठरविले होते. परंतु, शासनाने पत्राचाळ मधील मूळ रहिवाशांचा सहानुभूतीपूर्वक विचार करुन, उक्त दरमहा रु.१८,०००/- ऐवजी रु.२५,०००/- इतके घरभाडे मंजूर करण्याचा निर्णय घेतलेला आहे. आतापर्यंत १२३ लोकांनी म्हाडाकडे दिलेल्या माहितीस अनुसरुन मार्च, २०२२ ते नोव्हेंबर, २०२२ पर्यंतचे दरमहा रु.२५,०००/-याप्रमाणे घरभाडे म्हाडाने त्यांच्या बँक खात्यात जमा केलेले आहे. यावरुन दरमहा रु.२५,०००/- इतके भाडे रहिवाश्यांकडून स्विकारले जात असल्याचे स्पष्ट होते. मूळात हा प्रकल्प रखडलेला असून तो लवकरात लवकर पूर्ण होण्याच्या दृष्टीने या प्रकल्पाची जबाबदारी म्हाडावर सोपविण्यात आलेली आहे. त्यानुसार म्हाडाकडून मूळ ६७२ गाळेधारकांच्या पुनर्वसनास प्राधान्य देऊन कार्यवाही सुरु केलेली आहे.

**********

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२२ चे चौथे (हिवाळी) अधिवेशन

**मा. श्री. नारायण कुचे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ८५६ पुढीलप्रमाणे आहे :-**

"जालना जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या शेती पंपांना विज पुरवठा करण्यासाठी "HVDS" एक शेतकरी एक रोहित्र योजनेतील १६ केव्हिए चे रोहित्र वारंवार जास्त जळण्याचे प्रमाण आढळून येत असल्याचे निदर्शनास येत असणे, तसेच, दहा महिन्यानंतरही रोहित्र दुरुस्ती झाले नसल्याचे ही आढळून येत असणे, परिणामी या परिस्थितीला कंटाळून जालना जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांनी थेट सामुहिक आत्मदहनाचा इशारा महावितरणला दिलेला असणे, तसेच, शेतकरी यांना तातडीने रोहित्र दुरुस्ती वा नवीन डीपी देण्याबाबत शासन कोणतीच कारवाई किंवा ठोस कार्यक्रम राबवित नसल्याचेही आढळून येत असणे, तसेच, सदरहू रोहित्र दुरुस्ती करण्यात होणाऱ्या विलंबाची कारणे शोधून चौकशीनुसार सदरहू प्रकरणी दोषी असणा-यांविरुद्ध कोणतीच कारवाई करण्यात येत नाही असेही निदर्शनास येत असणे, परिणामी विजेच्या समस्या, पाण्या मुळे हाता- तोंडाशी आलेला घास (, पीक ) नष्ट होऊन शेतकरी यांना आर्थिक नुकसान होत असल्याचे ही निदर्शनास येत असणे, परिणामी गरीब सामान शेतकरी यांच्यात शासनाच्या विरोधात तीव्र संतापाची लाट पसरली असणे, परिणामी शासनाने तातडीने करावयाची कारवाई किंवा उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया.?"

<u>मा. उप मुख्यमंत्री तथा मंत्री (ऊर्जा) यांचे निवेदन</u>

शासनाद्वारे दि.३१/०३/२०१८ पर्यंतच्या नवीन विद्युत पुरवठ्याकरिता पैसे भरलेल्या कृषीपंप अर्जदारांना अखंडित व नियंत्रित वीज पुरवठा करण्याकरिता उच्चदाब वितरण प्रणाली योजना लागू करण्यात आली आहे. या योजनेत एका रोहित्रावर एक किंवा दोन कृषी ग्राहकांना वीज जोडणी देण्यात येते. या योजनेअंतर्गत सद्यस्थितीत १.३६,०५४ कृषी पंपांना वीज पुरवठा देण्याची कार्यवाही करण्यात आली आहे.

जालना जिल्ह्यामध्ये उच्चदाब वितरण प्रणाली (HVDS) योजनेअंतर्गत ७,०९६ कृषीपंपांना वीज जोडणी देण्यासाठी १६ केव्हीए क्षमतेचे ७,०८१ रोहित्रे बसविण्याचे काम अंशतः टर्नकी निविदेमार्फत प्रस्तावित करण्यात आले होते. त्यानुसार दि.१८.१२.२०२२ पर्यंत १६ केव्हीएचे ६,०४१ रोहित्रे कार्यान्वित करुन ६,०४१ कृषीपंपांना वीज पुरवठा देण्यात आला आहे. सदर रोहित्रांपैकी दि.१८.१२.२०२२ पर्यंत १,२६७ रोहित्रे नादुरुस्त झाली असून, त्यापैकी १,१७१ रोहित्रे दुरुस्त करुन वीज पुरवठा चालू करण्यात आला आहे. उर्वरित ९६ रोहित्रे बदलण्याचे काम प्रगतीपथावर आहे. नादुरुस्त रोहित्रे तातडीने बदलण्याचे निर्देश क्षेत्रिय कार्यालयांना देण्यात आले आहेत. जालना जिल्ह्यामध्ये उच्चदाब वितरण प्रणाली योजनेअंतर्गत नादुरुस्त रोहित्रे बदलण्यासाठी शेतकऱ्यांनी आत्मदहन करण्याचा इशारा दिलेला नाही वा तसे कोणतेही निवेदन महावितरण कार्यालयास प्राप्त झालेले नाही.

नादुरुस्त रोहित्रे दुरुस्त करण्याकरीता जालना मंडळासाठी एकूण ३५ रोहित्रे दुरूस्ती एजन्सी नियुक्त करण्यात आल्या आहेत. तसेच जालना मंडळास सन २०२१-२२ मध्ये एकूण २८५ किलो लिटर व सन २०२२-२३ मध्ये (दि.१८.१२.२०२२ पर्यंत) एकूण १७५ किलो लिटर ऑईल पुरविण्यात आले आहे. नादुरुस्त रोहित्रे दुरुस्त करण्यासाठी लागणाऱ्या ऑईलचा मुबलक साठा उपलब्ध असून ऑईल अभावी रोहित्रे नादुरुस्त राहणार नाहीत याची दक्षता घेण्यात येत आहे. .

********************

लक्षवेधी सूचना क्र. १९०८

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२२ चे चतुर्थ (हिवाळी अधिवेशन)

डॉ. राहुल आहेर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना:-

"नार-पार-औरंगा व अंबिका या चार पश्चिम वाहिनी नदया पश्चिमेकडे वाहत जावून अरबी समुद्रात मिळणे, या पश्चिम वाहिनी नदयांच्या खोऱ्यालगत पूर्वेस गिरणा खोरे असुन सदर क्षेत्रातील पाणी उपलब्धता कमी असुन हे खोरे तुटीचे खोरे असणे, या खोऱ्यातील पाण्याची गरज लक्षात घेता पश्चिमी वाहिनी नदी खोऱ्यातील पाणी वळण योजनेव्दारे गिरणा नदी खोऱ्यात वळविण्याचे नियोजन असणे, या योजनेतुन वळविण्यात आलेल्या पाण्यामुळे नाशिक जिल्यातील सुरगाणा, कळवण, देवळा, सटाणा, मालेगांव, नांदगाव, चांदवड तालुक्यातील गावांना व जळगाव जिल्हयातील चाळिसगाव, भडगांव, पारोळा व पाचोरा या तालुक्यातील गावांना सिंचनाचा लाभ होणार असणे, तसेच पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटणार असणे, त्यामुळे स्थानिक जनतेच्या व शेतकऱ्यांच्या विकास व हितासाठी सदर प्रकल्प होणे आवश्यक असणे, म्हणून स्थानिक नागरिकांकडून नार-पार-गिरणा नदी जोड योजना होणेबाबत वारंवार पाठपुरावा केला जात असणे, नार-पार-गिरणा नदीजोड योजनेस शासनाने तात्काळ प्रशासकीय मान्यता देऊन निधी उपलब्ध करून देण्याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना".

---

मा. उप मुख्यमंत्री (जलसंपदा) यांचे निवेदन

नार-पार-औरंगा व अंबिका या चार पश्चिम वाहीनी नद्या महाराष्ट्रात उगम पावून पश्चिमेकडे वाहत जाऊन अरबी समुद्रात मिळतात. हे अतिरिक्त पाणी उपसा करुन पूर्वेकडील अतितुटीच्या गिरणा उपखो-यातील शेती व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी सदर योजना प्रस्तावित केली आहे. एकात्मिक राज्य जल आराखड्यातील तरतुदीनुसार नार, पार, औरंगा व अंबिका या पश्चिम वाहिनी नदीखो-यातील ३०४.६ दलघमी पाणी नार-पार गिरणा नदी जोड योजनेसाठी वळविण्याचे नमूद आहे. नार-पार-गिरणा नदीजोड योजनेमध्ये ९ धरणे प्रस्तावित आहेत. सदर धरणांची ३ लिंकमध्ये विभागणी करण्यात आली आहे. योजनेंतर्गत ९ धरणे व मनखेड, साजभोया व मांजरपाडा असे ३ सम्पद्वारे २६०.३० दलघमी पाणी उर्ध्वगामी नलिकेद्वारे उपसा करुन चणकापूर धरणाच्या पाणलोट क्षेत्रात सोडण्याचे प्रस्तावित असुन पुढे ७९.९२ कि.मी. लांबीच्या प्रवाही बंद नलिकेद्वारे सिंचन करणे प्रस्तावित आहे. सदर योजनेद्वारे नाशिक जिल्ह्यातील सुरगाणा, कळवण, देवळा, मालेगाव व जळगाव जिल्ह्यातील चाळीसगाव, पारोळा,

भडगाव तालुक्यांना सिंचनाचा लाभ मिळणार असून एकूण सिंचन क्षेत्र ५८,७६१ हे. आहे. नार-पार-गिरणा नदीजोड योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल बनविण्याचे काम वॅपकॉस लि., नवी दिल्ली यांना दि. ०२.०८.२०१८ च्या सामंजस्य करारानुसार देण्यात आले आहे. सदर सविस्तर प्रकल्प अहवाल अभिकरणामार्फत करण्यात आला आहे. या योजनेला मुख्य अभियंता, जलविज्ञान व धरण सुरक्षितता, नाशिक कार्यालयाचे दि. २९.०७.२०२२ च्या पत्रान्वये ७५% विश्वासार्हतेस ३०१.५३ दलघमी पाणी उपलब्धतेचे प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे. त्यातून स्थानिक वापर व बाष्पिभवन व्यय वजा जाता २६०.३० दलघमी पाणी गिरणा खो-यात वळविण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे. सविस्तर प्रकल्प अहवालानुसार योजनेची किमत रु. ६२७७.९३ कोटी आहे.

नार-पार-गिरणा नदीजोड योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक यांना महामंडळाचे पत्र दि. २४.१०.२०१९ व्दारे सादर केला असून त्यावर शेरे पूर्तता वेळोवेळी करण्यात आले आहे व तपासणीचे काम अंतिम टप्यात आहे. सदर योजनेअंतर्गत एकूण ३ लिंकपैकी लिंक क्रमांक ३ चे धरण, कालवे, बोगदे, बंदनलिका वितरण प्रणाली, उपसा सिंचन योजना व विद्युत गृहे यांची तपासणी मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांच्याकडून करून घेण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. सन २०२२-२३ च्या अद्ययावत दरसूचीनुसार दरपृथक्करण करण्यात आले असून मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेकडून प्रस्तावित धरणाचे संकल्पन अंतिम झाल्यानंतर सविस्तर अंदाजपत्रक सुधारित करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

उपरोक्तनुसार नार-पार-गिरणा नदीजोड प्रकल्पाच्या अद्ययावत प्रस्तावास राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक यांची मान्यता घेण्याची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर प्रगतीत आहे. तद्नंतर, क्षेत्रिय स्तरावर सदर प्रकल्पास, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ मधील कलम ११ (च) अंतर्गत महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाची मान्यता घेणे आवश्यक आहे.

उपरोक्त मान्यता प्राप्त झाल्यानंतर, राज्याची आर्थोपायाची स्थिती व मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांच्या निर्देशानुसार नार-पार-गिरणा नदीजोड प्रकल्पास प्रशासकीय मान्यता देणे शक्य आहे. सदर प्रकल्पास प्रशासकीय मान्यता प्रदान केल्यानंतर इतर वैधानिक मान्यता, निधी मागणी इत्यादी बाबत पुढील कार्यवाही करणे शक्य आहे.

*****

# लक्षवेधी सूचना

## महाराष्ट्र विधानसभा

### सन-२०२२ चे चौथे अधिवेशन

श्री. सुनील राणे, श्री.कालीदास कोळंबकर, श्री.अमित साटम, ॲड. आशिष शेलार, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली **लक्षवेधी सूचना** पुढीलप्रमाणे आहे:-

मौजे बोरिवली ता. बोरिवली येथील स.नं.२०९ योगीनगर (विचारे कंपाऊंड) या मिळकतीवर मध्य सरकार असे नाव तहसीलदार बोरिवली यांच्या कार्यालयात नमुद असणे, सदर जागेवर नोंद असलेल्या तीवरांच्या झाडांची मोठ्या प्रमाणात कत्तल केलेली असून शासकीय भूखंडावर अनिवासी गोडाऊन, अंदाजे ४० ते ५० अनधिकृत बांधकामे, व्हिजन स्टुडीओ व मोटर सायकल चे शोरूम तसेच अनेक बांधकामे झाल्याचे माहे ऑक्टोबर २०२१ रोजी निदर्शनास येणे, तसेच या ठिकाणी कांदळवनाचा ऱ्हास झाल्याबाबत सन २००९ व ऑक्टोबर २०२१ या वर्षी संबंधितांवर गुन्हे नोंदविण्यात आलेले असणे, या भूखंडावर आजतागायत अवैध बांधकाम सुरू असणे, स्थानिक प्रशासन तसेच आर/मध्य विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, संबंधित अधिकाऱ्यांचे अवैध बांधकाम करणाऱ्या व्यवसायिकांवर कारवाई करण्यास झालेले अक्षम्य दुर्लक्ष, शासकीय भूखंडावरील सदरहू अवैध बांधकाम तात्काळ निष्कासीत करून अवैध बांधकाम करणाऱ्यांवर व त्यांना अभय देणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोक प्रतिनिधींनी मा. महसूल मंत्री यांना इ-मेल द्वारे व मा. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना दि.०५/१२/२०२२ रोजी केलेली असणे, सदर अनधिकृत बांधकाम करणाऱ्या व्यावसायिकांवर व संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने तातडीने कारवाई करून शासकीय भूखंडावरील अवैध बांधकाम तात्काळ निष्कासीत करण्याची आवश्यकता, त्यासाठी शासनाने तातडीची करावयाची कारवाई व उपाययोजना, शासनाची प्रतिक्रिया"

---

### श्री. राधाकृष्ण विखे-पाटील, मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन

मौजे बोरीवली, तालुका बोरीवली येथील स.नं. २०९ या मिळकतीच्या ७/१२ उताऱ्यास कब्जेदार सदरी मध्य सरकार अशी नोंद असुन सदर मिळकत आंतरराष्ट्रीय बेतार अनुश्रवण केंद्र, दुरसंचार विभाग या केंद्र सरकाच्या विभागाच्या ताब्यात आहे. सदर मिळकतीचे एकुण क्षेत्र ३.९४.०६ हेक्टर आर ऐवढे आहे. महाराष्ट्र शासन राजपत्र अधिसुचना दिनांक ०७ जुलै २००८ नुसार सदर मिळकतीच्या एकुण क्षेत्रापैकी १.८१०० हेक्टर आर क्षेत्र संरक्षित वन म्हणून घोषित करण्यात आले आहे. सदर क्षेत्राचा ताबा दिनांक ०३/१०/२०१३ रोजी मुंबई वन विभागाकडुन कांदळवन कक्ष वन विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आला आहे. तसेच भारतीय वन अधिनियम, १९२७ चे कलम ४ अन्वये दिनांक ०४/१०/२०१३ रोजी सदर क्षेत्र "राखीव वन" म्हणुन घोषित करण्यात आले आहे.

विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक यांच्या दिनांक २१/१२/२०२२ रोजीच्या अहवालानुसार मौजे बोरीवली स.नं. २०९ , न.भू.क्र. ४ मध्ये MRSAC नकाशाच्या आधारे तपासणी केली असता, अधिसुचित राखीव कांदळवन क्षेत्रात काही प्रमाणात अनधिकृत बांधकामे निदर्शनास आल्याने गुन्हा क्रमांक E/०२/२०२२ दिनांक २९/०१/२०२२ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला होता. त्या अनुषंगाने नगर भूमापन अधिकारी यांच्याकडुन मो.र.नं. १९२२/२०२२ दिनांक २४/०६/२०२२ अन्वये न.भू.क्र. ४ ची हद्द कायम करुन घेतली आहे.सदर हद्द कायम नकाशानुसार राखीव कांदळवन क्षेत्रात एकुण ३ अनधिकृत बांधकामे येत होती. त्यापैकी २ अतिक्रमणे दिनांक २२/०९/२०२२ रोजी व उर्वरीत १ अतिक्रमण दिनांक १५/१२/२०२२ रोजी

टेटा H1867 (१०-१-२३)

ट व्ह.मं.प.

निष्कासित केलेबाबत विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक यांनी अहवाल सादर केला आहे.

तसेच, तहसिलदार बोरीवली यांनी दिनांक २१/१२/२०२२ रोजी सादर केलेल्या अहवालानुसार सदर मिळकतीवरील कांदळवन ऱ्हासाबाबत तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. सदर तक्रारीचे अनुषंगाने सविस्तर चौकशी व स्थळपाहणी करुन एम.एच.बी. पोलिस ठाणे येथे गु.र.क्र.०६/०९, दिनांक २२/०१/२००९ अन्वये संबंधितावर तसेच गु.र.नं.४६/२०२१ दिनांक ०१/१०/२०२१ अन्वये एकुण १८ व्यक्ती / संस्थांवर गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.

प्रकरणी प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने तहसिलदार बोरीवली कार्यालयामार्फत दि.०५/०१/२०२१ रोजी स्थळपाहणी करण्यात आली. मोजे-बोरीवली, ता. बोरीवली येथील स.क्र.२०९ या मिळकतीमधील न.भू.क्र.४ चे क्षेत्र अंदाजे ४ एकर असून, सदर जागेच्या चारही बाजूला पत्र्याचे कंपाऊंड केलेले असल्याचे दिसून आले. सदर कंपाऊंडच्या आतमध्ये अनिवासी गोडाऊन, अंदाजे ४० ऑफीस, स्वामी समर्थ मठ व निवासी अंदाजे ३० ते ३५ बांधकामे असल्याचे दिसून आले. सदर कंपाऊंडच्या पश्चिम दिशेस व्हिजन स्टुडिओ व यामाहा मोटर सायकलचे शोरुम असून लगत कांदळवन असल्याचे दिसून आले. शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग, परिपत्रक क्रमांक जमीन-०७/ २०१३/ प्र.क्र.३७४/ ज-१, दिनांक १०/१०/२०१३ मधील मुद्दा क्रमांक ३ नुसार शासकीय जमिनीवरील अतिक्रमणास प्रतिबंध करणे ही सदर जमीन ज्या विभागाच्या ताब्यात आहे त्या विभागाची जबाबदारी आहे.

सदर प्रकरणी अवैध बांधकाम तात्काळ निष्कासित करुन अवैध बांधकाम करणाऱ्यांवर व त्यांना अभय देणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर तातडीने कायदेशीर कारवाई करणेबाबत लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ०५/१२/२०२२ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्याकडे विनंती केली होती. सदर विनंतीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी दिनांक ०६/१२/२०२२ रोजी सदर मिळकतीचे धारक आंतरराष्ट्रीय बेतार अनुश्रवण केंद्र, दुरसंचार विभाग, भारत सरकार यांचे समवेत सर्व संबंधितांची बैठक आयोजित केली होती. सदर बैठकीस उपस्थित प्रभारी अभियंता, आंतरराष्ट्रीय बेतार अनुश्रवण केंद्र, दुरसंचार विभाग यांनी बैठकीमध्ये असे सांगितले की, "सदर जमीन त्यांच्या विभागाच्या मालकीची असुन, सदर मिळकतीवरील अतिक्रमणे निष्कासित करणेकामी त्यांच्या विभागाकडून सर्व अतिक्रमण धारकांवर रितसर नोटीस बजावण्यात आली. सदर नोटीसच्या विरोधात अतिक्रमण धारकांनी मा. मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली असुन सदर याचिकेच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालयाने "जैसे थे" आदेश पारीत केले आहेत, सबब निष्कासनाची कारवाई करता येत नाही."

सदर बैठकीत जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी खालीलप्रमाणे सुचना दिल्या आहेत:-

१. सदर प्रकरणी प्रभारी अभियंता, आंतरराष्ट्रीय बेतार अनुश्रवण केंद्र, दुरसंचार विभाग यांनी मा. उच्च न्यायालयाचे "जैसे थे" आदेश रद्द होणेकामी वरीष्ठ विधीज्ञांची मदत घेऊन मा. न्यायालयात सदर जमीन राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने किती महत्वाची आहे, याबाबत मा. न्यायालयात आपली बाजु सक्षमपणे मांडावी.
२. तसेच प्रभारी अभियंता, आंतरराष्ट्रीय बेतार अनुश्रवण केंद्र, दुरसंचार विभाग यांनी विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन घटक, बृहन्मुंबई महानगरपालिका व तहसिलदार बोरीवली यांचे संयुक्त विद्यमाने निष्कासनाचा कार्यक्रम आयोजित करुन सदर मिळकतीवरील अतिक्रमणे तातडीने निष्कासित करणेची कारवाई करावी.

*****

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२२ चे चौथे अधिवेशन

लक्षवेधी सूचना क्र. ४६५

डॉ. बालाजी किणीकर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

"उल्हासनगर महानगरपालिकेचा स्वत:चा स्त्रोत (उद्भव) असलेली पाणी पुरवठा योजना नसल्याने शहरासाठी भविष्यातील पाणी पुरवठ्याची मागणी व पाणी पुरवठा निश्चिती विचारात घेऊन उल्हासनगर महानगरपालिकेने स्वत:चा स्त्रोत विकसीत करण्याचा निर्णय सन: २००५ मध्ये घेण्यात येणे, या योजनेचा उल्हास नदी उद्भवाकरीता मौजे-म्हारळ, ता. उल्हासनगर येथील सर्वे क्र.५३ मधील १.५० हे. जागा व जलशुध्दीकरण केंद्र व अनुषंगीक कामांकरीता मौजे-कानसई, ता. अंबरनाथ येथील सर्व्हे क्र.१२ मधील ७.५० हे. शासकीय जमीन संपादित करावी लागणार असणे, त्याअनुषंगाने सदर शासकीय जमीन मिळण्याकरीता रितसर प्रस्ताव उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडे सादर करण्यात आला असणे, त्याअनुषंगाने मौजे-कानसई येथील शासकीय जमीन महापालिकेच्या पाणी पुरवठा योजनेसाठी मंजूर करत महापालिकेस कब्जा हक्काची रक्कम म्हणून रु. ५.५५ कोटी तहसीलदार, अंबरनाथ यांच्याकडे भरणा करण्यास कळविण्यात आले असणे, त्यानुसार महापालिकेकडून रु. ५२.५० लक्ष इतकी रक्कम दि.३१/०३/२००५ रोजी शासन जमा करण्यात येवून जमिनीचा आगाऊ ताबा मिळण्याबाबत विनंती करण्यात आली असणे, परंतू अद्यापपर्यंत सदर जमिनीचा आगाऊ ताबा महापालिकेस देण्यात आलेला नसणे, परिणामी उल्हासनगर महानगरपालिकेचा पाणी पुरवठा योजनेचा स्वत:चा स्त्रोत निर्माण करण्याची योजना गेल्या १७ वर्षांपासून रखडलेली असणे, उल्हासनगर महापालिकेचा स्वत:चा पाण्याचा स्त्रोत उपलब्ध करण्यासाठी सदर शासकीय जमीन महापालिकेस मिळण्याबाबत शासनाने योग्यती निर्णयात्मक कार्यवाही करण्याची आवश्यकता."

---

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील, मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन

आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका उल्हासनगर यांनी मौजे म्हारळ, ता. उल्हासनगर, जि. ठाणे स.नं.५३ पै. या जमिनीपैकी उद्धव विहीर व त्यावरील पंपगृहासाठी क्षेत्र १-५०.० हे. आर व मौजे कानसई ता.अंबरनाथ, जि.ठाणे येथील स.नं.१२ पै. एकूण क्षेत्र १५-९७.६२ हे.आर यापैकी ७-५०.० हे. आर जमीन जलशुध्दीकरण केंद्र व मुख्य संतुलन टाकीकरिता जमीन मागणी केलेली आहे.

प्रश्नाधीन जमिनीची सन २००५ च्या शिघ्रसिध्दगणकानुसार तात्पुरती कब्जाहक्काची रक्कम रु.५,५५,००,०००/- एवढी होत असून सदरची कब्जाहक्काची किंमत तहसीलदार, अंबरनाथ यांचेकडे जमा करणेबाबत जिल्हाधिकारी, ठाणे यांनी दिनांक २१/०२/२००५ रोजीच्या पत्रान्वये उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर यांना कळविणेत आलेनुसार उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर यांनी रुपये ५२,५०,०००/- धनादेशाद्वारे तहसीलदार अंबरनाथ यांचेकडे दिनांक ३१/०३/२००५ रोजी जमा केली आहे. उर्वरित रक्कम नियमाप्रमाणे शासनाकडून अंतिम मुल्यांकन झालेनंतर भरणा करण्यात येईल, असे उल्हासनगर महानगरपालिकेने कळविले आहे. तथापि, शासन परिपत्रक, महसुल व वन विभाग, क्र.जमिन १०/०५/प्र.क्र.३७/ज-१, दि.७/४/२००५ अन्वये शासनाच्या पुर्व मंजूरी शिवाय आगाऊ ताबा

कुठल्याही प्रयोजनासाठी कोणत्याही प्रकरणात देऊ नये व जमिनी वाटपाचा प्रस्ताव शासनास सादर करावा, असे निर्देश दिलेले असल्यामुळे उक्त जमिनीचा ताबा उल्हासनगर महानगरपालिकेस देता येणार नाही, असे जिल्हाधिकारी, ठाणे यांनी दिनांक ०७/०५/२००५ रोजीच्या पत्रान्वये उल्हासनगर महानगरपालिकेस कळविणेत आलेले आहे. तदनंतर उक्त जमीन मागणीचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, ठाणे यांनी विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई यांचेमार्फत शासनास सादर केलेला आहे.

मौजे म्हारळ, ता. उल्हासनगर, जि. ठाणे येथील स. नं. ५३ पैकी क्षेत्र १-५०-० हे. आर शासकीय जमीन पंपगृह, उद्भव विहीर व अशुध्द पाण्याची जलवाहिनी, जलशुध्दीकरण केंद्र व मुख्य संतुलन टाकी, शुध्द पाण्याच्या जलवाहिनी या प्रयोजनासाठी उल्हासनगर महानगरपालिकेस मंजूर करणेबाबत तसेच मौजे कानसई, ता. अंबरनाथ, जि. ठाणे येथील स. नं. १२ पैकी एकूण क्षेत्र १५-९७.६२ हे. आर पैकी ७-५०.० हे. आर शासकीय जमीन उल्हासनगर महानगरपालिकेस पाणीपुरवठा योजनेसाठी मंजूर करणेबाबतचे दोन्ही प्रस्ताव शासनास प्राप्त झाल्यानंतर सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने अभिप्राय देण्याची विनंती नगर विकास विभागास सन २०१५ मध्ये करण्यात आली होती. तथापि, उक्त दोन्ही प्रस्तावाच्या अनुषंगाने नगर विकास विभागाचे अभिप्राय प्राप्त न झाल्यामुळे विषयांकित दोन्ही प्रस्तावांची पुनर्बांधणी करून अद्ययावत वस्तुस्थितीदर्शक अहवाल त्यांचे अभिप्रायासह शासनास सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी, ठाणे यांना दिनांक ०२.०९.२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले होते. त्यानुषंगाने जिल्हाधिकारी, ठाणे यांनी उक्त दोन्ही प्रस्ताव पुनर्बांधणी करून दिनांक १५.११.२०२२ रोजीच्या पत्रान्वये शासनास सादर केले आहेत. सदर प्रस्तावावर शासनाच्या प्रचलित नियमानुसार आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

******

लक्षवेधी सूचना क्र.७८०

सन २०२२ चे अधिवेशन (हिवाळी)

श्री.राजेश पवार, विधान सभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधान सभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे-:

"राज्यात रेती घाटाचे लिलाव करून रेती उपसा करण्याची परवानगी देण्यात येणे, परंतु सध्याच्या रेती लिलाव प्रक्रियेमध्ये अनेक त्रुटी असणे,त्यामुळे मोठ्या प्रमाणात रेती उपसा होत असल्यामुळे पर्यावरणाचा -हास होणे, तर वाळू माफिया राज्याचा करोडो रुपयांचा महसूल बुडविणे, त्याचबरोबर रेती ही इमारत बांधकामाकरिता अत्यंत आवश्यक असून यामुळे सर्वसामान्य नागरिकांना घरकूल बांधकामासाठी रेतीचे भाव न परवडणे, या अवैध वाळू उपसा धंदयाला स्थानिक महसूल अधिकारी, पोलिस विभाग यांचा समन्वय असणे, परिणामी राज्याच्या महसूलावर परिणाम होत असून यामुळे गुन्हेगारीमध्येही वाढ होत असल्याने सर्वसामान्य नागरिकामध्ये निर्माण झालेल असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याकरिता राज्य शासनाने तेलंगणा राज्याच्या धर्तीवर रेती धोरण अवलंबविण्याची गरज, याबाबत शासनाने तातडीने निर्णय घेण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील, मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन

महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ मधील प्रकरण पाच मध्ये, नाला, नदी व खाडीपात्रातील वाळू/रेतीच्या निर्गतीबाबत तरतुदी केल्या असून, नियम ७० मध्ये, "लिलाव, विनियोग इत्यादीच्या अटी व शर्ती यासंबंधातील कार्यपध्दती शासनाकडून वेळोवेळी निश्चित करण्यात आली आहे. मा. सर्वोच्च न्यायालय, मा. उच्च न्यायालय व मा.राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने दिलेले आदेश तसेच, केंद्रशासनच्या पर्यावरण, वन व वातावरणीय बदल मंत्रालयाने निर्गमित केलेल्या Sustainable Sand Mining Guidelines,२०१६ व Sand Mining Framework,२०१८ मधील तरतुदीशी समन्वय साधून दिनांक २८/०१/२०२२ रोजीचे सुधारित वाळू/ रेती निर्गती धोरण जाहीर करण्यात आले आहे. शासकीय कामांसाठी तसेच, स्थानिकांनी लेखी मागणी केल्यास जिल्हाधिकारी यांनी राखीव ठेवलेल्या वाळू गटातून स्वामित्वधनाची रक्कम आकारुन वाळू उपलब्ध करुन देण्यात येते.

जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनानुसार गौण खनिजाच्या अवैध उत्खननास व वाहतूकीस आळा घालण्यासाठी महसूल, परिवहन व पोलिस यांच्या संयुक्त पथकामार्फत वेळोवेळी कारवाया करण्यात येतात. राज्यात एप्रिल,२०२२ ते ऑक्टोबर,२०२२ अखेर वाळूच्या लिलावापोटी रुपये ३९.८० कोटी महसूल प्राप्त झाला असून गौण खनिजाच्या एकूण ४८६२ अवैध उत्खनन/वाहतुक प्रकरणी आकारण्यात आलेल्या दंडाची रक्कम रुपये २२.७१ कोटी एवढी आहे. तसेच, प्रकरणी ६८६ गुन्हे दाखल करुन ४९४ आरोपीनां अटक करण्यात आली आहे. अवैध वाळू उत्खनन व वाहतूकीच्या प्रकरणांना आळा घालण्यासाठी व नागरीकांना स्वस्त दरात वाळू उपलब्ध होण्याच्या उद्देशाने सुधारित वाळू/ रेती निर्गती धोरण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

*********

रोटा/एब-८१६[७५०-१-२३]·

लक्षवेधी क्र. ८२८

सन २०२२ चे चतुर्थ (हिवाळी) अधिवेशन

**श्री. संजय रायमुलकर मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. ८२८ पुढीलप्रमाणे आहे:-**

"भिवंडी तहसिल कार्यालयातील सजा-भिनार व सजा-कामतघर मधील जेवढी गावे आहेत, त्या गावांमधील गेल्या दोन ते वर्षापासून मोठ्या प्रमाणात विकास कामे चालू असून त्या ठिकाणातील भूभागात पंचवीस ते ३० फूट खोलीपर्यंत गौणखनिज स्वामित्व न करता उत्खनन करण्यात येणे, नारपोली सर्व्हे क्र. ९४ मध्ये सात कोटी रुपयांसह या भागातील तीनशे कोटी रुपयांपर्यंत गौणखनिज गैरव्यवहारातून गैरलाभ मिळवून संबंधित तलाठ्यांनी वसूल केलेले नाही, अशा गैरव्यवहारामुळे गेल्या चार वर्षात ठाणे तहसिल व भिवंडी तहसिल विभागांमध्ये बारा हजार कोटी रुपयांचे स्वामित्व बुडविण्यात आल्यामुळे व गैरव्यवहारातून चुकीचे फेरफार व वरिष्ठांकडून आलेल्या आदेशांची कुठलीही नोंदणी सातबा-यावर करत नसल्याने शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे, परिणामी सर्वसामान्य शेतक-यांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने संबंधित तलाठी गैरव्यवहाराचा ठपका ठेवून त्यांची खातेनिहाय व संपत्तीची चौकशी करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने केलेली व करावयाची कारवाई याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील, मा.मंत्री (महसूल) यांचे निवेदन

तलाठी सजा कामतघर यांच्या कार्यक्षेत्रात मौजे कामतघर व नारपोली या गावांचा तर तलाठी सजा भिनार यांच्या कार्यक्षेत्रात मौजे भिनार, गोरसई, सावंधे, निंबवली, वालशिंद, येवई व एलकुंदे या गावांचा समावेश होतो. सदर गावांच्या क्षेत्रातून सन २०२१ मध्ये गौण खनिजाच्या उत्खननाकरीता रुपये ८२,८४,०२२/- एवढे स्वामित्वधन शासन जमा करण्यात येऊन एकूण २५ उत्खनन परवाने देण्यात आले आहेत.

तलाठी सजा कामतघर व भिनार यांच्या कार्यक्षेत्रात एकूण ८ अनधिकृत गौण खनिज उत्खनन प्रकरणी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम ४८ (७) अन्वये रुपये ४,१६,६९,६४०/- एवढ्या रक्कमेची दंडात्मक कार्यवाही करण्यात आली असून सदर दंडनीय रक्कम ही जमीन महसूलाची थकबाकी म्हणून महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील १७६ तरतुदींनुसार वसुल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

मौजे नारपोली येथील सर्व्हे नं. ९४ बाबत तक्रारदार यांनी शासनाची रॉयल्टी बुडवुन उत्खनन केले बाबत दिनांक १४.०२.२०२२ रोजी प्राप्त झालेल्या अर्जाच्या अनुषंगाने सदर जमीनीमध्ये केलेल्या इमारतीच्या बांधकामाबाबत संबंधितास महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम ४८ (७) नुसार दंडात्मक कारवाईची नोटीस बजावण्यात आली असता, संबंधिताने

मौजे कामतघर येथील स.नं. ९४ मध्ये सन २०१५ मध्ये इमारत बांधकामासाठी ४०० ब्रास गौण खनिजाचे स्वामित्वधन भरल्याचे तसेच भिवंडी निजामपूर महानगरपालिका यांचेकडील दिनांक १३.११.२०१४ रोजी बांधकाम परवानगी सादर केली.

संबंधिताने सादर केलेला खुलासा तसेच मंडळ अधिकारी, भिवंडी यांच्याकडून प्राप्त झालेला फेरचौकशी अहवालाच्या अनुषंगाने महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम ४८ (७) नुसार सुनावणी घेवून अंतिम आदेश पारीत करण्याची कार्यवाही सुरू आहे.

***************

# लक्षवेधी सूचना

**महाराष्ट्र विधानसभा**
**सन-२०२२ चे चौथे अधिवेशन**

श्री. समाधान अवताडे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली **लक्षवेधी सूचना** पुढीलप्रमाणे आहे:-

"मौजे व्यारवली, ता. अंधेरी, जि. मुंबई उपनगर येथील न.भू.क्र. २५ हया मिळकतीवर अर्जदार/ विकासक मे. बिन्द्रा कन्स्ट्रक्शन यांनी दिनांक २/०३/२०१६ रोजी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १०६ व १३५ अन्वये क्षेत्र हद दुरुस्ती प्रस्ताव "वहीवाटी प्रमाणे" दुरुस्तीसाठी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्या कार्यालयात सादर केला असणे, जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी योग्य न्याय संधी सर्व संबंधित कार्यालये व संबंधित बाधितदार/अ याना देऊन क्षेत्र दुरुस्तीच्या बाबतीत निरिक्षणे नोंदवून न.भू.क्र.२५ चे क्षेत्र अतितातडी/ क्षे.दु./ मो.र.नं. १५८९/२०१५ चे मोजणी अंती मूळ नगर भूमापन हद्दीप्रमाणे काढलेले क्षेत्र ३०६९.२ इतकेच आले व जे पूर्वीपासूनच मिळकत पत्रिकेवर नमूद असून योजनेचे क्षेत्र असणे, तद्नंतर विकासक बिन्द्रा कन्स्ट्रक्शन वहिवाटीनुसार लगतचे न.भू.क्र.२४/१अ या मिळकती पैकी ६५.३.चौ.मी. व न.भू.क्र.२०/१ ब या मिळकती पैकी ३७४.१ चौ.मी. असे एकूण ४३९.४ चौ.मी. इतर मिळकतीतून अवैधरित्या व मौजे व्यारवली व मौजे मुळगाव यांच्या सीमा भागातील पोकळिस्त क्षेत्र जे महाराष्ट्र शासनाच्या मालकीचे आहे असे ४३०.१ चौ.मी. क्षेत्र असे एकूण ८६९.५ चौ.मी. क्षेत्र आपल्या नावावर करण्यासाठी अर्ज केला असणे, यावर सर्कल कार्यालय, तलाठी कार्यालय, नगर भूमापन कार्यालय व जिल्हा अधिक्षक भूमी यांचेकडील उपलब्ध अहवाल तपासून त्यावर आपली निरिक्षणे नोंदविली असणे, सदर आदेशातिल निश्कर्ष (१) न.भू.क्र.२५/२४/१२/२४/१ब या भुखंडाचे क्षेत्र मो.र.३. न.१५८९/२०१५ नुसार मूळ मिळकत पत्रिकेतील क्षेत्राइतकेच असणे, त्यामुळे त्यात क्षेत्र दुरुस्ती संभवत नसल्याचे निदर्शनास आले असणे, त्यामुळे जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी आपल्याकडील आदेशानुसार सदर क्षेत्र दुरुस्तीचा प्रस्ताव फेटाळला असणे, त्यावर अर्जदार विकासक बिन्द्रा कन्स्ट्रकशन यांनी तत्परतेने त्यांचदिवशी दिनांक २२/१२/२०१७ रोजी अप्पर आयुक्त, कोकण विभाग, कोकण आयुक्त यांचेकडे अपिल करित एका सुनावणीमध्ये जिल्हाधिकारी कार्यालय किंवा अन्य संबंधित कार्यालय यांना योग्य न्याय संधी उपलब्ध करून न देता व कोणतीही निरिक्षण न नोंदवता आपल्याकडील आदेश क्र. अपिल / डेस्क/ एलएनडी / ८२-२०१८, दि. ८/२/२०१८ ने अपिल मंजूर केले असणे, अर्जदार विकासक बिन्द्रा कन्स्ट्रक्शन कंपनीने केलेले क्षेत्र दुरुस्ती ही वहिवाटी नुसारची असणे, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १०६ व १३५ अन्वये वहिवाटीनुसार क्षेत्र दुरुस्ती व हद दुरुस्ती करण्याचे प्रयोजन नसणे, मुंबई उपनगरात अशाप्रकारे मागील काही वर्षात १०२ संशयास्पद नकाशे बनवण्यात आले असणे, जे जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख यांच्या अखत्यारित असतात अशाप्रकारे नकाशे व क्षेत्रात

① HB/1253/H-3/810प्रती / Folded-/ PA4*

अवैधरित्या बदल घडवून मोठ्या आर्थिक फायदासाठी हे व्यवहार होत असणे, त्याबाबतची गुन्ह्यांची नोंद खेरवाडी पोलीस स्टेशन मध्ये IPC Section ४२०, ४६५, ४६७, ४०९ व ३४ अन्वये अनोळखी कर्मचारी व व्यक्तिविरोधात नोंद असणे, शासकिय कर्मचारी अनोळखी कसा होऊ शकतो याबाबत लोकप्रतिनिधींनी विचारणा केली असणे सदर प्रकरण हे त्यांच स्वरूपाचे असून त्यातील क्षेत्र दुरुस्ती रद्द करून दोन गांवामधील पोकळीस्त क्षेत्र हे महाराष्ट्र शासनाच्या सदरी जमा करण्यात जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांनी त्यांच्या आदेशात नमूद केल्याप्रमाणे न भू.क्र. २५, २४/१अ व २४/१८ यांच्या हद्दीत पहिल्याप्रमाणे कायम करण्याची मागण केली असणे, तसेच खेरवाडी पोलीस स्टेशन मध्ये नोंद गुन्हांमध्ये त्यातील व्यक्तिंचा सामावेश आहे किंवा कसे हे तपासून त्यावर योग्य ती कायदेशीर कार्यवाहीचे आदेश देवून वहिवाटीप्रमाणे क्षेत्र दुरुस्ती केल्यास शासनाचा प्रचंड प्रमाणात महसूल नुकसान होऊ शकेल, अशाप्रकारे केलेले बेकायदेशीर हद दुरुस्ती क्षेत्र दुरुस्तीचे अप्पर आयुक्त, कोकण विभाग याचे आदेश रद्द करून सदर कामी केलेली अतितातडी मोजणी / दु./मो.र.नं.२५८९/२१५ नुसार मौजे व्यारवली व मौजे मुळगांव या दोन गावाच्या हद्दीमधील पोकळीस क्षेत्र ४३० चौ. मी. एवढे क्षेत्र महाराष्ट्र शासनाचे नांव लावून तो पुनर्वसनाचा मार्गच नसल्याने त्वरीत ताब्यात घेण्याच्या सुचना संबंधित कार्यालयास देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया"

---

## श्री. राधाकृष्ण विखे-पाटील, मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन

नगर भूमापन व्यारवली, तालुका अंधेरी येथील न.भू.क्र.२५ या मिळकतीचे क्षेत्र दुरुस्ती करुन मिळणेकरिता अर्जदार मे. बिन्द्रा कन्स्ट्रक्शन यांनी जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, मुंबई उपनगर जिल्हा यांच्या कार्यालयात दिनांक ०३/१२/२०१५ रोजी अर्ज सादर केला होता. सदर अर्जाच्या अनुषंगाने दिनांक ०५/१२/२०१५ रोजी दिलेल्या सुचनेनुसार अर्जदार मे. बिन्द्रा कन्स्ट्रक्शन यांनी नगर भूमापन अधिकारी, विलेपार्ले यांच्याकडे सादर केलेल्या मोजणी अर्जास अति तातडी / क्षेत्र दुरुस्ती / मो.र.नं. १५८९/२०१५, दिनांक २१/१२/२०१५ देऊन दिनांक ०६/०१/२०१६ रोजी मोजणी काम करण्यात आले होते. त्यानुसार नगर भूमापन अधिकारी, विलेपार्ले यांनी दिनांक ०२/०३/२०१६ रोजीच्या पत्रान्वये क्षेत्र /हद्द दुरुस्ती अहवाल जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, मुंबई उपनगर जिल्हा यांच्याकडे सादर करण्यात आला होता. त्यानुसार दिनांक २२/०४/२०१६ रोजीच्या टिपणीद्वारे जिल्हा अधीक्षक,भूमी अभिलेख यांनी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांच्याकडे प्रस्ताव सादर केला होता. सदर प्रस्तावानुसार चौकशी करणेकामी सर्व संबंधितांना वेळोवेळी सुनावणीची संधी देऊन. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी दिनांक २२/१२/२०१७ रोजी आदेश पारीत केले होते. सदर आदेशानुसार नगर भूमापन व्यारवली, तालुका अंधेरी येथील न.भू.क्र. २५, २४/१अ २४/१ब या मिळकतींचे नगर भूमापनाचे हद्दीत दुरुस्ती न करता मिळकत पत्रिकेवर सद्यस्थितीत दाखल असलेले क्षेत्र कायम ठेवण्यात आले होते.

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्या दिनांक २२/१२/२०१७ रोजीच्या आदेशान्वये व्यथित होऊन मे. बिन्द्रा कन्स्ट्रक्शन यांनी अप्पर आयुक्त, कोंकण विभाग यांच्या न्यायालयात महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अन्वये अपील अर्ज दाखल केला होता. सदर अपील अर्जावर अप्पर आयुक्त, कोकण विभाग यांनी दिनांक ०८/०२/२०१८ रोजी आदेश पारीत केले आहेत. सदर दिनांक ०८/०२/२०१८ रोजीच्या आदेशानुसार अपिलार्थी यांचे अपील मान्य करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचे दिनांक २२/१२/२०१७ रोजीचे आदेश रद्द करण्यात आले व मौजे व्यारवली/ अंधेरी, न.भू.क्र.२५चे क्षेत्र-३०६९.२ चौ.मी. ऐवजी ३९३८.७चौ.मी.; न.भू.क्र.२४/१अ चे क्षेत्र-६०४४.६ चौ.मी. ऐवजी ५९७९.३ चौ.मी. व न.भू.क्र.२४/१ब चे क्षेत्र-३६९७.७ चौ.मी. ऐवजी ३३१७.७ चौ.मी. असे मो.र.नं.१५८९/२०१५ अनुसार मोजणीअंती जागेवरील वहिवाटीनुसार येणारे क्षेत्र कायम करण्यात आले आहे.

अप्पर आयुक्त, कोकण विभाग यांच्या दिनांक ०८/०२/२०१८ रोजीच्या आदेशानुसार नगर भूमापन अधिकारी, विलेपार्ले यांनी दिनांक २१/०३/२०१८ रोजीचे फेरफार क्र. १६, १७ नुसार नगर भूमापन व्यारवली, न.भू.क्र.२५, २४/१/अ, २४/१/ब या मिळकतीचे मिळकत पत्रिकेवर नोंदी घेण्यात आलेल्या आहेत.

मंबई उपनगर जिल्ह्यातील अन्य प्रकरणी, नगर भूमापन अधिकारी, गोरेगांव अधिनस्त मौजे एरंगळ, ता.बोरीवली, जि. मुंबई उपनगर तसेच उपअधिक्षक, भूमी अभिलेख, मुंबई उपनगर कार्यालयांतर्गत हद्द कायम मोजणीचे नकाशे बनावटरित्या तयार करण्यात आलेल्या प्रकरणाची चौकशी करण्याकरीता दिनांक २४/०१/२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमी अभिलेख, पुणे यांचे अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठित करण्यात आली होती. सदर चौकशी समितीने त्यांचा चौकशी अहवाल शासनास सादर केला असून त्यामधील शिफारशींनुसार आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत नगर विकास विभाग व जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमी अभिलेख, पुणे यांना शासन पत्र दिनांक १५/१२/२०२२ अन्वये कळविण्यात आले आहे.

*****

लक्षवेधी सूचना क्र.११९४

सन २०२२ चे चतुर्थ (हिवाळी) अधिवेशन

**श्री. रवि राणा, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-**

अमरावती जिल्ह्यातील मौजें परसोडा, मासोद तालुका जिल्हा अमरावती या ठिकाणी निलेश चौरशिया याची टोन इंडस्ट्रीज परसोडा येथील गट नंबर ४३, २०, २२ व १२ मध्ये विनापरवाना अग्रीम स्वामीतवधनाचा भरणा न करता ब्रास गौण खनिजाची साठवणूक केली. जिल्हाधिकारी यांचे आदेशानुसार निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हा खनिकर्म अधिकारी, भूजल सर्वेक्षण यंत्रणेच्या अधिकारी, महसूल अधिकारी, पोलीस अधिकारी यानी संयुक्त पडताळणी करून निलेश चौरसिया यांचे खदानीमद्ये अवैद्य स्फोटक पदार्थ झिलेटिंग काड्या सापडल्या त्यांच्या गुन्हा दाखल करून जिल्हाधिकाऱ्यांनी दंड ठोठावला आहे असे तरी पण शासनाच्या कोणत्याच यंत्रणा जुमानता ते अवैध संपत्ती यांचा धंदा सुरू असणे त्यांच्या खदानी मध्ये ब्लास्टिंग करण्यासाठी जिलेटिन च्या काड्या वापरल्या असणे ब्लास्टिंग वापरायचा आहे ते कोणतीही परवानगी नसताना ते त्यांनी वापरले असणे ज्याच्यामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेच्या संदर्भात तकारी मिळालेला अमरावती जिल्ह्याच्या प्रशासकीय अधिकाऱ्यांना न जुमानता त्यांचा सर्रास खदानीत व्यवसाय सुरू असून ज्यामधून कोट्यावधी रुपयाची गौण खनिज विकली जात असणे. स्टॉक केली असणे जिल्हाधिकारी यांनी त्यांच्यावर दंड आकारला असून तो दंड त्यांनी अध्यापन भरला नसणे यावर वेळीच शासनाने लक्ष देण्याची आवश्यकता महसूल बुडवला म्हणुन चोरीचा गुन्हा नोंदवून खदान मालक निलेश चौरसिया यांना अटक करण्याचे सरकार कडून आदेश देण्याबाबत कार्यवाही आवश्यकता. या बाबत सरकारची भूमिका"

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील, मा.मंत्री (महसूल) यांचे निवेदन

मौजे मासोद व मौजे परसोडा ता.जि. अमरावती येथील खदानीमध्ये मोठ्या क्षमतेचे विस्फोटक वापरून ब्लास्टींग करण्यात येत असून सदर विस्फोटकाच्या हादऱ्यामुळे मौजे मासोद व परसोडा येथील घरांना जबर धक्का बसत असून घरांना भेगा पडत आहेत, तसेच सदर भागातील पाण्याची पातळी खाली जात आहे, अशा आशयाच्या तक्रारी स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरीकांनी जिल्हाधिकारी, अमरावती यांच्याकडे सादर केल्या आहेत.

त्यानुषंगाने उपविभागीय दंडाधिकारी, अमरावती व तहसिलदार, अमरावती यांना जिल्हाधिकारी यांनी चौकशी करण्याबाबत सूचना देण्यात आल्या होत्या. तदनंतर, जिल्हाधिकारी यांनी सदर तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करीता अपर जिल्हादंडाधिकारी अमरावती यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०८.११.२०२१ रोजी संयुक्त समिती स्थापन करण्यात आली. सदर समितीने मौजा परसोडा व मौजा मासोद येथील खाणपट्याची पाहणी करुन जिल्हाधिकारी अमरावती यांना दिनांक १७.१२.२०२१ रोजी अहवाल सादर केला. सदर अहवाल जिल्हाधिकारी, अमरावती यांनी दिनांक २०.१२.२०२१ रोजीच्या पत्रान्वये अपर जिल्हा दंडाधिकारी, अमरावती, वरीष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण अमरावती, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, अमरावती, जिल्हा खनिकर्म अधिकारी, अमरावती, पोलीस आयुक्त, अमरावती शहर यांना त्यांच्या विभागाशी संबंधित मुद्यांवर कारवाई करण्याबाबत कळविले.

तसेच ब्लास्टींग संदर्भातील तक्रारीच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्याकरिता जिल्हाधिकारी, अमरावती यांनी दिनांक २१.१२.२०२१ रोजीच्या पत्रान्वये नागपूर येथील संचालक, खाण व सुरक्षा निर्देशक, नागपूर या कार्यालयास कळविले होते. त्यानुसार संचालक खाण व सुरक्षा निदेशालय नागपूर व संबधीत अधिकारी यांनी वेळोवेळी केलेल्या पाहणी व तपासणी दरम्यान आढळलेल्या त्रुटींचे अनुषंगाने १४ खाणपट्टयांना Violation Notice बजावून खाणपट्टयातील खाणकामे पुढील अनुपालनापर्यंत थांबवलेली आहेत. खाण व सुरक्षा निदेशालय नागपूर क्षेत्र संख्या-१ यांनी Impact of deep hole blasting conduct at stone mines located in Masod and Parsoda villages, Amravati tehsil of Amravati याविषयाबाबत अमरावती खदानधारक व खाण व सुरक्षा निदेशक नागपूर यांच्या समवेत दिनांक ०७.१०.२०२२ रोजी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आलेल्या सभेच्या आयोजनामध्ये Jock Hammer किंवा Short Hole चा वापर करुन दगड फोड करण्याचे प्रक्रियेमध्ये दगड कणांव्दारे Silcosis हा आजार संभवत असल्याने, Deep hole blasting ही पध्दत अधिक सुरक्षित आहे. त्यानुषंगाने खाणपट्टाधारक यांना काही तांत्रीक अडचण असल्यास खाण व सुरक्षा निदेशक नागपूर यांच्याकडून मार्गदर्शन करण्यात येणार असल्याचे नमूद केले.

मौजा परसोडा येथील खाणपट्टा धारक श्री. चौरसीया यांनी मौजा परसोडा येथील गट नं. ४३, २०, २२ व १२ मध्ये साठवणूक केलेल्या गौण खनिजाची ETS मोजनी केली असता १९४५०.६५ ब्रास गौण खनिजाचे साठवणूक केल्याचे आढळून आल्याने त्यांना रुपये १२,९७,७४,७३७/- इतक्या रक्कमेची नोटीस बजावण्यात आली असता त्यांनी मा. उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर येथे रिट याचिका क्रमांक ५२०५/२०२२ दाखल करण्यात आले असता मा. न्यायालयाने दिनांक २०.०९.२०२२ रोजीच्या आदेशान्वये जिल्हाधिकारी यांनी दिलेल्या नोटीशीस स्थगिती दिली असून सद्यस्थित प्रस्तुत प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

तसेच मौजे मासौद व परसोडा येथील दगडखाणीच्या अनुषंगाने श्री. प्रशांत दादाराव चांभारे व इतर यांनी मा. मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर येथे जनहित याचिका क्रमांक १३/ २०२२ दाखल केली सदर याचिकेत मा. न्यायालयाने Director General of mines safety यांच्याकडून Action Taken Report घेऊन सदर याचिका खारीज केली.

तसेच मौजे मासोद येथील नागरिकांनी अवैध बोअर ब्लास्टींग बंद करण्याबाबत जिल्हाधिकारी अमरावती यांना दिनांक २१.११.२०२२ रोजी अमरण उपोषण करण्याबाबत निवेदन दिले असून सदर मागणीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी अमरावती यांच्या कार्यालया समोर दिनांक १९.१२.२०२२ रोजी पासून उपोषण सुरु केले आहे. उपोषणकर्ता यांच्या निवेदनातील बार्बीवर दिनांक ०७.१२.२०२२ रोजीच्या बैठकीत उपोषण सुरु करण्यापूर्वीच जिल्हाधिकारी अमरावती यांच्याकडून चर्चा करण्यात आली आहे.

*********************

रव-८१३-१३.

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२२ चे चौथे अधिवेशन

लक्षवेधी सूचना क्र. १४७६

श्री. संजय रायमुलकर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

"उशिद फळेगांव कल्याण व कशेळी भिवंडी येथील सन १९९० पूर्वीच्या व गावनमुना १-ई मध्ये शेतकऱ्यांच्या नोंदी असलेल्या आकारीपड अथवा सरकारी जमिनीचे अतिक्रमण नियमाकुल करणेसाठी मा. उच्च न्यायालय, मुंबई जनहित याचिका क्र. २०४/२०१० प्रमाणे सबंधित शेतकऱ्यांना अतिक्रमण नियमानुकूल करण्याचे आदेश दिलेले असतांना जिल्हाधिकारी ठाणे यांनी अनेक शेतकऱ्यांची कायदेशीर पुरावे असतांनासुध्दा कित्येक वर्षे न्यायालयाच्या आदेशानंतरही शेतकऱ्यांचे अतिक्रमण नियमाकुल प्रकरणे प्रलंबित ठेवलेले असल्यामुळे सदर प्रकरणांचा तात्काळ निपटारा करण्यासाठी १९९० पुर्वीच्या गावनमुना ई-१ मध्ये नोंद असलेल्या शेतकऱ्यांचे अतिक्रमण नियमाकुल न केल्यामुळे न्यायालयाचा अवमान होणे, परिणामी सर्वसामान्य नागरीकांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने शेतकऱ्यांच्या हितासाठी गांभीर्याने दखल घेऊन तात्काळ अतिक्रमण नियमित करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कारवाई, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

---

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील, मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन

शासन निर्णय, महसुल व वन विभाग, क्र.एलइएन-१०९०/प्र.क्र.१७२/ज-१, दिनांक २८/११/१९९१ अन्वये दिलेल्या निर्देशाची प्रभावी अंमलबजावणी करणेसाठी महाराष्ट्र जमीन महसुल संहिता, १९६६ च्या कलम ३३०-अ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करुन मुंबई आणि मुंबई उपनगर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी खेरीज सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी कलम ५१ खालील अतिक्रमणे नियमानुकूल करण्याबाबत त्यांना असलेले अधिकार त्यांच्या अधिपत्याखालील संबंधित तालुक्याच्या तहसीलदारांना प्रत्यायोजित करण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे.

मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी जनहित याचिका क्र. २०४/२०१० मध्ये दिनांक २८/०३/२०१४ रोजी आदेश पारीत केले असून सदर आदेशानुसार कार्यवाही करून अनुपालन अहवाल सादर करण्याबाबत विभागीय आयुक्त, कोकण यांनी दिनांक १०/१२/२०१४ रोजीच्या अर्ध शासकीय पत्रान्वये जिल्हाधिकारी, ठाणे यांना निर्देश दिलेले होते. त्यानुसार जिल्हाधिकारी, ठाणे यांनी दिनांक ३०/१२/२०१४ रोजीच्या अर्ध शासकीय पत्रान्वये संबंधित तहसीलदार यांना शेतीचे अतिक्रमण नियमानुकूल करणेच्या अनुषंगाने सर्व प्रकरणे प्राधान्याने निकाली काढणेबाबत निर्देश दिलेले आहेत.

मा. उच्च न्यायालयाच्या उक्त आदेशाचे पालन होण्याच्या अनुषंगाने जी प्रकरणे नियमानुकूल करणेस पात्र आहेत अशा प्रकरणांत शासन निर्णय, महसूल व वन विभाग, दिनांक २८/११/१९९१ मध्ये नमुद असलेल्या अटी व शर्तीवर शेतीचे अतिक्रमण नियमानुकूल करण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करुन अहवाल सादर करणेकामी सर्व संबंधित तहसीलदारांना जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या दिनांक १८/०६/२०१५ रोजीच्या पत्रान्वये कळविणेत आले होते. त्यानुसार तहसिलदार, भिवंडी यांनी भिवंडी तालुक्यातील एकूण

१००५ प्रकरणे क्षेत्र ४२९.६९.४० हे.आर अपात्र ठरवुन निकाली काढणेत आलेली आहेत. तसेच तहसिलदार, कल्याण यांनी एकुण ४७ प्रकरणे क्षेत्र ३२-१६.९ हे.आर अपात्र ठरवुन निकाली काढलेली आहेत.

मौजे उशिद, ता.कल्याण, जि.ठाणे येथील स.नं. ८२/१२ अ, क्षेत्र १-६३.० हे.आर व स.नं. ८२/१२ ब क्षेत्र ०-९१.० हे.आर या जमिनीवरील शेतीचे अतिक्रमण नियमानुकूल करणेकामी श्री. भगवान नारायण भोईर यांचे कुळमुखत्यारधारक श्री.नागेश निमकर यांनी अर्ज दाखल केलेला होता. परंतु, अर्जदार हे सदर ठिकाणी शेती करत नसल्याने जिल्हाधिकारी, ठाणे यांनी दिनांक १६/८/२०११ रोजीच्या पत्रान्वये त्यांचा अर्ज निकाली काढणेत आला होता. त्यांनतर अर्जदार यांनी जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या दिनांक १६/८/२०११ रोजीचे पत्राविरुध्द अपर आयुक्त, कोकण विभाग, मुंबई यांचेकडे अपिल अर्ज दाखल केला होता. सदर अपिल अर्जावर अपर आयुक्त, कोकण यांनी दिनांक २०/१/२०१५ रोजी आदेश पारीत करून अर्जदार यांचा अपिल अर्ज अमान्य करण्यात आलेला आहे. सदर आदेशाविरुध्द अर्जदार यांनी तत्कालीन मा.मंत्री (महसुल) महाराष्ट्र राज्य यांचेकडे अपिल दाखल केलेले होते. त्यानुसार तत्कालीन मा.मंत्री (महसुल) यांनी दिनांक २३/०७/२०१९ रोजी आदेश पारीत करून अर्जदार यांचा फेरतपासणी अर्ज अशंत: मंजुर करण्यात आलेला आहे. तसेच अर्जदार यांचे विनंती अर्जाचे अनुषंगाने त्यांनी सादर केलेल्या पुराव्याची तपासणी करुन प्रकरणी प्रचलित शासन धोरणातील तरतुदीनुसार आवश्यक ती कार्यवाही करणेबाबत जिल्हाधिकारी, ठाणे यांना निर्देश दिलेले आहेत. सदर निर्देशाचे अनुषंगाने तहसीलदार, कल्याण यांचेमार्फत चौकशी करण्यात आलेली असुन पुढील कार्यवाही जिल्हाधिकारी, ठाणे यांच्यामार्फत सुरु आहे.

*******

लक्षवेधी सूचना क्र. १६८२

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२२ चे हिवाळी अधिवेशन

डॉ.देवराव होळी, वि.स.स. यांच्या लक्षवेधी सूचना क्र. १६८२ वरील निवेदन महसूल मंत्री सभागृहासमोर ठेवतील :-

"तेलंगाना महाराष्ट्र राज्याच्या सीमेवर गडचिरोली जिल्ह्यातील सिरोंचा येथे गोदावरी नदीवर मेडीगट्टा कालेश्वरम सिंचन प्रकल्प दोन्ही राज्याच्या संयुक्त संमतीने कार्यान्वित असणे, दिनांक २३ ऑगस्ट, २०१६ रोजी मुंबई येथे महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस व तेलंगाना चे मुख्यमंत्री मा. के. चंद्रशेखर राव यांच्या स्वाक्षरीने झालेल्या संयुक्त करारनाम्यानुसार ३७८ हेक्टर आर जमिनीचे भूसंपादन करणे अपेक्षित असणे, मात्र अजूनही १७६ हेक्टरचे भूसंपादन करण्यात न येणे, त्यातच ज्या जमिनीचे भूसंपादन मंजूर करण्यात आले त्या मंजूर झालेल्या भूसंपादनाची प्रक्रिया अजून पर्यंत पूर्ण न होणे, जमीनही गेली उत्पादनही गेले, मोबदलाही मिळालेला नाही त्यामुळे आता शिल्लक काहीच राहिलेले नसल्याने शेतकरी प्रचंड संकटात सापडलेला असणे, त्यातच या प्रकल्पातून वारंवार पाणी सोडत असल्यामुळे या प्रकल्पाचे पाणी सोडताना निर्माण होणाऱ्या अतीप्रवाहामुळे नडीकुडा, कोत्तुर, चितारवेला, रंगधामपेठा, अंकिसा, यासह अनेक गावातील शेकडो हेक्टर जमीन दरवर्षी वाहत जाऊन त्या जमिनीचे नदीत रूपांतर होणे, त्यांचे प्रचंड नुकसान शेतकऱ्यांना होत असून अनेक शेतकरी भूमीहीन झाले तर अनेक शेतकरी भूमी होण्याच्या मार्गावर असणे, याप्रकारे दरवर्षी जमीन नदीमध्ये रूपांतरित होत असल्याने या नदीकाठावर संरक्षण भिंत बांधण्याची आवश्यकता निर्माण होणे, त्यामुळे ज्या शेतजमिनी भूसंपादना अंतर्गत मंजूर झालेल्या आहेत त्या शेतजमिनीची तात्काळ भूसंपादन प्रक्रिया करून हेक्टरी ५० लक्ष रुपये मोबदला देण्याची आवश्यकता निर्माण होणे, याकरिता मागील अनेक वर्षांपासून पीडित शेतकरी सातत्याने याबाबतच्या मागण्या शासन स्तरावर करूनही अजून पर्यंत त्या मागण्यांचा विचार न होणे, या विरोधात करण्यात येत असलेले उपोषण, आंदोलन याची दखल घेऊन शासनाने या मागण्यांचा विचार करण्याची आवश्यकता, दोन राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनी संयुक्त स्वाक्षरीने केलेल्या करारनाम्यातील बाबींची पूर्तता करण्याची नितांत आवश्यकता असणे, ज्या जमिनीचे भूसंपादन अजून पर्यंत करण्यात आलेले नाही त्या जमिनीचे तातडीने भूसंपादन करून हेक्टरी ५० लक्ष रुपये मोबदला देण्याची कारवाई सुरु करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

### श्री.राधाकृष्ण विखे-पाटील, मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन

कालेश्वरम प्रकल्प, मेडीगट्टा बॅरेज हा प्रकल्प महाराष्ट्र व तेलंगणा या दोन्ही राज्याचा संयुक्त प्रकल्प असून दिनांक २३.०८.२०१६ रोजी आंतरराज्य मंडळाचे बैठकीमध्ये झालेल्या सामंजस्य करारानुसार सदर प्रकल्पावरील होणारा संपुर्ण खर्च हा तेलंगणा राज्य करीत आहे.

सदर प्रकल्पाकरीता महाराष्ट्र राज्यातील गडचिरोली जिल्हयातील सिरोंचा तालुक्यामधील मौजा पोचमपल्ली, आयपेठा व वडधम येथील खाजगी जमीन भूसंपादनाबाबत प्रस्ताव कार्यकारी अभियंता, मेडीगट्टा बॅरेज वि.क्र. १, महादेवपुर तेलगणा राज्य यांनी थेट खरेदीचा प्रस्ताव सादर केला होता. त्यानुसार जिल्हाधिकारी, गडचिरोली यांनी थेट खरेदी पदध्दतीने मौजा पोचमपल्ली,

आयपेठा, वडधम, पेंटीपाका, तुमनुरमाल, व मुंगापुर असे एकुण ६ गावातील एकुण २३४.९२ हे. आर. जमीन खरेदी करण्यात आली आहे. महाराष्ट्र व तेलंगणा शासनाच्या कालेश्वरम आंतरराज्यीय प्रकल्प अंतर्गत मेडीगड्डा बॅरेज प्रकल्पाचे बांधकाम जून २०१९ मध्ये पूर्ण करण्यात आलेले आहे.

उक्त सिंचन प्रकल्पाचे पाण्यामुळे बाधीत झालेली व गोदावरी नदी पात्रातील बुडीत क्षेत्रातील मौजा सिरोंचा माल, सिरोंचा रै., कासरपल्ली, रामक्रिष्णापुर, नगरम, चिंतमपल्ली, मदीकुठा, जानमपल्ली, आरडा माल, राजन्नापल्ली, मृदक्रिष्णापुर, मुंगापुर असे एकुण १२ गावातील एकुण २९५ स.नं. चे एकुण १६३८ भूधारकांची एकुण १२८.०४ हे. आर. खाजगी जमीन देखील प्रकल्पाकरीता संपादन करण्यात यावी अशी मागणी केली होती. त्याअनुषंगाने उक्त प्रकल्पाच्या बॅक वॉटरमुळे बाधीत होत असलेल्या क्षेत्राचे संयुक्त सर्वेक्षण करण्यात आले. भूसंपादन अधिनियम, २०१३ नुसार संपादन संस्थेकडून (कार्यकारी अभियंता, मेडीगट्टा बॅरेज प्रकल्प, तेलंगणा राज्य) भूसंपादन अधिकारी, सिरोंचा यांच्या कार्यालयास भूसंपादन प्रस्ताव दिनांक ६.०८.२०१९ रोजी प्राप्त झाला असुन त्यानुसार पुढील कार्यवाही सुरु आहे.

उपविभागीय अधिकारी, अहेरी यांनी सदर भूसंपादन प्रकरणात कलम ११(१) ची अधिसुचना दिनांक ०१.१२.२०२१ रोजी प्रसिद्ध केली असुन कलम १९(१) ची अधिसुचना दिनांक ६.१०.२०२२ रोजी प्रसिद्ध केलेली आहे.

भूसंपादन अधिनियम, २०१३ अंतर्गत कलम २६ ते ३० च्या तरतूदींप्रमाणे कार्यपद्धती विहीत आहे. त्याअनुषंगाने जिल्हाधिकारी, गडचिरोली यांनी कलम २६ (३) अंतर्गत मूल्यदर निश्चितीचा प्रस्ताव शासनास पाठविला आहे. परंतु, सदर प्रकल्पाकरीता यापूर्वी भूसंपादन अधिनियमानुसार २३४.९२ हे. आर. जमिनी थेट खरेदीने ताब्यात घेतलेल्या आहेत. सद्यस्थितीत भूसंपादन अधिनियमानुसार प्रक्रिया सुरू होऊन ती अंतीम टप्प्यात आहे त्यामुळे यापूर्वी थेट खरेदीने ताब्यात घेतलेल्या २३४.९२ हे. आर. जमिनीला देण्यात आलेले मुल्यांकन विचारात घेऊन उर्वरीत बुडीत क्षेत्र १२८.०४ हे.आर. करीता भूधारकास वाजवी व न्याय मोबदला देणेच्या दृष्टीने कलम २३ (क) मधील तरतूदीनुसार संमती निवाडा करण्याची कार्यवाही करण्याबाबत जिल्हाधिकारी यांना कळविले आहे.

************************

लक्षवेधी क्र.१८५०

सन २०२२ चे चतुर्थ (हिवाळी) अधिवेशन

श्री. चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. १८५० पुढीलप्रमाणे आहे:-

"मौजे सातोड ता.मुक्ताईनगर येथील गट नंबर २२५/२/३, २२५/२/२, २२५/२/१, २२५/१/१, २२५/१/२ हा एक संपूर्ण गट मुंबई नागपूर राष्ट्रीय महामार्गाला लागून असून जवळपास ४४ हेक्टरचा असून संपूर्ण गट मुरमाच्या टेकडीचा आहे. संबंधित गट धारकाने शासनाची कुठलीही परवानगी न घेता सदरील टेकडीवर असलेले झाडांची कत्तल करुन या टेकडीचे अवैधरित्या उत्खनन करुन कुठलाही गौण खनिज परवाना न घेता जवळपास २ लक्ष ब्रास पेक्षा जास्त गौण खनिज उत्खनन करुन, उत्खनननंतर निघालेले गौण खनिजाची उचल करुन महाराष्ट्र शासनाच्या मृद व जलसंधारण विभागाच्या दिनांक २९ नोव्हेंबर २०१७ च्या शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१६ प्रक्र २२७ जल एक, मंत्रालय मुंबई चा आधार घेऊन शासन निर्णयातील नमूद कार्यपध्दतीचा अवलंब न करता तसेच अटी शर्ती व शासनाने ज्या उद्देशाने शासन निर्णय केला तो उद्देश बाजूला ठेवून लाखो ब्रास अवैध गौण खनिज उत्खनन करुन त्या गटधारकाने त्याचा राजकीय दबाव वापरुन शासनाचा जवळपास ४०० कोटी रुपयांचा महसूल बुडवून उत्खनन करुन त्यातून निघालेले गौणखणीज मुंबई नागपूर राष्ट्रीय महामार्गाचे काम करीत असलेल्या गावर कन्स्ट्रक्शन कंपनीला विक्री करुन कोटयावधी रुपयांची कमाई करुन या गट धारकाने कोटयावधी रुपयांचा भ्रष्टाचार केल्याचे दिसून येते, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील, मा.मंत्री (महसूल) यांचे निवेदन

राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६ मधील चिखली ते तरसोद येथील टप्प्याचे काम करण्याबाबत आवश्यक असलेले गौण खनिज मौजे सातोड येथील गट क्रमांक २२५/२/३, २२५/२/२, २२५/२/१, २२५/१/१, २२५/१/२ मधून गौण खनिज उपलब्ध होण्याबाबत केंद्र शासनाच्या रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालया मार्फत राबविण्यात येत असलेल्या महामार्ग विकास कार्यक्रमासाठी आवश्यक असलेली माती/मुरुम/दगड याकरिता जल संधारणाच्या उपचारांची सांगड घालण्याबाबत मृद्द व जलसंधारण विभागाने दिनांक २९.११.२०१७ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णया मधील तरतुदीनुसार जिल्हाधिकारी, जळगांव यांच्याकडे संबंधित कंत्राटदार यांनी दिनांक ०८.०१.२०१९ रोजी अर्ज सादर केला. दिनांक २९.११.२०१७ च्या शासन निर्णयातील तरतुदी विचारात घेऊन तालुका कृषि अधिकारी, मुक्ताईनगर जिल्हा जळगांव यांनी मौजे सातोड येथील गट क्रमांक २२५/१/१ मध्ये शेततळे खोदकामात दिनांक ०९.०१.२०१९ च्या पत्रान्वये मंजुरी प्रदान करण्याबाबत अपर जिल्हाधिकारी, जळगांव यांना अहवाल सादर केला. सदर अहवालाच्या अनुषंगाने अपर जिल्हाधिकारी, जळगांव यांनी दिनांक १४.०१.२०१९ व ०९.०९.२०१९ च्या

आदेशान्वये एकूण २०,००० ब्रास च्या गौण खनिजाचे स्वामित्वधनाचा भरणा संबंधित कंत्राटदार यांच्याकडून करुन घेऊन गौण खनिज उत्खननाबाबतचे अल्पमुदतीचे परवाने देण्यात आले.

मौजे सातोड, ता. मुक्ताईनगर, जि. जळगांव येथील गट क्रमांक २२५/२/३, २२५/२/२, २२५/२/१, व २२५/१/२ मधून दिनांक २९.११.२०१७ च्या शासन निर्णयानुसार राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६ साठीच्या गौण खनिजाचे उत्खनन करण्यास संबंधित कंत्राटदार यांना जिल्हाधिकारी, जळगांव यांच्याकडून परवानगी देण्यात आलेली नाही. उपविभागीय अधिकारी, भुसावळ व तहसिलदार, मुक्ताईनगर यांनी दिनांक २४.१२.२०२२ रोजी केलेल्या संयुक्त स्थळ पाहणी मध्ये सदर गटातील बराचसा भाग हा टेकडीचा असून त्यापैकी काही भागात उत्खनन झाल्याचे दिसून आल्याबाबतचा अहवाल उपविभागीय अधिकारी, भुसावळ यांनी अपर जिल्हाधिकारी, जळगांव यांना सादर केला.

त्या अनुषंगाने अपर जिल्हाधिकारी, जळगांव यांनी दिनांक २४.१२.२०२२ च्या पत्रान्वये मौजे सातोड तालुका मुक्ताईनगर जिल्हा जळगांव येथील गट क्रमांक २२५/२/३, २२५/२/२, २२५/२/१, २२५/१/१ व २२५/१/२ यांची स्थळ निरीक्षण करुन गट क्रमांक २२५/१/१ या गटामधून परवानगीच्या परिमाणा पेक्षा जास्त उत्खनन करण्यात आले आहे किंवा कसे याबाबत तपासणी करण्यात यावी तसेच उर्वरित गट क्रमांक २२५/२/३, २२५/२/२, २२५/२/१, व २२५/१/२ मधून गौण खनिजांचे अवैधरित्या उत्खनन झाल्याचे आढळून आल्यास ईटिएस मोजणी करुन परवानगी पेक्षा जास्तीच्या परिमाणाचे गौण खनिजाचे उत्खनन आढळून आल्यास कायद्यातील तरतुदीनुसार कार्यवाही करण्याबाबत उपविभागीय अधिकारी, भुसावळ यांना सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण जळगांव यांना उक्त गटामधून संबंधित कंपनीने किती ब्रास गौण खनिजाची खरेदी केलेली आहे, याबाबत चौकशी करुन अहवाल सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी, जळगांव यांनी दिनांक २४.१२.२०२२ च्या पत्रान्वये कळविलेले आहे.

***************

महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये मा. श्री अजित पवार, [redacted], श्री. धनंजय मुंडे, श्री.सुनिल भुसारा, श्री. राजू कारेमोरे, डॉ. किरण लहामटे, श्री. दौलत दरोडा, श्री. इंद्रनिल नाईक, श्री. छगन भुजबळ, श्री. नितीन अर्जुन (ए.टी.) पवार, श्री. विनोद निकोले, श्री. दिलीप वळसे पाटील, कुमारी आदिती तटकरे, श्री.हिरामण खोसकर, वि.स.स यांनी उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

" महाराष्ट्र शासनाचा सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभागाचा शासन निर्णय क्र. रामाआ-२००३/प्र.क्र. १७५/मावक-१, २००५ अन्वये महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती, जमाती आयोग, मुंबईची स्थापन करण्यात आलेली असणे, अनुसूचित जाती जमातीच्या समाजाच्या मागण्याच्या अनुषंगाने या समाजाच्या सामाजिक,शैक्षणिक,आर्थिक,सांस्कृतिक व राजकीय वगैरे सदयस्थितीचा अभ्यास करण्याच्या अनुषंगाने शासनास उपाययोजना सुचविण्यासाठी महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती, जमाती आयोग गठित करण्यात आलेली असणे, या आयोगावर एक अध्यक्ष व चार सदस्य यांची नेमणूक केली जात असणे. मात्र नसल्याचे निदर्शनास येणे, या पदांवर अनुसूचित जमातीला पुरेसे प्रतिनिधीत्व दिले जात नसणे, त्यामुळे अनुसूचित जमाती समाजाच्या मागण्या आणि अडचणी बाबत तत्परतेने कामकाज होत नसल्याचे निदर्शनास येणे, अनुसूचित जमाती मधील जनता आणि लोकप्रतिनिधी यांच्यामध्येही अनुसूचित जाती आणि जमातीसाठी एकच आयोग असल्याने संभ्रमाचे वातावरण दिसून येणे. सबब आयोगाची स्थापना झाल्यानंतर नेमणूक करण्यात आलेले अध्यक्ष आणि सदस्य यांची त्यांचे संवर्ग निहाय माहिती याबाबत संभ्रम असणे, अनुसूचित जमातीसाठी स्वतंत्र महाराष्ट्र राज्य अनुसूचित जमाती आयोग स्थापन करण्याबाबत शासनाची भूमिका काय "

---

मा.मंत्री (आदिवासी विकास) यांचे निवेदन

राज्यात सामाजिक न्याय विभागाच्या दि.०१/०३/२००५ च्या शासन निर्णयान्वये अनुसूचित जाती/जमाती आयोग गठित करण्यात आला आहे. राज्यातील अनुसूचित जाती/जमाती या समाजाच्या सध्याच्या सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, सांस्कृतिक व राजकीय सदयथितीचा अभ्यास करुन त्यावर उपाययोजना सुचविण्यासाठी सदर आयोग गठित केला आहे. सदर आयोगामध्ये १ अध्यक्ष व ४ सदस्य नियुक्त करण्याची तरतूद असून आयोगाचा कार्यकाल ३ वर्षाचा आहे. आयोगाचे अध्यक्ष म्हणून पहिल्या दिड वर्षाकरिता अनुसूचित जातीतील व्यक्तीची व उर्वरित दिड वर्षाकरिता अनुसूचित जमातीतील व्यक्तीची नियुक्ती करण्याबाबत तरतूद आहे. तसेच ४ सदस्यांपैकी १ सदस्य स्त्री व २ अनुसूचित जातीचे व २ अनुसूचित जमातीचे नियुक्त करण्याबाबत तरतूद आहे.

सदयस्थितीत राज्याच्या अनुसूचित जाती/जमाती आयोगावर अनुसूचित जमातीतील सदस्यांची नियुक्ती करण्यात आलेली नाही ही वस्तुस्थिती आहे. राज्यातील अनुसूचित जातीचे व अनुसूचित जमातीचे प्रश्न भिन्न असून त्यांची सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, सांस्कृतिक व राजकीय स्थितीदेखील भिन्न आहे. राज्यातील अनुसूचित जमातीतील जनता व लोकप्रतिनिधी यांच्याकडून राज्यात अनुसूचित जमातीसाठी स्वतंत्र महाराष्ट्र राज्य अनुसूचित जमाती आयोग स्थापन करण्याबाबत मागणी होत आहे. राज्यासाठी केंद्र शासनाच्या धर्तीवर स्वतंत्र अनुसूचित जमाती आयोग गठित करण्याची बाब शासन स्तरावर विचाराधीन आहे.

---

लक्षवेधी सूचना क्रमांक-७९९

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२२ चे चतुर्थ (हिवाळी) अधिवेशन

मा. श्री. राजेश पवार, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे-

"राज्यातील अनुसूचित जमातीतील शेकडो विद्यार्थी वैद्यकीय आणि अभियांत्रिकी शिक्षण पूर्ण करणे, परंतू या विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्राच्या कारणास्तव पदवी प्रमाणपत्र देण्यात येत नसणे, त्यामुळे त्यांना पुढील शिक्षण घेण्याकरीता अनेक अडचणी येत असणे, तसेच नवीन वर्षाकरीता प्रवेश घेण्यासाठी जात वैधता प्रमाणपत्राची सक्ती केली जाणे, त्याचप्रमाणे पोलीस दलामध्ये १०, २०, ३० या साखळी पध्दतीने पदोन्नतीप्रमाणे जाहीर करण्यात आलेल्या परिपत्रकानुसार पदोन्नतीसाठी जात वैधता प्रमाणपत्राची सक्ती करुन पदोन्नतीपासून वंचित ठेवले जात असणे, त्यामुळे सर्व समाज बांधवात असंतोष निर्माण झाला असणे, अनुसूचित जमातीतील वैद्यकीय आणि अभियांत्रिकी शिक्षण पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना अंतरवासिता व पदोन्नती पदवी प्रमाणपत्र तात्काळ देण्यात यावे व नवीन शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश घेताना जात वैधता प्रमाणपत्र सक्तीचे न करता पोच पावतीच्या आधारे प्रवेश देण्याची आवश्यकता, अनुसूचित जमातीतील विद्यार्थ्यांना व पोलीस कर्मचारी बांधवांना न्याय देण्याकरीता शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

---

मा. मंत्री (आदिवासी विकास) यांचे निवेदन

राज्यामध्ये महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम २००० व महाराष्ट्र अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २००३ नुसार अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे काम करण्यात येते. उक्त अधिनियमातील कलम ३ नुसार अनुसूचित जमातींसाठी राखीव असलेल्या कोणत्याही लाभाची मागणी करताना जात प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. तसेच उक्त अधिनियमातील कलम ४ नुसार असे जात प्रमाणपत्र हे त्याच्या पडताळणीचे अधीन राहून वैध असेल अशी तरतूद आहे.

कु. माधुरी पाटील व इतर विरुध्द अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे व इतर प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे दाखल झालेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक १४७६७/१९९३ प्रकरणी निर्णय देताना मा. सर्वोच्च न्यायालयाने जात प्रमाणपत्र निर्गमित करणे व त्याची पडताळणी करणे याबाबतची विविध मार्गदर्शक तत्वे घालून दिलेली आहेत. या मार्गदर्शक तत्वानुसार अनुसूचित जमातीचा दावा करणाऱ्या अर्जदारांनी आपले जात प्रमाणपत्र किमान सहा महिने अगोदर संबंधित अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीकडे शैक्षणिक संस्था व सेवेत नियुक्ती मिळविण्याकरीता तपासणीसाठी सादर करावे, अशा सूचना दिलेल्या आहेत. त्यानुसार विविध व्यवसायिक अभ्यासक्रमांसाठी अनुसूचित जमातींसाठी राखीव असलेल्या जागांवर प्रवेश घेवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी त्यांचे जात प्रमाणपत्र पडताळणीबाबतचे प्रस्ताव विहित मुदतीत संबंधित अनुसूचित जमाती प्रमाणपत्र

तपासणी समितीकडे सादर करणे आवश्यक आहे. तथापी मा. उच्च न्यायालयाने विविध रिट याचिका प्रकरणांमध्ये अनुसूचित जमातीच्या राखीव जागेवर व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या अर्जदारांना जरी त्यांनी अर्ज विहित मुदतीत समितीकडे पडताळणीसाठी सादर केलेले नसले तरी काही अपवादात्मक प्रकरणी अशा अर्जदारांना व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी तात्पुरत्या स्वरुपात हमीपत्राच्या आधारे वैधता प्रमाणपत्र सादर करण्याच्या अटीवर प्रवेश देण्याबाबत शैक्षणिक संस्थांना आदेशित केलेले आहे.

याबाबत मा. सर्वोच्च न्यायालयात श्री. दिलीप विठ्ठल बांबळे व इतर विरुध्द दिलीपकुमार मोतीराम तोतलोड व इतर या विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक- ११२३४-४८/२०१७ प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने दिनांक ०६.०९.२०१७ रोजी निर्णय देताना हमीपत्राआधारे वैधता प्रमाणपत्राशिवाय मागास प्रवर्गाच्या राखीव जागेवर शैक्षणिक संस्थेमध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी देण्यात आलेले प्रवेश रद्दबाबतल ठरविले आहेत. त्यानुसार शासन व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी अनुसूचित जमातीच्या राखीव जागेवर प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या अर्जदारांना वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. यासंदर्भात दिनांक १० डिसेंबर, २०१९ च्या शासन निर्णयान्वये वेळापत्रक निश्चित करून देण्यात आले आहे. तसेच व्यवसायिक अभ्याक्रमासाठीच्या प्रवेशाचे वेळापत्रक जाहिर झाल्यानंतर वेळोवेळी विशेष मोहिम राबवून विद्यार्थ्यांचे अर्ज निकाली काढण्यात येत आहेत. ज्या विद्यार्थ्यांनी यापूर्वी हमीपत्राच्या आधारे राखीव जागांवर प्रवेश घेतला आहे त्यांनी त्यांचे जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना व्यवसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेण्यापूर्वी वैधता प्रमाणपत्र उपलब्ध व्हावे त्यांची धावपळ होवू नये व अनुसूचित जमाती वैधता प्रमाणपत्राच्या आभावी विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित राहू लागू नये तसेच अनुसूचित जमाती प्रमाणपत्र पडताळणी समितीला देखील विद्यार्थ्यांच्या दाव्याची पडताळणी करण्यास पुरेसा कालावधी प्राप्त व्हावा यासाठी ९ वी ते १० वी मध्ये शिक्षण घेणाऱ्या अनुसूचित जमातीच्या मुलां-मुलींना जमातीचे दाखले देऊन त्यांची जमात प्रमाणपत्राची पडताळणी करुन घेण्यासंदर्भात सर्व अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्या, प्रकल्प अधिकारी, शासकीय आश्रमशाळा, अनुदानित आश्रमशाळा यांना दिनांक ०६.११.२०२० रोजीच्या परिपत्रकान्वये सूचना देण्यात आल्या आहेत.

वित्त विभागाच्या दिनांक ०२.०३.२०१९ च्या शासन निर्णयान्वये आश्वासित प्रगती योजनेबाबतचे निकष निश्चित करुन देण्यात आलेले आहेत. त्यानुसार आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मंजूर करताना संबंधित लाभार्थ्याकडे पदोन्नतीच्या पदाकरीता विहित केलेली अर्हता आवश्यक आहे.

अनुसूचित जमातीचे विद्यार्थी तसेच कर्मचारी हे अनुसूचित जमाती प्रमाणपत्राअभावी लाभांपासून वंचित राहू नयेत यास्तव त्यांना विहित वेळेत वैधता प्रमाणपत्र प्राप्त व्हावे, याद्दष्टीने वेळोवेळी आवश्यक कार्यवाही करण्यात येते.

-----------

लक्षवेधी सूचना क्र.८४६

श्री. प्राजक्त तनपुरे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. ८४६ पुढीलप्रमाणे आहे:-

"दिनांक ५ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास अहमदनगर जिल्हयातील अकोले तालुक्यातील अकोले तालुक्यातील शिरपुंजे येथील शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना अधीक्षक अश्विन पाईकराव यांनी पेटत्या लाकडाने केलेली अमानुष मारहाण, यामध्ये सहा विद्यार्थी गंभीर जखमी होणे, त्यांना उपचारासाठी राजूर येथील ग्रामिण आरोग्य केंद्रामध्ये दाखल करावे लागणे, या घटनेची गंभीर दखल घेऊन स्थानिक आमदार डॉ. किरण लहामटे यांनी रुग्णालयात जखमी विद्यार्थ्यांची घेतली भेट, विविध आदिवासी संघटनांनी या घटनेची उच्चस्तरीय चौकशी करुन संबंधीत वसतिगृह अधीकांना निलंबीत करण्याची केलेली मागणी, करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

---

डॉ. विजयकुमार गावीत मा. मंत्री (आदिवासी विकास) यांचे निवेदन

प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, राजूर जि. अहमदनगर या कार्यालयाच्या अंतर्गत असलेल्या शासकीय आश्रमशाळा शिरपुंजे ता. अकोले जि. अहमदनगर येथील निर्लेखन झालेल्या गादया ( खराब /रददबातल झालेल्या गाद्या ) शालेय शिक्षक कमिटीपुढे रीतसर पंचनामा करुन दिनांक ०३/१२/२०२२ रोजी दुपारच्या वेळेस पेटवून देण्यात आलेल्या होत्या. त्याचदिवशी सायंकाळी सहा वाजेच्या सुमारास श्री. अश्विनकुमार अर्जुनराव पाईकराव, अधिक्षक यांनी दत्ता सोमनाथ धादवड व इतर ५ विद्यार्थ्यांना जळत असलेल्या गाद्यांच्या राखेजवळ खेळतांना बघितले व विद्यार्थ्यांना कोणतीही ईजा होऊ नये या उद्देशाने विद्यार्थ्यांना तेथुन निघुन जाण्यास सांगीतले.

परंतु काही विद्यार्थी त्याच ठिकाणी बसून राहिले असतांना विद्यार्थी आज्ञेचे पालन करत नसल्याने बाजुलाच पडलेल्या लहान फांदीच्या डहाळयांनी त्यांना मारहाण केली. त्यानंतर दत्ता सोमनाथ धादवड, इयत्ता ८ वी या विद्यार्थ्यांने आपल्या घरी जाऊन सदर घडलेला प्रकार पालकास सांगितला.

सदर विद्यार्थ्यांच्या पालकाने गावच्या सरपंच, उपसरपंच, पोलीस पाटील यांना घडलेली घटना सांगितली व त्यांना सोबत आश्रमशाळेत घेऊन आले. त्यानंतर रुग्णवाहिका बोलवण्यात येऊन संबंधित सहा विद्यार्थ्यांना उपचारासाठी राजुर ग्रामीण रुग्णालय येथे नेण्यात आले व विद्यार्थ्यांसोबत काही शालेय कर्मचारी व पालक देखील

सोबत होते. सदर विद्यार्थ्यावर उपचार करण्यात येऊन वैद्यकीय अधिकारी, ग्रामीण रुग्णालय, राजूर यांनी साधी दुखापत झाली असल्याचे वैद्यकीय प्रमाणपत्र दिले आहे व उपचारानंतर सदर विद्यार्थ्यांना रुग्णवाहिकेने शासकीय आश्रमशाळा शिरपुंजे येथे पोहच करण्यात आले. दुस-या दिवसापासून विद्यार्थी आश्रमशाळेत नियमीत उपस्थित राहुन शिक्षण घेत आहेत.

स्थानिक विधानसभा सदस्य डॉ. किरण लहामटे व विविध आदिवासी संघटना तसेच विद्यार्थ्यांचे पालक व ग्रामस्थांनी याबाबत रोष व्यक्त करुन श्री. अश्विनकुमार पाईकराव, अधिक्षक यांचे विरुध्द निलंबनाची कारवाई करणेबाबत प्रकल्प अधिकारी राजूर यांचेकडे मागणी केली. त्यानुसार अपर आयुक्त आदिवासी विकास नाशिक यांनी दि.०६/१२/२०२२ च्या आदेशान्वये श्री. अश्विनकुमार पाईकराव, अधिक्षक यांचे निलंबन करण्यात आले आहे.

**************************

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२२ चे चतुर्थ (हिवाळी) अधिवेशन

श्री. छगन भुजबळ, श्री.अजित पवार, श्री. धनंजय मुंडे, श्री. दिलीप वळसे-पाटील,[redacted], डॉ. जितेंद्र आव्हाड, श्री. राजेश टोपे, कुमारी आदिती तटकरे, श्री. अनिल पाटील, डॉ. राजेंद्र शिंगणे, श्री. दिलीपराव बनकर, श्री. सुनिल भुसारा, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १४२ पुढीलप्रमाणे आहे:-

"नाशिक जिल्ह्यातील आंतरराष्ट्रीय खेळाडू ऑलिम्पियन कविता राऊत,रोईंगपटू दत्तू भोकनळ आणि आंतरराष्ट्रीय धावपटू अंजना ठमके यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर राज्याचे नाव उज्वल केले असणे,राज्य शासनाने शासन निर्णय दि. ३० एप्रिल,२००५ नुसार आंतरराष्ट्रीय,राष्ट्रीय व राज्यस्तरावर उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना शासन सेवेत थेट नियुक्ती देण्याचा धोरणात्मक निर्णय घेतलेला असणे, तर दि. १ मे, २०११ च्या शासन निर्णयानुसार आंतरराष्ट्रीय स्तरावर क्रीडा स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केली तर शासन सेवेत थेट नियुक्तीची मानके देखील निश्चित केलेली असणे,सदर शासन निर्णयातील वर्ग १ पदासाठी आवश्यक असलेले निकष या तीन्ही खेळाडूंनी पूर्ण केलेले असणे, या खेळाडूंची गट अ पदाकरिता शासकीय सेवेत थेट नियुक्ती देण्यासाठी क्रीडा आयुक्तांनी शासनास प्रस्ताव पाठवलेले असणे, शासनाने शासन निर्णय दि. २७ डिसेंबर २०१६, दि. ५/९/२०१८ आणि दि. २६/९/२०१८ अन्वये विविध अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंना उपजिल्हाधिकारी,पोलीस उपअधिक्षक,तहसिलदार,जिल्हा क्रीडा अधिकारी यासह विविध गट अ पदांवर नियुक्ती दिलेली असणे, मात्र नाशिक जिल्ह्यातील या तिन्ही अत्युच्च गुणवत्ताधारक आणि पात्र खेळाडूंना गट अ पदावर शासकीय सेवेत थेट नियुक्ती देण्यासाठी अन्याय केला जात असणे, या अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंनी आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये केलेल्या उल्लेखनीय कामगिरीचा आणि क्रीडा क्षेत्रातील त्यांच्या नैपुण्याचा विचार करून शासनाच्या क्रीडा धोरणनुसार त्यांची वर्ग १ पदावर शासकीय सेवेत थेट नेमणूक करण्यासाठी लोकप्रतिनिधींनी दि. ७ सप्टेंबर २०२२ वा त्यासुमारास आणि यापूर्वी अनेकदा शासनाकडे मागणी केलेली असणे, मात्र शासनाकडून दिरंगाई आणि टाळाटाळ केली जात असणे, त्यामुळे नाशिक जिल्ह्यातील खेळाडूंमध्ये निर्माण झालेले निराशेचे व चिंतेचे वातावरण, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया"

---

मा.मंत्री, क्रीडा व युवक कल्याण यांचे निवेदन

अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंना शासकीय सेवेत थेट नियुक्ती देण्याबाबतची कार्यपध्दती दिनांक ९ डिसेंबर, २०१० च्या शासन निर्णयान्वये विहित करण्यात आलेली आहे. तदनंतर दिनांक २१ मे, २०११ च्या शासन निर्णयान्वये गट-अ व गट-ब मधील थेट नियुक्तीसाठी पात्र स्पर्धा निश्चीत करण्यात आल्या आहेत. दि. १० एप्रिल, २०१३ च्या शासन निर्णयान्वये, शासन सेवेतील गट-क व गट-ड मधील पदांवरील थेट नियुक्तीसाठीची क्रीडा अर्हता निश्चीत करण्यात

आली आहे. व शासनाच्या दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१५ च्या शासन निर्णयान्वये, दिव्यांग खेळाडूंच्या गट-अ ते गट-ड मधील पदांवरील क्रीडा प्राविण्य अर्हता निश्चीत करण्यात आली आहे. सदर शासन निर्णयातील निकषाआधारे शासनाने आजवर ६७ खेळाडूंना शासन सेवेत थेट नियुक्ती दिली आहे.

२. अधिकृत आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमधून प्राविण्य मिळविणाऱ्या बहुतांश खेळाडूंकडून शासन सेवेत उपजिल्हाधिकारी, पोलीस उपाधीक्षक,राज्य उत्पादन शुल्क, विक्रीकर अधिकारी यासारख्या पदावर थेट नियुक्ती मिळण्यासाठी पाठपुरावा केला जातो. तथापि, क्रीडा विभागातच नियुक्ती मिळण्याबाबत खेळाडू आग्रही असल्याचे दिसत नाहीत. त्यामुळे खेळाडूंना अन्य विभागात नियुक्ती देण्यात येते परंतू खेळाडूंना पुढे शासकीय कामकाजात गुंतून रहावे लागते त्यामुळे त्यांच्या स्वतःच्या प्रगतीस खीळ बसते तसेच सदर खेळाडूंच्या खेळ कौशल्याचा वापर करून नवनवीन खेळाडू घडविणे शक्य होत नाही. तसेच इतर विभागात थेट नियुक्ती दिलेले खेळाडू त्यांच्या नियुक्तीच्या पदावरील परिविक्षा कालावधी विहित मुदतीत पूर्ण करू शकत नसल्याने त्यांच्या वेतनाच्या अडचणी उद्भवतात व अशा प्रसंगी क्रीडा विभागाने हस्तक्षेप करण्याची विनंती केली जाते. सदर खेळाडू शासन सेवेत नियुक्त झाल्यानंतरही त्यांच्या सरावासाठी तसेच स्पर्धेत सहभागी होण्यासाठी प्रदीर्घ कालावधीसाठी कार्यालयात हजर राहत नाहीत. त्यामुळे त्यांच्या पदाचा कार्यभार अन्य अधिकाऱ्यांकडे सोपवावा लागतो. सबब उपलब्ध अपुऱ्या मनुष्यबळावर अतिरिक्त कामाचा ताण निर्माण होतो.

३. उपरोक्त बाबी विचारात घेऊन सदर गुणवत्ताधारक खेळाडूंच्या सेवा वापरून अनेकोत्तम गुणवत्तापूर्ण खेळाडू घडविण्याच्या दृष्टीने खेळाडूंच्या थेट नियुक्तीच्या धोरणात समुचित सुधारणा करण्यात येत आहे.

..........................................

लक्षवेधी सूचना क्रमांक : १७१९

## सन २०२२ चे चौथे अधिवेशन

मा. श्री.जितेश अंतापूरकर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १७१९ पुढीलप्रमाणे आहे.

"करडखेड तालुका देगलूर जिल्हा नांदेड या गावांमध्ये सन २०१७ मध्ये मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल योजनेसाठी शासन स्तरावरून ७६ लक्ष रुपये मंजूर झालेले असणे, शासन नियमांच्या अधीन राहून गुत्तेदारांनी दोन वर्षात काम पूर्ण करणे अपेक्षित असणे, मात्र संबंधित गुत्तेदार व अधिकाऱ्यांनी संगणमत करून पाच वर्षापासून अधिक काळ हे काम ताटकळीस ठेवलेले असणे, मुख्य जलवाहिनी पाईपलाईनचे काम अर्धवट ठेवून पाणीपुरवठा टाकीला जलवाहिनी चे कनेक्शन न जोडताच आणि पंपिंग स्टेशनला विद्युत कनेक्शन न जोडता तसेच सबमर्सिबल मोटर बसून पाण्याची टेस्ट न घेता अर्धवट कामे कागदोपत्री पूर्ण झाली असे दाखवून बोगस कामांची एमबी रेकॉर्ड करून सदरील काम मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल योजनेतून अद्यावत झाले असे भासवून गुत्तेदार व अधिकाऱ्यांनी पूर्ण रक्कम उचलून शासनाला लाखो रुपयांचा भ्रष्टाचार केल्याची बाब उघडकीस आलेली असणे, देगलूर तालुक्यातील एकट्या करडखेड गावातील पाणीपुरवठा योजनेत ७६ लक्ष रुपयांचा अपहार विचारात घेतला तर संपूर्ण मतदारसंघात पाणीपुरवठ्याच्या नावाखाली शासकीय निधीचा कोट्यावधीचा भ्रष्टाचार झाल्या असल्याची ओरड ग्रामस्थांमध्ये असणे,नांदेड जिल्हयात अशा प्रकर अनेक प्रकारचे बोगस कामे करुन भ्रष्टाचार केलेले असणे, या संपूर्ण प्रकाराची चौकशी करून संबंधित ठेकेदार व अधिकारी यांचे विरुद्ध कायदेशीर फौजदारी कारवाई करण्याची मागणी ग्रामस्थांनी करणे, त्यानुसार चौकशी करून शासनाने संबंधित प्रकरणातील दोषींवर कडक करवाई करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया".

---

## मा. मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे निवेदन

मौ. करडखेड ता. देगलुर येथे मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत रु. ७५.२० लक्ष किमतीच्या नळ पाणी पुरवठा योजनेस तांत्रिक मान्यता, प्रशासकीय मान्यता अनुक्रमे दि. १७/११/२०१६ व २७/०६/२०१७ रोजी प्रदान करण्यांत आली. सदर योजनेची ई-निविदा रक्कम रु. ६७.७७ लक्ष असुन दि. ०७.०४.२०१८ अन्वये कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत.

सदर योजनेवर मुळ मंजुर किंमतीच्या अधिन राहुन रक्कम रु. ७५.२० लक्ष खर्च करण्यांत आला असुन योजना भौतिक व आर्थिक दृष्टया दि. २५.०३.२०२२ रोजी अंतिम करण्यांत आली व

**योजनेचे प्रत्यक्षात जेवढे काम झाले आहे तेवढेच देयक मुळ मंजुर किंमतीच्या आधीन राहुन अदा करण्यांत आले आहे.**

अंदाजपत्रकात ६ HPचे दोन पंपं बसविणे प्रस्तावित होते तथापि प्रत्यक्षात ७.५० HP चा एक पंप बसविण्यात आला असल्याने त्यानुसार एकाच पंपाचे देयक अदा करण्यात आले आहे. तसेच ११० मीमी व्यासाची १३६५ मी. लांबीचा उध्दरण नलिका टाकणे प्रस्तावित होते. परंतू मूळ अंदाजपत्रकातील प्रस्तावित उध्दवाच्या जागेवर चाचणी बोर घेण्यात आला सदर चाचणी बोर अयशस्वी ठरल्याने भूवैज्ञानिकांनी पुर्नसर्वेक्षण करुन दिलेल्या जागेवर चाचणी बोअर घेवून त्याची तपासणी करुन उद्भवाचे काम करण्यांत आले. त्यामुळे उध्दरण नलीकेची लांबी २६०९ मी झालेली आहे व त्यानुसार २६०९ मी. लांबीच्या उध्दरण नलीकेचे देयक अदा करण्यांत आले आहे.

अंदाजपत्रकात वितरण व्यवस्था ५३७६ मी लांबीचे करणे प्रस्तावित होते, प्रत्यक्षात ६३४२ मी लांबीची वितरण व्यवस्था २०० घरांना नळ जोडणीसह करण्यांत आलेली आहे व त्यानुसार ६३४२ मी लांबीच्या वितरण व्यवस्थेचे नळ कनेक्शनसह देयक अदा करण्यांत आलेले आहे.

सदरील योजनेत उद्भव विहिर, पंपघर, पंपीग मशीनरी, उध्दरण नलीका व वितरण व्यवस्था २०० घरांना नळ जोडणीसह पुर्ण करण्यांत आलेली आहेत. योजनेत उद्भव विहिरीची जागा बदलल्यामुळे उध्दरण नलीकेची लांबी वाढलेली आहे. उध्दरण नलीकेचे उद्भव विहिरी पासुन पाण्याच्या टाकी पर्यंत काम पुर्ण केले आहे.

गावात जुन्या योजनेची उद्भव विहिर असुन सदर जुन्या उद्भव विहिरीस मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम अंतर्गत करण्यांत आलेली उध्दरण नलीका जोडुन विहिरीत पाणी सोडण्यांत येते व जुन्या विहिरीतुन अस्तित्वातील टाकीला अस्तित्वात असलेल्या कनेक्शन व्दारे टाकीत पाणी सोडुन टाकीतुन वितरण व्यवस्थेंव्दारे गावात पाणी पुरवठा सुरु आहे.

तसेच योजनेचे **Third Party Inspection** श्री गुरु गोविंद सिंघजी अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र संस्था विष्णुपुरी नांदेड व्दारे करण्यांत आले असुन सदर अहवालात कामाची गुणवत्ता व प्रगती समाधानकारक असल्याचे नमुद केले आहे.

xxxxxxxxxxxxxxxxxxx

4(868-19

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२२ चे चौथे (हिवाळी) अधिवेशन

**श्री. सुभाष धोटे, श्री. नानाभाऊ पटोले, श्रीमती प्रतिमा धानोरकर, श्री. सुरेश वरपुडकर, श्री. बाळासाहेब थोरात, श्री.पृथ्वीराज चव्हाण, श्री. बळवंत वानखडे, श्री. अमित झनक, श्री. कुणाल पाटील, श्री. राजेश एकडे, वि.स.स. यांनी विधानसभा नियम-१०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सुचना क्र. १४१६ पुढील प्रमाणे आहे:-**

"राज्यातील सिमेंट उद्योग व सिमेंट उद्योगावर आधारित असलेले दर हे वेगवेगळे आहेत. सिमेंट बनविणारे उद्योग हे केंद्र सरकारच्या अधिपत्याखालील आहेत सिमेंट पासून उत्पादन बनविणारे उद्योग हे मध्यम व लघु उद्योगाशी निगडित असणे; त्यामुळे सिमेंट बनविण्याचा उद्योग आणि सिमेंटपासून उत्पादन बनविण्याचा उद्योग यांना एकच किमान वेतन लागू करणे हा सिमेंट उद्योगातील कामगारांवर अन्याय आहे. शासनाने जारी केलेले किमान वेतन दर आजमितीला ₹9000/- इतका आहे तर सिमेंट उद्योगातील कार्यरत संघटना या दिवसाला ₹550/- किंवा त्यापेक्षा जास्त मिळावेत यासाठी शासनास सिमेंट उद्योग व सिमेंट उद्योगावर आधारित उद्योग यांचे वेगवेगळे किमान वेतन दर ठरवावे, असे मत मांडत असणे; किमान वेतन दर हे निश्चित करणे किंवा लागू करणे याकरिता महाराष्ट्र राज्य किमान वेतन सल्लागार मंडळ महाराष्ट्र राज्याकरिता असणे; सदरहू सल्लागार मंडळ हे प्रत्येक अनुसूचित उद्योगाची पाहाणी करून, भेट देऊन किमान वेतन दर निश्चित करण्याबाबत शासनाला प्रस्तावित करीत असणे; सदर सल्लागार मंडळाची मुदत नुकतीच संपलेली असून ते सल्लागार मंडळ प्राधम्याने पुन्हा गठीत करण्याची आवश्यकता असणे; वेतन दर निश्चित करणेबाबतीत होत असलेले दुर्लक्ष, टाळाटाळ यामुळे सिमेंट उद्योगातील कामगारांमध्ये शासनाप्रती पसरलेला तीव्र असंतोष व नाराजीची भावना, याबाबत शासनामार्फत तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

---

**मा.मंत्री (कामगार) यांचे निवदेन**

किमान वेतन अधिनियम, १९४८ या अधिनियमांतर्गत महाराष्ट्र राज्यात एकुण ६७ अनुसुचित उद्योगांकरिता किमान वेतन दर निश्चित करण्यात आलेले आहेत. या अनुसूचित उद्योगांतील निश्चित केलेल्या किमान वेतन मूळ दराचे प्रत्येक ५ वर्षानंतर पुनर्निर्धारण करण्यात येते. या अनुसूचित उद्योगातील कामगारांकरिता वर्षातून दोनवेळा जानेवारी ते जून आणि जुलै ते डिसेंबर या कालावधीकरिता विशेष भत्ता जाहीर केला जातो. त्यानुसार किमान वेतन मूळ दर अधिक विशेषभत्ता म्हणजेच किमान वेतन होते.

किमान वेतन दर निश्चित करणे व पुनर्निर्धारण करण्याकरिता शासनास शिफारस / सल्ला देण्यासाठी महाराष्ट्र राज्य किमान वेतन सल्लागार मंडळाचे गठण करण्याची तरतूद आहे. महाराष्ट्र राज्य किमान वेतन सल्लागार मंडळाची दिनांक १४ नोव्हेंबर, २०१८ रोजी शासन निर्णयाने पुर्नरचना करण्यात आली होती. तथापि, मंडळाची मुदत दिनांक १४ नोव्हेंबर, २०२१ रोजी संपुष्टात आलेली आहे. किमान वेतन सल्लागार मंडळाच्या पुनर्गठनाची कार्यवाही सुरू आहे. सद्यस्थितीत "सिमेंटच्या व सिमेंटवरील आधारित उद्योगातील कामधंदा" या अनुसूचित उद्योगास लागू असलेले किमान वेतन दर खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | कामगार वर्गवारी | किमान मूळ वेतन दर (दरमहा रुपये) | | |
|---|---|---|---|---|
| | | परिमंडळ-१ एकूण वेतन (मूळ वेतन+महागाई भत्ता) | परिमंडळ-१ एकूण वेतन (मूळ वेतन+महागाई भत्ता) | परिमंडळ-१ एकूण वेतन (मूळ वेतन+महागाई भत्ता) |
| १. | २. | ३. | | |
| १. | कुशल | ९७०४ (३७१०+५९९४) | ९४०४ (३४१०+५९९४) | ९१०४ (३११०+५९९४) |
| २. | अर्धकुशल | ९६०४ (३६१०+५९९४) | ९३०४ (३३१०+५९९४) | ९००४ (३०१०+५९९४) |
| ३. | अकुशल | ९५०४ (३५१०+५९९४) | ९२०४ (३२१०+५९९४) | ८९०४ (२९१०+५९९४) |

सिमेंट व सिमेंटवर आधारित उद्योगातील कामगारांच्या किमान वेतनासंदर्भात दुरूस्ती करणेबाबत मराठा सिमेंट कामगार संघटना यांनी शासनास दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने शासन स्तरावर बैठका आयोजित करण्यात आल्या होत्या. किमान वेतन अधिनियमातील कलम ९ अंतर्गत समिती / उपसमिती गठित करण्याच्या तरतुदीस अनुसरून सिमेंट व सिमेंटवर आधारित उद्योगाकरिता स्वतंत्रपणे किमान वेतन दर निश्चितीबाबत अभ्यास करून शिफारस करण्यासाठी समिती गठित करण्याचे निर्देश दिले. याअनुषंगाने समितीमध्ये समाविष्ट करावयाच्या मालक, कामगार, स्वतंत्र प्रतिनिधी यांची नावे अंतिम करून समिती गठित करण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे.

************************************************************************

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२२ चे चतुर्थ (हिवाळी) अधिवेशन

**श्री. सुभाष धोटे, श्री. नानाभाऊ पटोले, श्रीमती प्रतिभा धानोरकर, श्री.सुरेश वरपुडकर, श्री.बाळासाहेब थोरात, श्री.पृथ्वीराज चव्हाण, श्री.बळवंत वानखडे, श्री.अमित झनक, श्री.कुणाल पाटील, श्री.राजेश एकडे वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. १५५५ पुढीलप्रमाणे आहे:-**

"राज्यातील लाखोंच्या संख्येने असलेल्या इमारत व बांधकाम क्षेत्रात काम करणा-या कामगारांसाठी शासनामार्फत चांगल्या योजना राबविण्यात येणे ; सदर योजनांचा लाभ तळागाळातील सर्व कामगारांना मिळावा, यासाठी संबंधित खात्याच्या अधिकारी वर्गाकरिता चार चाकी वाहने उपलब्ध करून देण्यात आली असणे ; शासनाच्या ग्रामपंचायत ते मंत्रालयापर्यंत कोणतीही वस्तु किंवा विशिष्ट वार्षिक खर्चाच्या अधिक असल्यास ती घेतांना खुली निविदा, टेंडर पध्दतीचा अवलंब करून घेणे बंधनकारक असणे ; सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालय, चंद्रपूर व कामगार अधिकारी, गडचिरोली या कार्यालया अंतर्गत असलेल्या इमारत व बांधकाम कामगार अधिकारी, गडचिरोली या कार्यालया अंतर्गत असलेल्या इमारत व बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळात वाहन भाडयाने घेतांना कोणत्याही कायदेशीर प्रक्रिया न राबविता आपल्या जवळच्या लोकांशी संगनमत करून त्यांच्याकडून दरपत्रक घेऊन, त्यांचेशी करारनामा करून वाहने भाडयाने घेतल्याचा प्रकार उघडकीस येणे ; संबंधित अधिकारी यांच्यासोबत भ्रमणध्वनिवर झालेला चर्चेचा पुरावा (क्लिप) मा. प्रधान सचिव (कामगार विभाग) व मा.कामगार आयुक्त यांना 9 डिसेंबर 22 रोजी सादर केला असणे ; यापूर्वी मंडळाच्या कामासाठी हयाचप्रकारे वाहने भाडेतत्वावर व्यवहार झाल्याची व त्या मोबदल्यात लाखों रूपये खर्च केल्याची माहिती संबंधित कार्यालयाकडून मिळाली असणे ; याप्रकरणी संबंधित वाहनधारक व चालक-मालक संघटना वाहने पुरविण्यास सक्षम असताना विना टेंडर बाहेरच्या जिल्हयातील पासिंग असलेली वाहने घेण्यामागे अधिकारी वर्गाचे काहीतरी स्वारस्य असणे ; संबंधित भ्रष्ट अधिका-यांची चौकशी करणे, त्यांचेवर निलंबनाची कारवाई करणेबाबतीत होत असलेले दुर्लक्ष, टाळाटाळ यामुळे कामगारांमध्ये शासनाप्रती पसरलेला तीव्र असंतोष व नाराजीची भावना, याबाबत शासनामार्फत तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

---

मा.मंत्री (कामगार) यांचे निवेदन

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडून राबविण्यात येणाऱ्या विविध शैक्षणिक सहाय्य योजना, आर्थिक सहाय्य योजना, सामाजिक सुरक्षा व अन्य योजना, आरोग्य विषयक योजना इ. लाभाचे वाटप करणे तसेच बांधकाम कामगारांची नोंदणी व नुतनीकरण करणे हे कामकाज कामगार आयुक्त कार्यालयांतर्गत विभाग व जिल्हा स्तरावरील क्षेत्रिय अधिकारी/कर्मचारी यांच्यामार्फत केले जाते.

रोस्टर H/ 5-- / (700-/-25)

मंडळाचे कामकाज हे जिल्हयाच्या शहरी भागांपासून ग्रामीण भागांपर्यंत पसरलेले असून यामध्ये अधिकारी व कर्मचारी यांना तालुका व गाव पातळीवर जावून काम करावे लागते. विभाग व जिल्हा कार्यालयांना मंडळाची वाहने नसल्याने व मंडळाचे कामकाज करताना अडचणी निर्माण होत असल्याने मंडळाच्या दि. ०४.०९.२०१९ रोजीच्या बैठकीतील ठराव क्र. ५२(०९)/२०१९, अन्वये कामगार आयुक्त कार्यालयाअंतर्गत ४४ विभाग/ जिल्हा कार्यालयांपैकी ज्या विभाग/ जिल्हा कार्यालयातील अधिका-यांची पदे भरलेली आहेत त्या अधिका-यांना मंडळाच्या कामकाजासाठी बोलेरो/ स्कॉर्पियो अथवा तत्सम प्रकारचे वाहन मासिक भाडेतत्त्वावर वाहन उपलब्ध करून देण्यास मान्यता प्रदान केलेली आहे. तसेच जिल्हा कार्यालय प्रमुखांनी संबंधित जिल्हयाचे जिल्हाधिकारी कार्यालय किंवा प्रादेशिक परिवहन अधिकारी (RTO) यांनी निश्चित केलेल्या दराने अथवा संबंधित विभागाच्या अपर कामगार आयुक्त / कामगार उपायुक्त यांच्या मान्यतेने मासिक भाडयाचे दर व धाव निश्चित करून प्रथम १ वर्षाच्या कालावधीकरीता जिल्हा स्तरावरून करारनामा करण्यास मंडळाच्या बैठकीत मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

त्यानुसार महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दिनांक २७.०९.२०१९ पत्रान्व्ये वाहने भाडेतत्त्वावर घेण्याची कार्यपध्दती व वापराबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

मंडळाच्या दि.१७.०६.२०२१ रोजी पार पडलेल्या ५८ व्या बैठकीतील ठराव क्रं.५८(१२)२०२१ अन्वये मंडळाच्या कामकाजाकरीता विभागीय व जिल्हा कार्यालयांनी घेतलेल्या भाडयाच्या वाहनांना पुढील एक वर्षाकरीता मुदतवाढ मंजुर करण्यात आली आहे.

सहाय्यक कामगार आयुक्त, चंद्रपुर कार्यालयाने वाहन भाडेतत्वावर घेण्यासाठी मागविलेल्या दरपत्रकानुसार एकूण ०३ पुरवठादारांकडुन सीलबंद दरपत्रके प्राप्त झाली. सदर निविदाकारांचे दरांची तुलना करुन न्यूनतम दरधारक मे. विक्की ट्रॅव्हल्स, नागपूर या पुरवठाराचे बोलेरो हे वाहन (MH४९ AT ६४७९) प्रति दिन २१००/- रुपये प्रमाणे भाडेतत्वावर घेण्यासाठी मे. विक्की ट्रॅव्हल्स, नागपूर यांच्यासोबत दि. ०२.०३.२०२० रोजी १ वर्षाकरीता (दि. ०२.०३.२०२० ते दि. ०१.०३.२०२१ अखेर) करारनामा करुन पुरवठा आदेश दिला आहे. सदर कालावधीत पेट्रोल/डिझेलचे दर वाढले असले तरी मे. विक्की ट्रॅव्हल्स, नागपूर हे पुर्वीच्या दरात काम करण्यास तयार झाल्याने सदर पुरवठाधारकास दि.०१.०३.२०२१ ते दि.२८.०२.२०२२ व दि. ०१.०३.२०२२ ते २८.०२.२०२३ या कालावधीकरीता मागील मंजूर दराने मुदतवाढ दिली आहे.

उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, चंद्रपूर यांचे स्तरावर दिनांक ३०.०९.२०१७ रोजी ३ वर्षाच्या कालावधीकरीता निवडणुकीसंबंधी अधिग्रहित करावयाच्या वाहनांच्या निश्चित झालेल्या वाहन भाडेदरानुसार स्कॉर्पियो या वाहनाचे वातानूकुलित वाहन प्रति दिन रू. ३२००/- आणि अवातानूकूलित वाहन प्रति दिन रू. ३०००/- असल्याचे दिसून आले. तसेच अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग यांनी जिल्हाधिकारी, नागपूर यांना दि.२५.०७.२०१९ चे पत्रामध्ये राज्य अतिथी व इतर मान्यवरांचे परिवहन व्यवस्थेसाठी खाजगी वाहन भाडेतत्वावर उपलब्ध करून देण्यासाठी नमूद केलेले दर टाटा सुमो (नॉन एसी) करीता प्रतिदीन रू. ३५००/- व स्कॉर्पिओ (एसी) करीता प्रतिदीन रू. ३८००/- असे आहेत.

उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, गडचिरोली यांचे स्तरावर दिनांक २८.०१.२०१९ रोजी निवडणुकीसंबंधी अधिग्रहित करावयाच्या वाहनांच्या निश्चित झालेल्या वाहन भाडेदरानुसार जीप/ट्रॅक्स/बोलेरो या वाहनाचे दर प्रति दिन रु.२७५०/- इतके नमूद करण्यात आलेले आहेत.

सरकारी कामगार अधिकारी, गडचिरोली कार्यालयाने भाडे तत्वावरील वाहनासाठी मागविलेल्या दरपत्रकानुसार एकूण ३ पुरवठादारांकडुन सीलबंद दरपत्रके प्राप्त झाली. सदर दरपत्रक धारकांच्या दरांची तुलना करून न्यूनतम दरधारक मे. एस एन टुर्स अँड ट्रॅव्हल्स, चंद्रपुर या पुरवठादाराचे मारुती ईर्टिगा हे वाहन (MH४९ AT ६८४९) प्रति दिन २१००/- रुपये प्रमाणे भाडे तत्वावर घेण्यासाठी मे. एस एन टुर्स अँड ट्रॅव्हल्स, चंद्रपुर यांच्यासोबत दि.०६.१०.२०२० रोजी ११ महीने करीता (दि. ०१.१०.२०२० ते दि. ३१.०८.२०२१ अखेर) करारनामा करून पुरवठा आदेश दिला आहे. सदर कालावधीत पेट्रोल/डिझेलचे दर वाढले असले तरी मे. एस एन टुर्स अँड ट्रॅव्हल्स, चंद्रपुर हे पुर्वीच्या दरात काम करण्यास तयार झाल्याने सदर पुरवठाधारकास दि. ०१.०९.२०२१ ते दि. ३१.०७.२०२२ या ११ महीन्याच्या कालावधीकरीता तसेच दि. ०१.०८.२०२२ ते दि. ३०.०६.२०२३ या पुढील ११ महिन्याच्या कालावधीकरीता मागील मंजूर दराने मुदतवाढ दिली आहे.

सहाय्यक कामगार आयुक्त, चंद्रपूर व सरकारी कामगार अधिकारी, गडचिरोली या कार्यालयांनी भाडे तत्वावर घेतलेल्या वाहनांचे प्रति दिन दर हे अनुक्रमे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, चंद्रपूर व उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, गडचिरोली यांनी निश्चित केलेल्या दरापेक्षा तसेच अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग यांनी निश्चित केलेल्या दरापेक्षा कमी असल्याचे दिसून येते.

---

सन २०२२ चे हिवाळी अधिवेशन

डॉ.राहुल पाटील, विधान सभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.४४३ पुढीलप्रमाणे आहे.

महाराष्ट्र राज्यातील गोर-गरीब रुग्णांसाठी राज्य शासनामार्फत महात्मा ज्योतीबा फुले आरोग्य योजना राबविण्यात येणे, सदर योजनेंतर्गत ९७५ आजारांवर मोफत उपचार मिळत असणे, सदर योजना ॲलोपॅथी उपचार घेणाऱ्या रुग्णांसाठी वरदान ठरत असणे, आयुर्वेद उपचार पद्धतीमध्ये सर्व आजारांवर औषधोपचार होत असणे, राज्यात सन २०१७ पर्यंत ६९ आयुर्वेद महाविद्यालय सुरु असणे, सदरील महाविद्यालयांतून उत्तीर्ण झालेल्या डॉक्टरांची संख्याही मोठ्या प्रमाणात असणे, त्यामुळे देश पातळीवर तसेच राज्यामध्ये आयुर्वेद उपचार घेणाऱ्यांची रुग्णांच्या संख्येतही मोठ्या प्रमाणात वाढ होत असणे, आयुर्वेद उपचार सर्वसामान्य, गोरगरीब रुग्णांपर्यंत पोहचत असणे, परंतू आयुर्वेद उपचार पद्धतीचा समावेशन शासनाच्या कोणत्याही आरोग्य योजनेमध्ये नसल्यामुळे आयुर्वेद उपचार घेणाऱ्या रुग्णांची होणारी आर्थिक कुचंबना, शासनाने आयुर्वेदीक उपचार महात्मा ज्योतिबा फुले आरोग्य योजनेमध्ये समाविष्ट करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची निर्णयात्मक कार्यवाही वा शासनाची प्रतिक्रिया."

---

प्रा. डॉ. तानाजी सावंत, मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण यांचे निवेदन

महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना दिनांक २ जुलै २०१२ पासून राज्यामध्ये राबविण्यात येत आहे. दिनांक २३ सप्टेंबर २०१८ पासुन प्रधान मंत्री जन आरोग्य योजना महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेसोबत एकत्रितपणे राबविण्यात येत आहे. सदर योजना अल्प उत्पन्न गटातील कुटुंबांना तातडीच्या उपचारांसाठी अंगीकृत रुग्णालयांमधून निःशुल्क गुणवत्तापूर्ण उपचार देण्याच्या हेतूने राबविण्यात येत आहे.

एकत्रित महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व प्रधान मंत्री जन आरोग्य योजनेमध्ये ९९६ उपचार सामायिक असून प्रधान मंत्री जन आरोग्य योजनेच्या लाभार्थ्यांसाठी अतिरिक्त २१३ उपचार मिळून एकुण १२०९ उपचार समाविष्ट आहेत. एकत्रित योजनेमध्ये रुग्णांना गंभीर, गुतागुंतीच्या व तातडीच्या आजारांवर उपचार करून रुग्णाचे प्राण वाचवण्याच्या हेतूने ३४ विशेषज्ञ सेवांमध्ये secondary व tertiary care वैद्यकीय उपचार व विविध शस्त्रक्रिया यांचा समावेश करण्यात आला आहे. या निर्णयाला अनुसरुनच योजना सुरु झाल्यापासून आजपर्यंत ॲलोपथी मधील वैद्यकीय उपचार व शस्त्रक्रिया यांच्या सहाय्याने रुग्णांना वैद्यकीय लाभ दिला जात असून दिनांक २ जुलै २०१२ ते २१ डिसेंबर, २०२२ या कालावधीमध्ये एकत्रित योजनेंतर्गत ५०.२२ लक्ष उपचार/शस्त्रक्रियांच्या माध्यमातून नागरीकांना वैद्यकीय लाभ देण्यात आले आहेत. यासाठी शासनामार्फत आतापर्यंत रुपये १०००४.१३ कोटी खर्च करण्यात आले आहेत. केंद्र शासनातर्फे संपूर्ण भारतभर राबविल्या जाणाऱ्या आयुष्मान भारत प्रधान मंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत सुद्धा राज्य शासनाच्या योजनेप्रमाणेच secondary व tertiary care वैद्यकीय उपचार व विविध शस्त्रक्रिया यांचा समावेश करण्यात आला आहे. ज्या आजारावर उपचार केला नाही तर जीवाला धोका उद्भवू शकतो, असे गंभीर व आकस्मिक आजारावरील खर्चिक उपचार मुख्यत्वेकरून योजनेत समविष्ट केले आहेत. अशा उपचारांचा समावेश आयुर्वेदिक उपचारांत नसल्याने आयुर्वेदिक उपचारांचा समावेश एकत्रित योजनेमध्ये सद्यःस्थितीत करण्यात आलेला नाही.

..............

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२२ चे चौथे (हिवाळी) अधिवेशन

**श्री.राजेश पवार, श्री. संतोष बांगर, वि.स.स यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम, १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे :-**

"राज्यातील ग्रामीण भागात प्राथमिक, ग्रामीण व जिल्हा रूग्णालयांमध्ये १०८ क्रमांकाच्या तात्काळ सेवेतील रूग्णवाहीकांची संख्या अत्यंत कमी असल्याने वेळेवर रूग्णवाहिका रूग्णापर्यंत पोहचत नसल्याचे वारंवार निदर्शनास येणे, ग्रामीण भागात १०८ ही रूग्णवाहीका व १०२ क्रमांक हा गरोदर मातांसाठी असून त्यांची तात्काळ सेवा रूग्णांना मिळत नसणे, यामुळे ग्रामीण भागातील जनतेत पसरलेला तीव्र असंतोष, या दोन्ही तात्काळ सेवेतील रूग्णवाहीकांची संख्या वाढविण्याबाबत लोकप्रतिनिधींनी वारंवार मागणी केली असणे, परंतु अदयाप पर्यंत रूग्णवाहीकांमध्ये वाढ झालेली नसणे, तात्काळ सेवेतील रूग्णवाहिकांची संख्या ग्रामीण भागात वाढविण्याबाबत शासनाने तात्काळ दखल घेऊन करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया"

---

**प्रा. डॉ. तानाजी सावंत, मा. मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण यांनी करावयाचे निवेदन**

महाराष्ट्र आपत्कालीन वैद्यकिय सेवा प्रकल्पांतर्गत, गंभीर स्वरुपाच्या रुग्णांना सुसज्ज रुग्णवाहिकेत प्राथमिक उपचार करुन रुग्णास नजीकच्या रुग्णालयामध्ये पुढील उपचारासाठी भरती करण्याबाबतची ही योजना आहे. यामध्ये रस्त्यावरील अपघात, सर्व गंभीर स्वरुपाच्या आजाराचे रुग्ण, बाळंतपणातील गुंतागुंतीचे रुग्ण, नवजात अर्भकांशी संबंधीत आजार, नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्तीत सापडलेले रुग्ण, गंभीर आजारामध्ये ह्दय रुग्ण, सर्पदंश, अपघात, विषबाधा, श्वासोच्छवासाचे गंभीर आजार, मेंदूशी संबंधित गंभीर आजार इत्यादींचा समावेश असतो.

राज्यात आपत्कालीन वैद्यकिय सेवा प्रकल्पांतर्गत (१०८) एकूण ९३७ रुग्णवाहिका कार्यान्वित आहेत. सदर रुग्णवाहिके मार्फत आपत्कालीन परिस्थितीतील रुग्णांस त्वरीत रुग्णवाहिका उपलब्ध करुन दिली जाते. सदर रुग्णवाहिकांमार्फत सन २०१४ पासून आतापर्यंत एकूण ७८२८४२७ रुग्णांना सेवा देण्यात आली आहे. सदर रुग्णवाहिकांमार्फत गरजू रुग्णांस १०८ या टोल फ्री नंबर वर call केला असता साधरणत: शहरी भागात २० मि. व ग्रामीण भागात ३० मि. मध्ये रुग्णवाहिका मोफत उपलब्ध करुन दिली जाते.

प्रचलित निकाषानुसार तसेच राज्याची लोकसंख्या विचारात घेऊन आपात्कालीन प्रतिसाद सेवेसाठी सुमारे एकुण १५०६ रुग्णवाहीकांची आवश्यकता आहे. सदयस्थितीत राज्यात आपत्कालीन सेवेअंतर्गत ९३७ रूग्णवाहीका उपलब्ध असून उर्वरित सुमारे ६६९ रूग्णवाहीका नव्याने खरेदी करण्यास शासन सकारात्मक आहे.

राष्ट्रीय आरोग्य अभियानातर्फे जननी शिशु सुरक्षा कार्यक्रमांतर्गत रेफरल ट्रान्सपोर्ट कार्यक्रमांतर्गत प्रसुतीपुर्व वेदनेच्या काळात व प्रसुतीसाठी निवासस्थानापासून रुग्णालयात, प्रसुतीनंतर मातेला व नवजात बालकाला निवासस्थानी पोहचविण्यासाठी, तसेच गंभीर आजारी बाळ (० ते १ वर्ष) यांना निवासस्थानातून रुग्णालयात घेऊन जाण्याची मोफत वाहन सेवेची सोय करण्यात आलेली आहे. सदर रुग्णवाहिका परतीच्या प्रवासासाठी वाहन सेवा १०२ क्रमांकाच्या टोल फ्री क्रमांकावर नागरिकांना पूर्णपणे मोफत उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

१०२ रेफरल ट्रान्सपोर्ट प्रकल्पांतर्गत ३९२६ रुग्णवाहिका आहेत. तसेच १०२ रुग्णवाहिकेसाठी सन २०२०-२१ व २०२१-२२ मध्ये रुग्णसेवा बळकटीसाठी १००० रुग्णवाहिकांची खरेदी करण्यात आलेली असून शहरी व ग्रामीण रुग्णांना सेवेचा लाभ उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

---

# महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२२ चे चौथे (हिवाळी) अधिवेशन

**श्री.रईस शेख, श्री. अबू आजमी , वि.स.स यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम, १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे :-**

"राज्यातील रुग्णालयामध्ये प्रसुतीगृहे, आरोग्य केंद्रे, दवाखाने या ठिकाणी दररोज येणाऱ्या नागरिकांना रुग्णांना तेथील विविध आरोग्य सुविधांबाबत योग्य ती माहिती उपलब्ध नसणे, पालिका रुग्णालये, प्रसुतीगृहे, आरोग्य केंद्रे, दवाखाने या ठिकाणी कोणते विभाग, प्रयोगशाळा, सोनोग्राफी, एमआरआय, बाहयरुग्ण विभाग कुठे व कितव्या मजल्यावर असल्याची माहिती रुग्णांच्या नातेवाईकांना न मिळणे, संबंधित डॉक्टर्स, नर्स कुठे असतात व त्यांना कसे संपर्क करावयाचे याबाबत काहीच माहिती नसल्याने रुग्णांना वेळीच उपचार न मिळाल्यास काही रुग्णांचा रुग्णालयातच मृत्यू होणे, राज्यात शासकीय रुग्णालयामध्ये माहिती अभावी रुग्णांची हेळसांड होत असणे, रुग्णालयात असलेल्या बेड उपलब्धतेबाबत सदर ठिकाणी जाऊन चौकशी करावी लागत असणे, त्यामुळे रुग्णांच्या नातेवाईकांना मानसिक, शारीरीक व आर्थिक त्रासाला सामोरे जावे लागणे, रुग्णांना तेथील विविध आरोग्य सुविधांबाबत योग्य ती माहिती तातडीने उपलब्ध होणे, व त्यांना तातडीने उपचार मिळणे याकरिता शासनाने एक "ऑनलाईन ॲप" निर्मिती करण्याची आवशकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**<u>प्रा. डॉ. तानाजी सावंत, मा. मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण यांनी करावयाचे निवेदन</u>**

राज्यात सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत १०७४० उपकेंद्रे, १९०६ प्राथमिक आरोग्य केंद्र ३६४ ग्रामीण रुग्णालये, ३२ (१०० खाटा) उपजिल्हा रुग्णालये, ६३ (५० खाटा) उपजिल्हा रुग्णालये, ८ सामान्य रुग्णालये, २० स्त्री रुग्णालये, २२ जिल्हा रुग्णालयांमार्फत प्राथमिक तसेच द्वितीय स्तरावरील आरोग्य सेवा पुरविण्यात येते. प्राथमिक आरोग्य केंद्रामधील खाटांची संख्या ६ इतकी असुन ग्रामिण रुग्णालयातील खाटांची संख्या ३० इतकी असते. तसेच उपजिल्हा रुग्णालयातील खाटांची संख्या गरजेनुसार ५०/१०० खाटा इतकी असते. राज्यातील सर्व शासकीय तसेच खाजगी रुग्णालयांना बॉम्बे नर्सीग होम ॲक्ट १९४९ व त्याअनुषंगाने महाराष्ट्र नर्सीग होम अधिनियम दि. १४/०१/२०२१ नुसार मार्गदर्शक सुचना देण्यात आल्या आहेत. तसेच शासकीय रुग्णालयांकरिता हॉस्पिटल ॲडमिनिस्ट्रेशन मॅन्युअल नुसार मार्गदर्शक सुचना देण्यात आल्या आहेत.

प्राथमिक आरोग्य केंद्राच्या व्यवस्थापनाच्या दृष्टीने आयुक्तालयामार्फत परिपत्रक दि.२१/०५/२०१४ अन्वये खालील प्रमाणे मार्गदर्शक सूचना निर्गमीत करण्यात आल्या आहेत:-

१) ग्रामिण भागातील गावांत प्रवेश केल्यानंतर रुग्णालयाचे ठिकाण समजण्यासाठी पथदर्शक फलक लावणे.
२) बाहय रुग्ण विभागात उपलब्ध असलेल्या औषधांची यादी असलेला फलक दर्शनी भागात लावण्यात यावा.
३) प्राथमिक आरोग्य केंद्रात आकारण्यात येणा-या रुग्ण शुल्काबाबतचे दरपत्रक तसेच उपलब्ध असलेल्या सेवेचा तक्ता बाहय रुग्ण विभागाच्या दर्शनी भागात लावावे.
४) नागरी सनद (सिटीझन चार्टर) मार्गदर्शक सुचनेनुसार उपलब्ध असावा.
५) बाहयरुग्ण विभागात सुचना/तक्रार पेटी ठेवण्यात यावी.
६) प्राथमिक आरोग्य केंद्रात लसिकरण , गरोदर माता तपासणी क्लिनीक अश्या प्रकारच्या विशेष सेवा देण्यात येतात, त्याची वेळ व सविस्तर माहिती स्वागत कक्षामध्ये लावलेली असावी. त्याप्रमाणे कार्यवाही झाली आहे.

त्याचप्रमाणे आयुक्तालयामार्फत परिपत्रक दि.२१/०५/२०१४ अन्वये ग्रामिण रुग्णालय व त्यावरील रुग्णालयांच्या व्यवस्थापनाच्या दृष्टीने पुढील प्रमाणे मार्गदर्शक सुचना निर्गमीत करण्यात आल्या आहेत:-

१) शहरात व ग्रामिण भागातील गावांत प्रवेश केल्यानंतर रुग्णालयाचे ठिकाण समजण्यासाठी पथदर्शक फलक लावणे.
२) बाहय रुग्ण विभागात माहिती देण्यासाठी रुग्णालयीन कर्मचारी उपलब्ध असावा.
३) बाहय रुग्ण विभागातील सर्व विभागांचे नाव व क्रमांक असलेला फलक स्वागत कक्षात उपलब्ध असावा.
४) वैद्यकिय अधिका-याच्या बाहय रुग्ण विभाग कक्षातील ड्युटी वेळापत्रक नावानुसार तक्ता लावण्यात यावा.
५) अपघात विभागात कार्यरत असलेल्या सीएमओ, डीएमओ व स्टाफ नर्स यांची नावे व कामकाजाचे वेळापत्रकाबाबतचा फलक तसेच सदर विभागात उपलब्ध असलेल्या औषधांची यादी असलेला फलक दर्शनी भागात लावण्यात यावा.
६) रुग्णालयीन शुल्काबाबतचे दरपत्रक तसेच रुग्णालयात उपलब्ध असलेल्या सेवेचा तक्ता रुग्णालयाच्या बाहय रुग्ण विभागात दर्शनी भागात लावावे.
७) नागरी सनद (सिटीझन चार्टर) मार्गदर्शक सुचनेनुसार उपलब्ध असावा.

मा.मुख्यमंत्री,महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली दि.१५.०९.२०२२ रोजी मंत्रालय, मुंबई येथे झालेल्या बैठकीमध्ये मुंबईमधील शासकिय रुग्णालय व महानगरपालिकांच्या रुग्णालयांचा दर्जा व सुविधा वृध्दीकरीता उपाययोजनांचा आढावा घेण्याबाबत बैठक आयोजित करण्यात आली होती.सदर बैठकीत मा.मुख्यमंत्री महोदयांनी रुग्णालयात दिशादर्शक फलक लावण्याबाबत तसेच रुग्णालयीन व्यवस्थापनेबाबत निर्देश दिले आहेत.

मा. मुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या निर्देशांनुसार आरोग्य विभागाच्या अधिपत्याखालील सर्व आरोग्य संस्थांमध्ये कार्यवाही केल्यास आरोग्य सेवेचा दर्जा वाढण्यास निश्चितच मदत होणार असून आरोग्य संस्था लोकाभिमुख होण्यासही मदत होणार आहे.

त्यामुळे सदर बाब आरोग्य विभागातील सर्व आरोग्य संस्थांना लागू करण्याचे निश्चित झाल्याने प्रधान सचिव (आरोग्य) यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयीन अधिकारी तसेच आयुक्तालयातील अधिकारी यांची दि.२३.११.२०२२ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीमध्ये झालेल्या चर्चेनुसार खालीलप्रमाणे निर्णय घेण्याचे निश्चित झाले असुन त्याअनुषंगाने आयुक्तालय स्तरावरुन मोबाईल ॲप्लीकेशन तयार करण्याची बाब विचाराधीन आहे:-

अ) आरोग्य संस्थांमध्ये दिशादर्शक फलक लावण्याबाबत त्या क्षेत्रातील जाणकार नामांकित संस्थेचे सहाय्य घेवून सदर दिशादर्शक फलकांची एकसमान रचना, तसेच रुग्णालयातील अंतर्गत त्याचप्रमाणे बाहेरील विभागाच्या रचनेचा अभ्यास करुन त्यानुसार दिशादर्शक फलकांची जागा निश्चिती करणे.

ब) आरोग्य संस्थांमध्ये आलेले रुग्ण व त्यांचे नातेवाईक यांची गर्दी रुग्णालयात होवू नये, त्याकरीता उपाययोजना म्हणून आज्ञावली तयार करणे किंवा यापूर्वीची आज्ञावली असल्यास त्यात बदल करणे व रुग्णांच्या संख्येनुसार रुग्णालयात बाह्यरुग्णांच्या नोंदणीकरीता सत्रांची संख्या व वेळ निश्चिती करणे.

क) खाटांची सद्यस्थिती उपलब्ध होण्याकरीता एखादी नवीन प्रणाली विकसित करणे जेणेकरुन लांब पल्ल्यावरुन एखादया आरोग्य संस्थेत रुग्ण संदर्भित करावयाचा असल्यास किंवा रुग्णास काही विशिष्ट सेवांची गरज असल्यास खाटांच्या व सेवांच्या उपलब्धतेनुसार रुग्णांना उपचार घेणे सुलभ होईल.

------------------------------

239.

<u>विधानसभा लक्षवेधी सूचना क्र. २९६</u>

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२२ चे चतुर्थ (हिवाळी) अधिवेशन

श्री. विजय वडेट्टीवार, श्री. सुनिल केदार, श्री. अस्लम शेख, श्री. सुनील राणे, श्री. विनोद निकोले, श्री. हितेंद्र ठाकूर, श्री. क्षितीज ठाकूर, श्री. राजेश रघुनाथ पाटील, श्री. श्रीनिवास वगना, श्री. शांताराम मोरे, श्री. सुनिल भुसारा, श्री. अमिन पटेल, श्री. झीशान सिद्दिकी, श्री. नानाभाऊ पटोले, श्री. बाळासाहेब थोरात, श्री. कुणाल पाटील, श्री. दिलीप लांडे, श्री. संतोष दानवे वि.स.स. महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ नुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२९६ पुढीलप्रमाणे आहे :-

"गेल्या १५ ते २० वर्षापासून राष्ट्रीय पोषण आहार योजनेअंतर्गत अगदी १५०० रूपयाच्या मासीक तुटपुंज्या मानधनात जिल्हा परिषद, नगर परिषद, खाजगी अनुदानित शाळेत दुपारचे भोजन बनविणाऱ्या शालेय पोषण आहार कर्मचाऱ्यांना किमान मासीक २४ हजार रूपये वेतन लागु करावे, त्यांची चपराशी कम कुक या पदावर नियुक्ती करावी, या सह अन्य मागण्यासाठी १ डिसेंबर, २०२२ रोजी शालेय पोषण आहार कर्मचाऱ्यांनी चंद्रपूर जिल्हयात आंदोलन करणे, दिवसेदिवसे महागाई वाढत असतांना व शासकीय, निमशासकीय कर्मचाऱ्यांच्या पगारात वाढ होत असंतांना मात्र शालेय पोषण आहार कर्मचाऱ्यांना १५०० रूपये एवढेच मासीक मानधन मिळणे मात्र ईतर राज्यातील शालेय पोषण आहार कर्मचाऱ्यांना दाम दुपटीने मानधन मिळत असून त्यात पांडेचार राज्यात १४ हजार रूपये, तामिळनाडू राज्यात ७ हजार ७०० रूपये, केरळ राज्यात १० हजार रूपये मासीक मानधन दिले जात असल्यामुळे त्याच धर्तीवर राज्यातील कर्मचाऱ्यांच्या मानधनात वाढ करण्याची मागणी करण्यात येणे, मात्र या मागणी कडे राज्य शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष त्यामुळे त्यांच्यात पसरत असलेले तिव्र असंतोष परिणामी राज्यातील शालेय पोषण आहार कर्मचाऱ्यांच्या मानधनात तातडीने वाढ करण्याबाबत व ईतर त्यांच्या मागण्याबाबत सकारात्मक निर्णय होणेबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रीया."

रोटा/ख-१८०७[र][६५०-१-२०२३]-१ मु.शा.प.

c:\data backup १८-१-२०१७\yadav २०२०\अधिवेशन कामकाज\२०२२\हिवाळी अधिवेशन-नागपूर\लक्षवेधी निवेदन.docx

निवेदन

**(श्री. दिपक केसरकर, शालेय शिक्षण मंत्री)**

केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत राज्य व केंद्र शासनाच्या, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या, खाजगी अनुदानित व अंशत: अनुदानित या शाळांमधील इ.१ ली ते इ.८ वी मधील विद्यार्थ्यांना केंद्र शासनाच्या निर्देशाप्रमाणे लाभ देण्यात येतो. ग्रामीण भागात शाळा व्यवस्थापन समितीव्दारे स्वयंपाकी तथा मदतनीस यांची आहार शिजवण्यासाठी नियुक्ती करण्यात येते. तसेच नागरी भागात महिला बचतगट/ संस्था यांच्यामार्फत केंद्रीय स्वयंपाकगृह प्रणालीव्दारे तयार आहाराचा पुरवठा करण्यात येतो. राज्यामध्ये सद्यस्थितीत १,५७,७८७ स्वयंपाकी तथा मदतनीस कार्यरत आहेत.

प्रस्तुत योजनेकरिता केंद्र व राज्य हिस्याचे प्रमाण ६०:: ४० असे आहे. केंद्र शासनाने स्वयंपाकी तथा मदतनीस यांच्या मानधनासाठी केंद्र हिस्सा रू.६००/- इतका निश्चित केला आहे. सदर मानधनामध्ये राज्य हिस्सा रू.४००/- इतका असणे अपेक्षित आहे. तथापि, शासन निर्णय दि.२३ जानेवारी, २०१९ नुसार स्वयंपाकी तथा मदतनीस यांच्या राज्य हिस्याच्या मानधनामध्ये रू.५००/- इतकी वाढ करून सदर हिस्सा रू.९००/- असा करण्यात आला आहे. तद्नुषंगाने सदर योजनेंतर्गत कार्यरत स्वयंपाकी तथा मदतनीस यांना वर्षातील १० महिन्याकरिता प्रतिमहा रू.१५००/- या प्रमाणे मानधन दिले जाते.

तसेच, सद्यस्थितीत स्वयंपाकी तथा मदतनीस यांच्या मानधनात राज्य हिस्यामध्ये वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

**************

विधानसभा लक्षवेधी सूचना क्र.९४७

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२२ चे चतुर्थ (हिवाळी) अधिवेशन

श्री. राजेश एकडे, श्री. अमित झनक, श्री. सुभाष धोटे, श्री. सहसराम कोरोटे, श्री. राजु पारवे वि.स.स. महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ नुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.९४७ पुढीलप्रमाणे आहे :-

बुलढाणा जिल्हयातील २ लाख ६८ हजार १९४ विद्यार्थी पोषण आहार योजनेअंतर्गत मिळणाऱ्या मध्यान्य भोजन योजनेस पात्र असणे, पोषण आहार वाटप करण्याकरीता शासनाकडून निविदा काढण्यात येऊन सदर वाटपाचे काम हे महाराष्ट्र कंज्युमर फेडरेशन मुंबई या संस्थेस मिळणे, सदर संस्थेकडे शालेय पोषण आहार वाटपा करता आवश्यक असलेली वाहन व्यवस्था व मनुष्यबळ उपलब्ध नसल्याने या संस्थेने बुलढाणा जिल्हयातील शाळांना पोषण आहाराचे वाटप न करता पोषण आहार वाटपाचे काम सबलेट करून दुसऱ्या कंत्राटदारास काम देणे, पोषण आहार वाटपाचे काम घेण्याआधी दोन कंत्राटदारांच्या वादामुळे एकमेकांच्या तक्रारी होणे, त्यामुळे प्रकरण न्यायप्रविष्ट होणे या कंज्युमर फेडरेशन आणि कंत्राटदार यांच्या गोंधळामुळे विद्यार्थी १९७ दिवसापासून हक्काच्या पोषण आहारापासून वंचित राहणे बुलढाणा जिल्हयासह अशीच गोंधळाची परिस्थिती आजूबाजूच्या जिल्हयामध्येही असणे, विद्यार्थ्यांना त्यांचे हक्काचा आहार मिळत नसल्यामुळे पालकांचा शासनाविषयी असंतोष निर्माण होणे, त्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाय योजना.

### निवेदन

### (श्री. दिपक केसरकर, शालेय शिक्षण मंत्री)

केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत राज्य व केंद्र शासनाच्या, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या, खाजगी अनुदानित व अंशत: अनुदानित या शाळांमधील इ.१ ली ते इ.८ वी मधील विद्यार्थ्यांना केंद्र शासनाच्या निर्देशाप्रमाणे लाभ देण्यात येतो.

सदर योजनेअंतर्गत शिक्षण संचालक (प्राथ.) यांच्या अध्यक्षतेखाली राज्य खरेदी समितीमार्फत तांदूळ वाहतूक व धान्यदी मालाच्या पुरवठयासाठी ई-निविदा प्रक्रियेव्दारे जिल्हानिहाय पुरवठेदार नियुक्त करण्यात येतात.त्यानुषंगाने बुलढाणा जिल्हयातील विद्यार्थ्यांना

योजनेचा लाभ देण्याकरीता मे. आशुतोष ट्रेडर्स, अकोला यांची नियुक्ती करण्यात आली आहे. कोविड-१९ विषाणू प्रार्दूभावामुळे उद्‌भवलेल्या परिस्थितीत केंद्र शासनाने कोरडा शिधा स्वरूपात प्रस्तुत योजनेचा लाभ देण्याचे निर्देश दिले होते. त्यानुषंगाने बुलढाणा जिल्हयातील माहे ऑगस्ट - २०२१ ते एप्रिल २०२२ या कालावधीतील एकुण १९७ कार्यदिनाकरीता प्रति विद्यार्थी प्रति दिन आहार खर्च मर्यादेत विद्यार्थ्यांना कोरडा शिधा स्वरूपात योजनेचा लाभ दिलेला आहे. तसेच कोविडचा प्रादूर्भाव कमी झाल्यानंतर विद्यार्थ्यांना पूर्वीप्रमाणे शिजवलेल्या आहाराच्या स्वरूपात योजनेचा लाभ देण्यात येत आहे.

राज्यातील अकोला जिल्हा वगळता इतर सर्व जिल्हयांमध्ये योजनेची अंमलबजावणी सुरळीतपणे सुरु आहे. अकोला जिल्हयासाठी पुरवठेदार नियुक्तीकरीता राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेबाबत मा. उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथे रिट याचिका क्र.३७२६/२०२२ दाखल झाली असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

**************

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२२ चे (हिवाळी) अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्रमांक १२१०**

**श्री. प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके, श्री. बाळासाहेब आजबे, श्री. संदिप क्षिरसागर वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १२१० पुढीलप्रमाणे आहे :-**

"राज्य शासनाने २०१७ मध्ये छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना राबवणे, सदर योजनेत एप्रील २०१२ ते जून २०१६ पर्यंत दीड लाखापर्यंत थकबाकी असणाऱ्या व दीड लाखापेक्षा जास्त थकबाकी असणाऱ्या शेतकऱ्यांनी दिड लाखावरील रक्कम भरणा करणाऱ्या शेतकऱ्यांना समावेश असणे, या योजनेत पात्र ठरलेल्या ८८,८४१ शेतकऱ्यांची छाननी प्रक्रिया सहकार विभागाच्या दुर्लक्षामुळे वेळेत पुर्ण न होणे, दरम्यान सन २०१९ मध्ये विधानसभेची सार्वत्रीक निवडणुक होणे, निवडणुकीनंतर सत्तेत आलेल्या महाविकास आघाडीच्या सरकारने महात्मा फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना जाहिर करणे, परंतू सदर ८८,८४१ शेतकऱ्यांचा या योजनेत समावेश न होणे, पर्यायाने पात्र ८८,८८,४१ शेतकरी अद्ययापही कर्जमाफी पासून वंचित रहाणे, यामुळे पात्र असणा-या शेतकऱ्यामध्ये शसना विरुध्द तिव्र असंतोष पसरणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची :पाययोजना"

---

**-: मंत्री (सहकार) यांचे निवेदन :-**

राज्य शासनाने शासन निर्णय दिनांक २८.०६.२०१७ अन्वये छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना घोषीत केली आहे. या योजनेअंतर्गत रु. १.५० लाखापर्यंतच्या कर्जास कर्जमाफी, रु. १.५० लाखावरील थकीत कर्जदारांसाठी एकवेळ समझोता योजना व सन २०१५-१६ व सन २०१६-१७ या कालावधीमध्ये पीक कर्जाची नियमीत परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी रु. २५ हजार पर्यंत प्रोत्साहनात्मक अनुदान देण्यात आले आहे.

या योजनेअंतर्गत कर्जमाफीसाठी रु. १३७०५ कोटी, एकवेळ समझोता योजनेसाठी रु. २६३० कोटी व प्रोत्साहनपर लाभासाठी रु. २४२७ कोटी याप्रमाणे एकुण रु. १८७६२ कोटी रकमेचा लाभ शेतकऱ्यांना देण्यात आला आहे.

राज्य शासनाने दिनांक २७.१२.२०१९ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ ही कर्जमाफी योजना अंमलात आणलेली आहे. सदर योजनेअंतर्गत विविध बँकांमार्फत योजना पोर्टलवर अपलोड करण्यात आलेल्या ३५.२० लाख कर्जखात्यांचे संगणकीय संस्करण करण्यात येऊन ३२.९३ लाख कर्जखात्यांना विशिष्ट क्रमांक देण्यात आला आहे. यापैकी ३२.३९ लाख शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण केले असुन त्यापैकी ३२.०३ लाख शेतकऱ्यांना रक्कम रु. २०,४२५ कोटी रकमेची कर्जमाफी दिली आहे. या योजनेअंतर्गत संगणकीय संस्करणामध्ये योजना निकषानुसार २.२७ लाख कर्जखाती योजना लाभास अपात्र ठरली आहेत. यामध्ये ८८,८४१ कर्जखाती शासनाच्या छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७ या योजनेअंतर्गत लाभास पात्र ठरलेली कर्जखाती असल्याने सदर कर्जखाती महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ अंतर्गत लाभास अपात्र ठरली आहेत. सदर कर्जखात्यांची एकुण रक्कम रु. ७११.१९ कोटी आहे.

उपरोक्त नमुद ८८,८४१ कर्जखाती छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७ या योजनेअंतर्गत लाभास पात्र / हरीत यादीमध्ये समाविष्ट आहेत. तथापी सदर योजनेत उक्त खात्यांना कर्जमाफीचा लाभ प्रदान करण्यात आलेला नाही. तसेच सदर कर्जखाती छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७ योजनेअंतर्गत लाभास पात्र ठरविण्यात आली असल्याने ही कर्जखाती महात्मा जोतिराव

फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ या योजनेअंतर्गत लाभास अपात्र ठरविण्यात आली आहेत. सदर कर्जखात्यांना कर्जमाफी योजनेचा लाभ अद्याप प्रदान करण्यात आलेला नाही. यास्तव या कर्जखात्यांना कर्जमाफीचा लाभ देण्याची कार्यवाही सुरु आहे.

************

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२२ चे चतुर्थ (हिवाळी) अधिवेशन

महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना क्र. १९७४

**मा. श्री. प्रकाश आबिटकर, श्री. सुभाष देशमुख, श्री. हरिभाऊ बागडे, श्री. रणधीर सावरकर, श्री. अतुल बेनके, श्री. अशुतोष काळे, श्री. कृष्णा खोपडे, श्री. विकास कुंभारे, श्रीम. श्वेता महाले वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सुचना पुढील प्रमाणे आहे:-**

"राज्यात मायक्रो फायनान्स कंपन्यांकडून व खाजगी सावकार यांचेकडून सर्वसामान्य नागरिकांची चौपट व्याजदर आकारणी करून आर्थिक लुबाडणूक सुरु असणे, ही लुबाडणूक थांबविण्यासाठी राष्ट्रीयकृत व सहकारी बँकापर्यंत पोहचू न शकणाऱ्या लहान-मोठ्या कर्जदारांना कर्ज देण्यासाठी महाराष्ट्रातील सहकारी पतसंस्था अत्यंत चांगल्या पद्धतीने कामकाज असणे, राज्य शासनाची कोणतीही आर्थिक मदत न घेता सद्यपरिस्थितीत लाखो ठेवी धारकांचे हजारो कोटी रुपये महाराष्ट्रातील २२ हजार पतसंस्थांमध्ये सुरक्षित पद्धतीने असणे, त्या माध्यमातून राज्यातील सुमारे अंदाजे ७.५० लाख कर्मचारी कार्यरत असणे, पतसंस्थांची चळवळ ही सावकारी व्याजापासून सर्वसामान्यांना मुक्त करण्यासाठी अत्यंत महत्वाची असून त्यासाठी शासनाने योग्य पद्धतीने निर्णय घेणे आवश्यक असणे, पतसंस्थांच्या कामकाजावर नियंत्रण ठेवण्यासाठी सहकारी अधिनियमामध्ये दुरुस्ती करून "नियामक मंडळाची स्थापना" करण्यात येणे, या नियामक मंडळातील जाचक अटींबाबत पतसंस्थानी सातत्याने तीव्र विरोध दर्शविलेला असणे, यामध्ये प्रामुख्याने अंशदान अनुदान रद्द करणे, 'ब' वर्ग सभासदांना कर्ज व्यवहारास मंजूरी देणे, कर्जवसुलीसाठी कलम १०१ ची प्रकरणे निकाली काढण्यासाठी सहकार विभागास योग्य ते आदेश देणे आवश्यक असणे, सहकारी बँकांच्या ठेवींना असणारी विमा संरक्षण सवलत पतसंस्थांनाही लागू करून राज्यातील लाखो ठेवीदारांच्या ठेवी सुरक्षित ठेवण्यासाठी राज्य शासनाने ठोस उपाययोजना करण्याची आवश्यकता असणे, याबाबत राज्य शासनाकडे वेळोवेळी बैठका, निवेदने, आंदोलने करूनही सहकार विभागाने पतसंस्थांच्या प्रश्नांकडे शासनाचे असलेलं अक्षम्य दुर्लक्ष व त्यामुळे निर्माण झालेला सर्वसामान्य सभासद यांचा असंतोष दूर करण्यासाठी कर्जदारांना कमी व्याज दरात सुलभपणे कर्ज मिळण्यासाठी व पतसंस्था चळवळीस बळकटीकरण करण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

---

**मा. मंत्री (सहकार) यांचे निवेदन-**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील तरतूदीनुसार राज्यामध्ये नागरी / ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थांची स्थापना करण्यात येते. सद्यस्थितीत राज्यात १३,४१२ नागरी / ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था आणि ६,५३६ कर्मचारी सहकारी पतसंस्था अशा एकूण १९,९४८ सहकारी पतसंस्था कार्यरत आहेत. या पतसंस्थांमध्ये ३.१० कोटी ठेवीदारांच्या एकूण रु. ९०,५०१ कोटी इतक्या रक्कमेच्या ठेवी आहेत. तसेच या पतसंस्थांच्या माध्यमातून सुमारे ४१,२६,००० कर्जदारांना रु. ६१,७९६ कोटींचे कर्जवाटप करण्यात आलेले आहे.

राज्यातील पतसंस्थांमध्ये मोठ्या प्रमाणावर झालेले गैरव्यवहार व अन्य कारणांमुळे ठेवीदारांच्या ठेवी मिळण्यात अडचणी येत होत्या. त्यामुळे ज्येष्ठ समाजसेवक श्री. अण्णा हजारे यांनी राज्यभर पतसंस्थांच्या कारभाराविरुद्ध व्यापक स्वरुपात जनआंदोलन उभारले होते. श्री. अण्णा हजारे यांनी सहकार कायद्यातील तरतूदी कडक करुन पतसंस्थांचे नियमन योग्य रितीने करणेबाबत सहकार आयुक्त आणि शासनास निवेदने दिली होती. तसेच याबाबत मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे जनहित याचिका क्र. ६०/२०११ दाखल करण्यात

आली होती. सदर जनहित याचिकेमध्ये मा. उच्च न्यायालयाने पतसंस्थामधील झालेल्या अनियमितांबाबत व ठेवीदारांच्या हिताचे रक्षण करण्याच्या हेतूने शासनामार्फत करावयाच्या उपाययोजनांबाबत प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे निर्देश शासनास दिले होते. मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार शासनाने पतसंस्थांसाठी स्वतंत्र प्रकरण कायद्यामध्ये समाविष्ट करण्याबाबत आणि ठेवीदारांसाठी विम्यासारखी योजना लागु करण्यात येईल असे प्रतिज्ञापत्र मा. उच्च न्यायालयांत सादर केले होते.

त्यानुषंगाने शासनाने राज्यातील नागरी / ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थांच्या कामकाजामध्ये गुणात्मक सुधारणा करण्यासाठी आणि त्यांच्या कामकाजावर नियंत्रण ठेवण्यासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मध्ये दिनांक ७.९.२०१७ रोजीच्या अधिसूचनेन्वये पतसंस्थांसाठी स्वतंत्र प्रकरण अकरा-१अ समाविष्ट केले.

त्यामधील तरतूदीनुसार राज्यातील बिगरशेती सहकारी पतसंस्थांसाठी दिनांक ३१.१.२०१९ रोजीच्या अधिसूचनेन्वये नियमाक मंडळ गठीत करण्यात आले आहे. सदर नियामक मंडळामध्ये पतसंस्थांचे ४ सदस्य आहेत. नियामक मंडळास पतसंस्थांमधील वैयक्तीक ठेवींची कमाल मर्यादा निश्चित करणे, ठेव / कर्जावरील व्याजदाराची किमान व कमाल मर्यादा ठरविणे, अंशदानाचा दर ठरविणे, प्रशासकीय व आस्थापना खर्चाची अनुज्ञेय कमाल मर्यादा ठरविणे, तसेच पतसंस्थांचे अधिकारी/ कर्मचारी यांच्या नियुक्तीसाठी किमान शैक्षणिक पात्रतेचे निकष ठरविणे इ. अधिकार प्राप्त झाले आहेत.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमातील तरतूदींनुसार स्थिरीकरण व तरलता निधी दिनांक ११.९.२०१९ रोजीच्या अधिसूचनेन्वये स्थापन करण्यात आला आहे. सदर निधीसाठी नियामक मंडळाने ठरविलेल्या दराने व पद्धतीने पतसंस्थांनी अंशदान द्यावयाचे आहे. सद्यस्थितीत हा दर १० पैसे प्रति १०० रुपये ठेव असा आहे. मात्र अशा प्रकारे अंशदान देण्यास बऱ्याच पतसंस्थांनी तसेच पतसंस्था फेडरेशन ने विरोध केला असून अंशदानाची तरतूद रद्द करण्याची मागणी देखील केली आहे. तथापि तरलता निधीमधून अडचणीत आलेल्या पतसंस्थांमधील ठेवीदारांना मदत करण्यात येणार असल्याने भविष्यामध्ये पतसंस्था आर्थिक अडचणीमध्ये आल्यास सामान्य ठेवीदारांना त्यांच्या ठेवीची रक्कम तात्काळ उपलब्ध होणार आहे. त्यामुळे ठेवीदारांचे आर्थिक हिताचे रक्षण होणार आहे. या सर्व बाबी विचारात घेता, नियामक मंडळाने लागु केलेले अंशदान रद्द करणे उचित होणार नाही. तथापि याबाबत तातडीच्या अंमलबजावणीची आवश्यकता विचारात घेऊन संबंधीत घटकांशी चर्चा करुन सुयोग्य अंशदान लागू करण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे.

बिगर सभासदांना कर्जवाटप केल्यास त्यांच्या कडून थकीत कर्जवसूलीमध्ये अनेक अडचणी निर्माण होत असल्याने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ४५ मधील तरतूदीनुसार पतसंस्थांना त्यांनी कर्ज वाटप केलेल्या प्रत्येक व्यक्तीला (कर्जदाराला) सभासद करुन घेणे बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच नियमित सभासदास कर्जवाटप केल्यास त्यांचे कर्जवाटपाचे प्रमाणात भाग कपात करण्यात येतात. त्यामुळे संस्थेच्या भाग भांडवलात वाढ होवून संस्थेच्या स्वनिधीमध्ये वाढ होते. त्यामुळे पतसंस्थांनी कर्जदारांना सभासद करुन घेऊनच कर्ज देणे उचित आहे. सद्यस्थितीत सहकार कायद्यामध्ये पतसंस्थांसाठी समाविष्ट केलेल्या प्रकरणातील तरतूदीनुसार कर्जदाराला तसेच ठेवीदारालादेखील सभासद करुन घेणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०१ अन्वये सहकारी संस्थांकडे थकीत कर्जाच्या वसुलीसाठी वसूली प्रमाणपत्र सहाय्यक निबंधक यांचेकडून देण्याची तरतूद आहे. याबाबत सहकार आयुक्त यांनी दिनांक १४.७.२०२१ रोजी परिपत्रकाद्वारे ३ महिन्यात वसूली दाखले निर्गमीत करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

****

H/882-19

लक्षवेधी सूचना क्र.५०१ राज्य उत्पादन शुल्क विभाग

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२२ चे चतुर्थ (हिवाळी) अधिवेशन**

**श्री.अभिमन्यु पवार, श्री.राणाजगजीतसिंह पाटील, श्री.राजेश पवार, श्रीमती नमिता मुंदडा, श्री.ज्ञानराज चौगुले, श्री.भास्कर जाधव, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.५०१ पुढीलप्रमाणे आहे:-**

"महाराष्ट्र दारुबंदी कायदा ची प्रभावीपणे अंमलबजावणी तसेच दोषसिध्दीचे प्रमाणामध्ये सुधारणा करण्यासाठी वेळोवेळी शासनाकडून कार्यवाही होत आलेली असणे, परंतु महाराष्ट्र दारुबंदी कायद्याचा विचार करता दरवर्षी महाराष्ट्रामध्ये सरासरी १ लक्ष गुन्हे दाखल होत असून फक्त नागपूर परिक्षेत्राचा विचार करता सरासरी २४,००० गुन्हे दाखल होत असून या कायद्यामध्ये दोषसिद्धीचे प्रमाण लक्षात घेता १% पेक्षा कमी असणे, महाराष्ट्र दारुबंदी कायद्याखाली दाखल झालेल्या प्रत्येक सौम्य / गंभीर गुन्ह्यामध्ये एफ.आय.आर., पंचनामा, मुद्देमाल जप्ती, FSL रिपोर्ट प्राप्त करणे व गुन्ह्यांचे सविस्तर तपास करुन न्यायालयामध्ये दोषारोप घटनास्थळ पत्र सादर करावे लागत असणे, त्याचबरोबर न्यायालयाकडुन प्रत्येक गुन्ह्याचा निपटारा करण्यात येत असणे, गुन्हा दाखल झाल्यानंतर तपास करण्याकरीता काही दिवस ते काही महिन्याचा कालावधी लागत असणे, न्यायालयामध्ये सदर गुन्ह्याची केस चालविण्यासाठी काही महिन्याचा कालावधी लागत असणे, त्याचबरोबर केसची न्यायालयीन सुनावणी होवुन निकाल लागेपावेतो काही महिन्याचा कालावधी लागणे, यासंपुर्ण प्रकिये दरम्यान जप्त केलेला मुद्देमाल पोलीस स्टेशनमध्ये जमा असणे, या प्रकियाकरीता बराच कालावधी जात असुन सुध्दा विविध कारणास्तव गुन्हे शाबीतीचे प्रमाण ०.५% याप्रमाणे अल्प असणे, यावरुन प्रचलीत कार्यपध्दतीद्वारे करण्यात येणारी कार्यवाही प्रभावी ठरत नसल्याचे दिसुन येत असणे, या कायद्याची परिणामकारक अंमलबजावणी करण्यामध्ये अपराध हे कोणतीही जोखीम न पत्करता उच्च लाभ मिळविण्याचे झालेले असल्याने अडचणी निर्माण होत असणे, त्याचप्रमाणे मोठ्या संख्येमध्ये दाखल होणाऱ्या दारुबंदी गुन्ह्यामुळे गंभीर गुन्ह्याचा तपासाच्या व अभियोग चालविण्याच्या गुणवत्तेवर परिणाम होत असणे, महाराष्ट्र दारुबंदी कायदा हा एक सामाजिक कायदा असुन जेव्हा संघटीत गुन्हेगारी टोळ्या करुन मोठ्या प्रमाणात दारुची निर्मीती, विक्री, वाहतुक व तस्करी संघटीतरित्या केली जाते, तेव्हा त्यांचेविरुध्द कटोरपणे कार्यवाही करणे गरजेचे असणे, त्याचबरोबर अशा गुन्ह्याचे गांभिर्यपुर्वक व गुणात्मक तपास करुन गुन्हेगाराना कडक शिक्षा होणे आवश्यक असणे, तथा लहान गुन्ह्याकरीता एफ.आय.आर. दाखल करणे, तपास करणे, दोषारोपपत्र न्यायालयात पाठविणे व खटला चालविणे याकरीता लागणारे मनुष्यबळ कमी करुन गुन्हे शाबीतीचे प्रमाण कमीतकमी ६०% ते ८०% नी वाढविणे, शिक्षेच्या सुनिश्चीतीची खात्री करणे, लोकांना दारुबंदी कायद्याचे तरतुदीचे उल्लंघन करण्यापासून थांबविण्यासासाठी महाराष्ट्र दारुबंदी कायद्यात सुधारणा करणे आवश्यक असणे, दारुबंदी कायद्याखालील अपराध हे केवळ कमी जोखीमेचे व उच्च लाभ मिळविण्याकरीता न राहता कोणतेही जोखिम न पत्करता फक्त लाभ मिळविण्याचे झालेले असणे, ज्यामुळे, गुन्हेगारांमध्ये शिक्षा होण्याचा धाक नाहीसा झाल्याने दिवसेंदिवस त्यांचे धाडस वाढत असणे, त्यामुळेच, दारुबंदी कायद्यामधील तरतूदींचे योग्य आणि प्रभावी अंमलबजावणीसाठी शिक्षेच्या सुनिश्चीततेची खात्र करणे आणि या कायद्याचे तरतूदींमध्ये सुधारणा करणे सद्यस्थितीचा विचार करता अधिक महत्वाचे झालेले असणे, दारुबंदी कायद्याची परिणामकारक अंमलबजावणी करून दारुबंदी कायद्याखाली दाखल गुन्ह्यांत अभियोगांच्या प्रक्रियेमध्ये सुलभता आणणे,

गंभीर / गुणात्मक आणि किरकोळ / लहान प्रकरणामध्ये भेद करणे तसेच किरकोळ / लहान प्रकरणाकरीता अभियोगाची क्रियारिती सुकर करणे, उपलब्ध माहीतीचे आधारावर विश्लेषण करुन पोलीस, अभियोजन पक्ष व न्यायालय या संस्थेवरील कामाचा भार कमी करणे या आणि इतर सुधारणा करणे गरजेचे असणे, तसेच सामाजिक दृष्या विचार करता राज्यातील प्रत्येक गावातील अनेक कुटुंब दारूच्या वाढते प्रमाण व गैर प्रसार यामुळे उधवस्त झाली असून गावातील महिलांचा दारू बंदी व दारूच्या वाढत्या प्रसाराला नेहमी विरोध राहीला असणे, यादृष्टीने शासनाने तातडीने महाराष्ट्र दारुबंदी कायदा- १९४९ ची प्रभावीपणे अंमलबजावणी होण्यासाठी कायद्यात सुधारणा करण्याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना. "

---

## मा.मंत्री (राज्य उत्पादन शुल्क) यांचे निवेदन.

महाराष्ट्र दारुबंदी कायदा, १९४९ ची अंमलबजावणी दि.१६ जून, १९४९ पासून सुरू झाली आहे. या कायद्यान्वये अवैध मद्य निर्मिती, विक्री, वाहतूक, बाळगणे इ. अपराध करणाऱ्या इसमांविरुध्द कारवाई करण्याचे अधिकार दिलेले आहेत. तसेच या कायद्यान्वये असे अपराध करणाऱ्या इसमांना द्रव्यदंड किंवा कैदेची शिक्षा किंवा दोन्ही शिक्षा देण्याचे अधिकार मा. न्यायालयास आहेत. राज्य उत्पादन शुल्क विभागातील निरीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्यांना महाराष्ट्र दारुबंदी कायद्यांतगत गुन्हा नोंद करण्याचे व तपास करण्याचे अधिकार शासनाने दि.२१ मे, १९७४ च्या पत्रान्वये व दुय्यम निरीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्यांना शासन अधिसूचना दि.१६.१.१९९१ अन्वये देण्यात आलेले आहेत. पोलीस विभागातील अधिकाऱ्यांना या कायद्यांतगत गुन्हे नोंदविण्याचे अधिकार या कायद्याची अंमलबजावणी सूरु झाल्यापासून आहेत.

२. राज्य उत्पादन शुल्क विभागाने सन २०१७-१८ ते सन २०२२-२३ (माहे नोव्हेंबर, २०२२ अखेर) या आर्थिक वर्षात राज्यात नोंदविलेल्या गुन्ह्यांची विगतवारी खालीलप्रमाणे आहे.

| वर्ष | एकूण गुन्हे | वारस | बेवारस | अटक आरोपी | मुद्देमालाची किंमत (रु. लाखात) |
|---|---|---|---|---|---|
| २०१७-१८ | ४५३३२ | २६१४८ | १९१८४ | २६७६१ | १०६२.९२ |
| २०१८-१९ | ४४०८२ | ३०७०८ | १३३७४ | ३०९६० | १४०४.४० |
| २०१९-२० | ४६६४८ | ३२६३० | १४०१८ | ३३०५५ | ११५०७.६० |
| २०२०-२१ | ४५८६७ | २९४५३ | १६४१४ | २९३९२ | १०८९४ |
| २०२१-२२ | ४७७४९ | ३४५४२ | १३२०७ | ३५०५४ | १४४४२ |
| २०२२-२३ ( एप्रिल-२२ ते नोव्हेंबर-२२) | ३४,२७८ | २६,६२५ | ७,६५३ | २८,३२७ | १०६३४ |

३. राज्य उत्पादन शुल्क विभागामार्फत प्रामुख्याने महाराष्ट्र दारुबंदी कायदा, १९४९ अंतर्गत गुन्हे नोंदविले जातात. नोंदविलेल्या एकूण गुन्ह्यांपैकी बहुतांश गुन्हे या कायद्याच्या कलम ६५ अन्वये नोंदविलेले असतात. महाराष्ट्र दारुबंदी कायद्यातील कलम ६५ अन्वये बेकायदेशीरपणे मद्याची आयात, निर्यात, वाहतूक, खरेदी-विक्री, आसवनी / ब्रुवरीची उभारणी करणे, मद्य तयार करणे इ. प्रकारचे अपराध करणा-या इसमास दोषसिध्दीनंतर मा. न्यायालय किमान ३ वर्ष ते ५ वर्षापर्यंत कैदेची शिक्षा किंवा किमान रु.२५,०००/- ते रु.५०,०००/- पर्यंत द्रव्यदंड किंवा दोन्ही शिक्षा देऊ शकते अशी तरतूद आहे. सदर शिक्षा जप्त करण्यात आलेल्या मळी/ मद्य / मद्यार्काच्या परिमाणावर अवलंबून नाही.

४. महाराष्ट्र दारुबंदी कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी तसेच दोषसिध्दीचे प्रमाण वाढविण्यासाठी करण्यात आलेल्या उपाययोजनांची माहिती खालीलप्रमाणे आहे.

अ) अवैध दारु विक्री, निर्मिती व इतर संलग्न बाबी संदर्भात करावयाच्या कार्यवाहीबाबत सविस्तर सुचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. त्यामध्ये पोलीस व राज्य उत्पादन शुल्क विभागाने एकत्रित कार्यवाहीच्या सूचना दिलेल्या आहेत. दरमहा बैठक घेऊन माहितीचे आदान प्रदान करावे तसेच ३ पेक्षा जास्त वेळेस कारवाई झालेल्या इसमाविरुध्द एम.पी.डी.ए. १९८१ अन्वये कारवाई कालबध्द स्वरुपात होईल याकडे पोलीस घटक प्रमुखाने विशेषत्वाने लक्ष देण्याचे व इतर निर्देश दिले आहेत. तसेच, ग्रामरक्षक दलाने केलेल्या तक्रारीची तातडीने दखल घेण्यात यावी व तसे न केल्याचे आढळल्यास आणि त्या ठिकाणी अवैध दारुधंदे सुरु असल्याचे आढळल्यास संबंधित अधिकाऱ्यावर कर्तव्यात कसूर केल्याबाबत शिस्तभंगविषयक कारवाई करण्याच्या सूचना शासन परिपत्रक दि.१ मार्च, २०१७ अन्वये दिलेल्या आहेत.

आ) जनतेला अवैध मद्य निर्मिती व विक्री बाबत तक्रार करण्यासाठी व्हॉट्सॲप क्रमांक ८४२२००११३३ व टोल फ्री क्र. १८००२३३९९९९ उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क कार्यालयात नियंत्रण कक्ष स्थापित केलेला आहे. तो अहोरात्र कार्यरत असतो.

इ) राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून दाखल करण्यात येणाऱ्या गुन्ह्यांच्या संदर्भातील दोषारोपपत्र व त्याची गुणात्मकता वाढविण्यासाठी वैधानिक सहाय्य मिळावे यासाठी कंत्राटी पध्दतीने विधि अधिकारी / विधि सल्लागार प्रत्येक जिल्ह्यात भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

ई) महाराष्ट्र दारुबंदी कायदा, १९४९ मधील कलम ९३ अन्वये सराईत गुन्हेगारांविरुध्द प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात येते व त्यांच्याकडून चांगल्या वर्तणूकीचे बंधपत्र घेण्याचे अधिकार उपविभागीय दंडाधिकारी / सहाय्यक पोलीस आयुक्त यांना आहेत.

उ) गुन्हा अन्वेषणाची गुणात्मकता वाढविण्यासाठी कायद्यातील प्रचलित तरतूदी, कार्यपध्दती, तपासी अधिकारी यांनी घ्यावयाची आवश्यकता, दोषारोपपत्र बिनचूक सादर करण्याकरिता घ्यावयाची खबरदारी व अनुषंगिक बाबींसंदर्भात सविस्तर सूचना क्षेत्रीय अधिकारी यांना देण्यात आल्या आहेत.

ऊ) विभागीय स्तरावर कार्यशाळा घेऊन गुन्हा अन्वेषणाची कामगिरी उत्तम करण्यासाठी प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात येतात.

५. या विभागात दोषसिध्दीचे प्रमाण १% पेक्षा कमी आहे. त्यामुळे महाराष्ट्र दारुबंदी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी कायद्यात सुधारणा करणे, गुन्ह्याचे स्वरुप विचारात घेऊन शिक्षेचे परिमाण ठरविणे, तसेच दोषसिध्दीच्या अल्प प्रमाणास कारणीभूत असलेल्या कारणांचा शोध घेऊन त्यावर उपाययोजना सुचविणे याबाबत सविस्तर अभ्यास करुन शासनास प्रस्ताव सादर करण्यासाठी एक स्वतंत्र अभ्यासगट स्थापन करण्याच्या सूचना दि.२५.११.२०२२ च्या पत्रान्वये आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क यांना दिल्या आहेत.

६. राज्य उत्पादन शुल्क विभाग हा राज्यास महसूल देणारा महत्त्वाचा विभाग आहे. विभागाकडून गुन्हा अन्वेषणा संदर्भात होणाऱ्या कारवाईमुळे राज्याच्या महसूलाचे संवर्धन होत असते. यामुळे कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणी बरोबरच दोषसिध्दीचे प्रमाण वाढविण्यासाठी विभागातील मनुष्यबळाचे सक्षमीकरण करण्याबरोबरच अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करण्याचा विभागाचा प्रयत्न राहील.

*******

राज्य उत्पादन शुल्क विभाग

**विधानसभा लक्षवेधी सुचना क्र. ९०२**

**सन २०२२ चे चतुर्थ (हिवाळी) अधिवेशन**

**श्री.प्रशांत ठाकूर, श्री.महेश बालदी, श्री.समीर कुणावार, श्रीमती मनिषा चौधरी, श्री.अमित साटम, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-**

"पनवेल महानगरपालिका हद्दीतील सिडको लि.ने विकसित केलेल्या खारघर नोडला दारुमुक्त क्षेत्र (No Liquor Zone) म्हणून पनवेल महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेच्या ठरावामध्ये नमूद केला गेला असल्याचे माहे डिसेंबर २०२२ रोजी उघडकीस येणे, बहुतांशी सुशिक्षित नागरिकांची वस्ती असलेला खारघर नोड शैक्षणिक हब म्हणून ओळखला जाऊ लागला असणे, खारघर नोड विकसित झाल्यापासून एकही मद्यविक्रीचे दुकान उक्त परिसरात अस्तित्वात नसणे, अशा परिस्थितीत संबंधित विभागामार्फत खारघर परिसरात मद्यविक्रीचा परवाना दिला गेला असणे, मद्यविक्रीचा परवाना दिला गेल्यामुळे खारघर परिसरात वातावरण गढूळ होवून नागरिकांच्या विशेषत: महिला वर्गाच्या मनात असुरक्षिततेची भावना निर्माण होणे, त्यामुळे नागरिकांच्या मनात निर्माण झालेल्या प्रचंड असंतोषाबाबत शासनाने खारघर परिसरातील मद्यविक्री परवाना रद्द करुन दारुमुक्त क्षेत्र (No Liquor Zone) म्हणून घोषित करण्याबाबत तातडीने करावयाची आवश्यक ती कार्यवाही तसेच याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

---

**मा.मंत्री (राज्य उत्पादन शुल्क) यांचे निवेदन.**

मुंबई दारुबंदी अधिनियम, १९४९ (ग्रामसभा ठराव पारित केल्यामुळे अथवा नगरपरिषद / महानगरपालिकेच्या वार्डातील मतदारांनी निवेदन दिल्यामुळे अनुज्ञप्ती बंद करणे) आदेश, २००८ आणि शासन अधिसुचना, गृह विभाग, दिनांक १२.०२.२००९ अन्वये, एखाद्या वार्डामध्ये स्थानिकांना दारुबंदी करावयाची असल्यास, नगरपरिषद / महानगरपालिका क्षेत्रातील एखाद्या वार्डातील २५% पेक्षा अधिक महिला मतदार किंवा एकुण मतदार यांनी लेखी निवेदन देऊन संबंधित वार्डातील मद्य विक्रीची अनुज्ञप्ती बंद करण्याची मागणी केल्यास, अशा अर्जाची पडताळणी करुन, विहीत कार्यपध्दती अनुसरुन गुप्त पध्दतीने मतदान घेण्याची प्रक्रिया पुर्ण करण्यात येईल, असे विहित करण्यात आले आहे. त्यानुसार, संबंधित वार्डातील एकुण मतदार किंवा महिला मतदारांच्या संख्येच्या किमान ५० % पेक्षा अधिक अनुक्रमे एकुण मतदार किंवा महिला मतदार यांनी मद्य विक्रीची अनुज्ञप्ती बंद करण्याच्या बाजुने मतदान केल्यास त्या क्षेत्रात मद्य विक्री अनुज्ञप्ती बंद करण्याबाबतची तरतूद करण्यात आली आहे. महानगरपालिकेच्या ठरावाद्वारे महानगरपालिका हद्दीतील सर्व मद्यविक्री अनुज्ञप्त्या बंद करण्याची तरतूद सदर आदेश व

अधिसुचनेमध्ये नाही. तसेच, परवाना कक्ष अनुज्ञप्ती मंजूर करतेवेळी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था यांच्याकडील ना-हरकत घेण्याची तरतूद प्रचलित नियमात नाही.

पुर्वाश्रमीचे खारघर ग्रामपंचायतीमध्ये ठराव क्र. ८, दि. ०७/०२/२००५ अन्वये ग्रामपंचायत हद्दीमध्ये दारुबंदी करण्याचा ठराव पारीत करण्यात आला होता. तद्नंतर, पनवेल महानगरपालिका सर्वसाधारण महासभेतील आयत्या वेळेचा ठराव क्र.१, दि. १८/१२/२०१७ अन्वये, पनवेल महानगरपालिका हद्दीतील सर्व प्रकारच्या किरकोळ व घाऊक मद्य विक्री व साठा अनुज्ञप्ती न देणेबाबत ठराव पारीत करण्यात आला. याअनुषंगाने, महानगरपालिका हद्दीतील सर्व मद्यविक्री अनुज्ञप्त्या बंद करण्याकरिता महानगरपालिकेच्या ठरावाद्वारे अशी कृती करण्याची तरतूद नाही. त्यामुळे, अशा प्रकारचा कोणताही ठराव विचारात घेता येऊ शकणार नाही, असे शासनपत्र, दि.२१.०९.२०१९ अन्वये आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांना कळविण्यात आले आहे.

पनवेल महानगरपालिका प्रशासकीय ठराव क्र. ५६२, दि.२८/११/२०२२ अन्वये पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती "अ" मधील, सर्व प्रकारच्या किरकोळ व घाऊक मद्य विक्री व साठा अनुज्ञप्ती न देणेबाबत ठराव पारीत करण्यात आला. याअनुषंगाने, सदर ठराव हा मुंबई दारुबंदी अधिनियम, १९४९ (ग्रामसभा ठराव पारित केल्यामुळे अथवा नगरपरिषद / महानगरपालिकेच्या वार्डातील मतदारांनी निवेदन दिल्यामुळे अनुज्ञप्ती बंद करणे) आदेश, २००८ आणि शासन अधिसुचना, गृह विभाग, दिनांक १२.०२.२००९ शी सुसंगत नसल्याचे अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, रायगड-अलिबाग यांच्या दि.२९.११.२०२२ व दि.०९.१२.२०२२ च्या पत्रान्वये आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांना कळविले आहे.

सद्य:स्थितीत खारघर प्रभागामध्ये २ एफएल-३ (परवाना कक्ष) अनुज्ञप्त्या कार्यरत आहेत.यापैकी एक अनुज्ञप्ती सन २००४, दुसरी अनुज्ञप्ती सन २०१५ पासून कार्यरत असून, एक एफएल-३ अनुज्ञप्तीचा प्रस्ताव जिल्हास्तरीय समितीच्या सप्टेंबर, २०२२ मध्ये झालेल्या बैठकीत मंजुर करण्यात आला आहे.

*******

राज्य उत्पादन शुल्क विभाग

विधानसभा लक्षवेधी सुचना क्र. १३६७

सन २०२२ चे चतुर्थ (हिवाळी) अधिवेशन

**श्री. धर्मरावबाबा आत्राम, श्री. नरेंद्र भोंडेकर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-**

"'गडचिरोली व भंडारा जिल्हयात मोहफुल हे मुख्य वनउपज असणे, मोहफुलास योग्य दर मिळत नसल्यामुळे आदिवासी शेतकऱ्यांना व स्थानीक बचत गटांना अतिरीक्त उत्पन्नाचा स्त्रोत निर्माण होण्याच्या दृष्टीने मद्यार्क निर्मीती प्रक्रियेमध्ये बदल करण्याकरीता शासन निर्णय क्र. एमआयएस-०९२०/प्र.क्र. १५४/राउशु-२ दि.२३/६/२०२२ जारी करणे, सदर शासन निर्णयाच्या अनुशंगाने गडचिरोली जिल्हयात मोहफुलावर आधारीत मद्यार्क निर्मीतीचे उद्योग सुरु होवून रोजगार निर्मीती होण्याची शक्यता, त्याअनुशंगाने गडचिरोली जिल्हयातून मद्य निर्मीती उद्योग सुरु करण्याकरीता शासनास प्राप्त झालेले प्रस्ताव, प्राप्त प्रस्तावापैकी किती प्रस्तावास मंजूरी प्राप्त होणे. प्राप्त प्रस्तावांपैकी उर्वरीत प्रस्तावास मंजूरी मिळण्याकरीता विलंबाची कारणे, प्रलंबीत प्रस्तावाबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमीका ""

---

<u>मा.मंत्री (राज्य उत्पादन शुल्क) यांचे निवेदन.</u>

गृह विभाग, शासन निर्णय दि.२३.०६.२०२२ नुसार, काजूबोंडे, मोहाफुले पासून उत्पादित केलेल्या मद्यास "देशी मद्य" याऐवजी "विदेशी मद्य" असा दर्जा देणे व या पदार्थासह फळे, फुले यापासून मद्यार्क उत्पादन व त्यापासून विदेशी मद्य निर्मिती करण्यासाठी धोरण विहित करण्यात आलेले आहे.

वरील धोरणानुसार, काजूबोंडे, मोहाफुले या पदार्थासह फळे, फुले यापासून मद्यार्क व मद्य उत्पादन करण्यासाठी, महाराष्ट्र मद्यार्क आसवन व पेय मद्य निर्मिती नियम, १९६६ नुसार नमुना-I अनुज्ञप्ती (मद्यार्क निर्मितीकरीता) व पीएलएल अनुज्ञप्ती (मद्य निर्मितीकरीता) मंजुरीचे अधिकार शासनास आहेत. महाराष्ट्र दारुबंदी कायदा, १९४९ नुसार नमुना-I/ पीएलएल व सीएल-१ (मळी व्यतिरीक्त) /बीआरएल अनुज्ञप्ती (वायनरी व मायक्रोब्रुवरी) मंजूर करण्याआधी इरादापत्र मंजूर करणे व त्यास मुदतवाढ देण्याबाबतची कार्यपध्दती शासन निर्णय, दि.०८.११.२०२१ अन्वये विहित करण्यात आली आहे.

गृह विभाग, शासन निर्णय दि.२३.०६.२०२२ मधील तरतुदीनुसार, सद्य:स्थितीत गडचिरोली जिल्हयात एकूण ४ संस्थांनी मोहफुलांपासून मद्यार्क आणि मद्य उत्पादन करण्यासाठी अनुज्ञप्ती मंजूर करण्याबाबतची विनंती राज्य उत्पादन शुल्क विभागास केली आहे. शासन निर्णय, दि.०८.११.२०२१ अन्वये विहित करण्यात आलेल्या कागदपत्रांची पूर्तता करण्याबाबत संबंधित अर्जदारांना कळविण्यात आले आहे. विहित कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर सक्षम स्तरावर मान्यता देऊन संबंधित संस्थाना मोह फुलापासून मद्यार्क उत्पादन व मद्य निर्मितीसाठीच्या अनुज्ञप्ती प्रदान करण्यात येतील.

*******

राज्य उत्पादन शुल्क विभाग

विधानसभा लक्षवेधी सुचना क्र. १५०७

सन २०२२ चे चतुर्थ (हिवाळी) अधिवेशन

श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

" " जळगांव जिल्हयातील मुक्ताईनगर येथे बनावट देशी व विदेशी दारु विक्री संदर्भात राज्य उत्पादन शुल्क विभागाचे विभागीय निरिक्षक श्री.सुजित कपाटे यांनी राज्य उत्पादन शुल्क कार्यालय, भुसावळ येथे ११/२०२२ नुसार दि.८.१.२०२२ रोजी गुन्हा दाखल करणे, सदरहू प्रकरणी गुन्हा दाखल होऊन विभागीय निरिक्षक यांनी स्थानिक बनावट दारुच्या रॅकेटच्या हस्तक व राजकीय पुढा-यांच्या संगनमताने सदरील कारवाई स्थगित करणे, सदर प्रकरणी सखोल चौकशी करणे अपेक्षित असतांना थातूरमातूर चौकशी करुन एक दिवसांची पोलिस कस्टडी देणे, या प्रकरणाच्या कारवाईवरुन आर्थिक व्यवहार करुन सदरील प्रकरण दडपण्याचा प्रयत्न होत असल्याचा स्थानिक नागरिकांमध्ये निर्माण झालेला संशय, या प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे ऑक्टोबर, २०२२ रोजीच्या सुमारास प्रशासनाकडे चौकशी करण्याची केलेली मागणी, परंतु अद्यापही या संदर्भात कोणतीच कारवाई होत नसल्याने सर्वसामान्य नागरिकांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कारवाई, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका. ""

---

मा.मंत्री (राज्य उत्पादन शुल्क) यांचे निवेदन.

निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, भुसावळ यांनी दि.०८.०१.२०२२ रोजी त्यांना मिळालेल्या माहितीवरुन मोटार सायकलवरुन मद्याची वाहतूक करताना एका इसमाला पकडले. त्याच्या चौकशीतील माहितीनुसार सदर मद्य ज्या ठिकाणी जाणार होते, त्या हॉटेल/ ढाब्यावर छापा टाकला असता तेथे सुध्दा मद्य जप्त करण्यात आले. याअनुषंगाने, महाराष्ट्र दारुबंदी कायदा, १९४९ अंतर्गत गु.र.क्र.११/२०२२ दि.०८.०१.२०२२ रोजी नोंदविलेला आहे. सदर गुन्हयाच्या प्रथम खबरी अहवालामध्ये ३ आरोपीत इसमांची नावे नमूद करण्यात आलेली आहेत. या गुन्हयात जप्त करण्यात आलेल्या एकूण मुद्देमालाची किंमत रु.१,०२,६८२/- इतकी आहे.

सदर गुन्हयात दि.०८.०१.२०२२ रोजी अटक करण्यात आलेल्या २ इसमांना मा.न्यायालयासमोर हजर केले असता, त्यांना दि.११.०१.२०२२ पर्यंत पोलीस कोठडी देण्यात आली होती. सदर गुन्हयातील तपासात आढळून आलेल्या चार आरोपींविरुध्द दि.१३.१२.२०२२ रोजी मा.न्यायालयात अंतिम अहवाल/ दोषारोपपत्र दाखल केले असून, प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

"राज्य उत्पादन शुल्क विभागाचे विभागीय निरिक्षक श्री.सुजित कपाटे, राज्य उत्पादन शुल्क कार्यालय, भुसावळ, (जि.जळगाव) यांची चौकशी होणेबाबत" अशा आशयाचे मा.श्री.चंद्रकांत पाटील, सन्माननीय विधानसभा सदस्य यांचे दि.१२.०१.२०२२ रोजीचे निवेदन या विभागास प्राप्त झाले होते. त्यानुषंगाने विभागीय उपआयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, नाशिक विभाग, नाशिक यांनी अधीक्षक,

राज्य उत्पादन शुल्क, नंदूरबार यांच्या अध्यक्षतेखाली त्रिस्तरीय चौकशी समिती नेमली होती. सदर समितीने चौकशी करुन अहवाल सादर केला असून, अहवालात सदर गुन्हयाच्या तपासाची दिशा व रुपरेषा योग्य पध्दतीने सुरु असल्याचे नमूद केले आहे.

*******